INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING
UNIVERSITY OF MUMBAI

# तृतीय वर्ष कला

## सत्र - V (CBCS)

## इतिहास अभ्यासपत्रिका क्र. - IX

# इतिहास संशोधन पद्धती आणि साधने

## विषय कोड: 97182

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रवींद्र कुलकर्णी**
प्र. कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| **कार्यक्रम समन्वयक** | : | **प्रा. अनिल बनकर**<br>सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व<br>प्रमुख, मानव्यविद्या शाखा,<br>दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| **अभ्यास समन्वयक** | : | **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**<br>सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,<br>दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| **संपादक** | : | **डॉ. प्रकाश मसराम**<br>प्रभारी विभाग प्रमुख, इतिहास विभाग,<br>मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रूझ पूर्व, मुंबई. |
| **लेखक** | : | **डॉ. बबन भिवसेन जाधव**<br>प्राध्यापक, इतिहास विभाग<br>एस. एम. डी. एल. महाविद्यालय,सेक्टर 3 ई,<br>काळंबोली, नवी मुंबई.<br><br>**डॉ. नरेश मधुकर मडावी**<br>सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग<br>गोंडवना विद्यापीठ. एम. आय. डी. सी. रोड, गडचिरोली.<br><br>**डॉ. अजयकुमार लोखंडे**<br>सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,<br>के. व्हि. पेंढारकर महाविद्यालय (स्वायत्त),<br>डोंबिवली (पु.), जि. ठाणे.<br><br>**प्रा. अविनाश कैलास पवार**<br>सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,<br>एस. एम. डी. एल. महाविद्यालय, सेक्टर 3 ई,<br>काळंबोली, नवी मुंबई. |

**ऑगस्ट २०२२, मुद्रण - १**    **ISBN 978-93-95130-38-7**

**प्रकाशक** : **संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | इतिहास– अर्थ, व्याप्ती व स्वरूप | १ |
| २. | इतिहासाचे महत्त्व | २० |
| ३. | इतिहासाची साह्यकारी शास्त्रे | ३१ |
| ४. | इतिहासाचे स्रोत / साधने, स्वरूप आणि प्रकार | ५४ |
| ५. | साधनांची सत्यता आणि विश्वसनीयता | ७१ |
| ६. | पुराभिलेखीय साधनांचे महत्त्व | ८३ |
| ७. | तथ्य संकलन पद्धती | १०५ |
| ८. | स्रोतांचे विश्लेषण आणि सामान्यीकरण | ११५ |
| ९. | तळटीपा आणि ग्रंथसूची | १२७ |
| १०. | प्राचीन भारतीय इतिहासाचे स्रोत / साधने | १३५ |
| ११. | मध्ययुगीन भारत आणि मराठ्यांच्या इतिहासाची साधने | १४४ |
| १२. | आधुनिक व समकालीन इतिहासाची साधने | १५६ |

तृतीय वर्ष कला

सत्र - V (CBCS)

अभ्यासपत्रिका क्र. - IX

# इतिहास संशोधन पद्धती आणि साधने

# SYLLABUS

## Elective Course IX A - Research Methodology and Sources of History

Objectives:

1. To teach students basics of research methodology in history with a view to promote historical research.
2. To understand the various kinds of sources of history and its interpretation.
3. To acquaint students with the new trends and approaches in history writing.

**Module I: History: Definition and Scope**

(a) History: Meaning, Scope and Nature
(b) Importance of History
(c) History and Auxiliary Sciences

**Module II: Sources of History**

(a) Sources: Nature and Types
(b) Authenticity and Credibility of Sources
(c) Importance of Archival Sources

**Module III: Research Methods in History**

(a) Methods of Data Collection
(b) Interpretation and Generalisation of Sources
(c) Footnotes and Bibliography

**Module IV: Sources for Writing Indian History**

(a) Sources for Ancient Indian History
(b) Sources for Medieval Indian and Maratha History
(c) Sources for Modern and Contemporary Indian History

**References:**


Acton, H. B. *'Comte's Positivism and the Science of Society' in Philosophy,* (Vol. 26, October, 1951).

Agarwal, R. S., *Important Guidelines on Research Methodology*, Delhi, 1983.

Ali Sheikh, History: *Its Theory and Method*, Macmillan India Ltd., Madras 1978.

Ayer, A. J. *Foundations of Empirical Knowledge* Macmillan Co., London, 1961.

Barzun, Tacques, Graff, Henry F. *The Modern Researcher*, Third Edition, New York, 1977.

Bloch, Marc, *The Historian's Craft*, Trans. Peter Putnam Manchester University Press, Manchester, 1954.

Bloch, March, *The Historian's Craft*, Trans. Sarah Mathews, Weidenfeld & Nicholson, London, 1980.

C. Behan McCullough, *Justifying Historical Description*, Cambridge University Press, New York, 1984. Cambridge, 1991.

Cannon John, ed. 1980. *The Historian at Work*, London, George Allen and Unwin

Carr, E. H. *What is History?* Macmillan, London: 1964.

Chattopadhyaya, Debiprasad (ed.) *History and Society*, Calcutta, 1978.

Clark, G. Kitson, *Guide for Research Students Working on Historical Subjects*, OUP, Cambridge, 1972.

Collingwood, R. G. *The Idea of History*, Oxford University Press. Oxford 1978.

Collingwood, R. G. *The Idea of History*, Ed. T. M. Knox (Oxford University Press, London, 1973).

Conal Furay & Michael J. Salevouris, *The Methods and Skills of History A Practical Guide*. Third Edition. Wheeling,: Harlan Davidson, Inc., Illinois, 2010.

Dasgupta, Sugata, *Methdology of Social Science Research,* New Delhi, Impex India, 1967.

Devahuti (ed.), *Problems of Indian Historiography*, Delhi, 1979.

Dilthey W, H. P. Rickman,, *Meaning in History*, (ed) George Allen &Unwin Ltd., London, 1961.

Dobreva, Milena and Ivacs Gabriella, *Digital Archives: Management, Use and Access*, Facet Publishing, London, 2015.

Doby, J. T., ed., *An Introduction to Social Research*, 2nd ed., New York, Appleton Century-Crafts, 1967.

Duverger, Maurice, *Introduction to the Social Science*, with special reference to their methods, Translated by Malcoln Anderson, London, Allen and Unwin, 1961.

Easthpoe, Gary, *History of Social Research Methods,* London, Longman, 1974.

Edwards, A. L.., ed., *Experimental Design in Phychological Research*, 3rd ed., New York, Hott, Rinehart and Winston, 1968.

Elton G. R., *Return to Essentials: Some Reflections on the Present State of Historical Study*,

Elton, G. R., *The Practice of History*, London, 1967.

*Essays in Indian History: Towards A Marxist Perception*, New Delhi, 1995.

Festinger, Leonand Katz, Daniel, *research Method in the Behavioural Sciences*, Dryden Press, New York, 1953.

G. R. Elton, *The Practice of History*, The Fontana Library, London, 1969.
Galton, M., *Educational Research, Methodology and Measurement*: An International Handbook,Oxford, 1988.
Galtung, Johan, *Theory and Method of Social Research*, London, Allen and Unwin, 1967.
Gardinar P., *The Philosophy of History,* Oxford University Press, London, 1974.
Gardiner, Patrick, *The Philosophy of History*, OUP, London, First Edition 1974 Reprinted 1984.
Gargn E., *The Intent of Toynbee's History: A Co- operative Appraisal*, Loyala University Press, Chicago, 1961.
Garranghan, G. J. S. J. *A Guide to Historical Method* (Ed), Jean Delanglez S. J.(Fordham University Press, New York, 1957.)
Geo, Wilson, *Social Science Research methods*, Appleton, 1950.
Gilbert J. Garraghan, *A Guide to Historical Method*, Fordham University Press, New York, (1946).
Gopal, S. and Thapar, R. (eds.) *Problems of Historical Writing in India*, Proceedings of the seminar held at the India International Centre, New Delhi, 21st -25th January 1963.
Gotschalk, L. R. (Ed.), *Understanding History, a primer of historical method (*Alfred A. Knopf, New York, 1951)
Gottschalk, Louis, *Understanding History*, New York, Second Edition, 1969.
Habib, Irfan, *Interpreting Indian History*, North-Eastern Hill University, Shillong.
Harvey, David, *The Condition of Post Modernity*, Cambridge, First Edition 1990, Reprinted 1994.
Iggers, George G., *New Directions in European Historiography*,
Jenkins, Keith, *Rethinking History*, London, 1991.
Jim Secord., *Tools and Techniques for Historical Research,* London 1848.
K. N. Chitnis – *Research Methodology in History*, published by Mrs. R. K. Chitnis, A1/23 Rambag Colony, Navi Path, Pune – 1979.
Lanaglosis C. V. & Segnobosis, *Introduction to the study of History,* Duckworth 1925.
Lanaglosis C. V. & Segnobosis, *Introduction to the study of History*, Duckworth1848.
Lord Acton, *Lectures on the Study of History,* New York, 1961.
Majumdar, R. C., *Historiography in Modern India*, Bombay, 1970.
Maloni Ruby and Kamble Anangha (eds.), Crafting History: Method and Content, Himalaya Publication, Mumbai, 2017.
Maratha Howell and Walter Prevenier, *From Reliable Sources: An Introduction to Historical method*, Cornell University Press: Ithaca (2001).
Mark Israel and Iain Hay, Research for Social Scientist, , Sage Publications Ltd. 2006.
Marwick, Arthur., *The Nature of History*, London, First Edition 1970, Reprinted 1976.
Mc Cullagh, C. Behan, The Truth of History, London, 1998.
Mc Dowell, W. H. *Historical Research. A Guide for writers*, Dissertation. Thesis Art book 2005.
Melanie Mauthner, et al, Ethics in Qualitative Research, Sage Publications Ltd. 2002.

Mike McNamee and David Bridges (eds.), The Ethics of Educational Research, Wiley-Blackwell 2002.
Munslow, Alun, *Deconstructing History*. Routledge : London 2006.
Nevins, Allan, *The Gateway to History*, Bombay, Indian Reprint 1968.
Nugent, Walter T.K, *Creative History*, New York, 1967.
Paul Oliver, The Student's Guide to Research Ethics, Open University Press, Second Edition 2010.
Popper, Karl. P., *Objective Knowledge: An Evolutionary Approach,* OUP, Revised Edition, 1986.
Presnell , Jenny L., *The Information-Literate Historian, A Guide to Research for History Students,* Oxford University Press, New York, 2007.
R. J. Shafar, *A Guide to Historical Method,* Revised edition. The Borsey Press, Homewood (IIIimois). 1974.
Rajannan, Busnagi, *Fundamentals of Research,* ASRC, Hyderabad, 1968.
Samerel, Raphael (ed.), *People's History and Socialist Theory,* London, 1981.
Shafer R. J., *A Guide to Historical Method,* The Dorsey Press: Illinois (1974). ISBN 0-534-10825-3.
Sherman Kent – Writing History, 2nd edition, New York, Appleton – Century Crafts, 1967.
Sinott E. W., Dunn L. C. and Dobzhansky T. -Principles of Genetics (5th edition) London, 1953.
Sorokin P. A. *Social and Cultural Dynamics,* 4 Vols., Peter Owen Ltd., London, 1957.
Sorokin P. A. *Social Philosophies of an Age of Crisis,* Adam & Charles Black, London, 1952.
Sorokin P. A.: *Reconstruction of Humanity* , Bharatiya Vidya Bhavan, Bombay, 1958.
Stern, Fritz. *Varieties of History.* Thames and Hudson, London, 1956.
Stielow Frederick J. *Building Digital Archives,* Descriptions, and Displays, Neal-Schuman Publishers, New York, 2003.
Thaper, Romila: *A History of India l,* Penuin, England, First Edition 1966.
Tom Beauchamp and James Childress, Principles of Biomedical Ethics, Oxford University Press, VI Edition 2008.
Toynbee A. J. *A Study of History* (Vol. I) London, 1956.
Weber, Max., *The Methodology of the Social Sciences,* New York, 1949.
Wilhelm Dilthey, *Meaning in History, ed. H. P. Rickman, Allen and Unwin,* London, 1967.
Zimmerman, C. C. *Sociological Theories of Pitirim* A. Sorokin, Thacker and Co., Bombay, 1973.

**Marathi Books**

Agalave Pradeep, *Samajik Sanshodhan, Paddhati Shastra va Tantre,* Sainath Prakashan, Nagpur.
Apte Mohan, *Internet Ek Kalpavruksha*, Rajhansa Prakashan, Pune, 1997.
Bendre V. C., *Sadhan Chikkitsa*
Bhaskar Dhatavkar, Purabhilekh Vibhag, Maharashtra Shasan, Mumbai.
Bodhankar Sudhir, Dr. Olani, *Samajik Sanshodhan Paddhat*

Deo Prabhakar, *Itihas Aik Shastra*, Kalpana Prakashan Nanded, 1997.
Desai Sanjiv P., *Sankalak va Lekhak, Abhilekh Vyavasthapakachi* Margdarshika, Sampadak,
Gafur Saikh, *Itihas Lekan Shashtra*, Pritam Prakashan , Mumbai.
Gaikwad D. , *Itihas Lekhan Paddhat va Aaitihasik Smarake yancha Abhyas*, Phadke.
Gaikwad R. D., *Itihas Lekhan Shashtra*, Phadke Prakshan, Kolhapur.
Ganorkar Prabha, Dahake Vasant Aabaji (Sampadit), Sadnya Sakanlpana Kosh, Popular Prakashan, Mumbai.
Gothal S., *Itihas Lekhan Shashtra, Itihaskar*, Kailas Prakashan Aurangabad.
Gupt Manik Lal, *Itihas – lekhan, Dharanaye yevam Paddhatiya*. Sahitya Ratnalaya, Kanpur, 2007.
Khobarekar V. G*., Daptarkhana – Varnan va Tantre*, Maharashtra Sahitya ani Sanskriti
Kothekar Shanta, *Itihas – Tantra ani Tatvadyan*, II Ed, Shri Sainath Prakashan, Nagpur, 2007.
Mandal , Mumbai.
Nadgonde Gurunath, *Samajik Sanshodhan Paddhati*, Phadake Prakashan, Solapur.
Patil B V, *Sanshodhan Paddhati*, Mangesh Prakashan , Nagpur.
Rajadarekar Suhas, *Itihas Lekhan Shastra*, Vidhya Prakashan, Nagpur.
Rajadhyksha Vijaya, (Sampadit), Sadnya Sakanlpana Kosh, Maharashtra Rajya Sahitya Va Sanskriti Mandal, Mumbai.
Raut Ganesh (Sampadit), Dattak Gavancha Itihas, Khand 1,2,3, Pune Vidhyapith, Pune, 1999.
Sardesai B. N., Atharavya Shatakatil Marathyancha Itihas – Nava Drushtikon, Phadke
Sardesai B. N., *Itihaslekhanpaddhati,* Phadke Prakashan, Kolhapur, 2005.
Sawant B. T., Salunkhe D., *Aaitihasik Kagad Patre va Thale*, Mehata Publishing House,
Wamburkar Jaswandi, Ithihas Lekhanatil Nave Pravah, Daimond Prakashan, Pune, 2014.

# १

# इतिहास– अर्थ, व्याप्ती व स्वरूप

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ इतिहासाचा अर्थ व व्याख्या

१.३ इतिहासाची व्याप्ती

१.४ इतिहासाचे स्वरूप

१.५ सारांश

१.६ प्रश्न

१.७ संदर्भ

## १.० उद्दिष्टे

- इतिहास म्हणजे काय ते सांगून त्याचा अर्थ व व्याख्या संदर्भात चर्चा करणे.
- इतिहासाची व्याप्ती समजून घेवून त्याच्या प्रासंगिकतेवर भाष्य करणे.
- इतिहास विषयाचे स्वरूप समजून घेणे.

## १. १ प्रस्तावना

“इतिहासातील संशोधन पद्धती आणि त्याची साधने”जाणून घेण्याआधी इतिहास म्हणजे काय? इतिहास शब्दाचा अर्थ काय,इतिहासाची व्याप्ती किती? इतिहासाचेस्वरूप कसे आहे? यांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. इतिहासकारांनी भिन्नभिन्न दृष्टिकोनातून ऐतिहासिक घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यातून इतिहाससंदर्भात अनेक सिद्धांत व व्याख्या प्रतिपादन केल्या. तसेच सुरुवातीला राजकीय व लष्करी घटनांपुरते मर्यादित असलेल्या इतिहास अध्ययनाच्या कक्षा वाढत गेल्या. राजकीय घटनांबरोबर इतिहासकारांना सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक घटकांचे ऐतिहासिक मूल्य कळाले. यामुळे त्या अनुषंगाने इतिहासातील संशोधन करण्याचे व अन्वयार्थ लावण्याचे प्रयत्न वाढू लागले. अशा प्रकारे टप्याटप्याने इतिहासाची व्याप्ती वाढत गेली. इतिहासाचा संबंध मानवी जीवनाच्या सर्व घटकांशी असतो. त्यावरून इतिहासाच्या व्यापक स्वरूपाची आपणास कल्पना येण्यास हरकत नाही.

**इतिहासाची संकल्पना प्रामुख्याने तीन गोष्टीवर साकारलेली आहे.**

(१) भूतकाळातील परिस्थिती व त्या काळात मानवाने केलेली प्रगती.

(२) त्याने भूतकाळात केलेल्या प्रगतीबद्दलची नोंद असणाऱ्या व पुरावा म्हणून असणाऱ्या गोष्टी.

(३) मानवी प्रगतीची नोंद करणारी पध्दती व ती नोंद करण्यासाठी वापरलेले तंत्रज्ञान.

**आता आपण थोडक्यात इतिहासाचा अर्थ आणि व्याख्या पुढीलप्रमाणे समजावून घेवूया.**

## १.२ इतिहासाचा अर्थ व व्याख्या

इतिहास म्हणजे'भूतकाळ आणि भूतकाळात घडलेल्या घटना' हा अर्थ होतो. भूतकाळातील घटनांचे दप्तर आणि तोंडी निवेदन असाही त्याचा ढोबळमानाने त्याचा अर्थ घेतात. संस्कृत भाषेतील शब्द 'इतिहास' याचा“असे असे घडले किंवा अशा प्रकारे घडले”असा होतो. इतिहास हा शब्द “इति+हा+आस”संयोगातून बनलेला आहे. म्हणजे भूतकाळात जे काही घडले ते सर्व इतिहासाचा भाग आहे. दुर्गाचार्याने आपल्या निरुक्त भाष्य वृत्तीत इतिहास या संज्ञेचीव्याख्या करताना म्हंटले आहे की,‘इति हैवमासिदिती यत् कथ्यते तत् इतिहास:'ज्याचा अर्थ आहे,‘ हे निश्चितरूपाने अशा प्रकारे झाले होते. इंग्रजी भाषेतील History या शब्दाचे मूळ Istoria या ग्रीक शब्दात सापडते. या शब्दाचा अर्थ 'जिज्ञासेने केले जाणारे संशोधन' व त्या द्वारा नव्या माहितीचा शोध असा आहे. जर्मन भाषेतील इतिहास वाचक शब्द Geschichte (गेश्चीते)असून त्याचा अर्थ गतकालीन घटनांचे तर्कशुद्ध वअर्थपूर्ण विवेचन असा आहे. ह्या तीन शब्दांच्या अनुरोधाने इतिहासाची व्याख्या स्थूलमानाने“भूतकाळातील माहितीचा शोध घेऊन जे घडले त्याचे तसेच्या तसे वर्णन तर्कशुद्ध व अर्थपूर्णरित्या करणे”अशी करणे समर्पक ठरेल.

तसेच इतिहास ही मानवाची कथा आहे. 'History म्हणजे His-story’ मानव जातीची कथा म्हणजे इतिहास. असा ही ढोबळमानाने इतिहासाचा अर्थ स्पष्ट करता येतो. 'एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका'मध्ये इतिहासाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे:“इतिहास या शब्दाचा वापर दोन प्रकारे करण्यात येतो. याचा अर्थ घटनांची जंत्री किंवा खुद्द घटना असाही करतात. या संज्ञेचा मूलभूत अर्थ चौकशी करणे व विधान करणे एवढ्या पुरता मर्यादित होता. तौलनिकदृष्ट्या आधुनिक काळात हल्ली इतिहास म्हणजे ही संकल्पना आहे तिचा त्यात समावेश होऊ लागला. ”

जागतिक इतिहासलेखनाला प्रदीर्घ परंपरा आहे. जस जसेकाळ आधुनिकतेकडे सरकत होते. तसतसे इतिहासाची व्याप्ती व स्वरूपात वाढ होत होती. त्याप्रमाणे भिन्न भिन्न विचारवंत व इतिहासकार यांचा इतिहासाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात बदल झालेला दिसून येतो. म्हणून जागतिक स्तरावर प्राचीन कालखंडापासून समकालीन इतिहासापर्यंत इतिहास सबंधित व्याख्यांचा वसंकल्पनेचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

इतिहास लेखनाला ग्रीस मध्ये इसवीसन पूर्व सहाव्या शतकात प्रारंभ झाला हे सर्वमान्य आहे. ग्रीकांचा इतिहास लेखन साधारणपणे इसवी सन पूर्व ६व्या शतकापासून ते इसवी सन २ऱ्या शतकापर्यंत चालू होते. या दरम्यान ग्रीक इतिहास लेखक आले,त्यात हिकाटीअस,डायोनिसस,थ्युसीडाईड्स,यांची नावे महत्वाची आहेत. हिकाटीअस

हा,परंपरागत मिथकांचा अंतर्भाव नसावा जे प्रत्यक्ष घडले त्याचेच वर्णन लेखकाने करावे, असे म्हणतो. इतिहास प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणे पुढे मांडून धडे शिकवितो, म्हणजे इतिहास हे मौल्यवान ज्ञानभांडार असून त्यातून माणसाला अनेक महत्त्वाच्या बाबी शिकता येतात, असे मत डायोनीसस याने मांडलेले दिसते. (History is philosophy teaching by examples). थ्युसिडाईडस् इतिहासाचा विषय काय असावा, ह्याविषयी सांगताना "इतिहास म्हणजे संस्मरणीय घटनांचे निवेदन" असे प्रतिपादन करतो. (History is a story of things worthy to be remembered). तर ॲरिस्टॉटल हा प्रख्यात ग्रीक तत्त्वज्ञ "इतिहास हा न बदलणाऱ्या भूतकाळाची कथा आहे," असे म्हणतो हेरोडोटस च्या मते इतिहास म्हणजे,“मनोरंजक व अविस्मरणीय अशा भूतकालीन घटनांचा शोध होय. ” (History means an enquiry into interesting and memorable past evevnt. ”) हा ग्रीक इतिहासकार इतिहासलेखनाच्या उद्दिष्टाचे स्पष्टीकरण देताना, 'घडून गेलेल्या महत्त्वाच्या घटनांची माहिती पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवणे, हा हेतू असल्याचे मत मांडतो. ग्रीक इतिहासकारांनंतर आलेल्या रोमन इतिहासकारांचीही इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी सामान्यतः ग्रीकांशी मिळतीजुळती असल्याचे आढळून येते, कारण रोमन इतिहासलेखन ग्रीकांनी प्रभावित झालेले होते.

युरोपमध्ये पुनरुज्जीवनाची लाट पसरल्यानंतर धर्मनिष्ठाची मानवी पकड शिथिल झाली. दैववादाचा पगडा ओसरू लागला. नवे ज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा, स्वतंत्र विचार शक्ती जागृत झाली. मानव हा विचारांचा केंद्रबिंदू बनला आणि मानवी जीवनाकडे पाहण्याची नवीन दृष्टी प्रादुर्भूत झाली. या सर्वांचा परिणाम इतिहास लेखनावर झाला. इतिहासात मानवी कर्तुत्वाला स्थान मिळाले. इतिहास हे मानवाला उपयुक्त ठरणारे ज्ञान भंडारा आहे असा विचार व्यक्त होऊ लागला. ह्या पार्श्वभूमीवर इ. स. १७व्या शतकातील प्रसिद्ध इतिहासलेखक व विचारवंत फ्रान्सिस बेकन “इतिहास ही मानवाला सुज्ञ बनविणारी ज्ञानशाखा आहे,” अशी इतिहासाची व्याख्या करतो. तसेच लौकिक जीवनात कर्तृत्व गाजवणारा आणि बौद्धिक पातळीवरून लेखन करणारा सर वॉल्टर रॅले “गतकाळातील उदाहरणे देऊन माणसाला शहाणपण शिकविणे व मार्गदर्शन करणे, हे इतिहासाचे उद्दिष्ट असल्याचे मत मांडतो. ” (The end and purpose of all history is to teach us by examples of times past such wisdom as may guide our desires and actions.)

युरोपमध्ये प्रबोधनाची सुरुवात झाल्यानंतर त्या अवधीत व त्यानंतर झालेल्या बौद्धिक वैज्ञानिक विकासाबरोबर मानवी जीवनाकडे पाहण्याचे भिन्न दृष्टिकोन प्रचलित होऊ लागले. अर्थशास्त्र, समाजशास्त्र अशा मानवी जीवनाशी संलग्न असलेल्या ज्ञानशाखा विकसित झाल्या. त्या क्षेत्रात मांडल्या जाऊ लागलेल्या नवनव्या प्रमेयांचा कार्यपद्धतीचा प्रभाव इतिहासाच्या अध्ययनावर पडू लागला. यामुळे भिन्न वैचारिक भूमिकांतून ऐतिहासिक सत्यशोधनाचे भिन्नभिन्न अर्थातूनअन्वयार्थ लावण्याचे प्रयत्न विचारवंत करू लागले. अशा अनेक विचारवंत वा इतिहासकरांनी इतिहासव्याख्या वसंकल्पनायाबाबत भिन्न भिन्न भाष्य केले. त्याचा खालीलप्रमाणे आढावा :

कार्लाईल :यांच्यामते "इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तीची चरित्रे व त्यांनी बजावलेली कामगिरी होय. " कार्लाईलच्या व्याख्येचा एकच अर्थ असा घेता येणे शक्य आहे की काही श्रेष्ठ व्यक्ती

आपल्या सामर्थ्याच्या प्रतिमेच्या जोरावर संपूर्ण समाजाची दिशा बदलून टाकतात. देशाला / राष्ट्राला उच्च स्थानी नेतात. उदा. नेपोलियनचा पराक्रम, फ्रान्सला त्याने अत्यंत समर्थ व प्रभावी राष्ट्र बनविले.

**रॉबर्ट सिले:** 'गतकालीन राजकारण म्हणजे इतिहास तर वर्तमान कालीन राजकारण म्हणजे भविष्यकालीन इतिहास'अशी इतिहासाची व्याख्या करतो. (History is a past Politics)

**रेनियर:** याने, 'सभ्य मानव समाजात राहणाऱ्यांच्या अनुभवांच्या गोष्टीस इतिहास म्हणतात. '(History is the story of men livling in Societies) अशी व्याख्या केली.

**प्रा. इल्टन:** यांच्यादृष्टीने "इतिहास म्हणजे मानवी जीवनात भूतकाळात घडलेल्या सर्व घटना त्याच्यातून उदयास आलेले विचार, सुख, दुःख, भोग, चांगल्या वाईट गोष्टी वर्तमानकाळात देखील आपला ठसा उमटवून जातात व ज्याच्यामुळे पुढे मानवाची भौतिक प्रगती, सामाजिक बदल याबद्दल आपल्याला काही अटकळ बांधता येते. "

सर चार्लस प्रिथ: "इतिहास म्हणजे गतकाळातील मानवी समाजाच्याबद्दलचा आढावा आहे. यात त्याकाळातील समाजात कसकसा बदल होत गेला, त्यावेळी समाजात कोणत्या निराळ्या संकल्पनांचा उदय झाला, त्यावेळची भौतिक परिस्थिती कशी होती आणि अनेक अडचणींवर मात करून मानवाने प्रगती कशी घडवून आणली त्याचा आढावा म्हणजे इतिहास होय. "

**लॉर्डअॅक्टन:** "मानवाची मुक्तिगाथा म्हणजे इतिहास" (History is the unfolding story of human freedom) अशी अत्यंत सुटसुटीत व्याख्या केलेली आहे. मानवाने अनेक अडीअडचणींवर केलेली मात त्याचा आढावा म्हणजे इतिहास. असा त्याचा अर्थ आहे.

**प्रा. ए. एल. रौस:** "इतिहास म्हणजे भूगोल व प्राकृतिक स्थिती ह्यातून जडणघडण होत गेलेले मानवी जीवन व समाजजीवन यांचे आलेखन"याव्याख्येचा अर्थ मानवी जीवनाच्या प्रगतीचाआढावा,असा आहे.

**प्रा. लेकी:** इतिहास म्हणजे नैतिक कल्पनांचा संग्रह स्पष्टीकरण होय.

**इ. एच. कार:** सुप्रसिध्द आधुनिक इतिहासकार म्हणून इ. एच. कार यांनी इतिहासाची व्याख्या करतांना "इतिहास म्हणजे वर्तमानकाळ व भूतकाळ या मधील कधीही न संपणारा संवाद होय. " असे म्हटले आहे. (History is an unending dialogue between the present and the past)

**प्रा. नेव्हिन्स:** यांच्या मते, "इतिहास म्हणजे भूतकाळाला वर्तमानकाळाशी जोडणारा पूल आहे व तो भविष्यकाळाचा मार्गदर्शक आहे. "

**कॉलिंगवूड:** याने,इतिहासाची व्याख्या करतांना म्हटले आहे, 'भूतकालीन ज्ञान आणि अनुभव ज्यास इतिहासकार स्वबुद्धीने जिवंत आणि उठावदार करून वर्तमानकाळात सादर करतो ते ज्ञान म्हणजे इतिहास.

**कार्ल मार्क्स:** १९ व्या शतकातील क्रांतीकारी, श्रेष्ठ जर्मन तत्वज्ञ याने इतिहासाचा सखोल असा अभ्यास करून आपले क्रांतीकारी तत्वज्ञान जगासमोर मांडले. त्याच्यामते “इतिहास म्हणजे वर्गकलहाचा इतिहास होय” अशी व्याख्या मांडून त्यांनी इतिहासाचे भौतिकवादी भाष्य प्रतिपादन केले. इतिहासातील सातत्याने दिसणाऱ्या संघर्षाचा धागा कार्लमार्क्सने नेमका धरून हा संघर्ष श्रीमंत आणि गरीब, जमीनदार आणि भूदास, सरंजामदार आणि तळागाळातील सामान्यजन यांच्या संघर्षाचा इतिहास कार्ल मार्क्सला अभिप्रेत आहे.

**अर्नाल्ड टॉयन्बी:** सुप्रसिध्द इंग्रज इतिहासकार याने जगातील सर्व संस्कृत्यांचा अभ्यास करून इतिहासाची व्याख्या अशी केली आहे की “मानवी संस्कृतीचा उदय व अस्तम्हणजे इतिहास. ”

त्याचप्रमाणे काही भारतीय इतिहास संशोधक वा इतिहासकार यांचे इतिहासाचे आकलन व्याख्यांच्या स्वरूपात जाणून घेणे महत्वाचे आहे. यामध्ये,धर्मानंद कोसंबी यांच्या मते,“इतिहास म्हणजे साधन व उत्पादन यांच्या परस्पर संबंधातील एक अनुक्रमवारआधारित अशी घटना होय. ”कोसंबी यांनी भारतीय इतिहासाचे भौतिकवादी भाष्य करून साधन व उत्पादनावरील परस्पर संबंधांना इतिहासामध्ये महत्वपूर्ण स्थान आहे हे सिद्ध केले. रमेशचंद्र मुजुमदार यांनी इतिहासाची व्याख्या विशद करताना म्हटले आहे, ‘इतिहासाचा संबंध आंतरिक सत्याच्या प्रती असणाऱ्या जिज्ञासेच्या प्रती आहेत. म्हणून ‘ सत्याचा शोध म्हणजे इतिहास’ होय. त्याचप्रमाणें वि. का. राजवाडे यांच्या मते, 'दिव्यकालांच्या आवरणाखाली मानवकुलांच्या हालचालींची विश्वसनीय हकीकत म्हणजे इतिहास होय. 'अशी इतिहासाची व्याख्या करतात.

अशा रीतीने इतिहासाच्या अनेकविद्वान, अभ्यासकांनी व तज्ञांनी व्यक्त केलेल्या इतिहास विषयकविचारांचा केलेल्या व्याख्यांचा धावता आढावा घेतल्यास इतिहास ज्ञानशाखेबाबत एकवाक्यता आढळून येत नाही. त्यांच्या भूमिका बऱ्याच कालसापेक्षी व व्यक्तीसापेक्षी होत्या असे आढळून येते.

**आपली प्रगती तपासा**

१. इतिहासाचा अर्थ आणि व्याख्या स्पष्ट करा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १.३ इतिहासाची व्याप्ती

ऐतिहासिकची व्याख्या व स्वरूप याप्रमाणे इतिहासाची व्याप्ती सतत बदलणारी व विकसित होणारी आहे. भूतकाळाचे अध्ययन करत असताना ज्या प्रमाणेमानवी समाज,व्यवस्था, मूल्ये,शिक्षण,अर्थव्यवस्था यांमध्ये परिवर्तन होत गेले त्यामुळे या सर्व घटकांचा प्रभाव कालानुक्रमे इतिहासावर होत गेला व इतिहास संकल्पनेचा विकास होत गेला. इतिहास अध्ययनाची पद्धत वत्यांचे स्वरूप बदलत गेले. प्राचीन कालखंडातील इतिहास संकल्पना

आणि २१व्या शतकातील इतिहास संकल्पना यांमध्ये खूप मोठे अंतर निर्माण झाले आहे. सुरवातीला राजकीय घटना,थोर व्यक्तींची चरित्र,लोककथा,लढाया,युद्धे वमानवी जीवनाची उत्क्रांतीयेवढ्या पुरता इतिहास मर्यादित होता. इतिहासाची व्याप्ती मानली जात असे. कलाईल ने म्हटल्या प्रमाणे इतिहास म्हणजे थोर व्यक्तींचे चरित्रे. त्यामध्ये सामान्य व्यक्तीच्या कर्तुत्वाला स्थान नव्हते. पुढे कालाईल ची संकल्पना मागे पडली आणि इतिहासात सामान्य व्यक्तीच्या त्यामध्ये शेतकरी,कामगार,स्त्रिया,आदिवासी यांच्या जाणिवेची व योगदानाची चर्चा होऊ लागली. १९ व्या शतकापासून या व्याप्तीत हळूहळू पण निश्चित स्वरूपाचा बदल होऊ लागला. आधुनिक काळात इतिहासाने तीन वैशिष्टयांवर विशेष भर दिला आहे, ती पुढीलप्रमाणे :

i. काय घडले याचे वर्णन करणे.
ii. ते कसे घडले याची चर्चा करणे
iii. त्या घटनांचे शास्त्रशुद्ध दृष्टिकोणातून पृथक्करण

ही आधुनिक पद्धत शास्त्रशुद्ध आहे. पूर्वीपासून असा एक समज होता की, इतिहास हा विषय स्वतंत्र विषय नसून ( Independent branch of knowledge) साहित्य, राज्यशास्त्र व तत्त्वज्ञान यांचीच एक शाखा आहे. वरील बदलत्या पद्धतीमुळे या विचारसरणीत मोठा बदल झाला आहे. त्यामुळे इतिहासाला शास्त्राचा दर्जा प्राप्त झाला आहे. इतिहासाकडून दोन गोष्टींची अपेक्षा असते, त्यापुढीलप्रमाणे

१. संदर्भसाधने गोळा करणे.
२. मूलभूत इतिहासविषयक दृष्टिकोणातून त्याचा अन्वयार्थ लावणे.

यांपैकी पहिल्या गोष्टीमुळे वस्तुनिष्ठता व शास्त्रशुद्ध दृष्टिकोण अस्तित्वात येतो व दुसऱ्या गोष्टीमुळे व्यक्तिनिष्ठता येण्याची शक्यता असते.

इतिहासाची व्याप्ती वाढण्यापाठीमागे अनेक घटक जबाबदार आहेत. इतिहास हा भूतकालीन मानवी जीवनाचाआरसा आहे. इतिहासाच्या केंद्रस्थानी व्यक्ती असल्यामुळे व्यक्तीच्या निगडित सर्व घटकांचा अभ्यास इतिहासामध्ये अनस्युत आहे. मानव समाजात राहतो. त्यामुळे मानवी जीवनाच्या धार्मिक,सांस्कृतीक, आर्थिक, कलात्मक, वाङ्मयीन, सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय, भौगोलिक अंगांचा अभ्यास महत्वाचा वअत्यावश्यकआहे,कारण या सर्व घटकांचाव्यक्ती वर परिणाम होत असतो. तसेच आधुनिककाळात इतिहासामध्ये जे नवीन संशोधन केले गेले यामधून काही नवीन गोष्टी उजेडात आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने प्राचीन संस्कृतींचा शोध, वेगवेगळ्या मानववंशाचा शोध, नवीन लिपीचे वाचन, नाणकशास्त्राच्या संशोधनांमुळे सुद्धा इतिहासाची व्याप्ती वाढत गेली. पुरातत्त्वीय व वाङ्मयीन साधनांमुळे सुद्धा इतिहासाची व्याप्ती वाढलेली दिसून येते. पुरातत्त्वशास्त्राच्या संशोधनामुळे व प्रगतीमुळे नवनवीन माहिती उजेडात आली. त्याचप्रमाणे आधुनिककाळात 'सबाल्टर्नस्टडी' यासारखा विचारप्रवाह इतिहासामध्ये रूढ झाला. या विचारप्रवाहाने सर्वसामान्यांच्या योगदानाला व कार्याला महत्त्वपूर्ण मानून प्रत्येक ऐतिहासिक घटनेमागे सर्वसामान्यांच्या योगदानाला प्रतिपादित केले. प्रारंभिक काळात इतिहास हा साहित्य सबंधित विषय मानला जात असे. परंतु इतिहास लेखनाची वैज्ञानिक पद्धतीवर आधारित विशिष्ट शास्त्रशुद्ध पद्धत विकसित झाल्यामुळेइतिहासात वस्तुनिष्ठता (विश्वसनीयता)व सत्यता यांची पडताळणी होऊ लागली. त्यामुळे इतिहास संशोधनाला बळकटी प्राप्त होऊन

विविध ऐतिहासिक संशोधनाला चालना मिळाली. अशा अनेकविध कारणांमुळे इतिहासाची व्याप्ती वाढलेली दिसून येते.

**प्रारंभीचा राजकीय इतिहास:**

जागतिक पातळीवर इ. स पूर्व सहाव्या शतकातपश्चिमात्य देशात औपचारिक रित्या इतिहास लेखनाची सुरुवात ग्रीकांपासून सुरू झाली. ग्रीकांनी प्रामुख्याने राजकीय घटना, लढाया, युद्धे हे विषय निवडले, कारण ह्या घटना लक्षवेधी होत्या. राजकीय घटनांत लोकांना रूची असे व त्या विषयी माहिती सहजपणे मिळत असे. परिणामी हेरोडोटस, थ्यूसिडाईडस् आणि रोमन इतिहासलेखकांनी नजीकच्या भूतकाळातील राजकीय घटनांचे निवेदन केलेले आढळते. शिवाय त्याकाळी दळणवळणाची साधने व संपर्क माध्यमे अगदीच तोकडी असल्यामुळे समकालीन अथवा निकटच्या भूतकाळातील घटना हा त्यांनी आपला वर्ण्यविषय बनविला. उदा. हिरोडोटस ने ग्रीक-इराण यांच्यात झालेल्या संघर्षाचा इतिहास लिहिला. थ्यू सिडाईडस्हयातीत पेलोपोनेशियन युद्ध-अथेन्स व स्पार्टा यांच्यातील संघर्ष इ. स. पूर्व ४५९-४०६ सुरू झाले. थ्युसिडाईडस्ने ह्या युद्धातील दैनंदिन घटनांची नोंदकरून ठेवली आणि पुढे त्या माहितीच्या आधारे 'History of the Pelopponesian War हा ग्रंथ लिहिला. ग्रीक परंपरेतील पॉलिबियस याने ‘Histories’ हा ग्रंथ लिहून रोमच्या राज्यविस्ताराची माहिती दिली. त्याचप्रमाणें कॅटो याने Origines, लिव्ही याने History of Rome, ज्युलियस सीझर याचे Commentries on the Gallic War आणि Commentries of the Civil War, इ. हे राजकीय घटकावर आधारित इतिहास ग्रंथ सांगता येतील.

**ईश्वरवादी इतिहास**

इ. स. च्या तिसऱ्या शतकापासून सुमारे पंधराव्या शतकापर्यंतचा काळ हा ख्रिस्ती जगातील धर्मनिष्ठ इतिहासलेखनाचा काळ होता. त्या कालावधीत राजकीय विषय पूर्णतः मागे पडले. सर्व विश्वाचा गाडा ईश्वराच्या मर्जीनुसार चालतो. मानवाच्या ठिकाणी स्वतंत्र कर्तुत्वशक्ती नाही. अशा विचारांचे समाजात प्रस्थान वाढले. त्यामुळे विश्वातील ईश्वराचे कार्य, त्याच्या लीला आणि संत महात्म्य, त्यांचे जीवनकार्य व चमत्कार हे इतिहासाचे विषय बनले. त्यामध्ये मानवी कर्तृत्वाला त्यात स्थान मिळाले नाही. उदा. सेक्सटस ज्युलियस आफ्रिकानस या ख्रिस्ती इतिहासकाराने Chronographia हा ग्रंथ लिहला. युसीबियस याने रोमन ग्रंथालययेथे उपलब्ध असलेल्या मौलिक ग्रंथांचा सखोल अभ्यास करून चार प्रसिद्ध ग्रंथ लिहिले. तसेच सेंट ऑगस्टीन याचे The Confessions, The City of God असे ग्रंथ लिहिले. त्याचप्रमाणे अरबांच्या इतिहासलेखनाचे विषय ही बहुतांशी असेच आहेत.

सोळाव्या शतकात युरोपात झालेल्या प्राचीन विद्येच्या पुनरुज्जीवनानंतर जी वैचारिक क्रांती तेथे घडून आली, त्यामुळे मानवी जीवनाकडे पाहण्याची नवी मानववादी दृष्टी विकसित झाली. मानवाच्या कर्तृत्वाविषयी जिज्ञासा निर्माण झाली. त्यामुळे परमेश्वर व त्यासंबंधी विषय बाजूला सारले गेले आणि राजेरजवाडे, सरदार, अमीर उमराव यांचे जीवन, तसेच साहसी वीरांच्या कर्तृत्व व शौर्य कथा, असे मानवाच्या कार्याशी निगडित लौकिक विषय इतिहासलेखक निवडू लागले. या दृष्टीने विलीयम कॅमडन याचा 'हिस्ट्री ऑफ

एलिझाबेथ' तसेच फ्रान्सिस बेकनचा 'द रेन ऑफ किंग हेन्नी द सेवंथ' हे ग्रंथ वाचनीय ठरतात.

## बुद्धीवादी इतिहासलेखनाला सुरुवात

अज्ञात प्रदेश शोधण्याची जिज्ञासा युरोपियन लोकांमध्ये उत्पन्न झाल्यामुळे साहसी लोक जलपर्यटनाला निघाले. त्यांच्या प्रवासा वर्णनामुळे मानवी ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या. वॉल्टर रॅलीसारखे बुद्धिमान मुसद्दी व धडाडीचे प्रवासी जगाचा इतिहास लिहू लागले. हे इतिहासाची कक्षा विस्तारण्याचे द्योतक होते. अठराव्या शतकात वाहतुकीची साधने वाढली. तसा लांबचा प्रवास शक्य झाला युरोपातील जिज्ञासू इतिहासकार प्राचीन इतिहासाचा मागोवा घेऊ लागले. संबंधित साहित्याचा गतकाळातील कागदपत्रांचा अभ्यास गंभीरपणे करू लागले. त्याचबरोबर केवळ घटनांचा अभ्यास हा इतिहासाचा विषय न राहता दीर्घकाळातील घडामोडींचा अभ्यास होऊ लागला. या संदर्भात एडवर्ड गिबन चा Decline and fall of the Roman Empire या ग्रंथाचा उल्लेख करावा लागतो.

इतिहासाची व्याप्ती वाढण्याला महत्वाचा घटक म्हणजे इतिहासाचे तात्विक विवेचन. अठरावे व एकोणिसावे शतक बुद्धिवादाचा काळ असल्यामुळे अनेक इतिहासकार इतिहास विषयाची सैद्धांतिक मांडणी करून इतिहासाचे तत्वज्ञान मांडू लागले. यामध्ये बेकन, व्होलटेअर, विको, हर्डन, हेगेल, कार्ल मार्क्स, हर्बट स्पेंसर, स्पेंगलर, इ. उल्लेख महत्वाचा ठरतो. इतिहास म्हणजे काय ? त्याची कार्यपद्धती कोणती ? त्याच्या प्रक्रियेचे स्वरूप काय ? त्यांचा विषय कोणता? ऐतिहासिक घटिते म्हणजे काय? त्यावर आधारित असतात का ऐतिहासिक सत्याचे स्वरूप कसे असते. ? घटितांमधून काही तर्क संगत अर्थ काढता येतो का?असे नानाविध प्रश्न या कालखंडात विचारले जाऊ लागले. तसेच बौद्धिक व वैज्ञानिक विकासाबरोबर मानवी जीवनाकडे पाहण्याचे भिन्न दृष्टिकोन प्रचलित होऊ लागले. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र मानवी जीवनाशी संलग्न असलेल्या ज्ञानशाखा स्वतंत्रपणे विकसित झाल्या. त्या क्षेत्रात मानल्या जाऊ लागलेल्या नवनव्या प्रमेयंचा पडू लागला. यामुळे भिन्न वैचारिक भूमिकांतून ऐतिहासिक सत्यशोधनाचे, इतिहासाचा भिन्न भूमिकांतून अन्वयार्थ लावण्याचे प्रयत्न विचारवंत करू लागले. इतिहासाच्या स्वरूपाबाबत नवनवे सिद्धांत मांडले जाऊ लागले या प्रक्रियेतून इतिहासाचे तत्त्वज्ञान विकसित होत गेले व इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची कक्षा व्यापक होत गेली.

वरील प्रमाणे इतिहासकार इतिहासलेखनाची प्रक्रिया ही पूर्णतः शास्त्रीय आहे असे ठासून प्रतिपादन करीत, इतिहास ही साहित्याची शाखा आहे ह्या तत्कालीन भूमिकेविरुद्ध निबूर, व रांके यांनी प्रखर प्रतिक्रिया व्यक्त केली व इतिहासलेखानाला शास्त्रीय अधिष्ठान देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. रांकेने ऐतिहासिक साधनांच्या परीक्षणाची शास्त्रीय पद्धत विकसित करून ऐतिहासिक साधनांच्या विश्वसनीयतेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्लाइल, हेगेल,कार्ल मार्क्ससारख्या इतिहासकारांनी मानवी जीवनातील स्थित्यतरांमागे अथवा विकासात्मक प्रक्रियेत तत्व किंवा सिद्धांत शोधण्याचा प्रयत्न केला. उदा. जर्मन तत्त्वज्ञ हेगेल याने एक चितशक्ती विश्वाचे संचलन करीत असते आणि मानवी जीवनातील घडामोडी म्हणजे या चित्शक्तीचाच आत्माविष्कार आहे. असे भाष्य केले; तर करून कार्ल मार्क्स व एंजल्स यांनी द्वंद्वात्मक विकासाच्या सिद्धांताचा वापर मानवी समाजाच्या वाटचालीचे विश्लेषण करण्यासाठीवापरला. सर्व मानवी व्यवहारांची घडण आर्थिक व्यवहार निर्धारित करतात

असे ठाम मत मांडून आर्थिक हेतुमूलकतेचा सिद्धांत प्रतिपादित केला. स्पेंगलर आणि टॉयंबी यांनी एखाद्या मोठया ऐतिहासिक घटनेचा अगर देशाच्या इतिहासाचा नव्हेतर मानवी संस्कृतींचा अभ्यास केला. त्यात त्यांना चक्राकारगतीचे सूत्र आढळले. तसेच इतिहासाच्या घटितांसंबंधी व ऐतिहासिक सत्यासंबंधी देखील अशीच भिन्न प्रमेये इतिहासाच्या तज्ज्ञांनी मांडली.

इतिहासाच्या व्याप्तीत भर पडण्यासाठीची आणखी एक महत्त्वाची घटना विसाव्या शतकाच्या प्रारंभी घडली. १९०३मध्ये ब्रिटिश इतिहासकार प्रा जी. बी. बरीयांनी इतिहासाच्या स्वरूपाबाबत मोठे विधान करून इतिहास क्षेत्रात मोठी खळबळ माजवली. अठराव्या शतकापासून इतिहासाला शास्त्रीय ज्ञान शाखांच्या नजीक नेऊन बसविण्यासाठी प्रयत्न काही इतिहासकार करीत होते. बरीने त्या पुढची पायरी गाठली आणि “इतिहास हे केवळ एक शास्त्रच आहे” असे ठाम प्रतिपादन केले. तर त्याचे खंडन करून “इतिहास हे शास्त्र आहे तसेच कलाही आहे” असे प्रमेय जी. एम. ट्रॅव्हलियन यांनी मांडले.

अशाप्रकारे अठराव्या शतकापासून आज पावेतो इतिहासाच्या व्यासंगी अभ्यासकांनी इतिहासाबाबत नानाविध सिद्धांत मांडले वइतिहास विषयक्षेत्राच्या कक्षा वाढविण्याचे महत्वाचे कार्यकेले.

### इतिहासात सामाजिक, आर्थिक व इतर घटकांचा अभ्यास

एकोणिसाव्या शतकात तर इतिहासाच्या विषयात मूलगामी बदल घडून आले. त्या मानवी जीवनाचा अधिकाधिक व्यापक दृष्टीने विचार होऊ लागला. माणूस हा एकाकी प्राणी नसून तो समाजाचा अविभाज्य घटक आहे, त्याच्या घडणीत समाजाचा मोठा वाटा आहे, म्हणून माणसाच्या कृतीबरोबरच तो राहातो त्या समाजाचा अभ्यास महत्त्वाचा ठरला. राऊसे म्हणतो, "History is essentially a record of the life of men in societies, in their geographical and physical environment. " तसेच सामाजिक परिस्थिती भौगोलिक स्थितीने बऱ्याच अंशी निर्धारित होत असते, म्हणून इतिहासात कालगणने इतकेच भूगोल शास्त्राच्याअध्ययनाचे महत्व प्रतिपादित केले जाऊ लागले. (Chronology and geography are the two eyes of history). याबरोबरच राजकीय जीवन हा मानवी जीवनाचा केवळ एक पैलू आहे, समग्र मानवी जीवन नाही, इतिहास म्हणजे गतकालीन मानवी जीवनाचा अभ्यास असेल तर राजकीय घटनाबरोबरच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांचाही विचार इतिहासकाराने करावा, त्याखेरीज मानवी जीवनाचे यथार्थ आकलन होणार नाही, असे मत मांडले गेले. या भूमिकेतून सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक इतिहासांची नवी दालने खुली झाली. उदा. कार्ल मार्क्सने मानवी जीवनाचे भौतिक वादी भाष्यकरून आर्थिक व्यवहारांकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. युरोप, अमेरिका व भारत या देशांमध्ये आर्थिक दृष्टिकोनातून इतिहास लिहिण्यासाठी प्रयत्न होऊ लागले. यामध्ये दामोदर धर्मानंद कोसंबी यांनी प्राचीन इतिहासाचे भौतिकवादी भाष्य केले. डॉ आर. एस. शर्मा यांनी भारतातील सरंजामशाहीचा अभ्यास केला. डॉ हबीब यांनी भारतीय कृषी व्यवस्थेचा व महसूल व्यवस्थेचा अभ्यास केला. मानवी जीवनाच्या सामाजिक क्षेत्रासंबंधी सुद्धा इतिहासकारांनी मोठ्या प्रमाणात इतिहास लेखनाला चालना दिली. इंग्लंडचा सहा शतकांचा सामाजिक इतिहास लिहिणाऱ्या प्रा जी. एम. ट्रिव्हेलियन यांनी त्यांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत राजकीय अंगाला फाटा देऊन लिहिलेला समाजाचा

इतिहास म्हणजे सामाजिक इतिहास होय. अशी सामाजिक इतिहासाची व्याख्या केलेली आढळून येते. इतकेच नव्हे तर सामाजिक इतिहासाचे महत्त्व प्रतिपादन करताना “सामाजिक इतिहासाशिवाय आर्थिक इतिहास निष्फळ व राजकीय इतिहास अनाकलीय ठरतो” असेही ठाम विधान त्यांनी केले.

मानवी जीवनाच्या सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक, घटकांबरोबरच इतिहासात वैचारिक घटकाला सुद्धा महत्व प्राप्त झाले. मानवी जीवनातील प्रत्येक अवस्थेतील वैचारिक धारणा भिन्न असतात म्हणजेच मानवी जीवनात वैचारिक परिवर्तन ही घडत असते. या दृष्टीने भिन्न कालखंडातील संकल्पना, विचार प्रणाली, वैचारिक परिवर्तन या सर्वांचा इतिहास वैचारिक इतिहासाचा विषय ठरतो. याच दृष्टीने“मानवाचा खरा अर्थपूर्ण इतिहास हा संकल्पनांचा इतिहास आहे कारण तो मानवी कृतीला जन्म देतो. ”असे शीलर म्हणतात. कॉलिंगवूड यांनी ही, 'सर्व इतिहास हा विचारांचा इतिहास आहे असे विधान करून वैचारिक इतिहासाचे महत्त्व प्रतिपादिले आहे. 'बेनेडिट क्रोसे याने 'इतिहास म्हणजे गतकाळाचा सजीव विचार आहे. ' (History is a living thought of the past ) असे म्हटले आहे. तर प्रा. मेटलंड यांनीही इतिहासात माणसाची कृती, शब्द व विचार हे सर्व महत्वाचे असल्याचे मत मांडले. (History is what men have done, said and above all what they have thought).

### राष्ट्रीय इतिहास

अठराव्या शतकाच्या अखेरच्या पर्वात व एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राष्ट्र राज्याची संकल्पना दृढमूल होऊ लागल्यानंतर इतिहासकार राष्ट्रांच्या इतिहासात रस घेऊ लागले. एकोणिसाव्या शतकातही हा प्रकार इतिहासकारांचा आवडीचा विषय होता. राजकीय क्षेत्र राष्ट्रवादी विचारप्रवाह ह्या कालावधीत प्रभावी बनल्याचाही हा परिणाम होता. मेकॉलेचा इंग्लंडचा इतिहास, लिओपोल्ड रांकेचा जर्मनीचा इतिहास,फ्रान्सचा इतिहास इत्यादी. हे लक्षणीय ग्रंथ ठरतात.

### जगाचा इतिहास

एकोणिसाव्या शतकापर्यंत इतिहासकार एका राष्ट्राचा इतिहासाचा मागोवा घेत. परंतु दळणवळणाची साधने, देश देशांत व्यापार वाढला. त्यामुळे इतिहासकाराची दृष्टी व्यापक होऊन खंडांचे इतिहास येऊ लागले. उदा. युरोपचा इतिहास, आशियाचा इतिहास, आफ्रिकेचा इतिहास,इ. विसाव्या शतकात ही प्रक्रिया अधिक विकसित झाली. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीने भिन्नखंड ही जवळ आले. अशा जागतिक इतिहास लेखनाचे प्रयत्न काही व्यापक दृष्टीच्या लेखकांनी विसाव्या शतकातही केलेले आढळून येते. एच. जी. वेल्स यांचा जगाच्या इतिहासावरील ग्रंथ प्रसिद्ध आहे. विल ड्युरंटयांचा संस्कृतीचा इतिहास हा कित्येक खंडात प्रकाशित झालेला जागतिक इतिहासाचे उत्तम उदाहरण आहे. अलीकडे जागतिक इतिहासाची कक्षा इतकी रुंदावली आहे की, या विषयाला पूर्ण न्याय देणे हे एका व्यक्तीच्या आटोक्याबाहेरचे काम झाले आहे. त्यासाठी सामूहिक कार्याची गरज ध्यानात आल्याने संस्थात्मक पातळीवर असे सामूहिक प्रयत्न होत आहेत.

### प्रादेशिक व स्थानिक इतिहास

राष्ट्रीय पातळीच्या इतिहासलेखनानंतर राष्ट्रातील एक विशिष्ट घटक म्हणून प्रदेशाचा इतिहास पुढे येवू लागला, या हेतू त्या प्रदेशातील वास्तव्य करणारे लोक, तेथील भिन्न समाज गट, त्यांची जीवन पद्धती, उदरनिर्वाहाची साधने,व्यापार,उद्योग, धार्मिक व राजकीय धारणा,संस्था,कला व स्थापत्य इत्यादींची सर्वांगीण व सखोल माहिती प्राप्त करून घेणे. या इतिहास लेखनाच्या कक्षेला Micro Study असे म्हणतात. उदा. वि. गो. खोबरेकर लिखित 'कोकणचा इतिहास'. विसाव्या शतकाच्या मध्यानंतर प्रादेशिक इतिहासाचा अधिक सूक्ष्म प्रकार म्हणजे स्थानिक इतिहास होय. उदाहरणार्थ अमरावती शहराचा इतिहास हा स्थानिक इतिहासाचा भाग होऊ शकतो.

### सर्वसामान्यांचा इतिहास

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये दुर्लक्षित व वंचित गटांचा इतिहास लिहिण्याची प्रेरणा मिळाली. वंचितांच्या कार्याची, संस्कृतीची, मानसिकतेची, प्रेरणांची दखल घेणे,त्याचे इतिहासातील योगदान आणि त्यासाठी पारंपरिक साधनसामग्रीबरोबर लोककथा, मिथके, दंतकथांचाही वापर होऊ शकतो, असे प्रतिपादन करणारा इतिहासकारांचा एक गट पुढे आला. यामुळे इतिहासाला नवे विषय मिळाले.

विसाव्या शतकात विषयाची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात वृद्धिंगत झाली. गतकालीन मानवी जीवनावर प्रकाश टाकू शकणाऱ्या अनेक ज्ञानशाखांच्या अध्ययनाला ह्या काळात चालना मिळाल्यामुळे इतिहासलेखनासाठी नवे विषय, नवी सामग्री उपलब्ध होऊ लागली. पुरातत्वशास्त्र, नाणेशास्त्र, कोरीव लेखशास्त्र ह्या इतिहासाच्या सहाय्यक शास्त्रांनी इतिहासाला भरपूर माहिती पुरविली व त्या माहितीच्या आधारे इतिहासकार तोवर अज्ञात असलेले नवे विषय हाताळू लागले. इतिहासाच्या केंद्रस्थानी असलेला मानव जाऊन त्या जागीविज्ञान-तंत्रज्ञान, परिवर्तन, खेळ, शहर, स्थळे, वास्तु, कला, दुर्मिळ वस्तू, औषधे, खाद्यपदार्थ, इ. घटकांचा इतिहास लिहिला जावू लागला. यामुळे इतिहास विषयाची व्याप्ती प्रचंड प्रमाणात वाढली.

तसेच इतर ज्ञानशाखांत जेव्हा नवनवे सिद्धांत मांडले जाऊ लागले, उदाहरणार्थ, आइनस्टीनचा सापेक्षतावादाचा सिद्धांत, साहित्याच्या क्षेत्रातील संरचनावादाचा सिद्धांत, उत्तरसंरचनावादाचा सिद्धांत तेव्हा त्यांचे प्रतिध्वनी इतिहासाच्या क्षेत्रातही उमटले आणि नवेदृष्टिकोण इतिहासाच्या क्षेत्रात प्रचलित होऊन इतिहासलेखनाचे नवे प्रयोग होऊ लागले, व्यापक विषयांबरोबर दुर्लक्षित लहान विषय मायकेल फूकोसारखे इतिहासकार हाताळताना आढळतात.

इतिहासाच्या व्याप्ती संबंधी भाष्य करीत असता, प्रो. रॉबिन जी. कॉलिंगवूड म्हणतात, “इतिहासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. इतिहासाची शिकवण मानवी जीवनाला उपयोगी आहे. सध्याच्या मानवी जीवनातील गतगोष्टी व त्यांचे होणारे समान परिणाम यामुळे त्यातील नाद हा पूर्वीप्रमाणे बदलण्याची शक्यता आहे. महत्त्वपूर्ण घटना लक्षात ठेवल्याने भविष्यकाळात निर्णय घेण्याच्या दृष्टीने सोईचे ठरते. काय होऊ शकेल व सध्याच्या सुसंगत कालक्रमणेमध्ये कोणता धोका होऊ शकेल याचे मार्गदर्शन इतिहासामुळे होऊ शकते. प्रो. सलिकीने इतिहासाची व्याप्ती अशी सांगितले आहे. “जी व्यक्ती गतकालीन घटनांचे वैशिष्ट्य जाणण्यात निष्णात असते, ती व्यक्ती स्वतःच्या समकालीन घटनांचे मूल्यमापन करण्यास

फारशी चूक करणार नाही. " म्हणजेच इतिहासाची व्याप्ती अशा प्रकारे व्यक्तीचे मूल्यमापन करण्यास पात्र असते. इतिहासाच्या व्याप्तीची तीन वैशिष्ट्ये प्रो. बॉडीनने खालीलप्रमाणे सांगितली आहेत.

i. ज्या शाश्वत तत्त्वांवर मानवी स्वभावाची बैठक आधारित असते त्या तत्त्वांची ओळख इतिहासामुळे आपल्याला होते. उदा. मानवी स्वभावातील राग, लोभ, मोह, क्रौर्य, हंसा, महत्त्वाकांक्षा या गुणांची ओळख आपल्याला इतिहासामधून होते. मोगल इतिहासामध्ये जागोजागी क्रौर्य आपल्याला दिसते. उदा. मोगल राज्यकर्ते आपल्या विरोधकांचे डोळे काढीत असत. आपल्या विरोधकांचा नायनाट करण्याची प्रवृत्ती मोगलांमध्ये आपणास दिसते. हिंदू लोकांमधील धरसोड वृत्ती, विनाकारण शत्रूला आदराने वागवणे व हीच मंडळी वेळ आल्यावर हिंदूंच्यावर उलटतात. उदा. पृथ्वीराज चौहानने महंमद घोरीला आपल्या हाती सापडला असता सोडून दिले, परंतु महंमद घोरीला संधी मिळाल्यावर त्याने पृथ्वीराज चौहानचे डोळे काढले. मराठ्यांच्या इतिहासामध्ये, प्रतापराव गुजराने बहलोलखान हाती सापडल्यावर त्याला सोडून दिले पण पुढे नेसरीच्या खिंडीत प्रतापराव सापडल्यावर बहलोलखानाने त्याला ठार मारले. ऐतिहासिक घटना वाचूनसुद्धा समाजामध्ये समज निर्माण होत नाही. हा एका अर्थाने इतिहासाचा पराभव मानावा लागेल.

ii. ऐतिहासिक घटनांच्या अभ्यासावरून एका ठरावीक मर्यादेपर्यंत भावी घटना वर्तविता येतात. या व्याप्तीचे स्वरूप असे की, प्रत्येक राष्ट्राची, समाजाची, विशिष्ट जडणघडण असते. एकदा वा जडणघडणीचा अभ्यास केला म्हणजे त्या समाजासंबंधी, राष्ट्रासंबंधी आपल्याला भवितव्यता काही प्रमाणात वर्तविता येईल. इतिहासाच्या अभ्यासाने ज्याप्रमाणे भवितव्यता वर्तविणे काही प्रमाणात शक्य आहे, त्याचप्रमाणे वर्तमानकाळाचा अभ्यास करून आपल्याला ऐतिहासिक घटनांच्या आधारे भूतकाळाचे चित्र उभे करणे शक्य आहे.

iii. मानवी इतिहासाच्या अभ्यासाद्वारे शाश्वत जीवनाची मूल्ये जागता येतात. मानवी जीवनाची शाश्वत मूल्ये म्हणजे प्रेम, दया, शांती, माणुसकी मानवतावाद इ. प्राचीन भारताच्या अभ्यासापासून या गुणांचा परिपोष झालेला आपल्याला दिसतो. आधुनिक जगामध्ये याच मूलभूत सत्याच्या मागे सर्व जग धावते आहे असे आपल्याला दिसते.

अशा प्रकारे ग्रीक इतिहास लेखनाच्या काळापासून आजपर्यंत इतिहासविषयाची व्याप्ती वाढत गेली; विषयांचे क्षितिज विस्तारत गेले. या दृष्टीने "इतिहास म्हणजे स्थूलमानाने गतकाळच" असे विधान हेन्री जॉन्सन करतो. (History in the broadest sense is everything that ever happened it is the past itself). इतिहास ही या दृष्टीने सतत विकसित व व्यापक होत जाणारी गतिशील ज्ञानशाखा आहे, असे म्हणणे वास्तवाला धरूनच होईल.

### आपली प्रगती तपासा

१. प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासमाधील फरक स्पष्ट करा .

प्रो. बॉडीनने सांगितलेले इतिहासाच्या व्याप्तीचे तीन वैशिष्ट्ये वर्णन करा.

## १.४ इतिहासाचे स्वरूप

इतिहासाचा संबंध मानवी जीवनाच्या सर्व घटकांशी असतो. त्यावरून इतिहासाच्या व्यापक स्वरूपाची आपणास कल्पना येण्यास हरकत नाही. परंतु गतकालीन मानवी जीवन हा इतिहासाचा विषय असला तरी दैनंदिन मानवी जीवनातील सर्व शिल्लक बाबींचे वर्णन इतिहासात अपेक्षित नसते. फार पूर्वी इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता घटनांची एक जंत्री म्हणजे इतिहास. प्रगतीया संकल्पनेचा इतिहासाशी संबंध आहे असे कोणालाच वाटत नव्हते परंतु कालांतराने दृष्टिकोन बदलला गतकाळाच्या अभ्यासावरून वर्तमान समजून घेतले पाहिजे अशी भावना इतिहास संशोधकांमध्ये निर्माण झाली. १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून इतिहासाकडे पाहण्याच्या भूमिकेमध्ये फरक पडू लागला. इतिहासात घटना व्यक्तीनिष्ठतेनुसार न पाहता वस्तुनिष्ठतेमधून पाहिल्या पाहिजेत अशी धारणा संशोधकांमध्ये निर्माण झाली. घटनांचे फक्त वर्णन करून चालणार नाही त्याचे मूल्यमापन करून अन्वयार्थ लावला पाहिजे त्याचे स्पष्टीकरण केले पाहिजे इतकेच नव्हे तर त्या घटनांचे विविध स्तरावर लोकांना महत्त्व सांगितले पाहिजे अशा संकल्पना अस्तित्वात आल्या. एकंदरीत इतिहासाचे पूर्वीचे कथा हे स्वरूप जाऊन त्याला एक प्रकारचा आकार येऊ लागला. १९०३ मध्ये इतिहास हे एक शास्त्र आहे अशी संकल्पना उदयास आली. तसेच इतिहासाचे तत्वज्ञान ही संकल्पना रूढ झाली. इतिहास संशोधकाने तीन बाबींवर भर द्यावा असे मानले जाऊ लागले.

**त्या तीन बाबी अशा :**

१. सत्याचा शोध घेतला पाहिजे.

२. गतकाळात ज्या घटना घडल्या त्या जशाच्या तशा लोकांच्या पुढे मांडल्या पाहिजेत.

३. प्राप्त झालेल्या घटनांचा अन्वयार्थ लावून त्यांचे स्पष्टीकरण केले पाहिजे व या घटना समाजापुढे आकर्षक भाषेत मांडल्या पाहिजेत.

१९ व्या शतकात जर्मन तत्त्वज्ञ हेगेल व मार्क्स यांनी इतिहास प्रक्रियेचे स्वरूप आपल्या दृष्टिकोणानुसार मांडले. हेगेलच्या मते, इतिहास प्रक्रियेमध्ये एखादी कल्पना महत्त्वाची

असते तर माक्सने भौतिक वादावर जोर देऊन इतिहासाचे स्वरूपच पालटून टाकले. १९ व्या शतकाच्या शेवटी जर्मन इतिहासकार रांकेयाने इतिहासामध्ये नवीन कल्पना शोधून काढल्या व इतिहासलेखन शास्त्राचा पाया घातला. त्यालाच आधुनिक इतिहासलेखन शास्त्राचा (Historiography) जनक मानतात.

**इतिहासाचे नेमके स्वरूप कसे असावे हे आपणास पुढील मुद्यांवरून लक्षात येईल.**

१) मानवी जीवनाचा आलेख म्हणजे इतिहास होय.

२) इतिहासात पारलौकिक घटनांना स्थान नाही.

३) गतकाळातील संस्मरणीय घटनांची निवड व त्यांचे स्पष्टीकरण.

४) वास्तवाचे वर्णन

५) सत्यशोधन व सत्यकथन

६) काळ व स्थळ

७) सातत्य व परिवर्तन

८) इतिहास लेखनातील वस्तुनिष्ठता

९) इतिहास लेखनासाठी निवडलेला वर्ण्यविषय

१०) कालपरत्वे बदलणारे घटक

माणसाच्या जीवनातील लक्षवेधी संस्मरणीय घटना इतिहासाचा विषय असतात. म्हणून इतिहास ही मानव्य शास्त्राची अविभाज्य शाखा आहे. गतकालीन मानवी जीवनाचा आलेख म्हणजे इतिहास; हे इतिहासाच्या स्वरूपाचे पहिले वैशिष्ट्य होय. तसेच मानवी जीवनाच्या लौकिक बाजूचा विचार इतिहासाचा कक्षेत येतो लोकगीत जीवनातील कल्पना सदृश्य घटकांना इतिहासात स्थान नसते. त्याचप्रमाणे काळ आणि स्थळ हे इतिहासाचे दोन आयाम आहेत आणि त्या मर्यादांसाठी इतिहासाचे कार्य चालते. गतकालीन मानवी जीवन हा इतिहासाचा विषय असला तरी दैनंदिन जीवनातील सर्व शिल्लक बाबींचे वर्णन इतिहासात अपेक्षित नाही माणसाच्या जीवनातील संस्मरणीय लक्षवेधी घटना इतिहासाचा विषय असतात. म्हणजेच निवड हा इतिहासाचे स्वरूप आहे. परंतु फक्त घटनेचे वर्णन महत्त्वाचे नसून ती घटना अर्थपूर्ण होण्यासाठी त्याचे अन्वयार्थ लावणे इतिहासाला आवश्यक असते यासंदर्भात इ. एच कार यांचे विधान महत्त्वाचे आहे. ते म्हणतात,“घटना बोलत नाहीत तर इतिहासकार त्यांना बोलके करतो”

इतिहास हा संपूर्णता पुराव्यांवर आधारित असल्यामुळे काल्पनिकव मिथकेया घटकांना त्याच स्थान नाही. म्हणून वास्तवाचे वर्णन करणे हे इतिहासाचे अत्यंत महत्त्वाचे स्वरूप आहे. त्याचप्रमाणे मानवी जीवन गतिमान असल्यानेत्यातील सातत्य व परिवर्तन उलगडून दाखवणेमहत्त्वाचे आहे हे इतिहासाचे स्वरूप सांगता येते. यासोबतच गतकालीन घटनांचे सत्य वास्तव दर्शन घडविण्यासाठी वस्तुनिष्ठ भूमिका महत्त्वाचीअसते. इतिहासकाराला तटस्थ राहून घटनांचे वर्णन करावे लागते. परंतु इतिहासकार हा वर्तमान काळात राहणारा असल्याने त्यात तो काही अंशी डोकावणे अपरिहार्य असते. असा विचार एडवर्ड कार या

इतिहासकाराने मांडला आहे. शास्त्रशुद्ध पद्धतीने लिहिलेला इतिहास रटाळ वाटू न देता प्रभावी परिणामकारक व रंजकरीत्या मांडणे. हा देखील इतिहासाच्या स्वरूपाचा महत्त्वाचा भाग आहे. यासंदर्भात फाईनबर्ग हा इतिहासकार म्हणतो, “गतकाळातील मृत माहिती तशाच रताळ पद्धतीने मांडणे हे इतिहास लेखनाचे वैशिष्ट्य नसावे तर त्या माहितीचा अन्वयार्थ लावून त्या ऐतिहासिक प्रसंगांचे वर्णन रोचक पद्धतीने करून सजीव करणे हे इतिहासाचे स्वरूप असावे. ”

तसेच इतिहास लेखनासाठी निवडले गेलेल्या विषयाचे स्वरूपही काळानुसार बदलते पूर्वी केवळ राजकीय घटना व महान व्यक्तींचे कार्यकर्तृत्व यांनाच इतिहासात स्थान मिळत असे. अलीकडे मात्र सर्वांचे मानवी जीवन इतिहासाचे स्वरूप बनले आहे.

इतिहासाच्या स्वरूपावर भाष्य करत असताना आपल्याला पुढील संकल्पना समजावून घेतल्या पाहिजेत म्हणजे इतिहासाच्या स्वरूपाचीविविधता समजू शकेल.

**१. बदल हा इतिहासाचा गाभा**

असा एक समज आहे की इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. काही इतिहासकार या विधानाला विरोध करतात; परंतु हे विधान अर्धसत्य आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होते याचा अर्थ एवढाच मर्यादित स्वरूपात घ्यावयाचा की घडणाऱ्या सर्व घटना सारख्याच असतात; परंतु त्या घडण्याचे मार्ग मात्र वेगळे असतात. ज्या दोन घटनांमध्ये आपण साम्य शोधण्याचा प्रयत्न करतो त्यामधून एक सूत्र मिळते काय हे आपण पाहत असतो. (Cause and effect relation) ऐतिहासिक घटना ह्या स्थल व काल या बाबतीत कधीही एकाच ठिकाणी घडत नाहीत, तरीसुद्धा त्यामध्ये मूलभूत एकात्मता असते. अशा मूलभूत एकात्मतेमुळेच इतिहासातील नियम ( Laws of history ) अस्तित्वात आले. मनुष्य प्राणी निसर्गचक्रात गुरफटलेलाआहे. परिणामी त्याच्या हातून ठराविक परिस्थितीत ठराविक कृती होते उदा. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली व दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना झाली. इतिहासामध्ये काही श्रेष्ठ विजेते होऊन गेले. उदा. जुलियस सीझर, नेपोलियन, बुल्यम डेवर हिटलर परंतु त्यांचे यश हे क्षणकाल टिकले. थोडक्यात म्हणजे इतिहासाची पुनरावृत्ती होते असे दिसून येते. इतिहासाच्या स्वरूपात विधानाला विरोध करणारे संशोधक असे म्हणतात की, इतिहासाची पुनरावृत्ती होत नाही. कारण बदल (Change ) हा निसर्गनियम आहे. त्यामुळे जरी दोन घटना सारख्या वाटल्या तरी त्यांमध्ये साम्य नसते. इतिहासाचा मुख्य उद्देश अंतर्गत सुसंगती जोडणे हा आहे व या संदर्भात दोन ऐतिहासिक घटना कधीही सारख्या असत नाहीत. बदल हा इतिहासाचा गाभा आहे हे लक्षात ठेवावे.

**२. सर्व इतिहास हा समकालीन इतिहास असतो**

इतिहासाच्या स्वरूपाबद्दल इटालियन तत्त्ववेत्ता बेनेटो क्रोसे (Croce) म्हणतो की, "सर्व इतिहास हा समकालीन इतिहास असतो. " त्याच्या मते भूतकाळ व वर्तमान काळ हे दोन्हीही एका विशिष्ट घटनाक्रमाने जोडलेले असतात. अशा या साखळीमुळे गतकाळातील घटनासुद्धा समकालीनच वाटते. क्रोसेच्या या विधानाचे प्रो. आर. जी. कॉलिंगवूड (Collingwood) यांनी समर्थनच केले आहे त्यांच्या मते इतिहास म्हणजे

दुसरे तिसरे काही नसून गतकाळातील घटना नव्याने सांगितलेल्या असतात. कॉलिंगवूडच्या या विधानाला ग्रीक इतिहासकार यूसीडीडस् (Thucydides) याने पुष्टी दिली आहे. तो म्हणतो, "सर्व ऐतिहासिक घटना या एकमेकांशी बुद्धिवादी पातळीवर व कायमच्या जोडल्या गेलेल्या असतात. " कोसेच्या वरील विधानाचा अन्वयार्थ असा की, प्रत्येक घटनेचा समकालीन भाषेमध्ये अन्वयार्थ लावता येतो. काही गोष्टी कलात्मक दृष्ट्या, काही नीतिशास्त्राच्या आधारे, काही तर्काच्या आधारे, तर काही अर्थशास्त्राच्या आधारे सिद्ध करता येतात. इतिहासातील प्रत्येक घटना यांपैकी कमीत कमी एकाने तरी प्रभावित असते. या सर्व घटना समकालीन असतात म्हणून सर्व इतिहास हा समकालीन इतिहास असतो.

**३. इतिहास म्हणजे भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद होय.**

प्रो. इ. एच्. कार यांनी 'What is History ?' या ग्रंथात वरील कल्पना मांडली आहे. त्यांच्या मते इतिहासकाराला सोडविण्यासाठी काही समस्या आवश्यक आहेत. जर अशा समस्या नसतील तर ते इतिहासाचे पुस्तक म्हणजे एक बखर होईल. इतिहासामध्ये जर अशी स्थिती येऊ द्यावयाची नसेल तर इतिहासकाराने स्वतःच्या हुशारीने काही समस्या निर्माण करून त्यांना उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इतिहासकारांचे खरे महत्त्व तो किती समस्या सोडवितो यावर अवलंबून आहे. इतिहासकाराला सर्वच्या सर्व भूतकाळ माहीत असणे शक्य नाही, म्हणून तो वास्तवतेच्या (Reality) किती जवळ तो याच्यावर त्याचे स्थान अवलंबून आहे. अशा प्रयत्नांमध्येच भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यात संवाद साधला जातो. भूतकाळ हा कधीही न संपणारा असल्यामुळे भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील हा संवाद अखंड चालतो.

**४. इतिहासात मूल्यमापन करणे आवश्यक**

इतिहासामध्ये स्वतःची काही मते असावीत किंवा नसावीत याबद्दलच्या वादावर लॉर्ड ॲक्टन याने असे मत प्रतिपादन केले आहे की, इतिहासामध्ये नुसतेच काय आवश्यक व काय अनावश्यक याची चर्चा करणेही गैर आहे. तर प्रत्येक इतिहासामध्ये मूल्यमापन चर्चा व काही निर्णय देणे हे त्या इतिहास संशोधनाचे अविभाज्य भाग आहेत. रँक व ब्यूरी (Bury) यांना हा विचार मान्य नाही. त्यांना असे वाटते की, इतिहासकाराने गतकालावे चित्रण करावे व त्यावर कोणत्याही प्रकारचे विधान न करता जशा घटना दिसल्या तथा लोकांच्यापुढे ठेवाव्यात. कोणत्याही प्रकारे तत्त्व शोधण्याचा प्रयत्न करू नये. अशा तऱ्हेचे विधान हे संपूर्णपणे गैर आहे. ब्यूरीच्या मते राष्ट्रवाद व इतिहासाचे तत्त्वज्ञान यांमुळे काही निर्णय देण्याची चुकीची पद्धत निर्माण झाली. म्हणून इतिहासकाराने निर्णय न देता नुसत्या घटना जशाच्या तशा मांडाव्यात; अर्थात् रँक व ब्यूरी यांची ही विचार सरणी आधुनिक काळात समर्थनीय नाही. या संदर्भात ॲक्टन म्हणतो की, "इतिहासाची सर्वांत मोठी कामगिरी कोणती असेल तर त्याने माणसाची सदसद्विवेक बुद्धी ही वस्त्रा सारखी सतेज केली. "

प्रो इरफान हबीब यांनी Indus Civilization नावाच्या संशोधनपर ग्रंथात त्यांनी सिंधू संस्कृतीच्या नाशाच्या कारणाची मीमांसा मार्क्सवादी तत्त्वज्ञानाप्रमाणे केली आहे. अतिरिक्त धान्य खपविण्याची योजना नसल्यामुळे सिंधू संस्कृतीचा ऱ्हास झाला असा सिद्धांत त्यांनी मांडला.

**५. इतिहासामध्ये समकालीन तत्त्व असावे**

प्राचीन काळापासून ग्रीक लोकांनी इतिहासाचा अन्वयार्थ लावत असताना बुद्धिवादी कसोट्यांचा वापर केला. रोमन लोकांनी त्याला राजकीय स्वरूप दिले, तर मध्ययुगातील धर्मसंस्थेने इतिहासामध्ये देव असतो असे मत मांडले. जर्मन तत्त्ववेत्त्यांनी इतिहासाला तात्त्विक बैठक दिली. मार्क्सने भौतिकवादाला प्राधान्य दिले. फ्रेंच लोकांनी समाजवाद पाहिला, तर ब्रिटिशांना इतिहासामध्ये साम्राज्यवाद दिसू लागला. अरब, चिनी, हिंदी, जपानी लोकांनी इतिहासाकडे आपापल्या दृष्टिकोणांतून पाहिले. प्रत्येक युगाचा इतिहासाच्या तत्त्वज्ञानावर परिणाम होत गेला. प्रत्येक युगात होणारे बदल हे भावी काळात टीकास्पद बनले. त्यामुळेच जसजशा कल्पना बदलतील तसतसे इतिहासाचे पुनर्लेखन होण्याची आवश्यकता भासू लागली. जॉन सीलीच्या मते इतिहास म्हणजे गतकाळातील राजकारण. या व्याख्येला इतिहासाचार्य राजवाडे यांनी याच भूमिकेतून विरोध केला. थोडक्यातइतिहासात समकालीन विचारांचा प्रभाव असतो व तो अपरिहार्य आहे.

**६. भवितव्य वर्तवण्याची क्षमता**

इतिहास प्रक्रियेमध्ये २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून अशी एक प्रक्रिया सुरू झाली की, इतिहासाला शास्त्राचा दर्जा असावा असे संशोधक म्हणू लागले. ज्याप्रमाणे शास्त्रामध्ये भवितव्यता वर्तवता येते, त्याचप्रमाणे इतिहासामध्येसुद्धा अशीच प्रक्रिया झाली पाहिजे. ऐतिहासिक घटना स्थल, काल व मानवी प्रवृत्ती यांनी बद्धअसतात. मानवी प्रवृत्तीवर जर भवितव्यता वर्तवता येत नसेल तर इतिहासामध्ये हे का शक्य होऊ नये ? समाजशास्त्रामध्ये ज्याप्रमाणे गॅलप पोल (Gallup Poll) द्वारे भविष्य वर्तवता येते तशा तऱ्हेची प्रक्रिया इतिहासामध्ये का होऊ शकणार नाही? अर्थात् जर समाज शास्त्रातील शास्त्रीय पद्धत इतिहासाला लागू केली तर भवितव्यता वर्तवता येईल.

**७. इतिहासाची पती सरळ रेषेत की चक्राकार ?**

इतिहासाची प्रगती कोणत्या दिशेने होते याबद्दल विद्वानांच्यामध्ये दोन भिन्न विवार प्रवाह आहेत. पहिल्या गटाच्या विचारप्रवाहानुसार इतिहासाची प्रगती ही अज्ञात भूतकाळापासून ज्ञात वर्तमानकाळातून अज्ञात भविष्यकाळात एका सरळ रेषेत होत असते; यामध्ये कोठेही बदल होत नाही. म्हणून भूत, वर्तमान व भविष्यकाळ यांमध्ये एक सुसंगती असते व त्याला आपण प्रगती असे म्हणतो. दुसऱ्या गटाच्या विचारप्रवाहानुसार इतिहासाची प्रगती चक्राकार पद्धतीने होत असते. ज्या ठिकाणाहून ती प्रक्रिया सुरू होते त्याच ठिकाणी ती पुन्हा येऊन मिळते. अशा तऱ्हेचा दृष्टिकोण इजिप्शियन, बॅबिलोनियन, भारतीय, चिनी, ग्रीक, रोमन व मुस्लिम इतिहासकारांनी व्यक्त केला आहे.

**८. इतिहास हा अनन्यसाधारण आहे.**

इतिहास हे एक स्वयंपूर्ण शास्त्र आहे, असा विचार पॅट्रिक गार्डिनर यांनी The Nature of Historical Explanation' या ग्रंथात मांडला आहे. गार्डिनर यांच्या म्हणण्याचा अर्थ असा की, इतिहासामध्ये दोन विचार प्रस्थापित केले आहेत. त्यानुसार कारण-परंपरांचे महत्त्व व ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण या दोन्हीही बाबींचा विचार केला पाहिजे. इतिहासाचा वर्ण्य विषय हा नैसर्गिक शास्त्रांच्यापेक्षा वेगळा आहे. इतिहासाची अभिव्यक्ती ही संपूर्णपणे वेगळीच आहे. पॅट्रिक गाडिनर म्हणतात, इतिहास हा अभिव्यक्तीचा व अनुभवाचा एक वेगळा असा प्रकार आहे आणि इतिहासकाराने नैसर्गिक शास्त्राच्या शास्त्रज्ञापेक्षा वेगळ्याच मार्गाने याकडे पाहिले पाहिजे. " ("History is a different mode of experience and the histo rian must in consequence approach it with methods entirely distinct from the methods of the scientist." २ ) अशा संदर्भात इतिहास हा स्वयंपूर्ण आहे. इंग्रज इतिहासकार आर. जी. कॉलिंगवूड यांच्या मते "इतिहासकार हा पूर्वी घडलेल्या घटना पुन्हा नव्याने तयार करून लोकांना सांगत असतो" ("History is re-enactment of past experience.") इतिहासाचे ज्ञान हे अशा स्वरूपाचे आहे की गतकाळात मानवप्राण्याने काय केले हे सांगितले जाते व या संदर्भात या विषयाचा इतर संबंध नाही. म्हणून ते स्वयंपूर्ण शास्त्र आहे.

**९. इतिहास स्वायत्त आहे**

इतिहासाची स्वयंपूर्णता आणि इतिहासाची स्वायत्तता या दोन्हीही कल्पनांमध्ये प्रकाराचा फरक नसून गुणात्मक फरक आहे. (There is a difference not of kind but of degree) इतिहासाची स्वायत्तता ही इतिहासकाराच्या प्रतिमेवर अवलंबून राहते म्हणून प्रो. ओक्सहॉट (Oakeshoot) म्हणतो की, इतिहासातील घटना या वर्तमानकाळातीलघटना असतात आणि त्या संदर्भात ऐतिहासिक घटना या समकालीन असतात. ऐतिहासिक घटनांमध्ये एक विचार असतो; म्हणून कॉलिंगवूड म्हणतो की, All History is the History of Thoughts"प्रो. कॉलिंगवूडच्या मते कोणतीही ऐतिहासिक घटना ही नुसतीच असत नाही तर तीमध्ये काही कारणपरंपरा असते. तसेच, प्रत्येक घटनेमध्ये काही ना काही तत्त्व किंवा विचार असतो. जगाच्या दृष्टीने ज्या घटनेमध्ये तत्त्व नाही ती उपयुक्त ठरू शकत नाही. मानवी समाजाची जी रचना व जो विकास झाला आहे त्याच्या मुळाशी काही विचार असतो. म्हणून इतिहास म्हणजे विचारांचा इतिहास असे कॉलिंगवूड म्हणतो.

**आपली प्रगती तपासा –**

१. "इतिहास म्हणजे भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद होय". भाष्य करा.

___

___

___

___

२. इतिहासाचे स्वरूप व त्याचे महत्त्व अधोरेखित करा.

## १.५ सारांश

एकंदरीत,इतिहासाचे अर्थ,व्याख्या, स्वरूप व व्याप्ती याचे पूर्ण आकलन करून घेतल्यानंतर असे लक्षात येते की, इतिहास ही एक परिवर्तनशील ज्ञानशाखा आहेत. इतिहासाचे स्वरूप हे काळानुरूप बदलत जाते. समकालीन मानवी जीवनातील राजकीय, सामाजिक, आर्थिकव सांस्कृतिक घटकांचा अथवा रूढ विचारांचा प्रभाव इतिहासलेखनावर होत असतो त्यामुळे इतिहासाचे वर्ण्य विषय बदलत असतात. इतिहासाच्या विषय संकल्पने बद्दलक्रमाक्रमाने जे बदल होत गेले. त्याने इतिहासाची कक्षा वाढत गेली, मानवी जीवनाचा विविध अंगांनी विचार होऊ लागला. गतकाळाच्या वैज्ञानिक पद्धतीच्या अध्ययना वरून व्यक्तीच्या अथवा राष्ट्राच्याविशिष्ट काळातील घटनांवरून भविष्य वर्तविले जावू लागले. आधुनिक कालखंडातील इतिहासकार मानवी जीवनातील घटनांचे अध्ययनकरून चिरकालीन व तात्कालिक स्वरूपाचे सिद्धांत प्रतिपादन करू लागले. अशा अनेक कारणांमुळे इतिहासाचे महत्व वाढत गेले. तसेच इतिहास विषयाची व्याप्ती वाढत गेली.

## १.६ प्रश्न-

१. इतिहासाची व्याख्या व अर्थ सांगून त्याची व्याप्ती स्पष्ट करा.

२. इतिहासाचे अर्थ स्पष्ट करून त्याच्या स्वरूपावर भाष्य करा.

३. इतिहासाचे अर्थ, व्याख्या, व्याप्ती व स्वरूप स्पष्ट करा.

## १.७ संदर्भ

१. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, पाचवी आवृत्ती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६.

२. सरदेसाई, बी. एन, इतिहास लेखन शास्त्र, तिसरी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७.

३. म्हैसकर प्रदीप, इतिहास तत्वज्ञान (व्याप्ती व चिंतन ), औरंगाबाद, २०१५.

४. सरदेसाई बी. एन. गायकवाड, हनुमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११

५. सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, प्रथमवृत्ती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११.

६. देव प्रभाकर, इतिहासलेखनशास्त्र, प्रथमावृत्ती, कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९७.

❄❄❄❄❄❄❄

२

# इतिहासाचे महत्त्व

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ इतिहासाचे महत्व

२.४ सारांश

२.५ प्रश्न

२.६ संदर्भ

## २.१ उद्दिष्टे

- मानवी जीवनाच्या संदर्भात इतिहासाचे महत्त्व अभ्यासणे
- इतिहासाच्या प्रासंगिकतेवर भाष्य करणे.
- सामाजिक उपयोगिता म्हणून इतिहासाचे महत्व अधोरेखित करणे.

## २.२ प्रस्तावना

२१ व्या शतकामध्ये इतिहास ही संकल्पना झपाट्याने बदलत आहे. प्राचीन, मध्ययुगीन कालखंडातील इतिहास वसंकल्पना व प्रबोधनानंतरच्या काळातील इतिहासाच्या पारंपारिक तत्त्वज्ञानामध्ये अथवा संकल्पनेमध्ये अत्यंत मूलगामी परिवर्तन घडून आले. अठरावे व एकोणिसावे शतक बुद्धिवादाचा काळ असल्यामुळे अनेक इतिहासकार इतिहास विषयाची सैद्धांतिक मांडणी करून इतिहासाचे तत्वज्ञान मांडू लागले. इतिहासाचे संशोधक व अभ्यासक यांनी१८ व्या १९ व्या शतकाच्या बुद्धिवादी कालखंडात इतिहास विषयाचे तात्विक विवेचन करून सैद्धांतिक मांडणी करू लागले. इतिहास म्हणजे काय ? त्याची कार्यपद्धती कोणती ? त्याच्या प्रक्रियेचे स्वरूप काय ? त्यांचा विषय कोणता? ऐतिहासिक घटिते म्हणजे काय? त्यावर आधारित असतात का ऐतिहासिक सत्याचे स्वरूप कसे असते? घटितांमधून काही तर्कसंगत अर्थ काढता येतो का? असे नानाविध प्रश्न या कालखंडात विचारले जाऊ लागले. इतिहास ही साहित्याची शाखा आहे ह्या तत्कालीन भूमिकेविरुद्ध प्रखर प्रतिक्रिया व्यक्त केली व इतिहासलेखानाला शास्त्रीय अधिष्ठान देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. रांकेने ऐतिहासिक साधनांच्या परीक्षणाची शास्त्रीय पद्धत विकसित करून ऐतिहासिक साधनांच्या विश्वसनीयतेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्लाइल, हेगेल, कार्ल मार्क्स सारख्या इतिहासकारांनी मानवी जीवनातील स्थित्यतरांमागे अथवा विकासात्मक प्रक्रियेत तत्व किंवा सिद्धांत शोधण्याचा प्रयत्न केला. इतिहासात भविष्य वर्तवण्याची क्षमता आहेवा मूल्यमापन करणे शक्य आहे असे मत इतिहासकार मांडू लागले. आधुनिक काळातील इतिहासकारांनी

खालील चार गोष्टींवर भर दिल्याचे दिसून येते ज्यामुळे इतिहासाला वैज्ञानिक स्वरूप प्राप्त झाले. इतिहासात सत्य कथन करणे, विश्वसनीय पुरावे देणे, त्या पुराव्यांची चिकित्सा करणे व माहितीचे रोचक व आकर्षक भाषेत अन्वयार्थ लावणे.

अशा प्रकारे एकंदरीत इतिहासाचे आधुनिक कालखंडात बदललेल्या स्वरूपामुळे इतिहासाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले. इतिहासाचे महत्त्व सांगताना विलियम बेकन म्हणतो की, "इतिहास मनुष्याला बुद्धिमान बनवतो" इतिहासाचे महत्त्व फक्त पराक्रम, युद्धे, लढाया, राजकीय घटना यांचे वर्णन करणे येवढे मर्यादित नसून त्यांचे कार्यकारण संबंध स्पष्ट करणे, परिणामांवर भाष्य करणे व सर्व घटनांचे अनुभव वर्तमान कालखंडात भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी किंवा नियोजन करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून स्वीकारणे गरजेचे असते. या संदर्भात इतिहासकार बिपिन चंद्र म्हणतात, "वर्तमान काळामध्ये असणाऱ्या संस्था संकल्पना व घटक यांचे मूळ अथवा उगमस्थान हे भूतकाळात दडलेले असते त्यामुळे वर्तमानकालीन बाबींचे नियोजन व धोरणे ठरवत असताना इतिहासाचे ज्ञान क्रमप्राप्त ठरते. "इतिहासाच्या वाचनाने व्यक्तीला, समाजाला व राष्ट्राला काय मिळते कोणता फायदा होतो हा सर्वच विषय चिंतनीय व विचारप्रवर्तक आहे.

## २.३. इतिहासाचे महत्व

### १. वास्तवतेची जाणिव

इतिहासकाराला गतकालीन घटना किंवा घडामोडी मांडत असताना वास्तवतेची जाणं ठेवून लिहिणे किंवा नि:पक्षपाती इतिहास लेखन करणे गरजेचे असते. कारण संबंधित इतिहास ग्रंथ समाजाचा दिशादर्शक असतो. अनैतिहासिक इतिहास लिहिल्यामुळे समाज दिशाहीन बनू शकतो. समाजात कलह उत्पन्न होऊ शकतात. त्यामुळे ऐतिहासिक सत्य मांडताना इतिहासकारांनी आपली निःपक्षपाती भूमीका बजावणे आवश्यक आहे. गतकाळातील घटनांचे मूल्यमापन करताना होऊन गेलेल्या घटनांची मांडणी वस्तुनिष्ठतेच्या आधारावर करावी. त्यातील कूट प्रश्न, वादग्रस्त प्रसंग, स्थळे आणि व्यक्ती यांचे मूल्यमापन करताना वाईट दृष्टिकोण बाळगू नये. आत्मप्रौढी पासून दूर असावे. गतकालीनएखाद्या व्यक्तीने केलेली गोष्ट, एखादा प्रसंग, अथवा घटना बरोबर का चूक ते ठरविण्याचा अधिकार आणि योग्यता इतिहासकाराला आहे. परंतु वरील बाबतीत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी स्थळ आणि काळ सापेक्षता, त्याची चिकित्सा निःपक्षपातीपणाने करणे आवश्यक आहे. इतिहासकाराला एखाद्या घटनेचे वर्णन मात्र स्वत:च्या दृष्टीने करता येते. ती घटना तीच राहाते. उदा. १८५७ मध्ये देशात घडलेली क्रांती किंवा उठाव या घटनेकडे निरनिराळ्या इतिहासकाचे निरनिराळे दृष्टीकोन आहेत. कोणी या घटनेला स्वातंत्र्याचा उठाव जसे म्हणतात तर कोणी या घटनेला शिपायाचे बंड असे म्हणतात. यात प्रत्येकानी आपल्या पसंतीचा निर्देश केला आहे. कारण इंग्रजांनी त्या राज्यद्रोहाच्या दृष्टीकोनातून पाहीले. भारतीय इतिहासकारांनी या घटनेकडे स्वातंत्र्य युध्दाच्या दृष्टीकोनातून पाहीले. म्हणून ब-याच वेळेस ऐतिहासिक घटना सत्य स्वरूपात असली तरी त्यावर स्वतंत्रपणे भाष्य करण्याचा अधिकार इतिहासकाराला आहे.

## २. सामाजिक उपयोगिता

इतिहास हा मानव केंद्री असल्यामुळे आणि मानव हा समाजात राहत असल्यामुळे गतकाळातील अनेक घटना, रूढी परंपरा, धार्मिक परंपरा, समज-गैरसमज, नीतिमूल्य, नैतिक मूल्ये इत्यादी बाबतचे ज्ञान किंवा त्यातील दोष व उणिवा दाखविण्याचे काम इतिहास करत असतो. त्यामुळे इतिहास हा समाजाचा दिशादर्शक असतो. सामाजिक व्यवस्थे मध्ये गतकाळात जे काही परिवर्तन झाले त्या परिवर्तनाचा अभ्यास देखील इतिहास करतो. समाज व्यवस्थेतील विविधता व सातत्य यांचा आढावा तसेच विविध पंथ, धर्म, जातीयांची उगमस्थाने व त्यांचा विकास हे ऐतिहासिक संशोधनामार्फत प्राप्त करता येते. समाज व्यवस्थेबाबत धोरणे ठरवत असताना त्या संदर्भातील अनेक गतकालीन माहिती प्राप्त करावी लागते. ऐतिहासिक अनुभवांच्या आधारे त्यातील उणिवा व दोष दूर करता येतात. उदा. राष्ट्रीय चळवळीने प्रतिगामीहिंदू अथवा मुस्लिम विचार प्रणालीचा स्वीकार न करता धर्मनिरपेक्षतेची बांधणी केली व लोकशाही समाज निर्माण केले. भारतीय समाजातील अनेक दुर्बल समुदायांचे शेकडो वर्ष खच्चीकरण केले गेले. त्यांची ही ऐतिहासिक सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन स्वतंत्र भारतात त्यांच्या उन्नतीसाठीचे प्रयत्न केले गेले. समाजाची विचारधाराव विचार प्रणाली दूषित होऊन ती संपूर्ण समाजासाठी किंवा समाजातील एका गटाकरिता घातक होऊ नये यासाठी इतिहास स्वतः जवळचे दाखले देऊन असे होण्यास पायाबंद घालत असतो. समाजात असे अनेक घटक अस्तित्वमान असतात जे समाजात राहूनही कधी एकरूप होतच नाही. या विपरीत आपले अस्तित्व समाजात कायम ठेवून ते समाजास दुरुस्त करण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा घटक तत्वांना नियंत्रणात आणण्यासाठी काय करायला हवे हेही इतिहास आपल्या माध्यमातून समाजास सांगत असतो प्रसंगी त्याचे निर्मूलन कसे करावे हे सुचित करत असतो. इतिहासाची सार्थकता यातच असते की समाजाकडून इतिहासात भविष्यकाळाचा मार्गदर्शक हे स्वरूप प्राप्त व्हावे. इतिहासाच्या अध्ययनामुळे प्राप्त होणारे ज्ञान हे बहुआयामी असते. इतिहासाच्या अध्ययनामुळे वैयक्तिक ज्ञानात वृध्दी तर होतेच पण विविध मार्ग आणि उपायांच्या साधने हे ज्ञान समाजास सहाय्यभुत ठरते. ऐतिहासिक वस्तू व अभिलेख संग्रहालये आणि ऐतिहासिक स्थळांचे पर्यटन हे दोन व्यवसाय तर इतिहासाच्या साह्यानेच उभे राहतात. साहित्य निर्मिती आणि मनोरंजन यासाठी देखील साह्यभूत होत असते.

## ३. राष्ट्रीय स्मृती

'इतिहासाची उपेक्षा करणाऱ्या राष्ट्रास कोणतेही भवितव्य असत नाही. असे बी शेख अली यांनी म्हटले आहे. इतिहास हा राष्ट्राचे अगर समृद्धीचे भांडार असते. आपल्या स्मृतीच्या साह्याने मानव अनुभवांचे जतन करीत असतो आणि जतन केलेल्या अनुभवाच्या सहाय्याने भविष्यकालीन आयुष्य सुखी आणि सुलभ कसे होईल यासाठी प्रयत्न करीत असतो. एखाद्या राष्ट्राला मिळालेले स्वातंत्र्य हे राष्ट्रासाठी बलिदान केलेल्या हजारो नायकांमुळे प्राप्त झालेले असते. त्यामागे त्यांचे विचार व कृती दडलेल्या असतात व ते संबंधित राष्ट्राची प्रेरणा ठरत असते. एखाद्या राष्ट्राची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय प्रगती ही त्याराष्ट्राच्या गतकाळावर अवलंबून

असते. त्यामुळे राष्ट्रातील ऐतिहासिक स्थळे व सांस्कृतिक ठेवा जतन होणे गरजेचे आहे. सबंधित इतिहास व स्मृति त्याची जपवणूक करणे हे देशाचे कर्तव्य असते. फक्त देशात स्मारके बांधून राष्ट्रीय स्मृती जतन करता येत नाही तर संबंधित नेत्याचे राष्ट्रीय विचार, स्वातंत्र्यासाठीचे योगदान, सामाजिक जाणीव, इ. संदर्भातील माहिती इतिहासबद्ध करून समाजात त्याचे प्रसार प्रचार करणे महत्त्वाचे ठरते. हेन्री स्टील कॉमेजर म्हणतो, “जर समाजाला इतिहास नसेल तर स्मृती नसलेल्या माणसाच्या अवस्थेसारखी त्याची भयानक परिस्थिती होते.”

## ४. ज्ञानवृद्धी

इतिहास मानवाला ज्ञानसंपन्न बनवतो. इतिहासातील प्रत्येक प्रसंग, घटना, विचार, टप्पा मानवी ज्ञानामध्ये भर घालत असतो. कारण इतिहासामध्ये गतकाळातील इतिहासाची नोंद असते. ज्या घटना आपल्याला माहिती नसतात त्या घटनांची माहिती इतिहासा द्वारे झाल्याने ज्ञानात भर पडते. पुढच्याला ठेच आणि मागचा शहाणा या न्यायाने इतिहासाचे अध्ययन करणारे व्यक्तीचे व समाजाचे ज्ञान भंडार समृद्ध व परिपक्व बनते आणि अनुभव विश्व अप्रत्यक्षपणे समृद्ध बनते. इतिहासाचे मानवकेंद्रीस्वरूप जाऊन इतिहास सर्वव्यापी बनला आहे. वनस्पती, पुरातत्त्व, पर्यावरण, परिवर्तन, समुदाय, औषधे, संस्था, संघटना संकल्पना इ. घटकाचा सर्व इतिहास आज आपणाला अभ्यासता येतो. त्यामुळे संबंधित विषयाचे ज्ञानप्राप्त होते.

समकालीन जगातील लोकांचे आंतरराष्ट्रीय ते स्थानिक पातळी वरचे स्थलांतराचे प्रमाण वाढल्यामुळे संबंधीत देशातील लोकांची संस्कृती, इतिहास, राहणीमान, समाज, रूढी परंपरा, धर्म, पंथ, इ माहीती असणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणेअनेक देशांना प्राचीन इतिहास आहे. इतिहासाच्या अध्ययनाने इतर देशातील संस्कृत्यात्याचा उदय, विकास, अस्तयांची माहीती होते. उदा. चीन, भारत, इराण, इ. त्याचप्रमाणे एखाद्या विषयाबाबत ऐतिहासिक संशोधन केले असता त्याविषयीची माहिती जाणून घेतल्यावर त्या संदर्भातील इतर अनेक अंगांचा विचार अथवा त्याबद्दल माहिती जाणून घेण्याची उत्सुकता संशोधकास लागते. या संदर्भातप्रो. आर्थर मार्वी आपल्या ‘The Nature of History’ या ग्रंथात म्हणतात की “ इतिहास नसलेले लोक अथवा इतिहासाची जाण नसलेला समाज हा स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखा असतो. प्रत्येक व्यक्तीस आपल्या घरण्याचा, वंशाचा, देशाचा, राज्याचा, गावाचा, शहराचा भूतकाळ जाणून घेण्याची उत्सुकता असते. त्यामुळे इतिहासाचे अध्ययन व संशोधन कधीच संपत नाही. काळ जसजसे पुढे सरकत जाते तसे ते इतिहास जमा होत असते. म्हणून इ. एच. कार हे इतिहासकार म्हणतात, “इतिहास हा भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांतील न संपणारा संवाद आहे. ”

इतिहासाबाबत अनभिज्ञ असणाऱ्या लोकांबद्दल रोमनसिनेटर सिसरो याने यासंदर्भात मोठे मार्मिक विधान केले आहे, तो म्हणतो, “ज्या व्यक्तीला त्याच्या जन्मापूर्वी घडलेल्या गोष्टींचे ज्ञान नाही त्यांची बाल्यावस्था संपली नाही असे समजावे. ”(To be ignorant of what happened before you wear born it’s to be ever a child)

## ५. मार्गदर्शक

इतिहासाचे मार्गदर्शक म्हणून काय महत्व आहे हे प्रो. लेकीने (Lecky) सांगताना म्हटले आहे की, "जी व्यक्ती गतकालातील घटनांचे वैशिष्ट्य जाणण्यात निष्णात आहे ती व्यक्ती स्वतःच्या समकालीन घटनांचे मूल्यमापन करण्यात फारशी चूक करणार नाही. " ("He who has learned to understand to turn character and tendency") मानवी जीवनाबाबतची माहिती इतिहासाद्वारे प्राप्तहोते. रानटी अवस्थेपासून मानवाने क्रमाक्रमाने प्रगती कशी केली याची माहिती इतिहासातून मिळाली की उत्क्रांतीच्या तत्त्वाचा बोध होतो आणि मानवी जीवनाच्या उद्दिष्टाचाही अर्थबोध होतो. पूर्वीच्या लोकांनी केलेल्या प्रशंसनीय साहसी कार्यातून प्रेरणा मिळते. चांगले कार्य करण्यास प्रोत्साहन मिळते तर पूर्वी केलेल्या चुका कळाल्या की ते कसे टाळायचे हे ही कळते. इतिहास अशाप्रकारे माणसाला दीपस्तंभ प्रमाणे मार्गदर्शन ठरतो. आधुनिक काळातील अस्तित्वात असणाऱ्या संकल्पना, संस्था, घटक, वास्तु, वस्तू, एखादी गोष्ट या सर्वांचे उगमस्थान अथवा मूळ इतिहासात दडलेले असते त्यामुळे आधुनिक काळात या संदर्भातील धोरणे व नियोजन ठरवत असताना सबंधित संस्था व संकल्पना कधी उदयास आली?तिचा विकास कसा झाला, त्याचे दोष कोणते? गुण कोणते? या सर्वांचा आढावा घेण्यासाठी इतिहासाची पाने चाळावी लागतात. उदा. एखाद्या परिसरात नवीन महाविद्यालय बांधावयाचे असेल तर त्याठिकाणी असणारे महाविद्यालय तेथील विद्यार्थ्यांचे प्रमाण, शैक्षणिक दर्जा, सोयी सुविधा, राजकीय व सामाजिक पार्श्वभूमी माहिती असणे गरजेचे असते. छ. शिवाजी महाराजांनी गनिमी युद्ध तंत्र पद्धतीने आपल्या शत्रूस जेर केले, कमी सैन्यबळासोबत मोठ्या शत्रूशी कसे लढावे याचे उत्तम उदाहरण शिवाजी महाराजांनी जगाला घालून दिले. हा इतिहास अभ्यासूनच व्हिएतनाम सारखा देश अमेरिका या बलाढ्य देशासोबत गनिमी युद्धतंत्र पद्धतीने प्रदीर्घ काळ युद्ध लढला आणि जिंकला. तसेच काही नकारात्मक घटना सुद्धा इतिहासात घडलेल्या दिसून येतात. ज्याप्रमाणे नेपोलियन ने रशियावर कडाक्याच्या थंडी मध्ये आक्रमण केले. थंडी मूळे लाखो सैन्य गारठून मरण पावले. ही घटना प्रसिद्ध असून सुद्धा त्याचे अचूक आकलन करून न घेतल्यामुळे द्वितीय महायुद्धात जर्मन सैन्य रशिया वर चढाई करत असताना मारले गेले.

त्याचप्रमाणे इतिहासाचे अध्ययन केल्याने व्यक्तीच्या दृष्टिकोनात देखील बदल होतो. एखाद्या घटनेचा सांगोपांगाने अभ्यास केल्यानंतर, त्याचे परिणाम समजून घेतल्यानंतर एखादी योजना कार्यान्वित करावी की नाही या बद्दल पुनर्विचार करता येतो. अशाच पद्धतीने एखाद्या गोष्टीचे नियोजन बद्दल मते जाणून घ्यावयाचे असेल तर अनेक व्यक्ती सबंधित नियोजन त्यांच्या दृष्टीकोनातून सांगण्याचा प्रयत्न करतील. त्याला पूर्वग्रहदूषितेचे गालबोट लागण्याची शक्यता असते. परंतु संबंधित गोष्टीची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेतल्यानंतर त्याबद्दल निःपक्ष पणे मते देता येतील. प्रो. गुस्टावसन (Gustavson) आपल्या 'A Preface to History' या ग्रंथात म्हणतात की, " एखादा मनोवैज्ञानिक सुद्धा औषध सुचविण्यापूर्वी गतकालाकडे जातो. ज्या वेळी त्याला एखादी वैयक्तिक समस्या सोडवायची असते, तेव्हा त्याला निदान करण्यासाठी व्यक्तिगत माहिती असणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व

म्हणजे तिच्या अनुभवांची गोळाबेरीज, त्याचप्रमाणे एखादे राष्ट्र किंवा संस्था याने दृश्य स्वरूप त्यांच्या पार्श्वभूमीवर प्रकाश टाकतात" ("Even the Psychiatrist goes into the Past before he dares to Prescribe a remedy. When he is asked to solve a personal problem he invariably wants a case history. Just as an individuals Personality represents the sum total of his experience. So the present appearance and conduct of nations and institutions reflect the formative circumstances of their background".

## ६. शिकवण

इतिहास जी शिकवण देतो ती रुक्ष, नीरस उपदेशपर मार्गाने नव्हे तर जीवंत उदाहरणे वाचकांच्या पुढे मांडून इतिहास रंजक पद्धतीने अप्रत्यक्ष शिकवण देतो. त्यामुळे तो रटाळ वाटत नाही. इतिहासाने समाजाला सहीष्णूपणाची जाण होते. भारतीयांना सहिष्णुता शिकविण्याची गरज नाही. प्राचीन काळापासून भारतामध्ये सहिष्णुता आहें. विविध संस्कृती, धर्म, विचार, संकल्पना, निष्ठा इत्यादी बाबी आपल्याला माहीतच आहेत. इतर राष्ट्रांनी या गुणांचा विकास केला पाहिजे. ते काम भारतीय इतिहास वाचून इतर राष्ट्रांनी करावे. तसेच इतिहासानेअनेक शहानपण प्राप्त होते आपल्याला आपले शत्रू कोण, मित्र कोण याची जाणीव होते तेव्हा समाजाला शहाणपणा शिकविण्याचे काम इतिहास करत असतो अर्थात इतिहासापासून मिळणारे शहाणपण हे ज्यात्या समाजाच्या नेतृत्वावर प्रामुख्याने अवलंबून असते. समाजाचे नेतृत्व दुबळे स्वार्थी असेल तर इतिहासापासून काही धडा घेणार नाही व चिनी म्हणीप्रमाणे "थोर व्यक्ती" हे राष्ट्राचे दुर्दैव ठरते. रॉबर्टसनच्यामते, समाजात जागृतता निर्माण करण्याचे काम इतिहास करीत असतो. इतिहासाच्या अभ्यासाने माणसाला आपला बुद्धिवादी दृष्टिकोण (Rational attitude) व तर्कबुद्धी (reasoning) वाढविता येते. प्रो. आर. जी. कॉलिंगवूड (R. G. Collingwood) यांनी 'The Idea of History' या ग्रंथात इतिहासाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे: "इतिहासाला अतिशय महत्त्व आहे. त्याची शिकवण. मानवी जीवनाला अतिशय उपयोगी आहे. कारण; सध्याच्या मानवी जीवनातील गतगोष्टी व त्यांचे होणारे समान परिणाम यांमुळे त्यांतील वाद हा पूर्वीप्रमाणेच बदलण्याची शक्यता आहे. महत्त्वपूर्ण घटना लक्षात ठेवल्याने भविष्यकाळात निर्णय घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात. असे हे निर्णय दृश्य स्वरूपात दाखविता येत नाहीत; परंतु काय होऊ शकेल व सध्याच्या सुसंगत कालक्रमणेमध्ये कोणता धोका होऊ शकेल याचे दिग्दर्शन करता येईल" ("History has a value; its teaching are useful for human life; simply because the rhythm of its changes is likely to repeat itself, similar autecedents leadings to similar consequents; the history of notable events is worth remembering in order to surve as a basis for Prognostic judgements, not demonstrable but probable laying dowh not what will happen but what is likely to happen, ladicating the points of danger in rhythms now going on. "

इतिहासराष्ट्राला संस्कृतीक वारसा शिकवित असतो. राष्ट्राला वेळोवेळी आलेले अनुभव इतिहासामधून समाजाला समजतात त्या मधुन राष्ट्राच्या ठिकाणी स्वाभीमान, आत्मसन्मान व राष्ट्रप्रेम निमीण होते.

### ७. वेळ व काळ यांचे महत्व

इतिहासामुळे समाजाला वेळ व काळ याचे महत्त्व समजले. उदाहरणार्थ इसवी सन १७६१ पानिपत च्या युद्धावेळी भाऊसाहेबास वेळीच मदत पोहोचली असती तर भारताचा इतिहास बदलला असता असे म्हणण्यास आपल्याला वाव आहे. १७६१ च्या पनिपत युद्धापुर्वी नजीब खान रोहिल्याच्या विधायक कारवाया आपल्याला रोखता आल्या असत्या तर मराठ्यांना पराभवास सामोरे जावे लागले नसते. काळाची पाऊले ओळखण्याची क्षमता आपल्यामध्ये इतिहास वचनाने निर्माण होते. काल व वेळ यांचा अभ्यास करून वर्तमान काळात सुनियोजित नियोजन करून गोष्टी व्यवस्थीत मार्गी लावता येतात. तसेच भविष्य काळातील घटना संबंधी अंदाज बांधता येतो.

### ८. व्यक्तिमत्व विकास

इतिहासाचे अध्ययन मानवास विवेकी, समतोल बनविते. मनोवृत्ती स्थिर होतात. मानवी व्यवहार आणि कार्याचे अर्थ प्राप्त होते. जीवनातील इष्ट अनिष्ट गोष्टी कळाल्यामुळे बुध्दी प्रगल्भ होते. समाजाला नव्या बौद्धिक सवयी लावून नवी शिस्त लावण्याचे काम इतिहास करत असतो. इतिहासामध्ये शास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब केल्या कारणाने एक प्रकारचा शास्त्रीय दृष्टिकोन व्यक्तीमध्ये, समाजामध्ये निर्माण होतो. इतिहासातूनच प्रेरणा घेवून व्यक्ती आपल्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणू शकतो. अशा अनेक थोर व्यक्तीचे कर्तृत्व इतिहासबद्ध झाले आहेत. ज्या व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर मानवजातीच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण ठसा उमटवला त्या व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा, शौर्याचा, विचारांचा अभ्यास इतिहासा मधूनच होत असतो. अशा व्यक्तींच्या जीवनकार्याची प्रेरणा आपल्याला मिळत राहते. त्यामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या इतिहासाच्या अध्ययनाने व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वामध्ये, स्वभावात, विचारांत महत्त्वपूर्ण बदलहोतात. उदा. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, भगत सिंग, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींच्या चरित्र अध्ययनाने अध्ययनकर्त्यांच्या व्यक्तिमत्त्वांचा विकास होतो.

### ९. भविष्याचा वेध

प्रत्येक जीवित प्राणी हा वर्तमानात जगत असतो. मानव हा बुध्दी प्रधान असल्याने वर्तमानात जगत असतानाच तो वर्तमानीय आयुष्य सुखमय आणि सुरक्षित करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याच वेळी तो आपले भविष्यही पूर्णतया सुखमय झाले नाही तरी कमीत कमी हे त्रासदायक होऊ नये याकरिता सातत्याने प्रयत्नरत असतो. असे असले तरीही या करिता आपण भूतकाळाच्या इतिहासाच्या गुहेत उपाय व साधनांचा शोध घेत असतो. भविष्यकाळाचा वेध घेणाऱ्या मानवाचे पाय भविष्यकाळाच्या दृष्टीने

भूतकाळातच असतात. वर्तमान काळातील माणसाचे तर असतातच. यामुळे असे म्हटले जाते की 'इतिहास विश्वाच्या वर्तमान स्वरूपाच्या पार्श्वभूमीचे ज्ञान प्रदन करतो.

इतिहासाच्या अभ्यासाने माणसाची अनुभवकक्षा वाढते. अनेक घटनांतील परस्परसंबंध त्याला समजून येतात. प्रो. एल्टन (Alton) आपल्या 'The Practice of History' या ग्रंथात म्हणतात, "इतिहासाच्या ज्ञानाने वर्तमानकाळाच्या अनुभूतीला भक्कमपणा येतो व भविष्यकाळासाठी काही मार्गदर्शन होऊ शकते. ("Historical knowledge gives solidity to the understanding of the present and may suggest guiding lines for the future. "

## १०. विश्वबंधुत्वाची भावना

आधुनिक काळात विज्ञानाच्या प्रगतीमुळे जग इतके जवळ आले आहे की, जगाच्या पटलावर होणाऱ्या बदलांचा परिणाम हा सर्व मानव जातीवर होत आहे. त्यामधूनच 'वसुधैव कुटुंबकम्' हा विचार पुढे आला. जगातील सर्व देशांबद्दल सद्भावना व सहानुभूती असली पाहिजे, हे उदिष्ट ठेवले. स्वराष्ट्र प्रेमाचा जर अतिरेक झाला तर काय होऊ शकते याची शिकवण इतिहासाने आपल्याला पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाने करून दिली. यामधूनच युनेस्कोसारखी संघटना स्थापून विश्वबंधुत्व व शांततापूर्ण सहकार्याची भावना वाढविण्याचा प्रयत्न केला. या सर्वांचा अभ्यास इतिहासामधून होत असतो.

## ११. परिवर्तवाचा अभ्यास

हिंदी जॉन्सन यांच्या मते समाजामध्ये राष्ट्रांमध्ये होणारे बदल यांचा मागोवा घेण्याचे काम इतिहास करीत असतो राष्ट्रांमध्ये विविध प्रकारचे भेद असतात याचा अभ्यास करणे हा इतिहास चा हेतू असणे आवश्यक आहे. बदलांचा अभ्यास करणे हा इतिहासचा प्रधान हेतू असला पाहिजे सर्व बदलांमध्ये एक प्रकारचे सातत्य असते हे शोधून काढण्याचे काम इतिहासाने केले पाहिजे बद्दल म्हणजे विकास असे गृहीत धरून संशोधन केले पाहिजे.

त्याचप्रमाणे, इतिहासवाचनाने नैतिक विचार, राजकीय विचारांची एक खास बैठक तयार होते. इतरांच्या अनुभवावरून समाज सुधारतो. राष्ट्राला भेडसवणारे प्रश्न कसे सोडवावेत यासंबंधी जान इतिहास वाचनाने प्राप्त होऊ शकते. वादग्रस्त मुद्दे सोडविण्यासाठी इतिहासाचा उपयोग होतो.

प्रा. बॉडीन यांच्यामते इतिहासाचे महत्व उपयोगाचे तीन प्रकारे वर्णन करता येईल.

i. ज्या शाश्वत तत्वावर मानवी स्वभावाची बैठक आधारीत आहे अशा तत्वाची ओळख समाजाला करून देण्याचे काम इतिहास करीत असतो.

ii. विशिष्टमर्यादेपर्यंत भावी घटनांसंबंधी भवितव्यता वर्तविता येते.

iii. इतिहासाच्या अभ्यासाद्वारे शाश्वत जीवनमूल्य ओळखता येतात.

## १२. जिज्ञासा

मानवाला नवे ज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा असते. ही मानवाची उपजत प्रवृत्ती आहे. माझे पूर्वज कसे राहत होते, त्यांची जीवनपद्धती के होती हे जाणून घेण्याची जिज्ञासा प्रत्येक व्यक्तिला, समाजाला, व राष्ट्राला असते. हा परिचय इतिहासदवारे होतो. त्यामुळे प्रत्येक जिज्ञासा पूर्तीचा अनानंद मिळतो. इतिहास गतकालीन संस्कृतीचा वारसा जपतो; त्याद्वारे प्राचीन संपन्न परंपरेची जाणीव करून देतो आणि अशा प्रकारे आत्मज्ञान देतो. हा विचार आर. जी. कोलिंगवूड हया विसाव्या शतकातील इंग्रज इतिहासकाराने प्रभावीपणे मांडला आहे. आपल्या Idea of History हया ग्रंथात ते म्हणतात, “आत्मज्ञानासाठी इतिहास उपयुक्त आहे. इतिहास मौल्यवान आहे. त्याची शिकवण मानवी जीवनासाठी लाभदायक आहे. (History is for humanSelf-Knowledge---History has a Value, Its teaching are useful for human life)

## १३. नैतिक मूल्यांची जोपासना

इतिहासाद्वारे नैतिक मूल्यांची जोपासना व संवर्धन केले जाते. इतिहास हा समाज मानव जीवनात नैतिक मूल्यांचे महत्व प्रतिपादन करत असतो. तसेच त्याला सुरक्षितता ही प्रदान करत असतो. खरेतर इतिहासामध्ये मानवाच्या ज्या संघर्षाची, प्रगतीची नोंद केली जाते. ती नैतिकतेने अनैतिकतेवर केलेल्या विजयाची असते. उदा. शिवाजी महाराजांचा संघर्ष, राणा प्रतापचे लढा, हिटलरचे अधपतन, महात्मा गांधींचा संघर्ष, रामायण, महाभारत इ. या संदर्भात थॉमस मनरो म्हणतात, “हजार पानांच्या धार्मिक ग्रंथांच्या वाचनापेक्षा इतिहासाची चार दोन पानांचे वाचन केव्हा ही चांगले”.

इतिहासाच्या शैक्षणिक मूल्यांवर सुप्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार व विचारवंत विल डयूरंट हे देखील विशेष भर देतात. ते म्हणतात, ‘शिक्षण म्हणजे संस्कृतींचा वारसा पुढील पिढीच्या हाती देणे आणि यात इतिहास मोलाची भूमिका बाजवतो.

## १४. गतकालीन संकल्पनांचे मुळ

वर्तमानकाळात प्रचलित असलेल्या अनेक विचारप्रवाहांचे मूळ गतकाळात आढळते. वसाहतवाद, व्यापारवाद, साम्राज्यवाद, जागतिकीकरण इत्यादी गहन वाटणाऱ्या सिद्धांतांचा उगम कसा व कोणत्या परिस्थितीत झाला, याची माहिती कळली की त्यांचे मर्मही सहजपणे ध्यानात येते. व्यक्तीपुढे, समाजापुढे अगर राष्ट्रापुढे उभ्या असलेल्या अनेक कठीण समस्यांची बीजे गतकाळात रुजलेली असतात. ती बीजे कशी व कोणत्या परिस्थितीत रुजली, कोणी व का रुजविली याचे स्पष्टीकरण इतिहासाद्वारा मिळाले की त्यांचे निराकरण करणे सुकर होते. इतिहासातूनच, ज्यू समाज जगभर का विखुरला, त्यांच्यात व अरबांच्यात संघर्ष का निर्माण झाला, किंवा भारतात जमातवादाला खतपाणी कोणी घातले हे कळले तर त्याकडे पाहण्याची निकोप दृष्टी मिळते, अतिरेकी निर्णयाचा धोका टळतो. आणि आपल्या पुढील समस्यांना विवेकीपणे आत्मविश्वासाने सामोरे जाण्याची शक्ती मिळते. समस्या केवळ माझ्याच वाट्याला आलेल्या नाहीत, त्या पूर्वीही गतकाळात अनेकांनी अशाच समस्यांना तोंड

दिले आहे ही जाणीव इतिहास निर्माण करतो. यामुळे माणसाची संकुचित, कूपमण्डुक वृत्ती नष्ट होऊन दृष्टी व्यापक बनते.

**१५. जागतिक घडामोडींचे ज्ञान**

इतिहासाच्या अध्ययनामुळे आजच्या काळातील जागतिक घडामोडींचे मर्मही सहजपणे उलगडते. भारत-पाकिस्तान तणावाची मूळ कारणे ध्यानात येतात. इंग्लंडमधील लोकशाहीच्या विकासाचे मर्म कळते, आणि आज आतंकवादाविरुद्ध कंठशोष करीत दण्ड थोपटणाऱ्या अमेरिकेनेच पश्चिम आशियातच नव्हे तर जगभर मूल्यहीन राजनीतीला व आतंकवादाला कसे खतपाणी घातले या वर्तमानावर इतिहास प्रकाशझोत टाकतो. यामुळेच राजकीय मुत्सद्यांना इतिहासाचे अध्ययन आवश्यक ठरते.

**आपली प्रगती तपासा –**

१. इतिहासात वेळ व काळाचे महत्त्व अधोरेखित करा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

२. व्यक्तिमत्त्व विकास व नैतिक मुल्यांची जोपासना यात इतिहासाची भूमिका सांगा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## २.४ सारांश

एकंदरीत वरील प्रमाणे इतिहासाचे महत्व विशद करता येईल. इतिहास हा फक्त शैक्षणिक विषय राहिला नाही. तर गतकालीन मानवी जीवनाचा सखोल स्वरूपाचा अभ्यास आहे आणि त्याद्वारे वर्तमान समाजाला मार्गदर्शन व भविष्याला दिशा देण्याचा काम इतिहास करत असतो. इतिहासाचे अध्ययन अर्थहीन नसून मानवी मन प्रगल्भ करण्यासाठी त्यांचे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी आणि एकूण जीवनाचा मार्ग सुखकर कार्यासाठी उपयुक्त व उपकारक ठरते. तसेच इतिहास या ज्ञानशाखेमुळे पुरातत्व शास्त्र, वस्तु संग्रहालय शास्त्र, दफ्तर शास्त्र, पर्यटन अशा विविध क्षेत्रात नोकरी व रोजगार प्राप्त होतो.

## २.५ प्रश्न

१. सामाजिक उपयोगिता या संदर्भात इतिहासाचे महत्व प्रतिपादन करा

२. मानवी जीवनात इतिहास हा विषय कसा सहाय्यक ठरतो यावर चिकित्सा करा.

३. भारतीय इतिहासाच्या संदर्भात इतिहासाची उपयोगिता स्पष्ट करा

## २.६. संदर्भ

1. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, पाचवी आवृत्ती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६.
2. सरदेसाई, बी. एन, इतिहास लेखन शास्त्र, तिसरी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७.
3. म्हैसकर प्रदीप, इतिहास तत्वज्ञान (व्याप्ती व चिंतन), औरंगाबाद, २०१५.
4. सरदेसाई बी. एन. गायकवाड, हनुमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११
5. सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, प्रथमवृत्ती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११.
6. देव प्रभाकर, इतिहासलेखनशास्त्र, प्रथमावृत्ती, कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९७.

❄❄❄❄❄❄❄

# ३

# इतिहासाची साह्यकारी शास्त्रे

## (Auxiliary Sciences of History)

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ साह्यकारी शास्त्र अध्ययनाची सुरुवात

३.४ इतिहासाची साह्यकारी शास्त्रे

३.५ सारांश

३.६ प्रश्न

३.७ संदर्भ

## ३.१ उद्दिष्टे

- वैज्ञानिक व समाजशास्त्रीय शाखा विषयांचे इतिहासाच्या कार्यक्षेत्रातील उपयोगिता जाणून घेणे
- इतिहासाच्या सहाय्यभूत शास्त्रांचे इतिहास अध्ययनातील महत्व अभ्यासणे.
- साह्यकारी शास्त्रविषयांचे क्षेत्र व त्याच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.

## ३.२ प्रस्तावना

इतिहास म्हणजे भूतकालीन मानवी जीवनाची समग्र वाटचाल होय. या संकल्पनेच्या न्यायाने मानवी आयुष्याशी निगडित सर्वच घटकांचा अभ्यास इतिहासामध्ये अन्नस्युत होतो. तसेच राजकीय घडामोडी घडण्यामागे आर्थिक, भौगोलिक, सामाजिक, मानसिक कारणे तितकीच महत्वपूर्ण असतात. माणूस हा समाजप्रिय असल्याने त्याचा समाजाशी किंवा समाजातील इतर घटकांशी, रूढी, परंपरा इ. संबंध येतो तसेच मानव हा समाजामध्ये उदरनिर्वाहसाठी आर्थिक व्यवहार सुद्धा करत असतो. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या जीवनावर भौगोलिक, परिस्थितीचा परिणाम व मानसिक परिणाम होत असतो. त्यामुळे समाजरचना, अर्थव्यवस्था व हवामान, वातावरण, मानसिकता यांचे इतिहासासंदर्भातील आकलन होण्यासाठी त्या शाखांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. भूतकालीन मानवाने त्याच्या संबंधित घटनांचे वर्णन तत्कालीन परिस्थितीमध्ये उपलब्ध असणाऱ्या भाषा व लिपीचा वापर करून लिहिण्याचा प्रयत्न केला. ह्या लिखाणामध्ये व आत्ताच्या भाषा आणि लिपी मध्ये खूप मोठी तफावत असलेली दिसून येते त्यामुळे तत्कालीन भाषा व लिपी यांचे आकलन होण्यासाठी हस्ताक्षर शास्त्र, आलेख शास्त्र, अधिकृत कागदपत्रांचा अभ्यास करणारे

शास्त्र, भाषाशास्त्र, मुद्रांचा अभ्यास करणारे शास्त्र इत्यादीं शास्त्राचा उपयोग इतिहासाच्या अभ्यासासाठी होतो. इतिहासाला पूरक म्हणून नाणकशास्त्र, संख्याशास्त्र, संदर्भग्रंथशास्त्र, मूर्तीशास्त्र व पुरातत्त्वशास्त्र हे देखील महत्त्वाचे सहाय्यकारी शास्त्र म्हणून ओळखले जातात. ह्या सर्व साह्यकारी शास्त्राच्या अभ्यासामुळे इतिहासातील कोणत्याही घटने संबंधी परिपूर्ण ज्ञान प्राप्त होण्यास मोठी मदत होते. म्हणून या संदर्भात प्रो. मॅबले म्हणतात, "असे काही साहाय्यकारी विषय आहेत की जे इतिहासकाराला टाळता येणे शक्य नाही."

## ३.३ साह्यकारीशास्त्र अध्ययनाची सुरुवात

१९ व्या शतकामध्ये इतिहासलेखन प्रक्रियेसंबंधी अनेक विचार नव्याने मांडण्यांत येऊ लागले. इतिहास लिहीत असताना त्याला शास्त्रीय दर्जा प्राप्त व्हावा यासाठी अनेक प्रयत्न जाणीवपूर्वक होऊ लागले. अशा प्रयत्नांमधूनच एक समस्या अशी निर्माण झाली. की, इतिहास हे एक शास्त्र आहे की कला ? यामधूनच ज्या गटाला इतिहास हा वाङ्मयाचाच एक भाग आहे असे वाटत असे त्यांनी History as an Art या दृष्टिकोणातूनच लिखाण केले. अशा लिखाणामध्ये बुद्धिवादापेक्षासुद्धा बऱ्याच वेळा प्रतिभेकडे लक्ष देण्यात आले परंतु दुसरा गट हा जास्त प्रभावी ठरल्याने History as a Science या दृष्टिकोणातूनच त्याच्याकडे पाहिले जाऊ लागले. २० व्या शतकापूर्वी इतिहासलेखन करत असताना इतर काही शास्त्रांची इतिहासाला मदत होऊ शकते अशी कल्पनाच "नव्हती. १९०३ मध्ये History is a science, no more and no less असे म्हटल्यामुळे इतिहास लेखनात अनेक शास्त्रांचा संबंध येतो याची पहिल्यांदा कल्पना आली.

इतिहासलेखन प्रक्रियमध्ये जी अनेक शास्त्रे येतात, त्यांना Auxiliary Sciences किंवा Anciliary Disciplines असे म्हणतात. प्रो. लॅजीलॉस आणि सेनबॉस आपल्या Introduction to the Study of History ' या ग्रंथात म्हणतात," या बाबतीत एखादा विद्वान गृहस्थ किंवा इतिहासकार यांचे कार्य इतर शास्त्रांप्रमाणेच आहे. तांत्रिक ज्ञानाची माहिती असत्याशिवाय किंवा निश्चित स्वरूपाची साधनसामग्री असल्याशिवाय ही गोष्ट साध्य होणार नाही. मग असे आहे तर विद्वान गृहस्थांची किंवा संशोधकाची उमेदवारी कोणत्या गोष्टीमध्ये समाविष्ट असते ? किंवा जर अप्रस्तुत भाषा वापरली तरीसुद्धा या ज्ञानाच्या जोडीला इतर शास्त्रांचा जो साठा वापरला जातो त्याला 'इतिहासाची साहाय्यकारी शास्त्रे' असे म्हणतात.

असे जरी असले तरी मानवी ज्ञानाच्या सर्वच शाखा सारख्याच उपयोगाच्या असतात असे नव्हे. तर त्यांपैकी काही शास्त्रे ही इतिहासाला जास्त पूरक असतात. काही शास्त्रे इतिहासाला इतकी जवळची असतात की त्यांच्या मदतीशिवाय इतिहासलेखन शक्यच होत नाही. उदा. भू-गर्भशास्त्राच्या माहितीशिवाय उत्खननही शक्य नाही व इतिहासलेखनही शक्य नाही. म्हणून इतिहासकाराला भू-गर्भशास्त्र माहीत असणे आवश्यक आहे.

## ३.४ इतिहासाची साह्यकारी शास्त्रे

### १. भूगोल (Geography)

इतिहास व भूगोल या दोन शास्त्रांचा एकमेकांशी अत्यंत निकटचा संबंध आहे. भूगोलाशिवाय इतिहासाचा विचार करता येत नाही. भूगोलाच्या रंगमंचावर इतिहासाचे नाट्य घडत असते. भूगोल आणि कालक्रम हे इतिहासाचे दोन डोळे आहेत. काळ आणि स्थानामुळे इतिहासाला योग्य संदर्भ मिळतो. जॉन्सनच्या मते, भूगोल शिवाय इतिहास व इतिहासाशिवाय भूगोलाची कल्पना करणे अशक्य आहे. इतिहास मानवी कार्याचा हिशोब आहे तर भूगोल नैसर्गिक वातावरणात माणसाच्या कामाची व्याख्या करतो. कारण मानवाची प्रत्येक क्रिया नैसर्गिक वातावरणाच्या संदर्भातच होत असते. मानवाच्या कार्यासाठी भूगोल एक पार्श्वभूमी आहे. इतिहासाच्या नात्यासाठी भूगोल एक रंगमंच आहे. भौगोलिक घटक अत्यंत महत्त्वाचे असतात. कारण वातावरणाच्या प्रेरणेच्या अभावी देश  किती ही प्राचीन असला तरी तो उच्च सांस्कृतिक स्तरावर पोहोचू शकत नाही. प्रो. मिचलेट (Michelet) यांच्या मते "भौगोलिक परिस्थितीची माहिती असल्याशिवाय इतिहासाचा जो कर्ता तो मानवप्राणी चिनी चित्रातील व्यक्तीप्रमाणे अधांतरीच चाललेला दिसेल. म्हणून जमिनीकडे (भूगोलाकडे) नुसतेच एक घटना केंद्र म्हणून पाहू नये तर अन्न व हवामान यांचा जसा प्रभाव पडतो तसाच जमिनीचासुद्धा शतगुणाने प्रभाव पडतो.

इतिहास संशोधन करत असताना ज्या वेळी श्रेष्ठ दर्जाची कागदपत्रे उपलब्ध नसतात तेव्हा भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून, निरीक्षण करून एक चित्र तयार केले जाते व त्याच्या आधारेच एक संभाव्य वर्णन तयार करणे सोपे जाते. इतिहासाच्या अभ्यासासाठी भौगोलिक रचना समजणे आवश्यक आहे. भारताच्या उत्तरेला पर्वतमाला व देशाच्या समुद्रकिनाऱ्यांनी भारताच्या इतिहासाला एक विशिष्ट स्वरूप दिले आहे. या नैसर्गिक सीमा मुळे बाह्य घटनांचा भारतावरील प्रभाव कमी आहे पण वायव्य सीमेच्या पर्वतातील खिंडी व व्यापारी मार्ग व समुद्रकिनाऱ्यांमुळे निरनिराळ्या समाजाच्या लोकांना देशात प्रवेश करण्याची सोय झाली. दुष्काळआदी आपत्तीमुळे मध्य आशियातील अनेक जाती भारतात आल्या. त्यापैकी कुशाण, मुघल, अफगान तुर्क वगैरे लोकांनी भारतात आपले विस्तृत साम्राज्य स्थापन केले. इतिहासकारास भूतकाळातील भौगोलिक संकल्पनांचा अभ्यास करावा लागतो व ऐतिहासीक अभिलेखातील भौगोलिक वर्णन व स्थानांच्या उल्लेखाची आधुनिक भौगोलिक वर्णन व स्थानांशी संगती बसवावी लागते. त्यामुळे भूगोलाचे अध्ययन इतिहासाची महत्त्वपूर्ण ठरते.

कोणत्याही देशाच्या इतिहासावर भूगोलाचा प्रभाव पडल्याशिवाय राहत नाही. भारताच्या संदर्भात भारतातील सर्व प्रमुख शेतीचे प्रदेश प्रादेशिक राजकीय सत्तेचे केंद्र झाले झाली. उदाहरणार्थ मगध किंवा पंजाब, कावेरीचा त्रिभुज प्रदेश हे तीन प्रदेश भारताच्या इतिहासात नेहमी महत्त्वाचे होते. या भागातील व्यापारी मार्गाची विशेष

भूमिका होती. सर्व शहरे या खोऱ्यातील व्यापारी मार्गाशी संलग्न होती. कोशंबी, मथुरा, तक्षशिला, वैशाली वगैरे प्रमुख शहरे व्यापारी मार्गांच्या शाखा निघाल्यामुळे भरभराटीस आली. दक्षिणी समुद्रकिनारा व्यापाराच्या दृष्टीने मोठा उपयोग होता. त्यामुळे केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेशाच्या किनाऱ्यावर अनेक बंदरांचा विकास झाला. दक्षिण भारतातील सागरी हालचालीमुळे चोल साम्राज्य मलाया, इंडोनेशिया, श्रीलंका पर्यंत पसरू शकले. म्हणून इतिहासकराचे भूगोलाचे ज्ञान आवश्यक आहे. भौगोलिक परिस्थिती त्या देशाच्या इतिहासाची रूपरेखा ठरवीत असते. भूगोलामुळे नैसर्गिक परिस्थिती, वातावरण, खनिज, पाण्याची साधने, वस्ती व वस्तीचे प्रदेश नद्या, पर्वतरांगा, वनस्पती वगैरे ठरतात. याचा देशाचा राजकारणावर समाजावर, धर्म, सागरिक महत्त्व, राजस्व व्यवस्था, व आर्थिक व्यवस्थेवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव पडतो. या भौगोलिक वैशिष्ट्यांमुळेच त्या देशाची संस्कृतीक प्रतिमा बनते. भौगोलिक परिस्थितीनुसार माणसाव्या आवडी-निवडी व चाली-रीती बनत असतात. डोंगराळ व खडकाळ प्रदेशातील मांणसे शरीराने धिप्पाड व काटक असतात. उदा. मराठे. त्यांची आवड साधी असते. त्यांचा चालीरीती भपकेबाज असत नाही. तसेच कोणत्याही संकटाला तोंड देण्याचे सामथ्यं त्यांच्यामध्ये असते. याच्या उलट चांगली सुपीक जमीन विपुल पाणी, समशीतोष्ण हवामान अशी स्थिती असेल तर ती माणसे वातुळ शरीराची आळशी, मंद व निरुत्साही स्वभावाची असतात. ग्रीक तत्त्ववेत्ता हिप्पोक्रेटिस याने नैसर्गिक परिस्थिती व मानवी जीवनपद्धती यांमध्ये समन्वय दाखवून दिला आहे. ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो म्हणतो की, माणसांच्या विविध प्रकारच्या शारीरिक ठेवणी, त्यांच्या कर्तृत्वाची क्षेत्रे, त्यांच्या सामर्थ्याच्या मर्यादा, त्यांची स्वभाववैशिष्ट्ये आणि त्यांच्या बऱ्यावाईट सवयी हे सगळे त्यांना मिळणारा सूर्यप्रकाश, त्यांच्या अंगावर वाहणारे वारे, त्यांच्या पोटात जाणारे अन्नपाणी आणि त्यांना नेहमी दिसणारा निसर्ग यावर अवलंबून असते. प्रसिद्ध विचारवंत माँटेस्क्यूने भौगोलिक परिस्थितीच्या बाबतीत विचार मांडले आहेत. मानवी इतिहासाच्या घडणीत माणसाचे कर्तृत्व फारसे महत्त्वाचे नाही. मोठमोठे पराक्रम करणारे महापुरुष इतिहास घडवत नाहीत. कितीही प्रचंड लढाई होऊन गेली तरी समाजाचे जीवन फार बदलत नाहीत. राष्ट्राच्या भरभराटीची किंवा अधोगतीची ती कारणे नव्हेत, तर तेथील भूमी व हवामान यांचा मानवी इतिहासावर दीर्घकाळ टिकणारा परिणाम होत असतो. याचा अर्थ असा नव्हे की भूगोलाशिवाय इतर कशालाच महत्त्व नाही तर मानवी इतिहास घडत असताना भूगोल हा त्यामध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. एवढाच होय.

### २. अर्थशास्त्र (Economics)

इतिहासाला अधिक जवळची असलेली अर्थशास्त्र ज्ञान शाखा अत्यंतिक उपयोगाची आहे. ऐतिहासिक घटनांचा कोणताही भाग असा नाही ज्याचा अर्थशास्त्राशी संबंध येत नाही. मानवाचा विकास त्याच्या आर्थिक प्रगती व महत्त्वकांक्षापासून सुरू होतो. रानटी अवस्थेत राहणाऱ्या मानवापासून तो आजपर्यंत मानवी जीवन भौतिक दृष्ट्या अधिकाधिक प्रगत करण्याचे सतत प्रयास मानवाने केले आहेत. यामुळे शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण व वाहतुकीची साधने, उत्पादन वितरण पद्धती, अधिकोषांची कार्यप्रणाली, बाजार व्यवस्था व कर व्यवस्था इत्यादी आर्थिक बाबींना मानवी जीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे. यामुळे कॉन्डरसेट, बकल, कार्ल मार्क्स, एंजल्स

इत्यादी अभ्यासकाने आर्थिक व्यवहारांवर विशेष भर देऊन व गतकालीन मानवी जीवनाचा अन्वयार्थ लावला आहे. मार्शलच्या मते, जीवनाच्या सामान्य व्यवहारात गुंतलेल्या लोकांचा अभ्यास म्हणजे अर्थशास्त्र होय. यात सुख समृद्धी भौतिक कर्जाची प्राप्ती व त्यांच्या व्यापारशी घानिष्ठपणे संलग्न अशा व्यक्तिगत व सामाजिक व्यवहारांची तपासणी होते दुसऱ्या शब्दात सुखी जीवनाच्या आवश्यकता मिळवण्यासाठी व त्याच्या सदुपयोग यासाठी खाजगी संबंधित खाजगी व सामाजिक क्षेत्राचा अभ्यास करतो.

अर्थशास्त्राचे सिद्धांत समजण्यासाठी व त्याची व्याख्या करताना आर्थिक इतिहासाची मदत होते. सामाजिक व्यवहार हा मागील आर्थिक हेतूमूलकता समजण्यासाठी अर्थकारणाची जाण इतिहासकाराला असणे आवश्यक असते. व्यापाराचे समतोल, मुक्त व्यापार, नियंत्रित अर्थव्यवस्था, मुक्त बाजार व्यवस्था अशा संकल्पनांचे योग्य आकलन होण्यासाठी अर्थशास्त्रीय सिद्धांत जाणून घेणे गरजेचे असते. सर विल्यम यांच्यामते आर्थिक विचार स्वतःची ऐतिहासिक तथ्य असतात. मानवाचे उपजीविकेच्या साधनांच्या उत्पादनात अधिकतम संतोष प्राप्त करण्यासाठी काय केले हा आर्थिक इतिहास आहे. आर्थिक इतिहासाच्या क्षेत्रात मानवास प्रभावित करणारे विचार समाजाचा उद्देश विविध समाज घटकांचे परस्परांशी संबंध व व्यवहारांचा अभ्यास आर्थिक इतिहासाचा विषय असतो.

अर्थशास्त्र हे जरी एक स्वतंत्र शास्त्र असले तरी इतिहासाच्या अभ्यासकाला त्याचा मागोवा घेणे आवश्यक ठरते. कोणत्याही व्यक्तीच्या हालचाली या स्वतंत्रपणे होऊ शकत नाहीत. समाजातील अनेक व्यक्ती एकमेकांशी आर्थिक हितसंबंधाने जोडलेल्या असतात. • इतिहासकाराला या आर्थिक संबंधाची थोडीशी तरी का होईना माहिती असणे आवश्यक असते. उदा. प्राचीन भारतातील व्यापार व नाणेपद्धती यांची माहिती घेतल्याशिवाय तत्कालीन समाजाचे आर्थिक व सामाजिक विवेचन करता येत नाहीत. आधुनिक काळात अर्थशास्त्र हे दिवसेदिवस गुंतागुंतीचे व किचकट होऊ लागले आहे; परंतु याचा सुद्धा काही प्रमाणात ऐतिहासिक घटनांवर परिणाम होत असतो ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि मग या आर्थिक प्रश्नांना मानवी समस्यांचे स्वरूप प्राप्त झाले. प्रा. सदाशिव आठवले आपल्या 'इतिहासाचे तत्वज्ञान या ग्रंथात म्हणतात, "इतिहासाला, मानवी घडामोडींना, भौतिक बाजू असतात; माणसांच्या कृती त्यांच्या आर्थिक गरजांतून आणि हितसंबंधांतून निर्माण होत असतात हा – विचार १९ व्या शतकात एकदम नव्याने आणि प्रथमच सांगण्यात आला असे मुळीच नाही; परंतु एवढे निश्चित की जीवनाच्या आर्थिक बाजूचा बराच खोलवर विचार करून तपशीलवार विवेचनाने इतिहासाचा हा अर्थ प्रथम १९ व्या शतकात जर्मन तत्त्वज्ञ कार्ल मार्क्स यानेच दिला".

प्राचीन आणि मध्ययुगात राजे लोकांनी परस्परांवर केलेली आक्रमणे ही काही उदात्त हेतू ठेवून केलेली नव्हती. जिंकलेला प्रदेश आपल्या राज्यास जोडण्याचे काम देखील त्यांनी त्या प्रदेशातील लोकांना सुख-सोयी द्यायच्या हे आपले नैतिक उत्तरदायित्व आहे म्हणून केलेले असते असेही नाही. अर्थार्जन करणे, अर्थ समृध्दी वाढविणे हाच त्यांचा हेतू असायचा. विविध कालखंडांत घडलेल्या आर्थिक घडामोंडीचा जेव्हा

आपण अभ्यास करू लागतो त्यावेळी त्या घडण्यामागची कारणमीमांसा पाहिली म्हणजे तत्कालीन इतिहासच उलगडला जात असतो. अर्थशास्त्राचा इतिहास जेव्हा मांडला जातो त्यावेळी अपरिहार्यपणे अर्थशास्त्राच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यात समाजात काय होत होते, राजव्यवस्था कशी होती, प्रणाली कोणती होती याचा उल्लेख हा होतच जातो. इतिहासाचा अभ्यास करतांना जसे अर्थशास्त्रात सामील होणाऱ्या घटकांचा जसे कर, कर प्रणाली, शेतसारा, वसूल करण्याची पध्दत यांचा अभ्यास होतो तसेच अर्थशास्त्राचा करताना इतिहासाचा होतो. यामुळेच इतिहास व अर्थशास्त्र हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले जाते. आधुनिक काळात देखील जेव्हा आर्थिक प्रश्नांना जेव्हा विचार केला जातो, त्यावेळी इतिहासाचे साह्य घ्यावे लागते.

### ३. मानसशास्त्र (Psychology)

मानसशास्त्र व इतिहास ही दोन्हीही शास्त्रे एकमेकांना अतिशय जवळची आहेत. कारण इतिहासात हा मानव केंद्र असतो तर मानसशास्त्रामध्ये मानवी मनाचा आणि वर्तनाचा सर्वच दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. ऐतिहासिक घटना घडवणारी व्यक्ती एका विशिष्ट मानसशास्त्रीय प्रक्रियेमधून जात असते. मानवी स्वभावातील माया, मोह, लोभ, मद, मत्सर, हर्ष, युयुत्सु प्रवृत्ती या सर्वांची माहिती इतिहासकाराला असणे आवश्यक असते. गतकाळातील घटना ही जशीच्या तशी उभी करण्याचे काम कागदपत्रे करत असतात; परंतु त्यातील व्यक्तीची मनोवृत्ती साक्षात् उभी करण्याचे काम मानसशास्त्राच्या मदतीशिवाय होणे शक्य नाही. इंग्रज इतिहासकार आर. जी. कॉलिंगवुड (R. G. Collingwood) यांनी Inside Outside Theory ही याच संदर्भात मांडली आहे. उदा. शिवाजी व अफजलखान यांच्या भेटीच्या वेळी त्यांची मनःस्थिती कशी होती हे समजण्यासाठी इतिहासकाराने दोन्हीही व्यक्तींची स्वतःच कल्पना करून त्यावरून निष्कर्ष काढल्यास दोघांचीही मनःस्थिती त्याला समजू शकेल. माणसाचे वैयक्तिक जीवन व भोवतालची परिस्थिती यांचा एकमेकांवर प्रभाव असतो. तेव्हा जर त्यांच्यातील संबंध जाणून घेतला तर मानसशास्त्रीय निष्कर्ष काढता येतात. मानसशास्त्राचा अगदी अलिकडील काळात चांगला वापर सुरू झाला आहे. "इतिहास म्हणजे केवळ घटनांची जंत्री नाही तर तो विचारांचा इतिहास आहे" अशी भूमिका बेनिडीटो क्रोचे, कॉलिंगवुड यांनी ठामपणे मांडल्यापासून मानसशास्त्राच्या अभ्यासाचे इतिहास लेखनाच्या दृष्टीने महत्त्व वाढले आहे. अँनल्स नावाने ओळखल्या जाणाऱ्या मार्क ब्लॉच व लुसियन फ्रावे या इतिहासकारांनी याच दोन अभ्यासाशाखांचे परस्परवलंबित्व आग्रहाने मांडले आहे.

पूर्वी इतिहास कार एखाद्या युद्धाची कारणे शोधत असताना आर्थिक, सामाजिक व राजकीय बाबींवर भर देत असत. अलिकडील काळात युद्धाच्या पाठीमागे असणारे मानसशास्त्रीय कारण शोधले जाते. उदा. दुसऱ्या महायुद्धास हिटलर कारणीभूत ठरला. त्यासाठी त्याच्यातील मनोविकृती हेच मुख्य कारण गृहीत धरले आहे. मानसशास्त्राच्या प्रभावामुळे ऐतिहासिक घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला ही गोष्ट सिद्ध होते. प्रो. बार्नस (Barnes) आपल्या 'A History of Historical Writing' या ग्रंथात म्हणतात, "मानसशास्त्राच्या आधाराने इतिहास अनेक महत्त्वाच्या गोष्टी जाणू

शकेल. एखादी क्रिया करण्यामागची प्रेरणा, तसेच जडण-घडण व नियंत्रक, मानवी श्रद्धा या सर्वांची इतिहास काराला माहिती घेता येईल"

भूतकाळातील ऐतिहासिक पात्रांनी घेतलेले निर्णयच केवळ मानसशास्त्राच्या भिंगातून पाहायचे असे नाही तर इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकाची मानसिकता देखील मानसशास्त्राच्या भिंगातून पाहणे आवश्यक असते. कोणतीही व्यक्ती तिच्या मनावर ज्या विचारांचे बिंबण झालेले असते त्याच विचारांच्या चौकटीत कोणत्याही घटनेचे विश्लेषण करीत असते. इतिहासाचा अभ्यास करणारी व्यक्ती कोणत्या वातावरणात राहात होती, तिच्यावर कोणत्या प्रकारचे विचारांचे बिंबण झाले आहे याचा परिणाम इतिहासाच्या अभ्यासावर झाला नसता तर एकाच घटनेचे विश्लेषण वेगवेगळ्या पध्दतीने झाले नसते. यासाठी १५८७ च्या स्वातंत्र्ययुध्दाच्या घटनेचा विचार करू. इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांत या घटनेच्या संबंधात विविध मते आहेत. काही इतिहासकारांच्या दृष्टीने हे शिपायांचे बंड होते. आपल्या या विचारांच्या समर्थनार्थ ते प्रतिपादन करतात की यात केवळ शिपायांचा सहभाग होता, सर्वसामान्य प्रजेचा नाही. तर काही अभ्यासकांनी यास स्वातंत्र्ययुध्द असे म्हटले आहे. आपला मुद्दा स्पष्ट करताना ते म्हणतात की इंग्रजांपासून मुक्त होण्यासाठी हा लढा लढला गेला. कोण लढले हे महत्त्वाचे नाही पण का लढले हे महत्त्वाचे आहे. म्हणून हे स्वातंत्र्ययुध्द आहे. तसेच एखादे वर्णन परस्पर हेतू प्राप्ती साठी पूर्वग्रह असण्याची शक्यता असते. उदा. मराठ्यांच्या इतिहासात मल्हार रामराव चिटणीस या बखरकाराने संभाजी महाराजांवर असलेल्या रागामुळे त्यांचे चुकीचे व विकृत वर्णन केले.

मानसशास्त्रामुळे इतिहासाच्या अभ्यासाच्या पद्धतीत निश्चितच परिवर्तन झाले. केवळ घटनेची माहिती व चरित्राची माहिती इतक्यापुरताच अभ्यास मर्यादित राहिला नाही घटनेच्या मागील मानसिकता देखील अभ्यासनीय झाली. सामाजिक चळवळींचा इतिहास लिहिण्यासाठी देखील मानसशास्त्राची मदत घेतली जाते. जॉर्ज रुड यांनी क्रांतिकारी उठाव मागील जमावाची मानसिकता अभ्यासली आहे. तर कारखान्यातील कार्यपद्धतीचा मजुरांच्या मानसिकतेवरील परिणाम हा देखील इतिहासकारांच्या अभ्यासाचा विषय झाला आहे.

## ४. समाजशास्त्र (Sociology)

इतिहास व समाजशास्त्र या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मानव हा समाज प्रिय प्राणी आहे. तो समाजात राहत असताना अनेक कृती करीत असतो. इतिहास व समाजशास्त्र ही दोन्हीही शास्त्रे मानवाचाच अभ्यास करतात. त्यामुळे त्यांचा निष्कर्ष जरी वेगळा असला तरी कार्यपद्धती सारखीच असते. इतिहास संशोधनातील अनेक विद्वान हे प्रथमतः समाजशास्त्रज्ञच होते. पूर्वी इतिहास व समाजशास्त्र हे दोन्ही विषय एकत्रच असत; परंतु त्यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याचे काम एमिल डर्कम Emile Durkheim) याने केले. २० व्या शतकात मॅक्स वेबर (Max Waber) याने अनेक बाबतींत संशोधन करून इतिहास व समाजशास्त्र या दोघांच्यामधील जवळचा संबंध दाखवून दिला. प्रो. ई. एच्. कार यांनी समाजशास्त्राच्या अभ्यासाला प्रोत्साहन

दिले आहे. ते म्हणतात, “जर समाजशास्त्राला इतिहासासारखे उपयोगी बनवावयाचे असेल तर त्याने वैशिष्ट्यपूर्ण घटना व सामान्य घटना यांच्यातील संबंधांचा अभ्यास केला पाहिजे. समाजशास्त्राने आक्रमक बनले पाहिजे व अशा वेळी वर्तमानकाळातील समाजाचा अभ्यास न करता समाजातील बदल व विकास या संदर्भात अभ्यास केला पाहिजे”.

समाजशास्त्र व इतिहास यांतील घनिष्ठ संबंध असा आहे की समाजशास्त्राची संबंधित एखाद्या विषयाचा अभ्यास इतिहासाच्या सहाय्यशिवाय करता येत नाही आणि इतिहासातील एखाद्या घटनेचा मागोवा घेताना समाजशास्त्राचे सहाय्य घ्यावे लागते. इतिहास आणि समाजशास्त्र यांच्या मांडणीची अभ्यासाची पद्धत भिन्न असली तरीही त्यांच्यातील संलग्नता इतकी विलक्षण आहे की त्यामुळे राजवाडे यांनी म्हटले आहे की, 'मानव समाजाच्या चरित्राचा जो वृत्तांत तो इतिहास होय व त्या मानव समाजाच्या गती स्थितीच्या कार्यकारणांशी जी नियम परंपरा तिला मानव समाजशास्त्र म्हणतात.'

इतिहास ही मानवाची निर्मिती असली तरीही ती एकट्या, एकाकी मानवाची निर्मिती असत नाही. टोळी, गट, समाज अशा रूपाने जेव्हा मानव हा एकत्र येतो तेव्हाच इतिहासाची निर्मितीही शक्य असते आणि त्याच वेळी समाजशास्त्राची निर्मिती होत असते. इतिहास हा समाजाचा विकासाचे, परिवर्तनाचे असा आलेख आहे की ज्याचा प्रत्येक बिंदू परस्परांशी संबंधित असतो. मानवाच्या क्रिया कलापांचे अध्ययन इतिहास आणि समाजशास्त्र दोघेही करतात. दोन्ही शास्त्रांचा अभ्यास हा भिन्न पद्धतीने होत असला तरी दोघांनी एकमेकांची क्षेत्रे व्यापलेली आहेत. या संदर्भात प्रो. इ. जी. हॉवार्ड म्हणतात की, इतिहास म्हणजे भूतकालीन समाजशास्त्र तर समाजशास्त्र म्हणजे वर्तमानकालीन इतिहास होय.

सुप्रसिद्ध ब्रिटिश इतिहास संशोधक अर्नाल्ड टॉयन्बी यांचा 'The Study of History हा ग्रंथ इतिहासाइतकाच समाजशास्त्राला जवळ आहे. प्रो. बर्कहर्थ सारख्या इतिहासकारांनी मानवाचे सामाजिक सबंध, लोकरूढी व शिष्टाचार, संस्था, समाजरचना इत्यादीचा अभ्यास करण्यावर भर दिला आहे. सिग्मंड बेल्हा या समाजशास्त्रज्ञाने ऐतिहासिक समाजशास्त्राला मान्यता दिली आहे. प्रो. बॉल हॅबेट यांचा 'Social policy and social change in Western India, १८१७ १८३०' हा प्रबंध किंवा डॉ. सुधा देसाईचा 'Social Life in Maharashtra Under the Peshwas.' हा प्रबंध यामध्ये समाजाचे ऐतिहासिक दृष्टिकोणातून वर्णन केलेले आहे. प्रो. जी. एम. ट्रिव्हेलीन यांनी “Social History of England" हा इंग्लंडचा सहा शतकांचा इतिहास लिहिला. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी राजकीय अंगाला फाटा देऊन लिहिलेल्या समाजाचा इतिहास म्हणजे सामाजिक इतिहास होय असे नमूद केले आहे.

समाजशास्त्र आणि इतिहास यांचा संबंध जरी निकटचा असला तरी या दोन्ही शास्त्रांत खालील बाबतीत भिन्नता दिसून येते.

१. समाजशास्त्र विश्लेषणात्मक शास्त्र आहे, तर इतिहास हे प्रामुख्याने वर्णनात्मक शास्त्र आहे.

२. समाजशास्त्रामध्ये वर्तमानकालीन मानवी समाजात घडणाऱ्या सामाजिक आंतरक्रियांचा अभ्यास केला जातो, तर इतिहासामध्ये भूतकाळात मानव समाजात घडलेल्या घटनांचा मागोवा घेतला जातो.

३. समाजशास्त्रामध्ये विशिष्ट दृष्टिकोणातून व्यक्तीचे महत्त्व सांगतात तर इतिहासामध्ये असामान्य व्यक्तीच्या चरित्रावर भर दिला जातो. असे असले तरी या दोन्ही शास्त्रांचा निकटचा संबंध आहे.

**५. राज्यशास्त्र**

'इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण' ही सीले यांनी केलेली इतिहासाची व्याख्या प्रसिद्ध आहे. एकोणिसाव्या शतकापर्यंत राजकीय विषयांना इतिहासात प्रामुख्याने स्थान असे. एक काळ असा होता की जेव्हा राज्यशास्त्राचा अभ्यास हा इतिहासाच्या अंतर्गतच समाविष्ट होता. कारण प्राचीन व मध्ययुगात इतिहासात राजा आणि त्याची राजनीति या भोवतीच इतिहास फिरत असतो. परंतु आता राज्यशास्त्र आणि इतिहास हे दोन्ही पृथक असे विषय झाले आहेत. राजकीय विषयांचा शास्त्रीय दृष्टीने अध्ययन करणारी अभ्यासशाखा हे राज्यशास्त्राचे स्वरूप असल्यामुळे भिन्न राजकीय विचारप्रणाली, राजकीय घडामोडी, प्रशासकीय पद्धती व यंत्रणा यांची माहिती ते शास्त्र करून देते. एकाधिकारशाही, हुकुमशाही, लोकशाही, श्रेष्ठीसत्ता, वसाहतवाद, निमवसाहतवाद अशा इतिहासात वारंवार वापरण्यात येणाऱ्या संकल्पना राज्यशास्त्र स्पष्ट करते. शासनाने पारित केलेले कायदे, अंमलात येणारे संविधान हे विषय देखील दोन्ही अभ्यासशाखांना महत्त्वाचे आहेत. तसेच लोकोत्तर शासकांच्या, युगप्रवर्तक विभूतींच्या कार्याचे राजकीय पैलू, त्यांची युद्धनीती, राजनैतिक संबंधांचे तात्त्विक अधिष्ठान, आंतरराष्ट्रीय राजकीय संस्थांची जडण घडण व कार्यपद्धती इत्यादी विषयांची राज्यशास्त्र देत असलेली माहिती इतिहासकाराला उपयुक्त ठरते. अनेक ऐतिहासिक घडामोडींची व समस्यांची उत्तरे राज्यशास्त्रातून सापडतात. राज्यशास्त्रात माणसांच्या राजकीय विचारांचा, प्रणालीचा अभ्यास होतो तर इतिहासात त्याच्या पार्श्वभूमीचा अभ्यास मांडला जातो.

वेगवेगळ्या राजकीय संकल्पना, राजकीय व शासकीय संस्था काळाच्या ओघात कशा उत्क्रांत झाल्या, गतकालीन राजकीय संस्थांचे स्वरूप काय होते, युद्धनीती काय होती ही माहिती इतिहासातून राज्यशास्त्रज्ञ मिळवितो. यामुळे राजनीतिज्ञांना इतिहासाचे अध्ययन निकडीचे ठरते. पंडित जवाहरलाल नेहरू, विन्स्टन चर्चिल, फ्रॅन्कलिन रूझवेल्ट यांसारखे महान जागतिक मुत्सद्दी इतिहासाचे गाढे अभ्यासक होते. यावरून राज्यशास्त्र व इतिहासाचा निकटचा संबंध स्पष्ट होतो. 'राजकारणाची कला आत्मसात करण्यास इतिहासाची मदत होते' असे ग्रीक इतिहासकार पॉलिबिअस म्हणतो. 'प्रत्यक्ष घडलेल्या सत्याधिष्ठित राजकारणाकडे दुर्लक्ष झाल्यास इतिहासाला कल्पनाधिष्ठित साहित्याचे स्वरूप प्राप्त होते आणि इतिहासाच्या व्यापक

दृष्टीखेरीज राजकारणाला गंभीर रूप येत नाही' असे सर सीले यांचे विधान दोहोतील परस्परपूरकता व निकटता दाखविण्यास पुरेसे बोलके आहे. राजकारण इतिहासाला विषय पुरविते तर इतिहास गतराजकारणाला उजाळा देतो. यामुळे दोन्ही अभ्यासशाखा परस्परांवर आधारित आहेत.

### ६. कालक्रमशास्त्र (Chronology)

इतिहास संशोधकाला सुरुवातीला जर कोणत्या गोष्टीची माहिती आवश्यक असेल तर ती म्हणजे कालक्रमाची होय. हे शास्त्र भूतकाळातील कोणती घटना कधी झाली होती. आणि दोन घटनांमध्ये किती अवधीचे अंतर होते हे निश्चित करते. लिहीत असताना घटनांची सुसंगती लावून एकामागोमाग एक घटना जर दिल्या नाहीत तर त्या लिखाणाला कादंबरीचे स्वरूप प्राप्त होते. कालक्रमाचे महत्त्व सांगताना सुप्रसिद्ध भारतीय इतिहास संशोधक नीळकंठ शास्त्री म्हणतात, “ Chronology is the eye of history, ‘आता प्रश्न निर्माण होतो तो असा की कालक्रम ही कल्पना कशामुळे अस्तित्वात आली ? पूर्वी धार्मिक कृत्ये व शेतीची कामे यांचे वार तिथी ठरविण्यासाठी अनेक घटनांची नोंद ठेवावी लागत असे. त्यामुळे एकापाठोपाठ एक घटना नमूद करण्याची पद्धती सुरू झाली व ही पद्धती इतिहास लेखनासाठी अतिशय आवश्यक आहे. कालक्रम नसेल तर त्या घटनांना काही अर्थच राहणार नाही, कालविपर्यासाचा दोष निर्माण होतो. उदा. सातवाहन राजा हाल याने ‘गाथासप्तशती’ हा प्राकृत ग्रंथ लिहिला असे मानले जाते. अर्थात् कालक्रमाचा कोठेही उल्लेख नसल्यामुळे ‘हा हाल कोणता? यापासून ते हा संग्रह हालानेच लिहिला काय? ‘इथपर्यंत अनेक मतभेद निर्माण होतात.

भारतात प्राचीन काळापासून एक समान कालगणनापद्धती अस्तित्वात नव्हती. येथे शक, संवत, हिजरी, फसली अशा वेगवेगळ्या कालगणना पद्धती प्रचारात असल्यामुळे आजच्या इसवी सनाच्या चौकटीत पूर्वीच्या घटना बसविणे व त्यासाठी भिन्न कालगणना पद्धती अभ्यासणे व कालगणना शास्त्राचा उपयोग करणे निकडीचे ठरते. विशिष्ट्य एका राज्याची कालगणनेला राजाच्या सत्ताग्रहणाच्या दिवसापासून प्रारंभ होत असे.

**भारतीय इतिहासातील काही कालगणना खालीलप्रमाणे :**

१. विक्रम संवत
२. शक सवंत
३. गुप्त शक
४. कलचुरी शक
५. गंग शक
६. चालुक्य – विक्रम शक
७. फसली सन
८. विलायती सन

९. त्रिपुरा शक

१०. मगी शक

११. मल्ल शक

१२. इलाही शक (कालगणना)

१३. राज्यभिषेक शक

१४. मावलुदी शक

घटनेची प्रामाणिकता सिध्द होण्यासाठी तत्संबंधी कालगणना लक्षांत घेऊन विचार करावा लागतो. वर सांगितल्याप्रमाणे काही कालगणना या लोप पावलेल्या आहेत तर काही संशयास्पद, कृत्रिम अशा आहेत. या सर्वांची माहिती अभ्यासकास असणे अत्यावश्यक असते. त्याशिवाय घटनेची प्रामाणिकता सिध्द होत नाही.

## ७. हस्ताक्षराचे शास्त्र (Paleography)

पॅलिओग्रॉफी म्हणजे जुन्या हस्ताक्षरांचा अभ्यास करणारे शास्त्र होय. अनेक अक्षरे कसकशी विकसित होत गेली याचा अभ्यास केला जातो. प्रत्येक शब्द किंवा अक्षर हे प्रत्येक व्यक्तीच्या हस्ताक्षरामध्ये कालांतराने बदलत जाते. या शास्त्रामध्ये स्थळ व काल यांमध्ये प्रत्येक शब्दाचा कसा विकास झाला यांचा अभ्यास केला जातो. हस्ताक्षरतज्ज्ञ (Paleographer) ही जुनी कागदपत्रे व शिलालेख नुसतेच वाचतो असे नव्हे तर प्रत्येक अक्षराचा विकास कसा झाला याची माहिती देतो. शिक्षणक्रमामध्ये प्रत्येक अक्षर ठरावीक कालखंडामध्ये बदलत असते. उदा. पूर्वी ल' हे अक्षर असे काढत असत तर हल्ली हेच अक्षर 'ल' असे काढले जाते. पूर्वी 'काही' यापैकी दोन्ही अक्षरांवर अनुस्वार देत असत तर हल्ली दोन्ही अनुस्वार काढून टाकलेले आहेत. ज्याप्रमाणे एखादी भाषा एकाच जमातीचे लोक अनेक प्रकारांनी लिहितात तसेच एखादी भाषा अनेक जमातीतील लोक अनेक प्रकारांनी लिहितात. तेव्हा हस्ताक्षरतज्ज्ञाला नुसते अक्षर पाहूनसुद्धा तो शब्द कोणी लिहिला असेल याची कल्पता येऊ शकते. हस्ताक्षरतज्ज्ञ हा अनेक संक्षिप्त रूपांचा (Abbreviation) अभ्यास करत असतो. हस्ताक्षरशास्त्राच्या अभ्यासाने संशोधकाची बुद्धी जास्त तीक्ष्ण बनते. तसेच अनेक गूढ प्रश्न सुटतात. या शास्त्रामुळेच अनेक गूढ प्रश्न सुटू शकतील. उदा. तंजावर येथील बहदीश्वर मंदिराच्या शिलालेखावरून मराठ्यांची अधिक माहिती समजते.

मानव जसा जसा विकसित होऊ लागला तसे त्याच्या अक्षर रचनेत देखील परिवर्तन होत गेले. हे परिवर्तन वेगाने आणि सर्वत्र सारख्याच पध्दतीने झाले असे मात्र नाही. यामुळे अक्षरांच्या रचनेवरून ते कोणत्या प्रदेशातील असेल हे त्याच्या अभ्यासावरून निश्चित होऊ लागले. यामुळे संबंधित काळ कोणता होता आणि तत्कालीन समाजाची स्थिती कशी होती हे निश्चित करणे सोपे जाऊ लागले. नाणी, शिक्के, शिलालेख, आणि अभिलेख व ग्रंथ यात असलेल्या अक्षरांच्या समाजातील सांस्कृतिक, धार्मिक बाबींचाही उलगडा करण्याचा प्रयत्न करता येतो. लिपिशास्त्रात केवळ लिपिचाच अभ्यास होतो मात्र नाही. लेखकाने उपयोगात आणलेल्या सांकेतिक शब्दांचाही

अभ्यास हस्ताक्षर शास्त्रात होतो. प्रत्येक लिपित कोणते ना कोणते सांकेतिक शब्द असतातच. जसे इंग्रजीत i.e. यासारखे सांकेतिक शब्द आहेत. सांकेतिक शब्द कोणत्या काळात निर्माण झाले आहेत हे निश्चित करून लिपिशास्त्राच्या साहाय्याने तत्कालीन लेखन विकासाची स्थिती लक्षांत घेता येते. लिपिशास्त्र हे इतिहासातील समाजाची बौद्धिक, शैक्षणिक, व लेखन निश्चित करण्याच्या विकास दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे शास्त्र आहे हे नि:संशय!

## ८. आलेखशास्त्र (Graphology)

या शास्त्रामध्ये व्यक्तीच्या हस्ताक्षरावरून तिचा स्वभावधर्म समजू शकतो. एखाद्या व्यक्तीच्या अनेक पत्रांचा संग्रह तपासला असता त्या व्यक्तीचा स्वभाव निश्चित समजू शकतो. उदा. एखाद्या व्यक्तीचे हस्ताक्षर शब्दाच्या शेवटी जर वर वर जाणारे असेल तर ती व्यक्ती महत्त्वाकांक्षी असते असा निष्कर्ष निघतो. अर्थात् निष्कर्ष ढोबळ मानाने काढलेले असतात. म्हणून वापरलेला कागद, त्या व्यक्तीचे वय, त्याचे लिंग व मनोवृत्ती यांचा अभ्यास केला पाहिजे. काही वेळां हेतुपूर्वक दिशाभूल करण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या प्रकारची अक्षरे काढली जातात. बऱ्याच वेळां अतिशय कामात व्यग्र असणाऱ्या माणसाचे हस्ताक्षर अतिशय खराब असते. उदा. पत्रकार व डॉक्टर. एकंदरीत या शास्त्राच्या अभ्यासावरून एवढे निश्चित समजू शकेल की तो मनुष्य सावधान चित्ताने लिहीत होता की घाईने लिहीत होता.

## ९. अधिकृत कागदपत्रांचा अभ्यास करणारे शास्त्र / (Diplomatics)

अधिकृत कागदपत्रे ही राष्ट्राराष्ट्रामधील पत्रव्यवहारात समाविष्ट होतात . अधिकृत कागदपत्रांचा अभ्यास करणारी ही शाखा एक स्वतंत्र शाखा आहे. Diplomatics शब्द Diploma या शब्दावरून आला आहे. Diplomatics या प्रकारामध्ये कोणी कोणाला पत्र लिहावे त्याचा मायना ठरलेला असतो. त्यावरून त्या पत्रलेखकाचा व पत्र स्वीकारणाऱ्याचा दर्जा समजतो.

अधिकृत कागदपत्रांमध्येसुद्धा मायने कालानुरूप बदलत असतात. उदा. पेशवे – दप्तरात अनेक पत्रांची सुरुवात 'स्वामी', 'गोसावी' अशा शब्दाने होते. अलिकडील काळात हे शब्दप्रयोग हास्यकारक वाटतात. Diplomatics हे अशा बदलांचा अभ्यास करते. Paleography व Diplomatics या दोन्होही शास्त्रांचे निष्कर्ष जर बरोबर ठरले तर संशोधकाचे काम सुलभ होते. मध्ययुगीन कालखंडातील राज्यकर्ते सरदार अधिकारी या वर्गाची मोठ्या प्रमाणात पत्रे आढळून येतात. पत्रांमधील मायना व मजकूर समजण्यासाठी या शास्त्राचा उपयोग होतो उदा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुरुवातीच्या पत्रांत "अजरख्तखाने राजेश्री सिवाजीराजे दामदौलतहू बजानिब करकूनान हाळ व इस्त्कबाळ व देशमुखानी प|| पुणे बिदानद के सुहूर सन...." अशा प्रकारचा मायना दिसून येतो. परंतु राज्यभिषेक नंतर ह्या मायन्या मध्ये बदल झालेला दिसून येतो.

## १०. मुद्राशास्त्र (Sigillography)

Sigillography या शब्दाचा उगम Sigil म्हणजे Seal किंवा मुद्रा किंवा Signature म्हणजे स्वाक्षरी यापासून झाला. यालाच Sphiragistic (स्फिरागिस्टिक) असेही म्हणतात. या शास्त्रामध्ये अनेक अधिकारी, राजे-महाराजे यांच्या मुद्रांचा अभ्यास केला जातो. त्यात उपयोगात आणलेल्या मुद्रांचा आकार, स्वरूप आणि वैशिष्ट्ये यांचाच अभ्यास होतो असे नाही तर ज्या पध्दतीने ही मुद्रा कागदपत्रांवर उमटवलेली असते आणि ती कोणत्या धातूची बनलेली असते याचाही यात अभ्यास होतो. मुद्रेत असणारी अक्षरे, प्रतिमा आणि त्या अक्षर व प्रतिमेची सुबकता, अकुशलता यावरून ज्याप्रमाणे तत्कालीन राजाच्या विचारांची, प्रवृत्तीची आणि श्रध्देची ओळख पटते. त्याचप्रमाणे तत्कालीन समाजाच्या आर्थिक सुबत्तेची, कौशल्य संपन्नतेच्या प्रमाणाची साक्ष पटते. ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये अनेक लोकांच्या अनेक मुद्रा उठवलेल्या असतात त्यावरून त्या व्यक्तीचा उद्देश समजतो.

उदा. शिवाजी महाराजांची राजमुद्रा.

प्रतिपश्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते॥

अशा मुद्रांमधून जो आशय असतो तो अनेक संशोधकांचा अनेक वर्षे संशोधनाचा विषय बनतो. राजमुद्रांचा वापर करीत असताना संबंधित ठिकाणच्या हवामानानुसार मेण ' किंवा ' शिसे ' यांचा वापर केला जातो. मुद्रेवरून जसे धोरण समजते तसेच त्याचा दृष्टिकोणही समजतो, बऱ्याच वेळां राज्याची आर्थिक परिस्थिती समजते. मुसलमानी आमदानीत प्रत्येक कागदपत्रावर मुद्रा उठवत असत त्यामुळे कागदपत्रांची सुसंगती लावणे शक्य होते. तसेच, त्या राज्याचा सांस्कृतिक दर्जासुद्धा स्पष्ट होतो.

भारतीय उपखंडात निर्माण झालेली आणि विकसित पावलेली संस्कृति म्हणून सिंधू संस्कृतिचा उल्लेख हा अपरिहार्यच आहे. या संस्कृतिच्या संबंधाने जेव्हा विविध स्थानी उत्खनन झाले त्यावेळी अनेक मुद्रा अर्थात शिक्के प्राप्त झाले. यावर असणाऱ्या आकृत्या व शब्द यांचा अर्थ लावण्याचा अनेक तज्ज्ञांनी प्रयत्न केला हे निश्चित परंतु त्यांना त्यात यश प्राप्त झालेच आहे असे म्हणता येत नाही. सिंधू संस्कृतितील समाजजीवन कशा प्रकारे नियंत्रित होत होते हे अजूनही उलगडले नाही. तरीही तिथे प्राप्त झालेल्या मुद्रा या राजव्यवस्थेशी संबंधित नसून तेथील भिन्न भिन्न व्यापारी लोकांच्या असाव्यात असा तर्क केला जातो. तो योग्य यामुळे वाटतो की सिंधू संस्कृतिशी संबंधित असलेल्या उत्खननात राजसत्ता असल्याची साक्ष देणारा कोणताही पुरावा अजूनही हाती लागला नाही असे म्हणण्यापेक्षा प्राप्त पुराव्यांवरून ज्ञात होऊ शकले नाही हे सत्य आहे.

कागदपत्रांना अधिकृत करण्यासाठी ज्याप्रमाणे मुद्रा उमटविल्या जात होत्या त्याचप्रमाणे ताम्रपट देखील विश्वासनीय व्हावेत, यासाठी त्याच्यावर राजमुद्रा बसवल्या जात होत्या. राजमुद्रांचे आकार-प्रकार विविध असले तरीही लहान, मध्यम आणि मोठ्या आकारात मोडणाऱ्या या राजमुद्रा या सामान्यतः वर्तुळाकार किंवा लंबवतुळकार असते. असे असले तरीही यास काही अपवाद आहेत. राजमुद्रांचा

उपयोग केवळ कागदपत्रांना अधिकृत करण्यासाठी होत होता असे मात्र नाही. जी दानपत्रे दिली जात होती त्यांनाही अधिकृत करण्यासाठी राजमुद्रांचा उपयोग होत होता. दानपत्रांची पद्धत मात्र भिन्न भिन्न होती. काही राजघराणी एकेरी पत्रावर दानपत्र लिहीत असत तर काहींचे दानपत्र हे अनेक पत्रांवर असे. दानपत्रांशी संबंधित असणाऱ्या राजमुद्रांवर कोणत्या प्रतिमा आहेत हा देखील अभ्यासाचा विषय आहे. त्या चिन्हांवरून किंवा त्यावरील शब्दांवरून संबंधित राजाच्या विचारांचा, श्रध्देचा वा परंपरांचा मागोवा घेणे सहज होते.

राजेलोक, शासकीय अधिकारी, खासगी व्यक्ती, व्यापारी किंवा धार्मिक संस्था यांच्या मातीच्या वा इतर प्रकारच्या मुद्रा उत्तर भारताच्या विविध प्रदेशांत प्राप्त झालेल्या आहेत. वसई, कसिया, सहेत- महेत, भीटा, नालंदा, राजघाट आणि कौशंबी येथे शेकडो मुद्रा सापडल्या आहेत. या राजमुद्रांवरून अनेक विषयांवर प्रकाश पडतो. राजमुद्रांच्या साह्याने भूतकालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक सर्व बाबींचा उलगडा होण्यास मदत होते.

## ११. भाषाशास्त्र (Philology)

भाषाशास्त्र हे अनेक भाषांचा तौलनिक अभ्यास करणारे शास्त्र आहे. आत वापरात असलेली भाषा, शब्द, वाक्यरचना यांचा विकास कसा झाला, त्या विकासाचे टप्पे कोणते यांचा अभ्यास करणारे हे शास्त्र समाजाच्या विकासावरही प्रकाश टाकते. No document No History या अनुषंगाने इतिहास हा कागदपत्राशिवाय शक्य नाही परंतु कागदपत्रे असून देखील कागदपत्रांतील भाषा अवगत होत नसेल तर त्यातील माहिती इतिहासासाठी निरुपयोगी ठरते. ही सर्वच कागदपत्रे एकाच व्यक्तीची किंवा एकाच भाषेतील असणे शक्य नाही. म्हणून संशोधकांना अनेक भाषा अवगत असणे आवश्यक आहे. तसेच त्या भाषांतील त्या काळातील शब्दप्रयोग माहीत असणे आवश्यक आहे. प्रो. रेनियर म्हणतात की, “इतिहास संशोधनाच्या पद्धती भाषाशास्त्रज्ञांनीच शोधून काढल्या आहेत.” इतिहास लिहीत असताना अनेक नावे, गावे इ. च्या बाबतीत गुंतागुंत होत असते. अशा वेळी जर भाषेचे सखोल ज्ञान असेल तर हा गोंधळ होणार नाही. अनेक भाषा बोलणारे लोक एकमेकांच्या सहवासात आल्यानंतर त्यांचा एकमेकांवर परिणाम होत असतो. उदा. इंग्लिश भाषेवर फ्रेंच भाषेचा फार प्रभाव पडलेला आहे. Parliament हा शब्द फ्रेंच भाषेतून इंग्रजी भाषेत आलेला आहे तसेच अनेक इंग्रजी शब्दांचे मूळ संस्कृत भाषेमध्ये सुद्धा आहे. Mother हा शब्द ‘मातृ ‘ या शब्दापासून तयार झाला आहे. Father हा शब्द ‘ पितृ ‘ या शब्दापासून तयार झालेला आहे.

प्रो. के. मीनाक्षी यांनी भाषाशास्त्राचा इतिहासावर असा परिणाम सांगितला आहे. “अनेक वर्षे भाषा भगिनी एकत्र राहिल्यावर त्यापासून सवयीने द्विभाषिकांबद्दल आस्था निर्माण होते. सहवासाने एका भाषेतून दुसऱ्या भाषेमध्ये शब्दांचे देवाण-घेवाण होते व सांस्कृतिक संबंध वाढतात. या भाषिक संपर्कामुळे सामाजिक उत्क्रांती होण्यास मदत मिळते. सामाजिक अभिसरण मोठ्या प्रमाणावर सुरू होते. आंतरजातीय विवाहास

चालना मिळते. वेगवेगळे व्यावसायिक गट एकत्र राहिल्याने एकमेकांचे व्यवसाय स्वीकारतात."

इतिहास हा जसा राजाचा, माणसांचा, घटनेचा किंवा एखाद्या वस्तूचा असू शकतो त्याचप्रमाणे तो भाषेचाही असतो. भाषेचा जन्म कधी झाला? तिचे प्राथमिक स्वरूप कसे होते? तिचा विकास कसा होत गेला? विभिन्न काळांत भाषा कशी होती? किती भाषांच्या लिपी तयार झाल्या? किती अस्तित्वात राहिल्या? या सर्वांचा अभ्यास भाषाशास्त्रात केला जातो. भाषा ही प्रवाही असल्याने सतत बदलणारी असते. हे स्पष्ट करून सांगायचे झाले तर यादवकालीन मराठी भाषा, बहामनीकालीन मराठी भाषा, शिवकालीन मराठी भाषा या सर्व भाषांच्या स्वरूपात भेद आहे, विभिन्नता आहे. भाषेच्या स्वरूपावरून तत्कालीन समाजाची राजकीय आणि सांस्कृतिक स्थिती कशी होती हे लक्षांत येते. कारण राजनीतित उपयोगात येणारे विशिष्ट शब्द हे तत्कालीन भाषेत प्रवाहबध्द होत असतात.

भारतीय मध्ययुगीन इतिहासातील इस्लामी आक्रमणामुळे स्वदेशीय भाषेवर परिणाम झाला व भाषेचे खरे स्वरूप नाहीसे होत गेले. त्याचप्रमाणे एखाद्या क्षेत्रातील राज्यातील भाषिक परिवर्तन कसे होत गेले याचा देखील अभ्यास भाषा शास्त्रात केला जातो. आज वापरात असलेली भाषा, शब्द, वाक्यरचना यांचा विकास कसा झाला, त्या विकासाचे टप्पे कोणते यांचा अभ्यास करणारे हे शास्त्र समाजाच्या विकासावरही प्रकाश कते. यामळे गतकालीन मानवी समाजाच्या बौद्धिक उत्क्रांतीचा आलेख तयार करण्यास भाषा शास्त्र उपयुक्त ठरते.

## १२. नाणकशास्त्र (Numismatics)

नाणकशास्त्र हा एक स्वतंत्र विषय आहे. ज्याप्रमाणे इतिहास लिहिण्यांसाठी 'कागदपत्रांची आवश्यकता असते तसेच नाण्यांची सुद्धा आवश्यकता असते. गतकालीन घडामोडींवर प्रकाश टाकण्यासाठी नाणेशास्त्राचा उपयोग होतो. पूर्वीच्या काळी राज्यारोहण, युद्धविजय अशा महत्त्वाच्या प्रसंगाच्या वेळी नवी नाणी तयार केली बात. त्यावर काही शब्द किंवा प्रतिमा कोरलेल्या असत. त्यावरून त्या काळातील लिपी, तसेच धार्मिक संकल्पनांची माहिती मिळते. तसेच नाण्यासाठी वापरलेल्या धातूवरून उत्कालीन आर्थिक परिस्थितीचा अंदाज बांधता येतो. या दृष्टिकोणातून सम्राट अशोकाच्या काळातील नाण्यांचा चिकित्सक अभ्यास डॉ. रोमीला थापर या विदुषीने केलेला आहे. अलीकडील काळात कागदी नोटा आल्यामुळे नाणी दुय्यम ठरली परंतु जेव्हा कागदी नोटा नव्हत्या तेव्हा नाणी अर्थव्यवस्थेचा एकमेव आधार होता. नाण्याच्या धातुवरून त्या राज्यातील आर्थिक परिस्थितीही समजत असे. तसेच त्या राज्याचा विचार व दृष्टिकोणही समजत असे. राज्याचा कालखंड ठरविणे हेही काम प्रामुख्याने होत असे. बऱ्याच वेळा त्या राज्याचा 'प्रदेशविस्तार किंवा व्यापारी संबंध ठरविण्यासाठी नाण्याची मदत होत असे. उदा. प्राचीन 'भारतीय नाणी रोममध्ये सापडली. यावरून प्राचीन भारतीयांचा व्यापार रोमशी होत होता है सिद्ध होते. भूमध्य समुद्रात तसेच इतरत्र अनेक ठिकाणीं ग्रीकांची अनेक नाणी सापडली त्यावरून ग्रीकाचा राज्यविस्तार समजणे शक्य होते. नाण्यासाठी जो धातू वापरला असेल

त्यावरून आर्थिक समृद्धता दिसून येते. उदा.सोन्याचे नाणे हे आर्थिक समृद्धता दाखवते तर ब्राँझचे नाणे हे आर्थिक व्यवस्था ढासळत आहे याचे द्योतक ठरते. ज्याप्रमाणे आर्थिक स्थिती समजते त्याप्रमाणे त्या राजाची मनोवृत्तीसुद्धा समजते. उदा. भारतीय नेपोलियन म्हणून ओळखला जाणारा समुद्रगुप्त याच्या नाण्यावर एका बाजूला तराजूचे चित्र व दुसऱ्या बाजूला वीणावादिनीचे चित्र कोरले आहे यावरून त्यांचा न्यायीपणा व विद्येची आवड सिद्ध होते.

प्राचीन भारताने आपली मुद्रा व्यवस्था खूप पूर्वी निर्माण केली होती. वेदात निष्क, शतमान आणि सुवर्ण हे निश्चित वजन असणारे सोन्याचे तुकडे असावेत. यातील निष्क हे वैदिक काळातील सोन्याची मुद्रा होती जशी मनुस्मृतीच्या काळात होती. नाण्याची निर्मिती जर इ.स. पूर्व ७०० ते ६५० या काळात झालेली असली तरीही नाण्याचा शास्त्र म्हणून अभ्यास हा खूप उशिरा म्हणजे आधुनिक काळातच सुरू झाला. नाण्यांशी संबंधित असणारे पहिले पुस्तक हे फ्रेंच भाषेत Guillaume Bude याने De Asseet Partibus या नावाचे १५१४ मध्ये लिहिले. असे असले तरीही नाण्यांचा पुरातत्त्वीय साधन या दृष्टीने अभ्यास हा विसाव्या शतकातच सुरू झाला.

नाण्यांचा शास्त्र म्हणून अभ्यास हा विसाव्या शतकात सुरू झालेला असला तरीही त्या अभ्यासाने इतिहासाचा पाया मजबूत करण्यास, त्यास सुस्पष्टता प्रदान करण्यास साह्यच केलेले आहे. आपल्या काळाच्या धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक इतिहासाचे प्रतिनिधित्व नाणी करीत असतात.

## १३. पुरातत्वशास्त्र (Archaeology)

पुरातत्वशास्त्र हा विषय इतिहासाच्या अभ्यासास मदत करणारा साह्यकारी शास्त्र आहे. प्रागैतिहासिक व इतिहासपूर्व काळाच्या इतिहासलेखनासाठी माहिती पुरविणारे शास्त्र म्हणून पुरातत्त्वशास्त्राला अतिशय महत्त्व आहे. इतिहासाची साधने भूपृष्ठाच्या आत दडलेली असतात. भूपृष्ठावर ज्या हालचाली होतात त्यामुळे पृथ्वीवर सतत स्थित्यंतरे होत असतात. आज भूपृष्ठावर दिसणारी नागर संस्कृती वा ग्रामीण संस्कृती भूकंप वा जलप्रलय यांनी एका क्षणात भूमातेच्या उदरात गडप होत असते. कालांतराने या संस्कृतीचा शोध घेण्याचे कार्य पुराणवस्तू शास्त्रज्ञ करीत असतात. पुराणवस्तूचा शोध घेण्याचे कार्य करणारी जी विद्याशाखा आहे तिला पुरातत्वशास्त्र असे म्हणतात. पुरातत्वशास्त्राचा उगम ग्रीक शब्दांमध्ये आहे. या विद्याशाखेला इंग्रजीमध्ये Archaeology म्हणतात.

इतिहास आणि पुरातत्व शास्त्र यांच्या संबंधाची व्याख्या करताना ग्रॅहॅम क्लार्क त्यांच्या Archaeology of Society या ग्रंथात म्हणतात, "भूतकालीन मानवी जीवनाची घडण जाणण्यासाठी केलेला अवशेषांचा पद्धतशीर व शास्त्रीय अभ्यास म्हणजे पुरातत्त्व होय." करत असताना लिखित व अलिखित संदर्भसाधनाचा वापर करावा लागतो. अलिखित संदर्भसाधनांतील सर्वांत महत्त्वाचे साधन  पुरातत्वशास्त्र किंवा पुराणवस्तु संशोधन शास्त्र होय. म्हणूनच प्रसिद्ध अमेरिकन मानववंश शास्त्रज्ञ डॉ. अल्फ्रेड क्रोबर यांच्या मते, 'पुरातत्व विद्या म्हणजे अलिखित इतिहास होय.'

आज जगामधील अनेक संस्कृत्यांचा अभ्यास करत असताना अनेक शास्त्रांचा अभ्यास केला जातो. सिंधू संस्कृती हे पुरातत्त्व शास्त्रातील एक वैशिष्ट्यपूर्ण संशोधन आहे. उत्खननामुळे अनेक गोष्टींवर प्रकाश पडतो व अपूर्ण प्रश्न सुटू लागतात. म्हणून पुरातत्त्व विषय हा इतिहासाच्या संशोधनाचा एक अतिशय महत्त्वाचा असा साह्यकारी विषय आहे. अति प्राचीन संस्कृतींची लिखित माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्या काळातील वस्तूंचा, अवशेषांचा शोध ह्या शास्त्राच्या मदतीने घेता येतो. प्राचीन संस्कृतींच्या प्रदेशांचा शोध घेणे, तेथे उत्खनन करून पुरातन वस्तूंचे अवशेष गोळा करणे, शास्त्रीय पद्धतीने त्यांच्यावर प्रक्रिया करून त्यांचा काळ ठरविणे ही पुरातत्त्वशास्त्राची कार्यकक्षा आहे. पुरातत्त्वीय वस्तूंवर शास्त्रीय प्रक्रिया करून त्या कोणत्या कालखंडातील असाव्यात, त्यांचा वापर कशासाठी केला जात असावा, तशाच वस्तू इतरत्र सापडतात कां या प्रश्नांची उत्तरे शास्त्रीय पद्धतीने शोधून प्राचीन काळातील मानवी जीवनाचे चित्र रेखाटण्यास वस्तू बोलक्या ठरतात. तसेच मंदिरे, प्राचीन इमारती, लेणी, स्तूप, गढ्या इत्यादी भूपातळीवरील उध्वस्त अवशेषांचा अभ्यासही ह्या शास्त्राच्या कक्षेत मोडतो. त्यावरून गतकालीन जीवनपद्धती विषयी माहिती मिळते.

भारतासारख्या देशात जिथे प्राचीन कालखंडात ऐतिहासिक लेखन फारच दुर्मिळ होते तेथे संस्कृतिक इतिहास लिहिण्यासाठी पुरातत्त्वविद्याची मदत मोठ्या प्रमाणात घ्यावीच. प्रत्येक देशातील लोकांना आपला इतिहास संस्कृती वारसा जाणून घेण्यासाठी ची इच्छा असते. हा प्राचीन इतिहास व संस्कृतीचा वारसा जाणून घेण्यासाठी पुरातत्व शास्त्र हे अत्यंत उपयोगी पडते.

भारतात १८८१ मध्ये पुराण वस्तू संशोधन खात्याची स्थापना झाली. अलेक्झांडर कॅनिंगहम अनेक वर्षे त्या खात्याचा प्रमुख होता. त्याने प्रामुख्याने वायव्य सरहद्द प्रांत, पंजाब, उत्तर भारतावर आपले लक्ष केंद्रित केले. त्याचे उत्खनन हे प्रामुख्याने बौद्ध क्षेत्रा पुरते मर्यादित होते. त्याच्या संशोधन कार्याचा वृत्तांत २१ खंडात प्रकाशित केला आहे. लॉर्ड कर्झन याने पुराण वस्तू संशोधन खात्याला शास्त्रीय स्वरूप दिले तर जॉन मार्शल यांच्या नेतृत्वाखाली श्रावस्ती कुशीनगर सांची तक्षशिला या क्षेत्रांचे संशोधन सुरू केले पुढे सिंधू संस्कृती उजेडात आली. अशा पद्धतीने भारतातील अनेक ठिकाणांचे उत्खनन केले. त्यामुळे भारतीय संस्कृत व इतिहास यांवर प्रकाश पडला.

लिखित ग्रंथ हे प्राचीनकाळी फारसे उपलब्ध नव्हते व ते होते ते प्रामुख्याने धार्मिक स्वरूपाचे होते. उत्खननात सापडलेल्या वस्तू प्रामुख्याने सर्वसामान्य माणसांच्या तत्कालीन जीवनावर प्रकाश टाकतात म्हणून प्राचीन भारत असो की प्राचीन काळातील विविध देशातील इतिहास व संस्कृतीचा अभ्यास यासाठी पुरातत्वशास्त्र निश्चितच शास्त्र हे निश्चितच उपयोगाची शास्त्र आहे. पुरातत्वविद्या ही मानवी जीवनाचा अभ्यास असल्याने इतिहास काळातील सामान्य माणसाच्या जीवनाचे सूसंगत चित्र उभे करण्यासाठी पुरातत्व शास्त्राचे सहाय्य घ्यावे लागते. इतिहासातील घटनांचा लेखी पुरावा उपलब्ध असला तरी कित्येक वेळा त्या घटना सिद्ध करण्यासाठी केवळ पुरातत्वीय पुराव्यांवर अवलंबून राहावे लागते. इसवी सन पहिल्या दुसऱ्या शतकात भारताचा रोम साम्राज्याशी फार मोठ्या प्रमाणात व्यापार होत असल्याचा उल्लेख

ग्रीक व रोमन लेखकांनी केला आहे. परंतु त्यांची सत्यता ही केवळ उत्खननातील पुराव्यांमुळे पटते. पुरातत्व शास्त्राच्या आधाराच्या सहाय्याने भारताच्या इतिहासाचा शोध अति प्राचीन काळापर्यंत नेऊन पोहोचवता येतो आणि त्यासाठी प्राचीन वाडमयामधील दंतकथेवर अवलंबून राहण्याची गरज राहत नाही. पुरातत्त्व शास्त्राच्या आधाराने अनेक प्राचीन संस्कृती या पुराव्याच्या आधारे रेखाटता येतात. पुरातत्वीय पुराव्यांचा उपयोग वाङ्मयीन माहितीला आधार म्हणून किंवा ती माहिती खोडून काढण्यासाठी म्हणून होऊ शकतो. उदाहरणार्थ हस्तीनापुर येथे झालेल्या उत्खननामधून पुरामुळे झालेला विध्वसाच्या खुणा दिसतात.

## १४. शिलालेखशास्त्र (Epigraphy)

Epigraphy म्हणजे शिलालेखशास्त्र होय.  हे शास्त्र भाषाशास्त्र (Philology) व हस्ताक्षरशास्त्र (Palaeography) यांना अतिशय जवळचे आहे. या शास्त्रांच्या आधारे अनेक शिलालेख वाचता येतात व त्यांच्या आधारे नवीन माहिती मिळू शकते. शिलालेख व ताम्रपट ही इतिहासासाठी अतिशय उपयुक्त अशी विश्वसनीय साधने मानली जातात. महत्त्वाच्या घटना पूर्वी शिलालेखांत नमूद केल्या जात. हे लेख संक्षिप्त स्वरूपाचे असले, तरी त्यावरील नोंदी स्पष्टपणे व निःसंदिग्धपणे, कोणतीही खाडाखोड न करता केलेल्या असतात. त्यावर घटनेप्रमाणे काळाचीही नोंद असते. यामुळे व हा पुरावा समकालीन असल्यामुळे विश्वसनीय मानला जातो. शिलालेख हे एकाच व्यक्तीने लिहिलेले नसतात. त्यामुळे त्यांनी वापरलेले शब्दप्रयोग, वाक्प्रचार भिन्न स्वरूपाचे असू शकतात. या शास्त्राचा उपयोग सांगतांना प्रो. रेनियर (Renier) म्हणतात, “ ऐतिहासिक घटनांचा शोध लावण्यासाठी संशोधकाला सदरचे पुरावे ज्या भाषेत लिहिले आहेत तिची सखोल माहिती आवश्यक आहे. तसेच (शिलालेख) लिहीत असताना ज्या संक्षिप्त रूपांचा वापर केला आहे ती पद्धती माहीत असणे आवश्यक आहे.”

ह्या शिलालेखावरील व ताम्रपटावरील कोरलेले शब्द ब्राम्ही, खरोष्टी अशा प्राचीन लिपीत असतात. ह्या लिपींचा उलगडा झाल्याशिवाय त्यांचा अर्थ लागत नाही. ब्राम्ही लिपीची उकल इंग्लिश ईस्ट इंडियाच्या शासनकाळातील ब्रिटिश अधिकारी जेम्स प्रिन्सेप ह्या शिलालेखतज्ज्ञाने परिश्रमपूर्वक केली.

## १५. स्थापत्यशास्त्र

‘मानवाने जे काही बांधून काढले आहे किंवा खोदून काढले आहे त्याचा सर्वागिण अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे स्थापत्यशास्त्र’ असे म्हणता येईल. स्थापत्यशास्त्रामुळे इतिहासास आधार तर मिळाला तसेच घडलेल्या घटनांची विश्वासार्हता अधिक वृध्दिंगत झाली. स्थापत्यशास्त्रामुळे इतिहास हा विस्तारित झाला हे मान्य करावे लागते. स्थापत्य या शब्दाचा अर्थच मुळात बांधकाम असा आहे. यामुळे बांधकामासाठी कोणते घटक उपयोगात आणले आहेत? त्या स्थापत्याचा काळ कोणता? त्याची शैली कोणती ? उपयोगात आणलेले घटक स्थानिक आहेत की बाहेरून आणलेले आहेत? बांधकामाचा उद्देश काय? बांधकाम हे अनुकरणात्मक आहे की नवीन संकल्पनेवर आधारित आहे? बांधकामावर कोण्या धार्मिक विचारांचा प्रभाव

आहे काय? या प्रमाणेच खोदण्यात आलेली लेणी वा गुहा यांचा विचार करावा लागतो.. स्थापत्यशास्त्रात अशाच प्रमाणांचा, निकर्षांचा आधार घेतला जातो.

इतिहासात घडलेल्या घटनांचा, प्रगट केलेल्या विचारांचा जरी विचार होत असला तरीही घडलेली घटना ज्यांच्यांशी संबंधित आहे असे लोक कोठे राहत होते? घटनेतील वर्णित वास्तू ही तशीच आहे का वा तिचे स्वरूप वेगळे आहे. हेही इतिहासाच्या विश्वासार्हततेसाठी निश्चित होणे आवश्यक असते. कारण ग्रंथातील वर्णनात अनेकदा अतिरंजीत वर्णने केलेले आढळतात. यामुळे स्थापत्याचे योग्य आणि वास्तव वर्णन इतिहासास वास्तवतेचा आधार प्राप्त करून देत असते.

स्थापत्यशास्त्रात प्राधान्याने होतो तो बांधणीच्या शैलीचा अभ्यास. ग्रीक शैली, रोमन शैली, इराणियन शैली, इजिप्शियन शैली, मुस्लिम शैली, हिंदू शैली, हेमांडपंती शैली अशा अनेक बांधकाम शैलीचा अभ्यास स्थापत्यशास्त्रात होतो. हा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. यातील कोणती शैली कधी निर्माण झाली आणि ती अस्तंगत कधी व कशी झाली हा अभ्यास मांडताना इतिहासाच्या अभ्यासात नकळतच भर पडत जाते. अनेक दोन शैलींच्या मिश्रणानेही एक स्थापत्य उभे राहते. जसे भारतात हिंदू-मुस्लिम, हिंदू ग्रीक, हिंदू-इराणियन अशा मिश्र शैलीची स्थापत्ये निर्माण झाली आहेत. ही अशी का निर्माण झाली आणि ती पुढे अस्तित्वात राहिली का हाही अभ्यासाचाच विषय आहे.

स्थापत्यशास्त्र हा केवळ इमारतीचा अभ्यास नाही तर तत्कालीन समाज, त्याची सांस्कृतिक बौध्दिक-आर्थिक स्थितीचे ज्ञान प्रातिचे साधन आहे. स्थापत्यशास्त्र हा स्वतंत्र विषय असला तरीही इतिहासाच्या विकासास व व्याप्तीस साह्य करणारे शास्त्र आहे.

## १६. संदर्भग्रंथसूची (Bibliography)

संदर्भग्रंथसूची हे एक स्वतंत्र शास्त्र आहे. या शास्त्रामध्ये ज्या संदर्भसाधनांच्या आधारावर जे संशोधन केलेले असते त्यांची समग्र यादी दिलेली असते. इतिहाससंशोधन किती श्रेष्ठ दर्जाचे आहे हे त्याच्या पाठीमागे दिलेल्या संदर्भसूचीवरून ठरविण्यात येते. संदर्भग्रंथसूचीसंबंधी डॉ. के. एन. चिटणीस म्हणतात, “संदर्भग्रंथसूचीमध्ये ज्या संदर्भाचा संशोधकाने वापर केलेला असतो. त्यांचा समावेश केलेला असतो. पण काही वेळा संशोधकाने काही संदर्भसाधनांचा वापर केलेला असतो परंतु त्यांचा उल्लेख केलेला नसतो. काही संशोधक जी संदर्भसाधने उल्लेखलेली नसतात किंवा वापरलेलीही नसतात अशांची यादी देतात. या यादीचा उपयोग संशोधकाला आपल्या विषयाची पार्श्वभूमी म्हणून करता येतो.”

**संदर्भग्रंथसूची-शास्त्रामध्ये पुढील चार प्रकार दिसून येतात :**

१. असे संदर्भ की ज्यांमध्ये जास्तीत जास्त उपयुक्त माहिती असते.

२. अशी संदर्भसाधने की, ज्यामध्ये कोणते ग्रंथ वापरले आहेत त्यांची यादी दिलेली असते.

३. अशा संदर्भांची यादी की, ज्यामध्ये कोणत्या ग्रंथांचा मागोवा घेतला आहे त्याची यादी दिलेली असते.

४. संशोधनाच्या विषयासंबंधी आवश्यक असणाऱ्या ग्रंथांची यादी.

वरील चार प्रकारांपैकी पहिल्या प्रकारच्या यादीला Select bibliography असे • म्हणतात तर चौथ्या प्रकाराला Exhaustive bibliography असे म्हणतात. वरील चारी प्रकारांचे दोन प्रकारे उपविभाग पडतात ते असे :

१. सर्वसामान्य संदर्भ (Ordinary bibliography)

२. टीपा – टिप्पणीसह संदर्भ (Annotated bibliography)

## १७. तत्वज्ञान

गतकालीन घटनांचे निव्वळ वर्णन करणे म्हणजे चांगला इतिहास नाही, इतिहासाल शैक्षणिक मूल्य आहे. गतकालीन घटनांतून, घडामोडींतून काही सारभूत तत्त्वे, काही सिद्धा मांडता येतात. जीवनदर्शन घडविता येते. असे मानवी जीवनाचे सैद्धांतिक दर्शन घडविण शास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान होय. फ्रेंच तत्त्वज्ञ व्होल्टेअर्स 'इतिहासाचे तत्त्वज्ञान' असा शब्दप्रयोग प्रथम केला. आणि अठराव्या शतकापासून इतिहासाच्या क्षेत्रातील विचारवंत तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झाले. गतकालीन समाज जीवनांचा व्यापकपणे अभ्यास करून त्यातून काही सार्वकालीन सिद्धांत स्पेंगलर, अर्नाल्ड टॉयन्बी, विल ड्यूरंद यासारख्या इतिहासक्षेत्रातील विचारवंतानी मांडले. तर क्रोसे, कोलिंगवूड, बरी यांनी तात्त्विक भूमिकेतून इतिहासाबाबतचे सिद्धांत मांडलेले दिसतात.

तसेच इतिहासात भारतीय तत्त्वज्ञानाची खूप मोठी परंपरा लाभलेले दिसून येत. प्राचीन वेद उपनिषदे ब्राह्मण ग्रंथ आरण्यक वेदांगे बौद्ध धर्मातील ग्रंथ जैन धर्मातील ग्रंथ गीता या सर्व धर्मातील धार्मिक ग्रंथांमध्ये मोठ्या प्रमाणात तत्त्वज्ञानविषयक चर्चा केली आहे हे तत्त्वज्ञान मानवी जीवनातील धार्मिक परंपरा, निती, मूल्य, सामाजिक नियम, प्रथा, देव, निसर्ग, या घटकांशी संबंधित आहेत. इतिहासाच्या अध्ययवरी वरील घटका संदर्भात केलेले चिंतन जाणून घेणे महत्त्वाचे ठरते त्यासाठी तत्त्वज्ञान विषयाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

## १८. साहित्य

साहित्य व इतिहास यांचा निकट संबंध सर्वमान्य आहे. अठराव्या शतकापर्यंत इतिहास हे साहित्याचे अंग मानले जाई. मानवी जीवन हा ह्या दोन्ही ज्ञानशाखांचा अभ्यासविषय आहे. साहित्यिक मानवी जीवनाचे कल्पनाधिष्ठित चित्र रेखाटतो. तर इतिहासकार मानवी जीवनाचे सत्यदर्शन घडवितो. ह्या दोहोतील दुसरा भेद म्हणजे इतिहासकाराचा अभ्यासविषय. गतकाळातील मानवी जीवन आहे. साहित्यिक मात्र भूतकाळाप्रमाणे वर्तमानालाही आपल्या कक्षेत घेतो. इतिहास साहित्याला वर्ण्यविषय देतो; गतकाळातील महान व्यक्तींची चरित्रे, ऐतिहासिक प्रसंगावर आधारित कादंबऱ्या, लघुकथा, नाटके, हे लोकप्रिय साहित्य प्रकार आहेत. इतिहासकाराला काही

साहित्यिक गुणांची गरज असते. इतिहास म्हणजे 'निखळ शास्त्र' असे म्हणणाऱ्या प्रा. बरी यांनीही इतिहासकाराला गतकाळाचा अर्थ लावताना 'सहानुभूतीपूर्ण कल्पनाशक्ती' वापरावी लागते असे म्हटलेले दिसते. लिओपोल्ड रांके हा शास्त्रीय पद्धतीच्या इतिहासलेखनाचा खंदा पुरस्कर्ता खरा, परंतु त्याच्या लिखाणातही कल्पनेचा वापर दिसतो, काही अंशी आत्मनिष्ठाही डोकावते. साहित्यिकात असणारे भाषाप्रभुत्व इतिहासलेखकात असणे उपयुक्त ठरते. ऐतिहासिक सत्यकथन रंजक पद्धतीने केल्यास ते विशेष परिणामकारक ठरते. इतिहासकाराचे भाषाप्रभुत्व, शब्दार्थांच्या सूक्ष्म छटांची जाण हे गुण लेखन प्रभावी करण्यासाठी आवश्यक ठरतात. थॉमस कार्लाइल याचा फ्रेंच राज्यक्रांतीवरील ग्रंथ किंवा यदुनाथ सरकारांचा औरंगजेबावरील अभ्यासपूर्ण ग्रंथ त्यांच्या भाषाप्रभुत्वामुळे रोचक ठरतात. एरवी इतिहासग्रंथ कितीही विद्वत्तापूर्ण असले तरी ते वाचकांपर्यंत पोचत नाहीत. याच दृष्टीने 'इतिहास हे शास्त्र आहे व कलाही' असे विधान जी.एम. ट्रिव्हेलियन यांनी केलेले आढळते.

## १९. मानवशास्त्र

काळातील अस्थींचा अभ्यास करून मानवाच्या शारीरिक रचनेत कसकसे परिवर्तन होत गेले याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानववंशशास्त्र होय. हे बदल परिस्थितीनुरूप होतात आणि म्हणून असे शारीरिक बदल होण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली असावी याबद्दल कयास बांधता येतात. माणसाच्या कवटीचा आकार, कपाळाची ठेवण, डोळ्यांचा व नाकांच्या हाडांचा आकार यांचे परीक्षण करून हे शास्त्र मानवाच्या शारीरिक उत्क्रांतीचे सर्वसाधारण निष्कर्ष काढते. मानवाचे वेगवेगळे वंश कोणते होते, त्यांची शारीरिक वैशिष्ट्ये कोणती याचा अभ्यास वंशशास्त्र करते. याच आधारे गोबिन (Gobineau) सारख्या लेखकाने आर्यांच्या तथाकथित वांशिक श्रे्ठत्वाचा सिद्धांत मांडला. त्याचे दुष्परिणाम जगाला भोगावे लागले

याखेरीज जीवशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र इत्यादी शास्त्रांचाही उपयोग इतिहास करून घेतो. उत्खननासाठी जागा निवास पदार्थविज्ञानाची मदत होते; अस्थी, लाकूड, दगड यांच्या वरील रासायनिक प्रक्रियेसाठी रसायनशास्त्र उपयुक्त ठरते. स्थापत्य शास्त्र, मूर्तीकलाशास्त्र, छायाचित्रांचे शास्त्र इत्यादी शास्त्रांचाही वापर अभ्यासविषयानुसार करणे इतिहासकाराला आवश्यक ठरते.

एकूण, इतिहासाच्या अभ्यासाची ऐतिहासिक सामग्री संकलित करण्याची इतकी विविध साधने व शास्त्रे आज उपलब्ध आहेत की त्यामुळे इतिहास अध्ययनाची कक्षा सतत व्यापक होत आहे आणि भिन्न शाखांच्या मदतीखेरीज बिनचूक व अर्थपूर्ण इतिहास लिहिणे दुरापास्त झाले आहे.

## २०. संख्याशास्त्र (Statistics)

संख्याशास्त्र हे इतिहाससंशोधकाच्या दृष्टीने एक नवीनच शास्त्र आहे. पूर्वी जेव्हा संख्याशास्त्र विकसित झालेले नव्हते तेव्हा त्याच्या आधाराने इतिहास संशोधकाला काही मदत मिळू शकेल अशी कल्पनाच नव्हती. आधुनिक काळात इतर अनेक शास्त्रे

वेगवेगळ्या शास्त्रांच्या आधाराने आपले ज्ञान पूर्णत्वाला नेत आहेत. उदा० एखादा समाजशास्त्रज्ञ किंवा अर्थशास्त्रज्ञ आपला मुद्दा स्पष्ट करताना संख्याशास्त्राचा आधार घेतो. मग अशाच शास्त्रामध्ये असणाऱ्या इतिहासाने संख्याशास्त्राचा वापर केल्यास कोणतीही हरकत नसावी. यामुळे संख्याशास्त्राचा उपयोग करून घेण्याची पद्धत सुरू झाली. पूर्वी इतिहासकार ढोबळ मानाने विधाने करीत असे तर आता इतिहासकार संख्याशास्त्र व गणकयंत्राच्या साहाय्याने आपला निष्कर्ष शंभर टक्के तंतोतंत कसा होईल या हेतूने संख्याशास्त्राचा वापर करू लागला.

**आपली प्रगती तपासा**

१.इतिहास ,राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र यातील संबंध स्पष्ट करा.

२. नानकशास्त्र , भाषाशास्त्र, संख्याशास्त्र ह्या साह्यकारी शास्त्राचा इतिहासाशी असलेला संबंधाचा मागोवा घ्या.

## ३.५ सारांश

अशा प्रकारे साहयकारीशस्त्रांचे इतिहास विषय क्षेत्रातील कार्य व उपयोगिता सांगता येईल. ही सर्वच शास्त्रे इतिहासाला कमी अधिक प्रमाणात महत्वाची आहेत. इतिहासातील सामाजिक सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, भौतिक, भौगोलिक संकल्पना व संस्था यांचे आकलनहोण्यासाठी या शस्त्रांची इतिहासाला मोलाची मदत होते.तसेच त्या त्या संबंधित विषय शाखांमध्ये इतिहास विषयाची उपयोगित सुद्धा महत्वपूर्ण आहे.

## ३.६ प्रश्न

१. इतिहासातील साह्यकारी शास्त्रे स्पष्ट करा

२. इतिहासाचे भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र या विषय शाखासोबत असणाऱ्या संबंधाचे परीक्षण करा

३. इतिहासाच्या साह्यकारी शास्त्रंचे महत्व विशद करा.

## ३.७ संदर्भ


१. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, पाचवी आवृत्ती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६.

२. सरदेसाई, बी. एन, इतिहास लेखन शास्त्र, तिसरी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७.

३. गद्रे प्रभाकर, इतिहास लेखनाच्या परंपरा, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००४.

४. म्हैसकर प्रदीप, इतिहास तत्वज्ञान (व्याप्ती व चिंतन), औरंगाबाद, २०१५.

५. सरदेसाई बी. एन. गायकवाड, हनुमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११

६. सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, प्रथमवृत्ती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११.

७. देव प्रभाकर, इतिहासलेखनशास्त्र, प्रथमावृत्ती, कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९७.

८. गाठाळ . एस एस, इतिहासलेखन शास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१८.


❄❄❄❄❄❄❄❄

# ४

# इतिहासाचे स्रोत / साधने स्वरूप आणि प्रकार

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे
४.१ परिचय
४.२ प्राथमिक स्रोत - साहित्यिक/ वाङ्ग्यीन
४.३ प्राथमिक पुराभिलेखीय स्रोत
४.४ दुय्यम स्रोत - साहित्यिक/ वाङ्ग्यीन स्त्रोत
४.५ तोंडी स्त्रोत
४.६ डिजिटल स्रोत
४.७ सारांश
४.८ प्रश्न
४.९ संदर्भ

## ४.० उद्दीष्टे

या युनिटमधून गेल्यानंतर विद्यार्थी सक्षम होऊ शकेल

१) प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहासासाठी स्त्रोतांचे स्वरूप आणि प्रकार समजून घ्या

२) प्राचीन भारतीय इतिहासाची प्राथमिक व दुय्यम स्त्रोत समजावून सांगा

३) ऐतिहासिक स्त्रोतांचे विविध प्रकार सांगा.

## ४.१ परिचय

इतिहास लेखनाचा स्त्रोत साहित्य हा आवश्यक भाग आहे. इतिहासाचे साधन म्हणजे ज्याच्या साहाय्याने आपणाला इतिहासाच्या एखाद्या पैलूचे किंवा प्रत्यक्ष इतिहासाचे ज्ञान होते त्याला इतिहासाचे साधन म्हणतात. इतिहास लेखनात साधनांचे महत्त्व स्पष्ट करताना आर्थर मार्विक यांनी म्हटले होते की, " केवळ साधनांचा अभ्यास इतिहास - लेखनासाठी पुरेसा नाही, मात्र त्याखेरीज इतिहास आकार घेत नाही हेही तितकेच सत्य आहे." इतिहासाला शास्त्राचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी ऐतिहासिक साधने इतिहास लेखनासाठी महत्त्वाची आहेत. विश्वसनीय संदर्भ साधने व त्या साधनांसाठी वापरात आणलेली शास्त्रशुद्ध मूल्यमापन पद्धती या दोन बाबी इतिहास लेखनासाठी महत्त्वाच्या आहेत. यावरून साधनांचे महत्त्व लक्षात येते.

थ्युसिडाईडीज याने संदर्भ साधनांचे महत्त्व स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, "ऐतिहासिक घटनांचे खरेखुरे, तंतोतंत वर्णन करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी योग्य साधने जमविणे

आवश्यक आहे, अशा घटना जमविल्या पाहिजेत की, त्यापासून भविष्यकाळात मानवाला काही धडा मिळू शकेल."

ऐतिहासिक स्त्रोत विविध प्रकारचे आहेत. त्यांच्या स्वरूपाप्रमाणे त्यांचे वर्गीकरण केले जाऊ शकते. इतिहास लेखनात स्त्रोत महत्वाची भूमिका बजावतात. म्हणून इतिहासकार पुराभिलेखागार, वस्तुसंग्रहालये आणि संस्था अशा वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेतो. इतिहासकार ऐतिहासिक स्त्रोतांच्या मदतीने भूतकाळातील घटनेचे पद्धतशीर वर्गीकरण करतो. त्यांचे विस्तृत प्रकारात खालील प्रकारे वर्गीकरण केले जाऊ शकते.

१. पुरातत्व स्त्रोत

२. साहित्यिक किंवा वाङ्मयीन स्त्रोत

३. तोंडी परंपरा

४. डिजिटल स्त्रोत

**या स्त्रोतांचे दोन प्रकारात वर्गीकरण देखील केले जाऊ शकते**

**प्राथमिक स्त्रोत -** घटना घडत असताना निर्माण झालेली साधने ही प्रथम दर्जाची साधने मानली जातात.गोत्शॅल्क यांनी प्राथमिक डेटा स्त्रोत म्हणून परिभाषित केले आहे की “कोणत्याही इंद्रिय व लेखकांची नेत्र साक्ष”. दुसऱ्या शब्दांत प्राथमिक स्त्रोत मूर्त सामग्री आहेत, जी ऐतिहासिक घटनेचे वर्णन प्रदान करतात आणि घटना घडल्यानंतर लवकरच तयार केली जातात. नवीन कागद अहवाल, अक्षरे, सार्वजनिक दस्तऐवज, कोर्टाचे निर्णय, वैयक्तिक डायरी, आत्मचरित्र, कलाकृती आणि प्रत्यक्षदर्शींच्या तोंडी साहित्याचा समावेश होतो.

भूमिपूजन किंवा उद्घाटनाच्या कार्यक्रमाला वेळेस जी कोनशिला बसवतात ते सुद्धा प्राथमिक साधन मानले जाते. एखाद्या महापुरुषाच्या समक्षच त्याच्या हयातीत त्याचे चरित्र लिहिले जाते तेसुद्धा प्रथम दर्जाचे साधन ठरते. उदाहरणार्थ बाणभट्टाचे हर्षचरित. प्राथमिक स्त्रोत खालील प्रमाणे दोन विस्तृत श्रेणींमध्ये विभागले जाऊ शकतात.

१) दिलेल्या ऐतिहासिक कालावधीचे अवशेष यामध्ये छायाचित्रे, कोरीव सापळे, जीवाश्म साधने, शस्त्रे, भांडी, फर्निचर आणि इमारतींचा समावेश असू शकतो. हे मूलतः भावी पिढ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्याकरिता नसले तरी भूतकाळाविषयी विश्वसनीय आणि योग्य पुरावे देण्यासाठी ते खूप उपयुक्त स्त्रोत सिद्ध करतील. या अवशेषाद्वारे मौखिक नसलेली माहिती प्रदान करतात.

२) ज्या वस्तूंचा प्रत्यक्ष शारीरिक संबंध आला आहे अशा वस्तूंचा यात समावेश होतो. यात कायदे, फाइल्स, पत्रे, हस्तलिखिते, सरकारी ठराव, स्मरणपत्रे, वर्तमानपत्रे, मासिके, जर्नल्स, फाइल्स, सरकारी किंवा इतर अधिकृत प्रकाशने, नकाशे, तक्ते, पुस्तके, कॅटलॉग, संशोधन अहवाल, बैठक अहवाल नोंद अशा कागदपत्रांचा समावेश आहे. शिलालेख, लिप्यंतरण वगैरे रेकॉर्डिंगच्या बैठका इ. साधने

प्राथमिक साधनांना इतिहास लेखनात महत्त्व दिले जाते याची कारणे प्रभाकर देव यांनी पुढीलप्रमाणे दिले होती. १) प्राथमिक साधने ही समकालीन असतात. २) समकालीन असल्यामुळे ती अधिक विश्वसनीय असतात. ३) समकालीन असल्यामुळे वास्तवाचा विपर्यास होण्याची शक्यता असते. ४) प्राथमिक साधने ही पूराव्याच्या स्वरूपातील असल्यामुळे सत्यशोधनात उपयुक्त ठरतात. ५) शिलालेखासारख्या साधनांत खाडाखोड शक्य नसते.

प्राथमिक किंवा मूळ साधनांचे वर्गीकरण दोन प्रकारे केले जाते. अ) लिखित साधने

**ब) अलिखित किंवा भौतिक साधने**

ब) दुय्यम स्त्रोत / साधने: घटना घडुन गेल्यानंतर त्या घटनेविषयी कुणाला तरी माहिती कळते, कुणाकडून तरी माहिती ऐकली जाते ती नोंदविली जाते. अशा नोंदी, माहीती म्हणजे दुय्यम दर्जाचे साधन होय. दुय्यम स्त्रोत असा आहे ज्यामध्ये प्रत्यक्षदर्शी किंवा सहभागी म्हणजेच ज्या घटनेचे वर्णन करणारे व्यक्ती प्रत्यक्षात उपस्थित नव्हते परंतु ज्याने दुसऱ्या व्यक्तीकडून किंवा स्त्रोतांकडून वर्णन किंवा वर्णन प्राप्त केले.

दुय्यम साधनांचा वापर संशोधक पुढील कारणांसाठी करतो- १) अभ्यास विषयाचे साकल्याने ज्ञान होण्यासाठी व विषयाची प्राथमिक चौकट तयार करण्याची, २) विषयाच्या उपलब्ध माहितीत असलेल्या उणीवांची पूर्तता करण्यासाठी ३) दुय्यम ग्रंथाच्या वाचनामुळे अधिकाधिक संदर्भ मिळण्यास मदत होते ४) विषयाची मांडणी करण्यासाठी

दुय्यम स्त्रोतांचा, या घटनेचा अभ्यास असण्याशी प्रत्यक्ष शारीरिक संबंध नसतात. मजकूर पुस्तके, चरित्रे, विश्वकोश, संदर्भ पुस्तके इत्यादींचा समावेश आहे. हे शक्य आहे की दुय्यम स्त्रोतांमध्ये एका स्त्रोताकडून दुसऱ्या स्त्रोताकडे माहिती पुरविल्यामुळे त्रुटी येऊ शकतात. अशा प्रकारे, जिथे शक्य असेल तेथे संशोधकाने डेटाचे प्राथमिक स्त्रोत वापरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तथापि, यामुळे दुय्यम स्रोतांचे मूल्य कमी होत नाही.

आर्थर मार्विक यांनी म्हटले होते की, " प्राथमिक साधन हा कच्चामाल असून सामान्य वाचकापेक्षा संशोधकाला अधिक मोलाचा असतो. दुय्यम साधन हे मूळ साधनावर आधारलेले असले तरी असे ग्रंथ सुसंगत माहिती देणारे असल्यामुळे बुद्धिमान सामान्य वाचकाला तसेच संशोधकालाही मोलाचे ठरतात. " एखाद्या विषयावर नवे भाष्य, नव्या दृष्टीने स्पष्टीकरण किंवा नवी कारणमीमांसा करणारा ग्रंथ असल्यास दुय्यम साधनांचा उपयोग अधिक प्रमाणात होतो.

प्राथमिक स्त्रोत साहित्य आणि पुरातत्व स्त्रोतांमध्ये विभागले जाऊ शकतात.

## ४.२ प्राथमिक स्रोत - लिखित साधन साहित्यिक/ वाङ्मयीन

लिखित साधनामध्ये समकालीन वाङ्मयाचा समावेश होतो. लिखित साधनाचे प्रकाशित अप्रकाशित साधने असे दोन प्रकार पडतात. वाङ्मय अनेक प्रकारचे असू शकते. उदा. धार्मिक, लौकिक, ललित, इतिवृत्ताच्या स्वरूपाचे, प्रवासवर्णने इ. पुराणे, चरित्र, बखरी, काव्य, नाटक, कथा यांचाही समावेश लिखित साधनामध्ये होतो. जेव्हा लेखनासाठी कागद उपलब्ध नव्हता तेव्हा ताडपत्रे, भूर्जपत्रे, शिला, ताम्रपट यांचाही वापर केला जाई.

कागदाचा शोध लागल्यानंतर वाङ्मयीन साधनांची व्याप्ती वाढली. मध्ययुगीन कालखंडात राजाचे आदेश, तहनामे, कैफियती, खाजगी पत्रे, जमा खर्च, धार्मिक सनदा इ.संबंधीची कागदपत्रे तसेच तवारीख नामे, वंशावळी, मोहिमांची टिपणे, शकावल्या, महजर, करीने, पोवाडे, काव्य, ऐतिहासिक म्हणी इत्यादींचा लिखित साधनात समावेश होतो.

आधुनिक काळात घडलेल्या घटनांच्या चित्रफिती, छायाचित्रे, ध्वनिफिती यांचा पुरावा म्हणून उपयोग केला जातो. सर्वसाधारणपणे अव्वल दर्जाची मानली जाणारी काही समकालीन पूर्णपणे विश्वसनीय असतीलच असे नाही. उदा. आत्मचरित्र हे सामान्यतः अव्वल दर्जाचे मानले जाते परंतु ते स्मृतीच्या आधारे लिहिले गेले असल्यामुळे त्यातील सर्व तपशील सत्य म्हणून स्वीकारणे धोक्याचे ठरते. तसेच वृत्तपत्रांचे आहे, वृत्तपत्रातून समकालीन घटनाचे वृत्त प्रकाशित होत असले तरी इतर वृत्तपत्रात काही प्रमाणात भेद आढळतो.

भूतकाळातील लोक, घटना आणि दैनंदिन जीवनाबद्दल माहिती घेण्यासाठी, शिकण्यासाठी इतिहासकार पुरावा वापरतात. गुप्तहेरांप्रमाणेच इतिहासकार पुराव्यांकडे पाहतात आणि निष्कर्षापर्यंत पोहोचतात. डायरी, पत्रे, जन्म-मृत्यू किंवा लग्नाची प्रमाणपत्रे, करार, राज्यघटना, कायदे, कोर्टाच्या नोंदी, कर रेकॉर्ड, जनगणनाची नोंद, करार, अहवाल कार्ड, वैद्यकीय नोंदी, प्रवासी याद्या, पासपोर्ट, व्हिसा आणि सैन्य भरती किंवा डिस्चार्ज पेपर्स हे प्राथमिक स्त्रोत मानले जाऊ शकते.

**पत्रे -**

समकालीन पत्रांचा उपयोग प्राथमिक साधन म्हणून केला जातो यामध्ये वैयक्तिक पत्रे खाजगी स्वरूपातील व सरकारी स्वरूपातील असतात. कार्यक्रम, भावना किंवा कथांच्या लोकांमधील पत्रव्यवहाराचा एक प्रकार आहे. पत्रे बहुतेकदा वैयक्तिक स्वरूपाची असतात पण ती अधिक औपचारिक देखील असू शकतात. सरकारी आणि खाजगी पत्रे ही समकालीन घटनांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी महत्त्वपूर्ण स्त्रोत आहेत.

**आठवणी -**

समकालीन व्यक्तीने लिहिलेल्या आठवणी प्राथमिक साधन म्हणून वापरता येते. मुघल साम्राज्याचे संस्थापक बाबर यांच्या स्मृतींना बाबरनामा हे नाव देण्यात आले आहे. हे बाबरचे स्वरूप आणि व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित करते. तुजुक-ए-जहांगीरी किंवा तुझुक-ए-जहांगीरी हे मुघल सम्राट जहांगीर (१५६९-१६२७) यांचे आत्मचरित्र आहे. तसेच जहांगीरनामा म्हणूनही संबोधले जाते, तुस्क-ए-जहांगीरी पर्शियन भाषेत लिहिलेले आहे. महात्मा गांधींच्या 'माझे सत्याचे प्रयोग' त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना आणि बालपणापासूनच गांधींच्या चारित्र्य निर्मितीची माहिती देतात. यांचा उपयोग प्राथमिक साधन म्हणून केला जातो.

**कोर्टाचे लेखन:**

न्यायालयीन कागदपत्रांचा उपयोग ही साधनांसाठी केला जातो. परंतु ही साधने योग्य पद्धतीने तपासून पाहावे लागतात कारण कोर्टातील निकाल आपल्या बाजूने लागावा यासाठी खोट्या

साक्षी सुद्धा सादर केलेल्या असतात. ही साधने समकालीन असल्याने महत्त्वपूर्ण असतात. अबुल फजल लिखित ऐन-ए-अकबरीमध्ये सर्व विषयांवरील सर्व विभागांमधील नियम आहेत आणि त्यात काही बाह्य गोष्टींचा समावेश आहे. ऐतिहासिक आणि इतर माहीतीसह त्याच्या साम्राज्याचे हे मौल्यवान आणि बैठकांचे सांख्यिकीय माहीती असणारे साधन आहे. यात मोगल प्रशासन आणि राज्य धोरणांची माहिती देण्यात आली आहे. हे त्यावेळच्या इतिहासाच्या प्रत्येक पैलूचा अंतर्भाव करते. तिसऱ्या खंडात आपल्याला अबुल फजलच्या वंशज आणि चरित्राबद्दल माहिती मिळते.

अब्बास खान सरवाणी यांनी 'तारिक-ए-शेरशाही' लिहिले. ते शेरशहाशी संबंधित होते आणि अकबरच्या कारकिर्दीत ५०० चा मनसबदार म्हणून काम करत होता. हे आत्मकथनाच्या स्वरूपात अधिक आहे. ते मुगल काळातील इंडो-मुस्लिम समाजाचे चित्र देतात. अहमद यादगर तारिक-ए-शाही किंवा तारिक-ए-सलाटिन-ए-अफगीना यांचे लेखक होते. हा भारतातील अफगाण वंशातील शेवटचा राजकुमार होता.

**खाजगी नोंदी**

खाजगी अभिलेखागार विभागाच्या ताब्यात भारतातील सार्वजनिक जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या नामांकित व्यक्तींच्या खासगी कागदपत्रांचा समृद्ध संग्रह आहे. हे कागदपत्रे मुख्यत्वे जगभरातील व्यक्ती आणि संस्थांकडून मिळालेल्या देणग्या आणि भेटवस्तूंच्या माध्यमातून मिळविल्या गेल्या आहेत. सार्वजनिक नोंदींमधील माहितीची पूर्तता करण्यासाठी ते एक महत्त्वपूर्ण स्त्रोत आहेत. अभिलेखामधील काही खास खाजगी कागदपत्रे म्हणजे महात्मा गांधी, राजेंद्र प्रसाद, दादाभाई नौरोजी, पी. डी. टंडन, मौलाना आझाद, मिनु मसानी, सरदार पटेल, के. डी. मालवीय इत्यादीचे हे सर्व खासगी कागदपत्रे नियमानुसार व अटींनुसार उपलब्ध आहेत.

**डायरी:**

डायरी एक प्राथमिक स्त्रोत आहे. लंडनमधील ब्रिटीश ग्रंथालयात 'राज दरम्यान प्रत्यक्षदर्शी खाती डायरी आणि संबंधित नोंदी' या ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या डायरींनी समकालीन विषयांवर चांगले पुरावे दिले आहेत. १८५७ विद्रोहाने भारतात विशेषत: उत्तर आणि मध्यभागी ब्रिटिश सत्ता कशा प्रमाणात हालावली हे ते प्रकट करतात. नागरी सेवा, व्हायसरॉय आणि गव्हर्नर्स यांच्यासह ब्रिटनने जटिल सरकारच्या अधिक जटिल रूढीवादी यंत्रणेत ज्या प्रकारे योगदान दिले त्याबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करणे, हे स्त्रोत साहित्य विद्वानांना ही प्रक्रिया कशी प्राप्त झाली आणि किती यशस्वीरित्या अंमलात आणली गेली याचा अभ्यास करण्यास अनुमती, माहिती देते.

**शासन दस्तऐवज:**

भारतातील तुर्को-अफगाण आणि मोगल शासनाच्या इतिहासाशी संबंधित अधिकृत नोंदी आढळल्या आहेत. या कालावधीसाठी ही सर्वात मूल्यवान आणि विश्वासार्ह स्त्रोत सामग्री आहे. परंतु योग्य देखभाल न केल्यामुळे आणि इतर अनेक कारणामुळे त्या नाहीशा झाल्या आहेत. फॅक्टरी रेकॉर्ड्स, जसे की नावावरून हे सूचित होते, पश्चिमेकडील ईस्ट इंडिया कंपनीच्या उत्तरेकडील सिंध ते मलाबार कोस्टवरील टेलिचेरीपर्यंतच्या व्यावसायिक

आस्थापनांच्या नोंदी आहेत. फॅक्टरीमध्ये कमर्शियल रेसिडेन्सी, इत्यादींचा समावेश होता. फॅक्टरी आणि रेसिडेन्सी रेकॉर्ड्स मुख्यत: कंपनीच्या व्यवसायाचे व्यवहार नोंदवतात, परंतु योगायोगाने देशातील राजकीय घटनांचा संदर्भ घेतात. भारतीय राज्यघटना ही सरकारच्या कागदपत्रांचे उदाहरण आहे.

**वृत्तपत्र लेख:**

वर्तमानपत्रे किंवा मासिके स्थानिक, प्रादेशिक किंवा राष्ट्रीय प्रचलित असू शकतात, म्हणून वर्तमानपत्रातील लेख किती वाचकांपर्यंत पोहोचला असेल आणि लेखात दिलेल्या माहितीसाठी संपादकांचा हेतू कोणता होता हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे. वर्तमानपत्राचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रबोधनात्मक, राजकीय परिणाम कसा झाला याचाही उपयोग होतो.

**ऐतिहासिक कुटुंबांची नोंद आणि खासगी कागदपत्रे:**

महाराष्ट्र राज्य अभिलेखागार साहित्याने, कागदपत्राने समृद्ध आहे. पुष्कळ ऐतिहासिक कुटूंबात त्यांच्या पूर्वजांच्या वेळीचे वर्णन करणारे विपुल कागदपत्रे आहेत. कौटुंबिक आख्यायिका, शाही कारकीर्द, सार्वजनिक व खाजगी पत्रव्यवहार आणि कायदा, दावे आणि कायदेविषयक निर्णय, लेखाची कागदपत्रे आणि पर्शियन भाषेतील व मोडी लिपीतील प्रत्येक वर्णनाची हस्तलिखिते या सर्वांच्या ताब्यात असलेल्या लोकांच्या ताब्यात असलेले राज्य कागदपत्रे अज्ञात घटना असतात. ते जतन करून ठेवलेले असते. ते संशोधक आणि विद्यार्थ्यांना संशोधनासाठी उपलब्ध आहेत.

**मुलाखत:**

एखाद्या घटनेबद्दल किंवा त्या व्यक्तीच्या आयुष्याविषयी आणि निर्णयाबद्दल अधिक माहिती मिळविण्यासाठी एखाद्याची मुलाखत घेतली जाते. मुलाखती एका नंतर एक घेतल्या जाऊ शकतात किंवा त्या पत्रकार परिषद स्वरूपात घेता येतील. ऑडिओ स्वरूपात लेखी रेकॉर्ड तयार करण्यासाठी मुलाखत रेकॉर्ड केली जाऊ शकते आणि नंतर लिप्यंतरण केले जाऊ शकते.

**प्रश्नावली:**

प्रश्नावली हे एक संशोधनसाधन आहे जे प्रतिसाद कर्त्यांकडून माहिती एकत्रित करण्याच्या उद्देशाने प्रश्नांच्या मालिकेचा समावेश करते. प्रश्नावलीमध्ये प्रश्नांचा एक संच असतो. साधारणपणे डेटा गोळा करण्याच्या प्रतिसादकांना हे मेल किंवा पोष्टाने पाठवले जाते. जेव्हा अभ्यासाचे क्षेत्र विस्तृत असेल आणि विषय व्यापक असेल तेव्हा हे काम केले जाते. या पद्धतीत संशोधक स्वत:हून प्रत्यक्ष पद्धतीने माहीती गोळा करत नाही.

**नकाशे आणि फोटो प्रती:**

बॉम्बे प्रेसिडेन्सी व इतर प्रांतांशी संबंधित सुमारे २०,००० जुने नकाशे आहेत. १८२० पासून या प्रांतात सर्व्हे ऑपरेशन जोरदारपणे सुरू झाले होते. बॉम्बे प्रेसिडेन्सी, आसपासच्या भागातील आणि मुंबई बेटाच्या जिल्ह्यांच्या त्या काळापासून आजपर्यंत तयार केलेल्या

नकाशांच्या प्रती या संग्रहात सापडल्या आहेत. बहुतेक नकाशे भारतीय सर्वेक्षण संस्थेने तयार केले आहेत. भारतातील रेल्वे सुरू झाल्यापासून भारतीय रेल्वे लाईन्सच्या योजना या संग्रहात जोडल्या गेल्या आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१. प्राथमिक व दुय्यम साधनातील फरक स्पष्ट करा.

___

___

___

२. प्राथमिक साधने म्हणजे काय?

___

___

___

३. प्राथमिक साधनांच्या प्रकारावर टीप लिहा.

___

___

___

## ४.३ प्राथमिक पुरातत्वीय साधने / अलिखित किंवा भौतिक साधने

भौतिक साधनांना अलिखित किंवा वस्तुरूप साधने म्हटले जाते. भौतिक साधन म्हणजे अशी साधने की आजही आपण तत्कालीन घटनांची साक्ष म्हणून हाताळू शकतो किंवा पाहू शकतो. यातील बहुतांश साधने घटना स्थळाच्या जागेवर असतात. त्यामुळे लिखित किंवा वाङ्मयीन साधनांच्या तुलनेत अधिक विश्वसनीय असतात. भौतिक साधनांनापुरातत्वीय साधनेम्हणूनही ओळखले जाते. ही साधने म्हणजे गतकालीन वाटचालीचा तो प्रत्यक्षदर्शी पुरावा असतो. इतिहासपूर्व व प्रागैतिहासिक काळातील वाटचाल रेखाटण्यासाठी पुरातत्त्वीय साधनेच उपयुक्त ठरतात. सर्वसामान्य समाजाचे चित्र स्पष्ट होण्यासाठी पुरातत्वीय साधनांचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. ही साधने उत्खननात किंवा जमिनीवर, नदीच्या काठी आढळतात. भौतिक साधनांना सामान्यपणे स्मारके, अभिलेख, नाणी, अवशेष, उत्खनने या प्रकारात विभागले जाते. वस्तुरूप साधनात मानवी अथवा प्राण्यांचे अस्थी, अवशेष, मातीची भांडी, खापरे, दैनंदिन वापराच्या वस्तू, नाणी, शिलालेख - ताम्रपट, शिल्पावशेष, स्थापत्य अवशेष, अन्य कलावशेष इ.चा समावेश होतो. या साधनांचा इतिहास लेखनात कसा उपयोग होतो ते आपण पाहू या.

**स्मारके:**

या स्मारकांमध्ये मंदिरे, स्तूप, मठ (विहार), राजवाडे, किल्ले इत्यादींचा समावेश आहे. वैयक्तिक स्मारकांव्यतिरिक्त प्राचीन शहरेही विपुल आहेत. मोहेंजोदारो आणि हडप्पा शहरांमध्ये या प्रकारचे स्त्रोत दिसून येतात. साहित्यिक नोंदी नसतानाही स्मारक इतिहास लेखनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. प्राचीन राजवंशांसारख्या कुशाण आणि पाश्चात्य यांची माहिती या ठिकाणी उत्खनन करून आणि उत्खनन केलेल्या ऐतिहासिक ठिकाणी सापडलेल्या स्मारकांचा अभ्यास करून गोळा केली जाऊ शकते.

स्मारके आणि त्यांचे अवशेष याशिवाय शिल्प, पेंटिंग्ज, कुंभारकाम आणि इतर कलाकृती आपल्याला प्राचीन भारताचा इतिहास आणि संस्कृतीची पुनर्रचना करण्यात मदत करतात. अजिंठाच्या गुंफावरील चित्रे, सांची, भारूत इत्यादीतील बौद्ध स्तूपांवरील प्राण्यांच्या शिल्पे, बुद्धांच्या जीवनातील दृश्ये दर्शवितात आणि जातक कथा दर्शवितात. पल्लव, चोल, चालुक्य आणि पांड्य काळातील दक्षिण भारतीय मंदिरे शिल्पांनी भरलेली आहेत, जी आपल्याला प्राचीन भारतीय शिल्पकार आणि कलाकारांच्या कलात्मक कामगिरी समजून घेण्यात मदत करतात. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक भारताचा इतिहास आणि संस्कृतीची पुनर्रचना करण्यात आपल्याला विविध प्रकारची कलाकृती मदत करतात.

**पेंटिंग्ज:**

गुजरात आणि माळवासारख्या काही प्रदेशांव्यतिरिक्त सुलतानांच्या काळात अनेक सचित्र हस्तलिखिते नव्हती. लघु चित्रकलेची पर्शियन प्रथा प्रथम या प्रादेशिक राज्यकर्त्यांनी सुरू केली होती. जेथे गुजरात व माळवा सारखे प्रदेशातील भारत विविध भागांमध्ये विशेषत: ऑर्थोडॉक्स धार्मिक नेत्यांचा आक्षेप, चित्रकला इस्लामिक मानणाऱ्या, मोगल सम्राटांनी या कलेचे रक्षण केले. चित्रकारांनी युद्ध, शिकार आणि इतर सार्वजनिक उपक्रमांसारख्या नेहमीच्या दृश्यांचे वर्णन करण्याबरोबरच पोर्ट्रेट पेंटिंगमध्येही विशेषता आणण्यास सुरुवात केली. राजस्थानात हिंदू पौराणिक थीम वापरुन अशीच पेंटिंगची शैली विकसित केली गेली.

**नाणी:**

नाणीं या वरील पौराणिक कथा आणि पुतळे इतिहासाला त्या काळातील धार्मिक इतिहासाची पुनर्रचना करण्यास मदत करतात. शक, पहलव आणि कुशाण या परदेशी आक्रमणकर्त्यांचे हळूहळू भारतीयकरण त्यांच्या नाण्यांवरून समजू शकते. या परकीय आक्रमणकर्त्यांनी हिंदू किंवा बौद्ध असे भारतीय धर्म स्वीकारले आणि भारतीय नावेही स्वीकारली. नाणी आपल्याला पुरातन भारतातील प्रजासत्ताक आणि राजेशाही सरकारबद्दल बरीच माहिती पुरवतात. बहुतेक प्राचीन राज्यांची नाणी होती. त्या नाण्यांवर दंतकथा कोरलेली होती. नाणींवरील आख्यायिका इतिहासकारांना त्या काळातील धार्मिक इतिहासाची पुनर्रचना करण्यास मदत करते.

**शिलालेख**

एखाद्या प्रदेशाचा इतिहास लिहिण्यासाठी किंवा पुनर्रचना करण्यास पुरातत्व स्त्रोतांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पुरातत्व स्त्रोताने आपल्या भूतकाळाबद्दल महत्त्वाची सामग्री

पुरविली, जी आपल्याला अन्यथा मिळू शकली नाही. इपिग्राफी आणि न्यूमिसमॅटिक्स ही इतिहासाच्या अभ्यासाची महत्त्वाची शाखा आहे, ज्याने भारताच्या भूतकाळाची समज वाढविली आहे. प्राचीन भारताच्या राजकीय इतिहासाच्या पुनर्बांधणीसाठी शिलालेख खूप मोलाचे आहेत. दगड किंवा धातूंवर कोरलेली ही शिलालेख प्रामाणिक आहेत कारण ते छेडछाड करण्यापासून मुक्त आहेत. शिलालेखांमध्ये विविध विषय आहेत. त्यामध्ये धार्मिक बाबी, राज्यकर्त्यांचे हुकूम, विजयाच्या नोंदी, व्यक्ती किंवा धार्मिक संस्था यांना विविध शासकांनी जमीन विकणे किंवा जमीन दान, कर्तृत्वाचे वर्णन इ. बाबी आहेत.

**अभिलेखीय कागदपत्रे:**

मुंबई आर्काइव्ह्जमध्ये खंड आणि पुस्तकांच्या रूपात छापील रेकॉर्डची चांगली संख्या आहे. जुन्या प्रकाशनांमध्ये छापील ॲब्स्ट्रॅक्ट ऑफ प्रोसिडींग्ज, शासकीय राजपत्रे, विविध विभागांचे अहवाल, कार्यालये, आयोग आणि समित्या, अधिनियम, नियम व शासनाने जारी केलेले आदेश, नागरी याद्या व वेळोवेळी प्रसिद्ध केलेली असंख्य सरकारी प्रकाशने यांचा समावेश आहे. राज्य सरकारच्या प्रत्येक प्रकाशनाच्या तीन प्रती मुंबई अभिलेखागारात संवर्धनासाठी पाठविल्या जातात. सार्वजनिक नोंदी आणि खाजगी पेपर्सच्या मोठ्या प्रमाणाव्यतिरिक्त, राष्ट्रीय अभिलेखागारात ग्रंथालयाचा समृद्ध आणि वाढणारा संग्रह आहे. यात समकालीन प्रकाशित सामग्रीव्यतिरिक्त विविध विषयांवरची काही जुनी आणि दुर्मिळ प्रकाशने आहेत.

आपली प्रगती तपासा

१. प्राथमिक साधन म्हणून पुरातत्त्वीय साधनाचे महत्त्व व प्रकार सांगा.

___

___

___

२. अभिलेखीय साधनांची माहिती सांगा.

___

___

___

## ४.४ दुय्यम वाङ्मयीन स्त्रोत

प्राचीन भारतीय इतिहासाची पुनर्रचना करण्यासाठी वाङ्मयीन स्त्रोतांचे दोन व्यापक प्रकारात वर्गीकरण केले जाऊ शकते १) धार्मिक साहित्य आणि २) धर्मनिरपेक्ष साहित्य.

इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण करण्याच्या दृष्टीने प्राथमिक व दुय्यम असे दोन मुख्य प्रकार साधनांचे करण्यात आले आहेत. यामध्ये प्राथमिक म्हणजे अधिक दर्जेदार व ' दुय्यम ' म्हणजे

कमी दर्जाचे अथवा कमी महत्त्वाची साधने असे नव्हे. इतिहास लेखनाच्या दृष्टिकोनातून प्राथमिक साधनांइतकेच दुय्यम साधनासही महत्त्व आहे. दुय्यम साधनांना ' दुय्यम ' म्हणण्याचे कारण म्हणजे यामध्ये प्रत्यक्षदर्शी कोणीही नसले तरी ज्यांनी घटना पाहिलेली आहे त्याने काही काळाने ती दुसऱ्याला सांगितली आहे व त्यांनी ती लगेचच लिहून काढली आहे. घटना घडून गेल्यानंतर बराच काळ उलटून गेल्यावर स्मृतीच्या आधारे लिखाण केल्यास त्यात चुका होण्याची शक्यता बरीच असते. एखाद्या व्यक्तीची स्मरणशक्ती कितीही चांगली असली तरी केवळ ऐकीव माहितीच्या आधारे केलेल्या लिखाणात ती पूर्णपणे सत्य येण्याची शक्यता कमीच असते. यामुळे अशा साधनांना दुय्यम म्हणतात. खरे म्हणजे प्राथमिक साधनांवरच दुय्यम साधने अवलंबून असतात, त्यामुळे दर्जाच्या दृष्टिकोनातून ती दुय्यम ठरत असली तरी कधी कधी त्याचीही विश्वासार्हता प्राथमिक साधनांएवढीच असते. घटना घडून गेल्यानंतरच्या माहितीवर दुय्यम साधने अवलंबून असतात. मूळ साधनांच्या आधारे लिहिण्यात येणारे संशोधनपर ग्रंथ, बखरी, शकावल्या, पोवाडे, करीने इत्यादींना दुय्यम साधने म्हटले जाते. या साधनांना दुय्यम साधने म्हणण्याची प्रमुख तीन कारणे आहेत.

१) अशा साधनांमधून संबंधित लेखकाचे स्वतःचे मत डोकावण्याची शक्यता असते.

२) इतिहासकार मूळ साधनांचा अर्थ आपल्या मतानुसार वा विचारसरणीनुसार लावण्याची शक्यता असते आणि

३) इ.एच. कार यांच्या म्हणण्यानुसार, ' घटिते स्वतः बोलत नाहीत, तर त्यांना बोलते करणारा इतिहासकार असतो. या प्रमुख कारणांमुळे अशा साधनांना दुय्यमत्व प्राप्त होते. उदा. कालिदासाचे मालविकाग्निमित्र ' हे नाटक घटना घडून गेल्यानंतर साधारणतः सहा शतकांनी लिहिलेले आहे. असे असले तरी, दुय्यम साधने सामान्य अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाची असतात कारण दुय्यम साधनांचे स्वरूप हे तुलनात्मक दृष्टिकोनातून कमी विश्वासार्ह असले तरी त्यामध्ये घटनांची सविस्तर माहिती दिलेली असते. प्राथमिक साधनांची विश्वासार्हता पडताळून पाहण्यासाठीही दुय्यम साधनांचा उपयोग केला जातो. दर्जाच्या दृष्टीने साधनांना दुय्यम संबोधले जात असले तरी कधी कधी या साधनांची विश्वासार्हता प्राथमिक साधनांएवढीच असते. सामान्य वाचकांना असे दुय्यम ग्रंथ मूळ साधनांपेक्षा अधिक उपयुक्त वाटतात.

**वंशावळी:**

मध्ययुगीन काळात नामांकित व्यक्तींच्या कुटूंबाची वंशावळ तयार करण्याची परंपरा होती. अशा वंशावळीत शौर्य, सैन्य मोहीम किंवा कुटुंबातील वेगवेगळ्या सदस्यांच्या इतर कृत्यांचा उल्लेख असत. अशी माहिती सामान्यत: अधिकृत नोंदींवर आधारित असते आणि म्हणूनच इतिहासाचे स्रोत म्हणून उपयुक्त आहे.

**पोवाडे आणि कविता:**

पोवाडा हा एक प्रकारचा नृत्य आहे जो एका रोमांचक शैलीने लिहिलेला आहे आणि ऐतिहासिक घटना प्रेरणादायक मार्गाने वर्णन करतो. पोवाड्याचे संगीतकार आणि गायक शाहीर म्हणून ओळखले जातात. प्रारंभीचे पोवाडे मुख्यत: या बॅलडमध्ये साजरे केलेल्या महान कार्यक्रमांच्या प्रत्यक्षदर्शींनी बनविला आहे. सर्वात अगोदरचा उल्लेखनीय पोवाडा म्हणजे अफगाल खानचा वध (द किलिंग ऑफ अफझल खान) (१६५९) आग्निदास याने बनविला. ज्याने शिवाजीची अफजल खानशी झालेल्या चकमकीची नोंद केली. त्यानंतरचा उल्लेखनीय पोवाडा म्हणजे तुलसीदास यांचा तानाजी मालुसरे, ज्यामध्ये तानाजींनी सिंहगड किल्ला ताब्यात घेतला याचा अहवाल दिला आहे.

**चरित्र :**

प्राचीन भारतीयांमधील काही लेखकांनी त्यांच्या साहित्यिक कृतींचा विषय म्हणून आपल्या शाही संरक्षकांचे जीवन स्वीकारले. धर्मनिरपेक्ष साहित्याच्या या श्रेणीमध्ये गौतम बुद्धांच्या जीवनाची आणि शिकवणुकीचा लेखाजोखा देणारी अश्वघोषाने लिहिलेल्या बुद्धचरिताचा समावेश आहे. संस्कृत गद्यातील श्रेष्ठ गुरु बानभट्ट यांनी हर्षचरित लिहिले. सल्तनत काळात फिरोजशाह तुघलक यांनी फतुहात-ए-फिरोज साही हे त्यांचे चरित्र लिहिले. सुलतान महमूद आणि तैमूर यांची स्वतःची चरित्रे होती. आणि चांद बारदोई त्यांच्या 'पृथ्वीराज रासो' या गीतात्मक गाण्यामुळे प्रसिद्ध झाले. मुघल भारतातील सर्वात महत्वाच्या आठवणी आणि चरित्रे म्हणजे बाबर आणि जहांगीर यांच्या स्मृती आणि गुलबदन बेगम यांचे हुमायूंचे चरित्र रेखाटन होय.

**वर्णनात्मक लेखन:**

**तारीख-ए-हिंद :- (अल-बेरुनी)**

अल-बेरुनी भारतात येऊन गझनीच्या महमूदच्या अधीन राहिले. ते अरबी, पर्शियन भाषेत चांगले परिचित होते आणि औषध, तर्कशास्त्र, गणित, तत्वज्ञान, ब्रह्मज्ञान आणि धर्मशास्त्रात त्यांची उत्कृष्ट बुद्धिमत्ता होती. भारतात वास्तव्याच्या वेळी त्यांनी संस्कृत भाषा शिकले आणि हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्यांनी दोन संस्कृत ग्रंथाचे अरबी भाषेत भाषांतरही केले. त्याच्या सर्वात महत्त्वाचे साहित्य योगदान म्हणजे तारिख-उल-हिंद होय. महान अचूकता आणि विद्वत्तापूर्ण सादरीकरण उत्कृष्ट अरबी लिहिले जात. ११ व्या शतकात हिंदू साहित्य, विज्ञान आणि धर्म खाते यावर लेखन केले. गझनीच्या भारत हल्ल्याच्या महमूदच्या वेळीचा या पुस्तकात भारताचा लेखाजोखा देण्यात आला आहे.

**इतर लेखन -**

सल्तनत आणि मोगल काळाविषयी बऱ्याच प्रमाणात लेखन आहे. मिन्हज-उस-सिराजचा "ताबाकत-ए-नसिरी" हा एक महत्त्वाचा समकालीन स्रोत आहे. जो महंमद घोरीच्या विजयाचा आणि १२६० पर्यंत मिंज-उस-सिराज पर्यंतचा भारतातील तुर्की साम्राज्याचा इतिहासाचा माहिती देणारा महत्त्वपूर्ण समकालीन स्त्रोत आहे. सुलतान नासिर-उद-दीन महमूद यांचे नेतृत्व तेव्हा होते. " तारिख-ए-अलई किंवा खजैन-उल-फुतुह" पर्शियन भाषेत अमीर खुस्राने

लिहिले होते. दिल्लीच्या कैकुबाद, जलाल-उद-दिन खिलजी, अलाउद्दीन खिलजी अशा अनेक सुलतानांच्या संरक्षणाचा त्यांना आनंद झाला. कुतुब-उद-दिन मुबारक शाह खिलजी आणि घियास-उद-दिन तुगलक. अमीर खुसराव हे गद्य आणि कवितांचे प्रख्यात लेखक होते. १२९० मध्ये ते कवी पुरस्कार विजेते होते. खजैन-उल-फुतुह हे तारिख-ए-अलई म्हणून ओळखले जात. हा अलाउद्दीन खिलजीच्या कारकिर्दीच्या पहिल्या सोळा वर्षांचा दरबार आहे. यामध्ये मलिक काफूर डेक्कन मोहिमेचा तपशील देण्यात आला आहे की, जलाल-उद-दीनची हत्या किंवा मंगोल लोकांनी सुलतानच्या पराभवाचा उल्लेख केला नाही. अमीर खुसराव यांच्या नावावर इतरही अनेक लेखन आहे. यामध्ये १२९१ मध्ये लिहिलेल्या "मिफ्ताह-उल-फुतुह" जलाल-उद-खिन खिलजीच्या सैन्य मोहिमेचे वर्णन आहे तुघलकनामा यामध्ये घियासुद्दीन तुघलकच्या राज्यारोहनासंदर्भातील घटनांचा मार्ग सापडतो.

तारिख-ए-फिरोजशाही जियाउद्दीन बरनी यांनी लिहिली होती. तारिख-ए-फिरोजशाही १३५८ च्या सुमारास लिहिले गेले होते. त्यात आपल्याला बलबनपासून मुहम्मद-बिन तुगलक आणि दिल्ली फिरोजशहाच्या कारकिर्दीच्या पहिल्या सहा वर्षांच्या दिल्लीच्या सुलतानांबद्दल माहिती देण्यात आली आहे. तारखांविषयी तो फारसा अचूक नव्हता. त्यांनी घटनांच्या कालक्रमानुसार वर्णन केले नाही. झिया-उद-दिन बरनी यांनी लिहिलेले फतवा-ए-जहांदारी १४ व्या शतकाच्या सुरूवातीस रचले गेले होते. सरकारच्या धोरणांवर आणि मुस्लिम राजाने पाळली पाहिजे अशी आदर्श आचारसंहिता यावर बरनी यांनी आपले विचार लिहिले होते.

शम-ए-सिराज आफिफ यांनी लिहिलेले तारिख-ए-फिरोज शाही बहुधा पंधराव्या शतकाच्या पहिल्या दशकात रचले गेले होते. लेखक सुलतान फिरोजशहा यांचे आवडते होते. त्यांनी सुलतानाच्या दीर्घ कारकिर्दीचा इतिहास वर्णन केला आहे. या काळातील संस्कृतीबद्दलही त्यांनी लिहिले आहे. सुलतान फिरोज तुघलक यांच्या इतिहासासाठी त्याच्या लेखाला खूप महत्त्व आहे.

अब्दुल कादिर बदायूनी यांनी मुन्ताख-उल-तवारीख किंवा तारिक-ए-बदायूनी लिहिले होते. पहिला खंड बाबर आणि हुमायूंच्या कारभाराबद्दल आहे. मुंतखब-उल-लुबाब हा ग्रंथ मुहम्मद हाशिम उर्फखाफी खान यांनी लिहिले होते. इतिहासाच्या लेखनावर बंदी असल्याने खाफी खानने ते गुप्तपणे लिहिले. बाबरच्या कारकिर्दीपासून इ. स. १७३३ पर्यंतच्या मोगलांचा प्रारंभ होण्याचा हा संपूर्ण इतिहास आहे. औरंगजेबाच्या कारभाराच्या सर्व बाबींचा त्यांनी पाहिल्या होत्या.

### नियतकालिके आणि वर्तमानपत्रे

समकालीन नियतकालिके आणि वर्तमानपत्र आपल्याला सामाजिक, राजकीय स्थितीबद्दल विविध प्रकारची माहिती देतात. बॉम्बे क्रॉनिकल (१८२५ ते १९५९)), बॉम्बे कुरियर (१७९७ ते १८४६), बॉम्बे टेलिग्राफ आणि कुरियर (१८४७ ते१८६१), बॉम्बे टाईम्स (१८३८ ते१८५९), बॉम्बे गॅझेट (१८०९ ते १९१४), बॉम्बे दर्पण (मराठी) (१८३२ आणि १८३४), मराठा (१९१३ ते १९२५), पूना ऑब्झर्व्हर (१८५२ - ५३, १८६१-६२, १८७६-१९१५)), केसरी (मराठी) (१९०० ते १९३१, १९६२ ते१९७३), नवजीवन (१९१९ ते १९३२), यंग इंडिया (१९१५ ते १९३२), इंडियन एक्सप्रेस (१९५५ ते डिसेंबर

२००८), ब्लिट्ज (१९५७ ते १९६४), फायनान्शियल एक्सप्रेस (१९६१ ते १९६४) लंडन टाइम्स, टाईम्स ऑफ इंडिया (१८६१ अप-टू-डेट), महाराष्ट्र टाइम्स (मराठी) (१९६२ अप-टू-डेट), लोकसत्ता (मराठी) (१९६० ते डिसेंबर २००८), सकाळ (मराठी) (१९६५ ते१९६८) आणि बऱ्याच समकालीन नियतकालिक जसे एशियाटिक जर्नल एशियाटिक जर्नल न्यू सिरीज, बंगाल ऑबिचुअरी (कलकत्ता, १८४८) बंगाल आणि आग्रा प्रेसीडेंसीच्या विविध भागांमधून स्मारकांच्या शिलालेखांचे संकलन. १८ व्या शतकापासून ते १८४८ च्या सुरुवातीच्या काळातील ब्रिटिश भारतातील नामवंत व्यक्तींच्या चरित्रात्मक स्केच आणि स्मृतींचा देखील यात समावेश आहे.

**जनगणना अहवाल**

जनगणना अहवाल (१८७१ नंतर) लोकसंख्याशास्त्रीय अभ्यासाचे एक मौल्यवान आणि मूलभूत स्त्रोत आहेत आणि त्यात लोकसंख्या, जाती, जमाती, व्यवसाय इत्यादींचा अभ्यासक आणि इतर वापरकर्त्यांच्या वापरासाठी माहीती (डेटा) आहे.

## ४.५ मौखिक साधने (स्त्रोत)

तोंडी इतिहास म्हणजे त्यांच्या स्वत: च्या शब्दातले अकाउंट्स आणि पूर्वीचे स्पष्टीकरण संग्रह. एखाद्या व्यक्तीच्या थेट भावना किंवा ती ज्या घटनांमध्ये सहभागी होती त्याबद्दल मते नोंदवतात. मौखिक इतिहास अशा महत्त्वपूर्ण घटनांबद्दल माहिती प्रदान करते ज्यात अन्यत्र लेखी किंवा संग्रह अभिलेखांमध्ये कागदपत्रांची कमतरता असू शकते. तोंडी इतिहासाची साधने मुलाखतींद्वारे प्राप्त केल्या जातात आणि ऑडिओ आणि व्हिडिओ रेकॉर्डिंगवर, चित्रपटांमध्ये आणि लेखी उताऱ्यामध्ये जतन केल्या जातात. मौखिक इतिहासाचा प्राथमिक स्त्रोत म्हणून उपयोग होतो. स्त्रोत सामग्री म्हणून त्यांचे कोणते फायदे आहेत. बऱ्याच वेळा तोंडी इतिहासात अशा व्यक्तींचे अनुभव नोंदवले जातात जे अशक्य आहेत किंवा ज्यांना वेळ नव्हता त्यांची लेखी खाती, कागदपत्रे नाहीत. मुलाखतदाराचे प्रश्न सहसा उत्स्फूर्तता आणि प्रेमळपणा तयार करतात जे कदाचित वैयक्तिकरित्या लिहिलेल्या खात्यात नसतील. शिवाय, रेकॉर्ड केलेल्या मुलाखतीत, माहिती देणाऱ्याचा आवाज इतर अद्वितीय स्त्रोत मध्ये पकडला जाऊ शकत नाही अशा अद्वितीय भाषणाची वैशिष्ट्ये आणि टोन प्रकट करू शकतो. तोंडी इतिहास त्याच्या विश्लेषणामधील आव्हाने सादर करतो. माहिती देणाऱ्याच्या माहितीची विश्वासार्हता प्रश्न असू शकते. चुकीच्या किंवा अपूर्ण रेकॉर्डचा परिणाम म्हणून काही विषयांवर माहिती देण्यास माहिती देणारे कदाचित टाळाटाळ करतात. सर्व स्त्रोतांप्रमाणेच, मौखिक इतिहासाचे मूल्यमापन इतर दस्तऐवजीकरणासह करणे आवश्यक आहे की ते अपवादात्मक किंवा पूर्वी स्थापित असलेल्या अनुरुप माहिती सादर करतात की नाही.

**आपली प्रगती तपासा**

१. दुय्यम साहित्यिक साधने म्हणजे काय?

_______________________________________________

_______________________________________________

२. इतिहासातील साधन म्हणून वर्णनात्मक लिखाणावर चर्चा करा.

३. मौखिक स्त्रोत म्हणजे काय?

## ४.६ डिजिटल स्त्रोत

डिजिटलायझेशनमुळे ग्रंथालये, अभिलेखागार, ऐतिहासिक संस्था, संग्रहालये आणि व्यक्तींनी त्यांचे संग्रह जगाबरोबर सहजपणे सामायिक (share) करणे शक्य केले आहे. आज संशोधकांकडे वर्णनात्मक डेटा असलेल्या प्राथमिक स्त्रोत सामग्रीच्या प्रतिमांवर अभूतपूर्व प्रवेश आहे, जो प्री-डिजिटल युगात केवळ अशाच लोकांसाठी उपलब्ध होता ज्यांना वैयक्तिकरित्या एखाद्या संग्रहात भेट दिली जाऊ शकते.

### १) इंटरनेट संग्रहणे (Archives)

वेब संग्रहण(Archives)सामाजिक वैज्ञानिक आणि डिजिटल मानव्यविदया अभ्यासकांना डेटा स्त्रोत प्रदान करते. जे ऐतिहासिक घटनेच्या संपत्तीचा अभ्यास सक्षम करते. वर्ल्ड वाइड वेबचा इतिहास रेकॉर्ड करण्याचा सर्वात उल्लेखनीय प्रयत्नांपैकी एक म्हणजे इंटरनेट आर्काइव्ह (आयए) प्रकल्प, जो जगातील संग्रहित डेटाचा सर्वात मोठा रेपॉजिटरी ठेवतो. संग्रहित डेटाची गुणवत्ता आणि एकाच वेबसाइटच्या प्रत्येक रेकॉर्डची पूर्णता समजून घेणे ही अभ्यासू संशोधनासाठी केंद्रीय समस्या आहे आणि अद्याप डिजिटल आर्काइव्हजच्या शोधाची कोणतीही मानक नोंद नाही. खरं तर, आजकालच्या नोंदी अगदी अचूक असल्या तरी, वेळोवेळी संग्रहित केल्यामुळे संग्रहित वेब सामग्री खराब होते. वेब आर्काइव्ह्ज फॉर हिस्टोरिकल रिसर्च (डब्ल्यूएएचआर) गटाचे इतिहास आणि वेब डेटा संग्रहातून डिजिटल स्त्रोत शोधण्यासाठी आणि स्पष्टीकरण देण्यासाठी इतिहासकारांना आवश्यक साधने प्रदान करण्यासाठी मोठा डेटा जोडण्याचे उद्दीष्ट आहे. आमचे संशोधन दोन्ही वेब इतिहासावर लक्ष केंद्रित करते - वेब अभिलेखामध्ये प्रतिबिंबित केलेल्या अलीकडील काळाबद्दल लिहितो - तसेच या रेपॉजिटरीज समजून घेण्यासाठी पद्धतीनुसार दृष्टिकोन असतो.

### २) शब्द भंडार

जगभरात १०,००० ग्रंथालयांमधून पुस्तके, डीव्हीडी, सीडी आणि लेखांसह माहीती भेटते. आपणास वर्ल्डकेसच्या साधनांसह सर्वात जवळचे ग्रंथालय देखील सापडेल.

### ३) गूगल बुक्स

गूगल बुक्स (यापूर्वी गुगल बुक सर्च आणि गुगल प्रिंट म्हणून ओळखले जाणारे आणि त्याच्या कोडनेम प्रोजेक्ट ओशनद्वारेगूगल इन्क.)ची एक सेवा आहे जी Google ने स्कॅन केलेल्या पुस्तके आणि मासिकेंचा संपूर्ण मजकूर शोधूनऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन (ओसीआर) वापरून मजकूरात रूपांतरित केली, पुस्तके एकतर Google Book Partner प्रोग्रामद्वारे किंवा Google च्या लायब्ररी भागीदारांद्वारे, लायब्ररी प्रोजेक्टच्या माध्यमातून पुस्तके प्रकाशक आणि लेखकांद्वारे उपलब्ध केली जातात. याव्यतिरिक्त, Google ने त्यांचे संग्रहण डिजीटल करण्यासाठी अनेक मासिक प्रकाशकांसह भागीदारी केली आहे.

### ४) प्राचीन भारत - ब्रिटीश संग्रहालय

ब्रिटीश संग्रहालयाच्या ऑनलाइन ऑफरर्स प्रभावी आहेत. प्राचीन सभ्यता वेबसाइट्स काही उल्लेखनीय जागतिक सभ्यतांच्या उपलब्धींवर प्रकाश टाकतात आणि मानवी विकासाच्या क्रॉस-सांस्कृतिक थीमची एक्सप्लोर करतात. ब्रिटीश संग्रहालयाच्या संग्रहातील ॲनिमेशन, थ्रीडी मॉडेल्स आणि ऑब्जेक्ट्स वापरुन प्राचीन लोकांचे लोक-संस्कृती, विश्वास आणि इतिहास जाणून घेतला जातो.

### ५) प्राचीन जागतिक संस्कृतींचा शोध लावणे: भारत

काही दुवे तुटलेले असले तरी प्राचीन भारताची आणखी एक चांगली ओळख आहे. सर्वात मनोरंजक वैशिष्ट्ये म्हणजे “भगवद्गीतेचा ऐतिहासिक संदर्भ आणि भारतीय धार्मिक मतांशी त्याचा संबंध,” आणि भगवद्गीतेचा ऑनलाइन अनुवाद. आपणास हरारप्पाच्या बऱ्यापैकी प्रतिमा सापडतील.

### ६) प्राचीन भारतातील दैनिक जीवन

या लोकप्रिय साइटवर उपलब्ध असंख्य धडे योजना आणि संसाधने श्री डॉन आणि इतर योगदानकर्त्यांनी विकसित केल्या आहेत. रहस्यमय सिंधू सभ्यता ३०००-१५०० बीसीई, आर्य सभ्यता दैनिक जीवन १५००-५०० बीसीई, वैदिक कालखंड १५००-१००० बीसीई, महाकाव्य कालावधी १००० - ५०० बीसीई, आणि साम्राज्यांचे डेली लाइफ ५०० बीसीई -७०० सी.ई. आहेत

### ऑडिओ व्हिज्युअल स्रोत

ऑडिओ रेकॉर्डमध्ये उत्कृष्ट व्यक्तिमत्त्वे छायाचित्रे, चित्रपट, व्हिडिओ, पेंटिंग्ज, रेखाचित्रे, व्यंगचित्र, प्रिंट्स, डिझाईन्स आणि शिल्पकला आणि आर्किटेक्चर यासारख्या त्रि-आयामी कलांची भाषणे समाविष्ट आहेत आणि ललित कला किंवा माहितीपट रेकॉर्ड म्हणून वर्गीकृत

केल्या जाऊ शकतात. काही दृश्य संसाधने ही एकप्रकारची असतात तर काहींची पुनरुत्पादने (पुस्तके आणि मासिकांमधील मुद्रणे किंवा चित्रे यासारखी) असतात.

**चित्रपट**

कथा इतिहासापासून दूर गेल्यावर सामाजिक वास्तवाचे वर्णन करणाऱ्या प्रायोगिक चित्रपटाच्या दिशेने आपण सहजपणे अनुकूल दृष्टीकोन स्वीकारू शकतो. उदाहरणार्थ प्रणालीगत पद्धतशीर शोषण, अंडरवर्ल्ड, वेतन गुलामी, महिलांचा भावनिक आघात किंवा स्थलांतरित कामगार आणि बेरोजगार यांच्या समस्या यावर प्रकाश टाकणारे चित्रपट इतिहासाचे काल्पनिक कथा बनवण्याची गरज नाही - हेच स्टोअर हिस्ट्री कोणत्याही परिस्थितीत बनलेले आहे. त्यांनी लिहिलेल्या इतिहासाकडे दुर्लक्ष करतात किंवा व्यक्त करू शकत नाहीत अशा बऱ्याच भावनांकडे आपले लक्ष वेधून घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, श्याम बेनेगल यांच्या 'अंकुर' सारखा चित्रपट दक्षिण भारतातील ग्रामीण भागातील सरंजामशाही आणि सादरीकरणातील सामाजिक-सांस्कृतिक यावर लक्ष केंद्रित करणारी एकेकाळी ऐतिहासिक आहे. गोविंद निहलानींच्या 'आक्रोश' विषयीही हेच आहे, जे भारतातील सत्ताधारी आणि त्यांच्या एजंटांद्वारे आदिवासींचे शोषण अधोरेखित करते.

**आपली प्रगती तपासा**

१. डीजीटल स्त्रोत म्हणजे काय? व त्याचे प्रकार सांगा

---

## ४.७ सारांश

मानवाच्या प्रगतीच्या प्रवासात बहुविध साधने निर्माण झाली. इतिहासाचे सुसंगतवार लेखन करण्यासाठी साधनांची आवश्यकता आहे. ही साधने बहुविध असून त्यांचे स्वरूप परस्परांपासून भिन्न आहे. तसेच ही साधने केवळ इतिहास समाजावा म्हणून निर्माण केली गेली नाहीत तर त्यांचा हेतू अन्य होता; परंतु या उपलब्ध साधनांच्या मदतीनेच आपणास आपला इतिहास लेखनाचा हेतू साध्य करता येतो. मानवी इतिहासाचा आढावा घेणे यासाठीच साधनांची आवश्यकता असते. कागदपत्रे अथवा संदर्भसाधने यांच्याशिवाय इतिहास एक परीकथा ठरेल. गतकाळातील घटना वर्तमानात सांगतांना त्यास संदर्भ किंवा आधाराची गरज आहे. काळानुरूप साधने बदलली तरी साधनांचे महत्त्व अबाधितच आहे. भौतिक साधनांच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास शिलालेख, मूर्ती, नाणी, उत्खननातील वस्तू यांची विश्वासार्हता १०० टक्के असते. तथापि त्यांची कालसापेक्षता ठरविणे हा वादाचा मुद्दा असतो. याउलट लिखित साधनांचे महत्त्व हे त्यातील वस्तुनिष्ठतेवर अवलंबून असते. बौद्धिक पातळीवर साधनांची चिकित्सा करून इतिहास लिहिण्याचा विचार केला तर त्यातून स्पष्ट होणारा इतिहास हा वस्तुस्थितीतील विचारांच्या जवळचा ठरणारा आहे. इतिहासकाराची बैठक जर विचार प्रधान नसेल तर इतिहासाच्या माध्यमातून उमटले जाणारे चित्र तितकेसे प्रभावी असणार नाही.

काळाच्या ओघात नवनवीन साधने उपलब्ध होत आहे. चित्रफीती, ध्वनिफीती, छायाचित्रे यांचाही वापर केला जातो. लोकवाङमयाचा आधार सुध्दा इतिहास लेखनात काळजीपूर्वक घेतला जातो. डिजीटल साधने, ई - साधने वापरली जातात.

## ४.८ प्रश्न

१) ऐतिहासिक स्त्रोतांचे स्वरूप व प्रकार यांचे वर्णन करा.

२) ऐतिहासिक स्त्रोतांचे प्रकार काय आहेत? त्याचे स्वरूप समजावून सांगा.

३) दुय्यम साहित्यिक स्त्रोतांच्या महत्त्वविषयी चर्चा करा

## ४.९ संदर्भ

१) गॅराघन जी. एस., गाइड टू हिस्टोरिकल मेथड, न्यूयॉर्क, फोर्ड हॅम युनिव्हर्सिटी प्रेस, १९९६.

२) गॉटस्टेक, एल., अंडरस्टँडिंग हिस्ट्री, न्यूयॉर्क, अल्फ्रेड ए. नॉफ, १९५१.

३) मॅकमिलन जे.एच. आणि शुमंदर एस., रिसर्च इन एज्युकेशन: अ कन्सप्च्युअल इंत्रोडक्शन बोस्टन एमए: लिटल ब्राउन आणि कंपनी, १९८४.

४) शेफर आर.जे., गाईड तू हिस्टोरिकल मेथड, इलियन्स: डोर्सी प्रेस, १९७४.

५) शांता कोठेकर, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, तिसरी आवृत्ती, २०११.

६) श्रीनिवास सातभाई, इतिहास लेखन शास्त्र, विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११.

७) प्रभाकर देव, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९७.

८) सरदेसाई बी. एन., इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४.

❄❄❄❄❄❄❄

# ५

# साधनांची सत्यता आणि विश्वसनीयता

**घटक रचना**

५.१ उद्दिष्टे
५.२ प्रस्तावना
५.३ साधनांची सत्यता पडताळणी (बाह्यांग परीक्षण)
५.४ साधनांची विश्वसनीयता तपासणे (अंतरंग परीक्षण)
५.४.१ सकारात्मक परीक्षण
५.४.२ नकारात्मक परीक्षण
५.४.३ लेखकाचा प्रामाणिकपणा
५.४.४ लिखाणातील चुकांच्या कारणांचा शोध
५.५ सारांश
५.६ प्रश्न
५.७ संदर्भ

## ५.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर  विद्यार्थ्यांना खालील गोष्टी लक्षात येतील.

१) प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहासासाठी स्त्रोतांचे स्वरूप आणि प्रकार समजून घ्या

२) प्राचीन भारतीय इतिहासाची प्राथमिक व दुय्यम स्त्रोत समजावून सांगा

३) ऐतिहासिक स्त्रोतांचे विविध प्रकार सांगा.

## ५.२ प्रस्तावना

ऐतिहासिक संशोधन ही एक शास्त्रीय पद्धत आहे. संशोधनाच्या विषयनिवडीपासून ते अहवाल लेखन या पायरीपर्यंत पद्धतशीर शास्त्रीय पद्धतीने संशोधन प्रक्रिया पार पाडावी लागते. यासंपूर्ण प्रक्रियेतील सांधनांच्या संकलन करून वर्गीकरण केल्यानंतरचा अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणजे "साधनांची सत्यासत्यता व विश्वसनीयता तपासणे. या दोन टप्प्यांशिवाय संशोधन पूर्णपणे अपूर्ण आहे. संशोधित केलेल्या तथ्यांची त्याच्या खरेपणाबाबत कोणतिही हमी देता येणार नाही.  इतिहास संशोधकाला गतकालीन लिखित साधनांचा वापर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करावयाचा असतो. त्यामुळे ऐतिहासिक लिखित सामुग्री कोठे उपलब्ध असेल याचा शोध संशोधकाला प्रथम घ्यावा लागतो. केवळ ऐतिहासिक माहितीच्या आधारे इतिहासाला आकार येत नाही हे जरी सत्य असले तरी त्या खेरीजही इतिहासग्रंथाची इमारत उभी होत नाही हे ही तितकेच सत्य आहे.

मूळ ऐतिहासिक सामुग्रीच्या संकलनानंतरचा दुसरा महत्त्वाचा टप्पा म्हणजे मूळ साधनांची सत्यासत्यता पडताळून पाहणे हा होय.NO DOCUMENT NO HISTORY या इतिहास संशोधनातील सिद्धांताप्रमाणे इतिहास हा संपूर्णपणे उपलबध होण्याऱ्या कागदपत्रांवर अवलंबून आहे. गतकाळात काय घडले, कसे घडले ही माहिती देण्याचे काम मूळ कागदपत्रे करतात.गतकालीन सापडलेल्या कागदपत्रांची घटनेसंदर्भात शहनिशा करणे अथवा त्यांची खातरजमा करणे महत्वाचे असते. इतिहास म्हणजे गतकाळाची कपोलकल्पित कथा नव्हे, तर जे प्रत्यक्ष घडले त्याचे निवेदन इतिहासलेखात अपेक्षित असते. परंतु त्यातून मिळणाऱ्या माहितीचे परीक्षण आवश्यक असते. वर्तमानकाळात घडणाऱ्या घटनांच्या वर्णनात खऱ्याखोट्याची जशी सरमिसळ झालेली अनेकदा आढळते तशीच ती गतकाळाची माहिती देणाऱ्या मूळ कागदपत्रांत झालेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून ती मूळ साधने तत्कालीन आहेत की नाही. आणि त्यातून मिळणारी माहिती विश्वासार्ह आहे की नाही याची खातरजमा करून घेणे निकडीचे ठरते. माहितीच्या सत्यतेविषयी पूर्ण खात्री पटल्याखेरीज त्याचा वापर ऐतिहासिक पुरावा म्हणून करता येत नाही.

ऐतिहासिक कागदपत्रांच्या परीक्षणाचा टप्पा चिकित्सात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा असतो. ह्या टप्प्याच्या दरम्यान संशोधकाची भूमिका तपासनीसाची असते. ज्याप्रमाणे गुप्तहेर खात्यातील तपासनीस डोळे व कान उघडेठेऊन पडलेल्या घटनेचा सूक्ष्मपणे तपास करतो, तसेच काम यावेळी संशोधकाला करावयाचे असते. यासाठी त्याला कुशाग्र, तल्लख बुद्धी, नीरक्षीर विवेक आणि कायम शंकेखोर वृत्ती असावी लागते. ज्या घटना घडल्या आणि जशा घडल्या असे ऐकतो अगर वाचतो, त्या खरोखर घडल्या का? आणि जसे वाचतो तशाच घडल्या का? याची शहानिशा करणे अगत्याचे असते; कारण विश्वासार्हतेच्या निकषावर पारखून खऱ्या ठरलेल्या माहितीलाच पुराव्याचे स्वरूप प्राप्त होते. व त्याचा उपयोग इतिहास लेखनात करता येतो. घटिते (facts) हा इतिहासलेखनाचा मूळ आधार असतो. या संदर्भात "घटनानिश्चिती हा परीक्षणाचा मुख्य उद्देश असतो, कारण पुढील सर्व प्रक्रियांचा मूळ आधार ह्या परिक्षित घटना असतात." हे हॉकेट यांचे विधान ह्या महत्त्वाच्या मुद्यावर नेमके बोट ठेवणारे आहे.

संकलित कागदपत्रांतील माहिती पुराव्यादाखल वापरता येईल की नाही याची निश्चिती करण्यासाठी संशोधकाला त्यावर परीक्षणाची प्रक्रिया करावी लागते. विश्वसनीयता निर्धारित करण्यासाठी कागदपत्रांवर दोन प्रकारचे संस्कार करावे लागतात. ते म्हणजे कागदपत्रांचे बाह्यांग परीक्षण आणि त्यांचे अंतरंग परीक्षण हे होत. यालाच इंग्रजीत अनुक्रमे heuristics आणि hermeneutics असे म्हणतात.

## ५.३ साधनांची सत्यता पडताळणी (बाह्यांग परीक्षण)

साधनांची सत्यता पडताळणे याला बाह्यांग परीक्षण देखील म्हणतात. बाह्यांग परीक्षणाला इंग्रजीत ह्युरिस्टिकस असे म्हणतात. ही कागदपत्रांच्या तपासणीची प्राथमिक प्रक्रिया होय. ऐतिहासिक कागदपत्रे हाती आल्यानंतर त्यांची सत्यता पारखून घेण्यासाठी सुरुवातीला त्या कागदपत्राविषयी स्वतःलाच काही प्रश्न विचारावे लागतात. त्या कागदपत्राच्या खरेपणाविषयी शंका उपस्थित करून तपासणीला प्रारंभ करावयाचा असतो. ते प्रश्न पुढीलप्रमाणे -

१) संशोधनासाठी निवडलेल्या विषयासंबंधी तो कागद आहे की नाही?

२) कागद मूळ स्वरूपात आहे की नक्कल आहे खरा आहे की बनावट ?

३) कागदाचा लेखक संशोधन विषयाच्या काळाशी निगडीत आहे का?

४) कागदात आलेला विषय संशोधनविषयाच्या काळाशी सुसंगत आहे की नाही?

५) कागदात स्थळाचा उल्लेख आहे का? असल्यास तो संशोधन विषयाच्या स्थलमयदिशी जुळतो का?

ह्या प्रश्नांचा हेतू मूळ कागदपत्राचा लेखक, स्थळ व काळ निश्चित करणे हा असतो. यालाच साधनांची सत्यता पडताळणे म्हणतात. काही इतिहासकार साधनांचीसत्यता परीक्षणाचेही लेखचिकित्सा (textual Criticism) व लेखकाचा चिकित्सक तपास (critical investigation of authorship) असे दोन भाग मानतात. काही इतिहासकार बाह्यांग परीक्षणाला गौण मानतात. हॉकेट देखील बाह्यांग परीक्षणाला प्राथमिक स्वरूपाची अपरिपक्क प्रक्रिया मानतात. परंतु याचा अर्थ ह्या प्रक्रियेचे महत्त्व गीण आहे असा मात्र नाही. फक्त ती परीक्षण प्रक्रियेची पहिली पायरी आहे. किल्ल्यात प्रवेश करावयाचा असल्यास प्रथम प्रवेशद्वार उघडावे लागते. त्याखेरीज आत प्रवेश मिळत नाही, तसेच कागदपत्राचा लेखक कोण? त्याचा काळ कोणता व स्थळ कोणते याची खातरजमा केल्याखेरीज परीक्षणाची पहिली पायरी ओलांडून पुढे पाऊल टाकता येत नाही. कागद जर संशोधन विषयाशी संबंधित नसेल, लेखक समकालीन नसेल आणि कागद जर बनावट वाटत असेल तर तो त्याज्य ठरतो आणि पुढील परीक्षणाची गरजच उरत नाही.

१) बाह्यांग परीक्षणासाठी पहिला मुद्दा विचारात घ्यावयाचा तो विषयाच्या स्वरूपाचा! संशोधनाचा विषय पेशवेकालीन असेल आणि कागदपत्र शिवकालीन असेल तर तो प्रथमदर्शनीच त्याज्य मानावा लागेल.

(२) दुसरा मुद्दा म्हणजे हाती आलेला कागद अगर हस्तलिखित मूळ स्वरूपात आहे. की त्याची नक्कल आहे? याचा विचार करावा लागतो. कागद मूळ आहे की नक्कल आहे त्याची शहानिशा करण्याचे तंत्र आहे. प्रत्येक कालखंडात लिखाणाची पद्धत वेगवेगळी असते. अक्षराचे वळण वेगळे असते, विशिष्ट शब्द प्रचारात असतात, यावरून कागद विशिष्ट काळाचा आहे की नाही याची शहानिशा करता येते. तसेच याशिवाय पूर्वी दरबारी कागदपत्रांवर विशिष्ट ठिकाणी शिक्कामोर्तब केले जात असे. यावरूनही काळ निश्चित करण्यास मदत होते. तसेच एखाद्या मूळ कागदाची/हस्तलिखिताची नक्कल करत असताना काही चुका अभावितपणे होतात. मुळातले काही शब्द नकल करताना गळतात, काही मुळात नसलेले शब्द घातले जातात; यावरून कागद मूळ स्वरूपात आहे की नक्कल याचा अंदाज करता येतो.

हस्तलिखिताची एक प्रत हाती पडल्यानंतर त्याच्या आणखी काही प्रती उपलब्ध आहेत का याचा शोध घेऊन, एका पेक्षा अधिक प्रती सापडल्यास त्या एकमेकाशी ताडून पाहाव्या लागतात. त्यावर ज्या लेखकाचे नाव असेल, त्याच्या इतर लिखाणाची माहिती मिळवून त्याचा तौलनिक अभ्यास करावा लागतो व त्यामधील अक्षराचे वळण

जुळते की नाही? वापरलेल्या शब्दात साम्य आढळते का? याची उत्तरे मिळवावी लागतात. उदाहरणार्थ, जुन्या पोथ्यांच्या तसेच बखरींच्या दोन तीन प्रती सापडल्या तर कागदाचा पोत, अक्षराचे वळण, शब्दांचा वापर यावरून मूळ प्रत कोणती याचा छडा लावता येतो. कधी मुळात असलेल्या चुका सुधारण्याचा नक्कलकाराचा प्रयत्न असतो. त्यावरून देखील मूळ व नक्कल यामधील भेद लक्षात येतो.

३) तसेच एखादा मूळ कागद हाती आला, तर ज्याचे नाव लेखक म्हणून निर्दिष्ट आहे, तोच त्याचा खरा लेखक आहे की दुसऱ्याच एखाद्या व्यक्तीने खऱ्या लेखकाच्या नावाखाली तो लिहिला आहे याचा शोधही घ्यावा लागतो. कधी कधी लेखाला महत्त्व मिळण्यासाठी, एखादी व्यक्ती एखाद्या प्रतिष्ठित प्रख्यात व्यक्तीच्या नावाचा वापर करून लेख लिहिते. अशा वेळी त्यातील मजकुराचा आशय, वापरलेले शब्द पाहून खऱ्या खोट्याचा निर्णय करावा लागतो.

४) मध्ययुगात शासकांच्या दरबारातून चालणाऱ्या शासकीय पत्रव्यवहारावर, उदाहरणार्थ, आज्ञापत्रे, दानपत्रे, इतर शासकांशी होणारा पत्रव्यवहार इत्यादी, ठराविक ठिकाणी शिक्का मारण्याची पद्धत असे. असा शिक्का न दिसल्यास त्या कागदाच्या खरेपणाविषयी प्रथमदर्शनीच शंका निर्माण होते. किंवा ठराविक जागेऐवजी वेगळ्या जागी शिक्का मारलेला आढळला. तरी शंकेला जागा शिल्लक राहाते. तसेच शिवकालीन अगर पेशवेकालीन कागदपत्रात पत्रातील मायना आणि पत्राची अखेर विशिष्ट प्रकारे, विशिष्ट शब्दात होई. तशी न आढळल्यास तपासणीची गरज आहे हे ध्यानात येते.

५) लेखाचा व लेखकाचा काळ ठरविण्यासाठी कालगणना शास्त्र, भाषाशास्त्र, लिपीशास्त्र, हस्तलेखाशास्त्र, शिकाशास्त्र इत्यादी इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्रांची मदत घेणे लाभदायक ठरते. एखाद्या कागदावर काळनिर्देश नसल्यास, त्यात निर्दिष्ट केलेल्या घटना, अगर व्यक्तींचे नामोल्लेख यावरून कागदाचा काळ ठरविता येतो. मुख्य म्हणजे कागदातील उल्लेख समकालीन लेखनप्रवाहात चपखलपणे बसतात की नाही याची खातरजमा करून घेणे आवश्यक ठरते. लेखात ज्या काळाचा निर्देश असेल त्याच्याशी त्यातील घटनांचे, व्यक्तींचे उल्लेख जुळत असतील तरच तो कागद कामाचा मानावा. शिवकाळातील एखाद्या कागदपत्रात जर पेशवेकालीन व्यक्तीचा, अगर घटनेचा उल्लेख सापडला तर तो निश्चित बनावट समजावा. पत्राचा एकूण सूर त्या काळाशी सुसंगत असणे महत्त्वाचे असते.

६) लेखकाचा व काळाचा शोध घेतल्यानंतर त्या कागदातील स्थळाचा उल्लेखही तपासायचा असतो. संशोधनाचा विषय ज्या प्रदेशासंबंधी असेल, त्या प्रदेशाचा उल्लेख त्यात आहे की त्याहून अगदीच वेगळ्या प्रदेशाचा आहे याचा शोध घेणे अनिवार्य असते. उदाहरणार्थ, रघुनाथरावाच्या उत्तरेकडील मोहिमांचा अभ्यास करताना नर्मदेच्या उत्तरेकडील स्थळांचा उल्लेख अपरिहार्य ठरतो, तसे उल्लेख नसून दक्षिणेकडील गावांच्या नावांचे, नद्या, पर्वतांचे उल्लेख असल्यास तो कागद खरा नाही असे मानण्यास हरकत नाही. कधी कधी स्थळांचे स्पष्ट उल्लेख कागदात सापडत नाहीत, अशावेळी मुख्य स्थळानजीकच्या काही भौगोलिक बाबींचे नद्या,

पर्वत, उद्योग, मार्ग, नजीकचे गाव यांचे उल्लेखही बोलतात. प्रदेशानुसार कधी कधी शब्दांचा वापर बदलत असल्याचेही ध्यानात येते; तसेच अक्षराच्या घाटणीत बदल असतो किंवा एकच शब्द परंतु वेगळ्या अर्थाने वापरतात. त्यामुळे भिन्न प्रदेशातील भाषिक बदलांची माहिती संशोधकाला असावी लागते. त्या आधारे कागदाचे स्थळ किंवा स्थूलमानाने प्रदेश निश्चित करता येतो.

सारांश असा की बाह्यांग परीक्षणाचा उद्देश मूळ कागदपत्राची सत्यासत्यता तपासण्याचा असतो. कागदाचा लेखक कोण? कागदाचा काळ कोणता? आणि त्याचे स्थळ कोणते? याविषयी खातरजमा झाली, ह्या तीन गोष्टी सुसंगत आहेत याची खात्री झाली की बाह्यांग परीक्षणाच्या कसोटीला तो कागद उतरला असे मानावे. बाह्यांग परीक्षणाबरोबर परीक्षणाचा पहिला टप्पा संपतो. त्यानंतर संशोधकाने मूळ कागदपत्राच्या अंतरंग परीक्षणाकडे वळावयाचे असते.

बाह्यांग व अंतरंग परीक्षणाच्या संदर्भात डॉ. शेख अली यांनी दिलेले उदाहरण बोलके आहे. ते म्हणतात पोस्टाने एखादे पाकीट आपल्या हाती आल्यानंतर आपली जिज्ञासा जागृत होते आणि साक्षेपी व्यक्ती त्या पाकिटावरील नाव आपलेच आहे की नाही? पत्र आपल्याच नावाने आले आहे की नाही, हे पाहातो. नंतर ते कोणाकडून आले आहे? पाठवणारा कोण आहे ते पाहातो, त्याच्या स्थळाचा उल्लेख पाहातो आणि ते पत्र कोणत्या दिवशी पोस्टात टाकले आणि कोणत्या दिवशी मिळाले हे दाखविणारे पोस्टाचे शिक्के तपासतो हे बाह्यांग परीक्षण असते. या तीन गोष्टीविषयी खात्री झाल्यानंतर ते पत्र उघडून त्यातील मजकूर वाचतो व त्यात काय म्हटले आहे, त्याचा आशय काय आहे याची छाननी करतो. हे अंतरंग परीक्षण असते. हाच अर्थ डॉ. के. एन्. चिटणीस यांनी अगदी थोडक्यात परंतु समर्पक शब्दात सांगितला आहे. 'बहिरंग परीक्षणात कागदाची सत्यासत्यता तपासायची असते, तर अंतरंग परीक्षणात त्याची विश्वासार्हता ठरवावयाची असते', ह्या त्यांच्या विधानात मूळ कागदपत्रांच्या परीक्षणाचे सार व्यक्त झाले आहे.

आपली प्रगती तपासा –

बाह्यांग परीक्षण म्हणजे काय? ते सांगा .

---

---

---

## ५.४ साधनांची विश्वसनीयता तपासणे (अंतरंग परीक्षण)

कागदपत्रांचा सखोल अभ्यास करून त्याआधारे विश्लेषण करणे व कागदपत्रांतील घटनेचा अर्थ, व्याप्ती. व सत्य जगापुढे आणणे म्हणजे अंतर्गत परीक्षणहोय. अंतरंग परीक्षणाला इंग्रजीत हेरमेन्यूटीक्स असेम्हणतात. मूळ कागदपत्रांची विश्वासार्हता व स्वीकारार्हता ठरविण्याच्या दृष्टीने बाह्यांग परीक्षणापेक्षा अंतरंग परीक्षणाची प्रक्रिया अधिक महत्त्वाची आहे. कागदाचा लेखक, काळ व स्थळ याबाबत बाह्यांग परीक्षणाने खातरजमा करून घेतल्यानंतर, त्यातील आशयाची विश्वासार्हता ठरविणे हा अंतरंग परीक्षणाचा उद्देश असतो. पत्रातील मजकुराची

चिकित्सक छाननी करायची म्हणजे पत्रात लेखकाने काय म्हटले आहे? त्यात कोणकोणते मुद्दे आले आहेत? कोणकोणत्या व्यक्तींचे अगर घटनांचे उल्लेख आहेत? कोणाविषयी काय मत व्यक्त केले आहे? त्यामागील हेतू काय असावा? लेखकाची मानसिकता, वैचारिक भूमिका काय असेल? मजकुरात शब्दार्थांप्रमाणे काही गर्भितार्थ आढळतो का? अशा नानाविध प्रश्नांची उत्तरे शोधणे म्हणजे अंतरंग परीक्षण होय. ही संपूर्ण परीक्षण प्रक्रिया नकारात्मक स्वरूपाची असते. म्हणजे जे हाती पडते ते तसेच सत्य म्हणून स्वीकार न करता सतत शंका उपस्थित करून, ते खोटे असण्याची शक्यता आहे हे गृहीत धरून त्याची सत्याच्या निकषावर तपासणी करणे. उपस्थित केलेल्या सर्व शंकांचे निरसन झाले की हाती राहिलेली माहिती हा ऐतिहासिक परिते अगर पुरावा म्हणून संशोधक लेखनात वापरतो.

**अंतरंग परीक्षणाचे**

१) सकारात्मक परीक्षण

२) नकारात्मक परीक्षण असे दोन भाग  असतात.

**सकारात्मक परीक्षण**

सकारात्मक परीक्षणाचा हेतू लेखातील आशय समजून घेणे हा असतो. लेखात लेखकाने कोणती विधाने केली आहेत व त्यांचा अर्थ काय? याचा शोध संशोधकाला घ्यावयाचा असतो. तो मजकूर विश्वासार्ह आहे की नाही हा विचार सकारात्मक परीक्षणाच्या टप्प्यात अपेक्षित नसतो. कागदातील आशयाचे आकलन करून घेण्यासाठी कागदातील संपूर्ण मजकुराचे एकत्रित विश्लेषण करून चालत नाही. कारण एकापेक्षा अधिक विधाने केलेली असतील तर ती सगळीच खरी अगर सर्व खोटी असण्याची शक्यता कमी असते. त्यातील काही खरी अगर काही संदिग्ध स्वरूपाची म्हणून साशंकता निर्माण करणारी असू शकतात. म्हणून सकारात्मक परीक्षणाच्या वेळी लेखातील प्रत्येक विधान सुटे करून, त्याची एकेकशः प्रत्येकी स्वतंत्ररणे तपासणी करणे श्रेयस्कर ठरते. यामुळे यातील प्रत्येक विधानात शंका उपस्थित करून त्याच्या सत्यासत्यतेची शहानिशा करता येते.

तसेच लेखाचा संपूर्ण व खरा अर्थ समजून घेण्यासाठी त्यात वाच्यार्थाप्रमाणेच गर्भितार्थ आहे का याची तपासणी करावी लागते. वाच्यार्थाचे समर्पक आकलन करून घेण्यासाठी, कागद ज्या काळातील असेल, त्या काळातील भाषेचे ज्ञान असणे आवश्यक असते. कारण भाषेचा वापर लवचिक असतो. भाषेचा वापर काळानुसार व प्रदेशानुसार बदलत असतो. एकच शब्द वेगवेगळ्या काळात अगर प्रदेशात वेगळ्या अर्थाने वापरला गेल्याची उदाहरणे दिसतात. किंवा एखाद्या काळी प्रचारात असलेला शब्द नंतरच्या काळात लुप्त झालेला दिसतो. तसेच नागरी व ग्रामीण भाषेतही भेद असतो. हे सर्व भाषाभेद संशोधकाच्या परिचयाचे असले तर लेखाचा वाच्यार्थ लावणे सुकर होते.

कधी कधी लेखाची भाषा वाचताना वाच्यार्थ सुसंगत वाटत नाही. काहीसा विचित्र, वाटतो. अशा वेळी त्याला आहे. सन्दर्शनी वापरलेल्या शब्दांच्या अर्थापेक्षा लेखकाला वेगळे काही तरी सुचवावयाचे आहे हे ध्यानात येते. असे झाल्यास विधानाचा संदर्भ लक्षात घेऊन त्याचा आंतील अर्थ, त्याचा गर्भितार्थ शोधून काढावयाचा असतो. उदाहरणार्थ, सरदार पटेल यांच्या संदर्भात नेहेमी 'पोलादी पुरुष' असा शब्दप्रयोग केला जातो. त्याचा वाच्यार्थ पाहिल्यास तो

चमत्कारिक वाटतो. म्हणून त्याचा गर्भितार्थ पाहावा लागतो आणि त्यांचे निर्णय व कृती पोलादाप्रमाणे अचल व सामर्थ्यशाली असल्यामुळे त्यांना पोलादी पुरुष म्हटले जाते हा अर्थ ध्यानात येतो. तसेच श्रीमती इंदिरा गांधी यांचे वर्णन एका लेखकाने 'the only man in the Cabinet' असे केले आहे. याचा शब्दशः अर्थ साहजिकच विचित्र वाटतो. परंतु मंत्रिमंडळात धाडसी निर्णय केवळ त्या एकट्याच घेत, असा man ह्या शब्दाचा गर्भितार्थ ध्यानात घेतला की त्याचा संदर्भ लागतो आणि ध्वन्यर्थ कळतो. किंवा १७०७ साली महाराष्ट्रात परत आलेल्या शाहू महाराजांच्या वाटेला आलेले राजपद म्हणजे 'काटेरी मुकुट' होता, हे विधान त्यांना राजपद सुखाचे नव्हते, तर काट्याप्रमाणे टोचणारे होते असे सूचित करणारे आहे. सारांश असा की लेखाच्या सकारात्मक परीक्षणात संशोधकाने फक्त मजकुरातील प्रत्येक विधानाचा खरा अर्थ समजून घ्यावयाचा असतो, त्यासाठी आवश्यक तेन्हा वाच्यार्थावरोवर सूचित अर्थही असल्यास लेखाच्या एकूण सुराच्या संदर्भात त्याचा अर्थ लावावा लागतो.

**नकारात्मक परीक्षण :**

नकारात्मक परीक्षण हे लेखातील मजकुराची विश्वासार्हता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. तसेच हे काम अतिशय जिकिरीचे असते. या टप्प्यात लेखातील विधाने कोणत्या परिस्थितीत लेखकाने केली? त्यांचा संदर्भ काय? विशिष्ट विधाने करण्यामागे त्याचा काही हेतू दिसतो का? इत्यादींची शहानिशा करावयाची असते. या टप्प्यातही लेखातील प्रत्येक विधानामागील संदर्भ व लेखकाची भूमिका तपासण्यासाठी प्रत्येक विधानासंबंधी पद्धतशीरपणे शंका उपस्थित करूनच सत्याचा शोध लावावा लागतो.

या दृष्टीने नकारात्मक परीक्षणाचे दोन पैलू मानले जातात. पहिला म्हणजे लेखकाच्या हेतूची, प्रामाणिकपणाची तपासणी याला इंग्रजीत Good faith असा शब्द वापरतात आणि दुसरा पैलू म्हणजे विधाने बिनचूक आहेत का? नसल्यास त्याची कारणे कोणती? याचा तपास. याला इंग्रजीत Errors of Accuracy असे म्हणतात.

एखाद्या लेखाचा लेखक कोण आणि त्याने जी विधाने केली त्याचा आशय समजल्यानंतर लेखाचे नकारात्मक परीक्षण करावे लागते. यात प्रथम लेखामागील त्याचा हेतू काय दिसतो? तो प्रामाणिकपणे विधाने करतो की काही लपवून ठेवण्याचा प्रयत्न दिसतो? त्यातून काही पूर्वग्रह आढळतात का? असे प्रश्न लेखकाच्या व्यक्तिमत्वासंबंधी, मानसिकता, बाह्य परिस्थिती, वैचारिक बैठक इत्यादी विषयी विचारावे लागते. ह्या परीक्षणासाठी संशोधकाला तल्लख बुद्धी, सूक्ष्म चिकित्सक वृत्ती आणि विवेकबुद्धी व तीक्ष्ण आकलनशक्तीची गरज असते.

**लेखकाचा प्रामाणिकपणा** :

ज्या लेखाचे परीक्षण संशोधकाला करावयाचे असते त्याच्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची, त्याच्या भोवतालच्या परिस्थितीची, बौद्धिक व वैचारिक पातळीची व मानसिकतेची माहिती मिळवावी लागते. ती मिळाल्यानंतरच त्याने व्यक्त केलेल्या मतांची, अगर विधानाची सत्यता जोखता येते. या दृष्टीने लेखकाविषयी पुढील माहिती आवश्यक ठरते.

१) लेखकाची विधाने व्यक्तिनिष्ठ दिसल्यास तो राजदरबारी असलेला अथवा राजाश्रय असलेला, शासकीय सेवेत असलेला अगर एखाद्या राजकीय पक्षाचा सदस्य किंवा

प्रतिनिधी आहे का याची माहिती काढावी लागते. त्याला राजाश्रय असल्यास अगर शासकीय सेवेत असल्यास तो मोकळेपणाने आपली मते व्यक्त करणार नाही. राजाविषयी प्रशंसापर विधाने करील किंवा राजाच्या विरोधकांविषयी किंवा विरोधी गटाविषयी हेटाळणीच्या किंवा तिरस्काराच्या, अवहेलनेच्या सुरात लिहील.

२) लेखक विशिष्ट धर्माचा प्रचारक अथवा आग्रही पुरस्कर्ता असल्यास त्याच्या लिखाणात बहुधा इतर धर्माविषयी अनुदारपणाची विधाने आढळतील.

३) लेखक समाजातील कोणत्या वर्गाचा अगर कोणत्या आर्थिक स्तरातील उच्चभ्रू वर्गातील किंवा विशिष्ट जात अगर जमातीचा असल्यास त्याचे प्रतिबिंब लेखात पडू शकते.

४) लेखक बुद्धिवादी आहे, कल्पनावादी आहे, राष्ट्रीय वृत्तीचा किंवा अतिरेकी राष्ट्रीय वृत्तीचा आहे? याची माहिती असल्यास विधानांची सत्यता पारखणे सोपे होते.

५) लेखक लिहिताना काही हातचे राखून लिहितो आहे, सत्य लपवीत आहे किंवा सत्यासत्याची सरमिसळ करीत आहे का? तो सत्य जाणतो, पण ते लपविण्याच्या त्याचा प्रयत्न दिसत असेल तर ते तो स्वार्थापोटी किंवा काही विशिष्ट परिस्थितीच्या अगर व्यक्तीच्या दडपणाखाली करतो आहे का? हे शोधावे लागते.

६) लेखक जी विधाने करतो त्यामागे त्याचा काही हेतू आहे का? अवाजवी, विधाने असतील तर आपले मोठेपण दाखवावे, स्वतःला मोठेपणा मिळवावा, इतरावर आपली छाप पाडावी या हेतूने तर तो लिहीत नाही ना? हे तपासावे लागते.

लेखक ज्या घटनेविषयी अगर व्यक्तीविषयी लिहितो, ते तो स्वतःच्या भूमिकेतून लिहितो. त्यात त्याचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबित होते. एखादी घटना प्रत्यक्ष पाहिल्यानंतर तिचे वर्णन लेखक जसेच्या तसे करेल असे नाही किंवा त्याला जे दिसते त्याहून वास्तव वेगळे असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. कदाचित ऐकीव माहितीवरून लेखक आपल्या बुद्धी व भाषा कौशल्याने एखाद्या घटनेचे वास्तव वाटेल असे वर्णन करू शकेल. परंतु अशा लिखाणात तपशीलाचा गोंधळ होतो. म्हणून लिखाणात लेखक जो प्रामाणिकपणाचा, वास्तव सांगण्याचा दावा करतो तो खरा आहे की नाही? त्याच्या लेखातील माहितीशी त्याचा प्रत्यक्ष संबंध आला होता का? ती माहिती स्वतः मिळवलेली होती की ऐकीव? ती बिनचुक समजण्याइतका तो सुबुद्ध होता का? तो समंजस व विवेकी दिसतो की पूर्वग्रह दुषित वृत्तीचा ? अशा अनेक प्रश्नांच्या मदतीने लेखाच्या लेखकाची पार्श्वभूमी तपासली म्हणजे त्याने केलेली विधाने विश्वासार्ह आहेत की नाही ते ठरविता येते.

**आपली प्रगती तपासा –**

१. अंतरंग परीक्षणाचा अर्थ सांगून त्याचे दोन प्रकार वर्णन करा.

लिखाणातील चुकांच्या कारणांचा शोध (Errors of Accuracy) :

लिखाणाची अचुकता तपासणे हा अंतरंग परीक्षणाचा अखेरचा टप्पा होय. ह्या टप्प्याकडे वळण्यापूर्वी संशोधकाने लेखकाचा प्रामाणिकपणा तपासलेला असतो. लेखक प्रामाणिक आहे तरीही लिखाणात चुका असण्याची शक्यता असते. अशा चुका लेखकाच्या अजाणतेपणे, न कळत झालेल्या असतात. परंतु अशा चुकांचा शोध घेणे पुरावा निर्दोष असण्यासाठी आवश्यक ठरते. अशा स्थितीत सामान्यपणे पुढील बाबींचा तपास करावा लागतो.

१) लेखकाने जे लिहिले आहे ते त्याने प्रत्यक्ष पाहिले आहे का? की ऐकीव माहितीच्या आधारे लिहिले आहे? प्रत्यक्ष पाहिलेल्या घटनांचे वर्णन, त्याच्या नोंदी अधिक प्रत्ययकारी व विश्वासार्ह असतात. अनेकदा लष्करी मोहिमांचे वर्णन ऐकीव माहितीच्या आधारे केलेलेअसते. त्यामुळे मोहिमातील मुक्कामाची ठिकाणे, किंवा सैनिकांची संख्या, वापरलेली शस्त्रास्त्रे,मृतांची जखमींची संख्या इत्यादी तपशील सत्य असण्याची शक्यता कमी असते.

(२) जे लेखकाने लिहिले ते सामान्य परिस्थितीत किंवा विशिष्ट परिस्थितीत लिहिले आहे का? उदाहरणार्थ, एखाद्या धार्मिक समारंभाला, शासकीय समारंभाला किंवा राजकीय स्वरूपाच्या सार्वजनिक सभेला किती श्रोते उपस्थित होते, अगर कोण कोण उपस्थित होते याचा तपशील खात्रीलायक नसतो. कारण अशा सार्वजनिक घटनांची वृत्तपत्रात माहिती देणारे वार्ताहर कित्येकदा घटनास्थळी असले तरी मोठ्या जमावाचा तपशील अचुक देणे कठीण असते म्हणून तपशीलात चुका होणे स्वाभाविक असते.

३) लिखाणात दीर्घ कालावधीत घडलेल्या घटनांची किंवा व्यापक प्रदेशात घडणाऱ्या घटनांची नोंद असल्यास त्यात चुका होऊ शकतात. उदाहरणार्थ, Ten Days that Shook the World ह्या ग्रंथात रशियात झालेल्या समाजवादी क्रांतीच्या दहा दिवसातील घटनांचे वर्णन अतिशय प्रत्ययकारी केले आहे. परंतु रशिया सारख्या विस्तीर्ण देशातील दहा दिवसातील घटना नेमक्या टिपणे एका व्यक्तीला अशक्य आहे. त्यामुळे अशा लिखाणातील तपशीलात अजाणता चुका होऊ शकतात. लेखक प्रामाणिक असला तरी हे काम त्याच्या आवाक्याबाहेरचे असते. सॅलिसबरी ह्या अमेरिकन वार्ताहराने व्हिएतनाम मधील अमेरिकन लष्कर व व्हिएतनामी लोक यांच्यातील लढ्याचे केलेले वर्णन किंवा आज अमेरिकन व ब्रिटिश सैन्याच्या इराकमधील लष्करी कार्यवाहीची वृत्तपत्रातून येणारी वर्णने याच गटात मोडतात.

४) लिखाण करताना लेखकाच्या मनावर काही विचारांचा प्रभाव होता का? लेखकाला ज्या विचारात रस असेल, विषय आवडीचा असेल त्याचे वर्णन तो मनापासून करेल, नावडीचा विषय असल्यास वर्णनात चुका होण्याची शक्यता असते. काव्यात्म प्रवृत्तीचा लेखक प्रशासकीय बाबींसारख्या नीरस विषयावर यथातथ्य लिखाण करू शकणार नाही.

५) घटनांची सत्य माहिती देण्याचा अनुभव व त्यासाठी लागणारी बुद्धी लेखकाजवळ आहे का? हे पाहणे निकडीचे असते. एखाद्या सामान्य बुद्धीच्या वार्ताहराला तांत्रिक अगर वैद्यकीय विषयावरील चर्चासत्राची माहिती मिळविण्याचे काम सोपविल्यास, ते तो

योग्यरीत्या करू शकणार नाही. कारण त्या विषयाचे ज्ञान त्याला नसते, तसा अनुभव नसतो, बौद्धिक पात्रता नसते. त्यामुळे अशा अहवालात चुकांची शक्यता अधिक असते.

६) घटना घडण्यात आणि त्याची नोंद करण्यात जर बराच काळाचे अंतर असेल तर वर्णनात सत्यासत्याची सरमिसळ अजाणतेपणी होऊ शकते. म्हणून घटना घडल्यानंतर त्याबाबत तत्काळ केलेले लिखाण अधिक विश्वासार्ह ठरते. यामुळे बहुतेक बखर वाङ्मय विश्वासार्ह साधन मानले जात नाही. आत्मकथनात सुद्धा अनेक वर्षापूर्वी घडलेल्या घटनांचे वर्णन स्मृतीच्या आधारे होत असल्याने त्यात चुका होऊ शकतात.

७) लेखकाची एकूण प्रवृत्ती आळशीपणाची, निष्काळजीपणाची चालढकल करण्याची असल्यास वर्णनात चुकांची शक्यता बरीच असते.

८) अनेकदा लेखक काही महत्त्वाच्या प्रसंगाविषयी लिहितो, त्यावेळी त्याला त्या घटनेमागील हालचालींची, आंतरराष्ट्रीय नेत्यांच्या बैठकीच्या वेळी त्यांच्या अंतर्वर्तुळातील चर्चा वार्ताहराला माहीत होत नाहीत. त्याची माहिती तो देऊ लागल्यास त्यात चुकांची शक्यता बरीच असते.

९) अनेकदा लेखक घटनास्थळी प्रत्यक्ष उपस्थित असला तरी डोळ्याला कमी दिसणे, कानाला कमी ऐकू येणे अशा शारीरिक वैगुण्यामुळे वृत्तांत लिहिताना अभावितपणे चुका होऊ शकतात.

अशा प्रकारे लेखक प्रामाणिक असला तरी त्याच्या नकळत त्याच्या लिखाणात चुका कोणकोणत्या कारणामुळे होऊ शकतात याचा अंदाज संशोधकाने घेऊन लेखाची तपासणी करणे निकडीचे उरते. ही प्रक्रिया पूर्ण झाली की मूळ कागदांच्या सर्वांगीण, सर्वकष परीक्षणाची प्रक्रिया पूर्ण होते आणि फोलपटातून धान्याचे कण वेगळे करून गोळा करावे तसे ऐतिहासिक पुराने हाती येतात.

मूळ ऐतिहासिक कागदपत्रांच्या परीक्षणाचा सारांशरूपाने आढावा घेतल्यास लेखाचे प्रथमतः बाह्यांग परीक्षण करावयाचे व त्याद्वारा लेखाचे स्थळ, काळ व लेखक यांची निश्चिती करावयाची, आणि अंतरंग परीक्षणाच्या वेळी सकारात्मक परीक्षणाने लेखाचा वाच्यार्थ व असल्यास लक्ष्यार्थ समजून घ्यावयाचा आणि नकारात्मक परीक्षणाने लेख लिहिण्यामागील लेखकाचा प्रामाणिकपणा तपासायचा आणि लेखक प्रामाणिक असूनही लेखात काही चुका आढळत असल्यास त्याची कारणे शोधायची असे स्थूलमानाने संपूर्ण परीक्षण प्रक्रियेचे स्वरूप आहे.

मूळ कागदपत्राच्या परीक्षणप्रक्रियेचे टप्पे

१) बाह्यांग परीक्षण

लेखाची निश्चिती, स्थळ, काळ, | लेखक निश्चिती

२) अंतरंग परीक्षण

सकारात्मक

नकारात्मक

लेखाच्या वाच्यार्थाचा व

माहितीच्या

ध्वन्यर्थाचा शोध

शोध शोध

लेखकाच्या

प्रामाणिकपणाचा

अचूकपणाचा

**इतिहास संशोधन प्रक्रियेतील टप्पे**

विषयाची निवड गुहिताचा निर्णय

ऐतिहासिक माहिती संकलन

स्त्रोतसाधने

मूळ/ प्राथमिक

दुय्यम

लिखित

अलिखित/ वस्तूरूप

अप्रकाशित

प्रकाशित

स्त्रोत साधनांच्या सत्यासत्यतेचा निर्णय

कारणमीमांसा : कारणांचा शोध व मांडणी

घटितांची तर्कशुद्ध मूत्र मांडणी

(ऐतिहासिक घटितांचा अन्वयार्थ )

ग्रंथ लेखन

१) घटितांची कालगणनेनुसार मुद्यानुसार प्रकरणात विभागणी /

२) घटितांचे साररूप निष्कर्ष

३) तळटीपा

४) संदर्भ ग्रंथ सूची ग्रंथनामाची संक्षेप सूची

५) विषय सूची

**आपली प्रगती तपासा-**

१. मूळ कागदपत्राच्या परीक्षणाची टप्पे सांगा.

---

---

---

## ५.५ सारांश

वरीलप्रमाणे थोडक्यात, कागदपत्रांची सत्यता पडताळून पाहण्यासाठी बहिर्गत परीक्षण केले जाते. कागदाचा लेखक, काळ, स्थळ याच्या सत्यतेविषयी खात्री झाली कि तो कागद बहिर्गत परीक्षणाच्या कसोटीला उतरला जातो असे मानावे. ऐतिहासिक संशोधनातअंतर्गत परीक्षणाला महत्व प्राप्त झाले आहे. अंतर्गतपरीक्षणामुळे संशोधकाच्या संकल्पना स्पष्ट जाण्यास मदत होते आणि त्यामुळे संशोधनाचे निष्कर्ष अचूक येतात. याखेरीज कागदपत्रांची विश्वासाहर्ता देखील परीक्षणद्वारे तपासली जाते.

## ५.६ प्रश्न

१. ऐतिहासिक संशोधनपद्धतीतील साधनांची सत्यसत्यता व विश्वसनीयता यापायरीचे स्वरूप स्पष्ट करा

२. ऐतिहासिक साधनांची सत्यसत्यता व विश्वसनीयता परीक्षणाचे महत्व स्पष्ट करा

३. ऐतिहासिक साधनांचे बहिर्गत परीक्षण व अंतर्गतपरीक्षण यावर भाष्य करा

## ५.७ संदर्भ

१. बि.शेख अली, हिस्ट्री :इट्स थेअरी अॅड मेथड , लक्ष्मी प्रकाशन न्यू दिल्ली,१९८१

❄❄❄❄❄❄❄

# ६

# पुराभिलेखीय साधनांचे महत्त्व

**घटक रचना**


६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ पुराभिलेखीय साधने

६.३ पुराभिलेखीय साधनांचे प्रकार

६.४ भारतातील अभिलेखागारे व त्यांची जडणघडण

६.५ मुंबईचे शासकीय अभिलेखागार

६.६ पुण्याचे शासकीय अभिलेखागार

६.७ भारत इतिहास संशोधक मंडळाचा दफ्तरखाना

६.८ कोल्हापूर येथील पुराभिलेख

६.९ डेक्कन कॉलेजमधील संग्रहालय व अभिलेखागार

६.१० सारांश

६.११ प्रश्न

६.१२ संदर्भ


## ६.० उद्दीष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर विद्यार्थ्यांना खालील गोष्टी लक्षात येतील.

१. पुराभिलेखीय साधने म्हणजे काय?

२. पुराभिलेखीय साधनांचे प्रकार

३. भारतातील अभिलेखागारे व त्यांची जडणघडण

४. मुंबईचे पुराभिलेखागार

५. पुण्याचे शासकीय अभिलेखागार

६. भारत इतिहास संशोधक मंडळ

७. कोल्हापूर येथील पुराभिलेख

८. डेक्कन कॉलेजमधील संग्रहालय व अभिलेखागार

## ६.१ प्रस्तावना

इतिहास लेखन प्रक्रियेत साधनांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे No Documents No History असे सेनबॉस यांनी म्हटले होते. काळानुसार साधनांचे स्वरूप बदलते परंतु साधनांचे महत्त्व आबाधित आहे. पुराभिलेखागारात साधने जतन करून ठेवली जातात.

कागद वापरात आल्यापासून पुराभिलेखीय म्हणजे कागदपत्रावरील लिखित पुरावे उपलब्ध होऊ लागले. हे पुरावे हस्तलिखित स्वरुपातले, छापील स्वरूपातले आहेत, कागद वापरण्यात येण्याअगोदर तर झाडाच्या सालीपासून तालपत्र बनवली जात. वनस्पतीपासून शाई व वेळूपासून बोरु बनवला जाई व त्यानंतर लिहिले जाई. अगदी ज्ञानेश्वरी सारखा ग्रंथही किंवा तुकारामांची गाथाही एखाद्या प्रतीत असे. याच्या दोन चार पिढ्यांनंतर त्या लिखाणाची आणखी एखादी नक्कल कुणीतरी करीत असे. त्यामुळे अशी जुनी हस्तलिखिते, पोथ्या, पुराणे, कथाग्रंथ, महात्म्य ग्रंथ किंवा इतर प्रकारची वाङमयीन निर्मिती अत्यंत मोलाची व दुर्मिळ मानली जातात. पुराभिलेखशास्त्राला इंग्रजी भाषेत ' आर्काईव्हज ' म्हणतात. अशा दुर्मिळ हस्तलिखितांचा संग्रह दिल्लीच्या राष्ट्रीय अभिलेखागार या ग्रंथालयात तसाच राज्यातल्या निरनिराळ्या अभिलेखागारात केलेला असतो. मुंबईला एलफिस्टन महाविद्यालयाच्या परिसरात मुंबई पुराभिलेखागार आहे.

## ६.२ पुराभिलेखीय साधने –

सामान्यपणे पुराभिलेख म्हणजे जुने हाताने लिहिलेले कागदावरील लिखाण (पुरातन). कागद वापरात येण्यापूर्वी झाडाच्या सालीपासून विशेषत : शाळवृक्षाच्या सालीपासून बनलेले 'तालपत्र' अशा लिखाणासाठी वापरले जात असे. अशी तालपत्र मिळविणे मोठे जिकीरीचे काम असे. त्यावर वेळूच्या तुकड्यांनी म्हणजे बोरूने नैसर्गिक रंगापासून लिहले जात असे. तात्पर्य कागदाचा शोध लागण्या अगोदर लिहिणे हि गोष्ट अत्यंत दुर्मिळ होती. कागदाचा वापर सुरु झाल्यानंतर लिहिणे थोडेसे सुलभ झाले. हस्तलेखन असल्यामुळे त्याच्या खुप कमी प्रती असत. धार्मिक ग्रंथ लिहिला जरी गेला तरी त्याची एकमेव प्रत असे तीच प्रत अत्यंत श्रद्धेने त्या लेखकाचे कुटुंबिय सांभाळून ठेवीत. दोन पाच पिढ्यानंतर त्या प्रतिवरून एखादा कुणीतरी दुसरी नक्कल करुन ठेवी. अशा रितीने एखाद्या ग्रंथाच्या कादंबरीच्या काव्याच्या महाकाव्याच्या एखाद दुसऱ्या प्रती उपलब्ध होत. साहजिकच ही अभिव्यक्ती, हे लिखाण कौशल्य आणि धर्मज्ञान, तत्वज्ञान, कर्मज्ञान, अत्यंत मर्यादित स्वरुपात व व्यक्तीच्या पातळीवरच मर्यादित राहिले, म्हणूनच या सर्व हस्तलिखित ग्रंथांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले.

पुराभिलेखीय पुरावे म्हणून अशी हस्तलिखिते जतन करुन ठेवण्याची परंपरा जगभर निर्माण झाली. आपल्याकडे कागद फार उशीरा म्हणजे १२व्या शतकात वापरात आला. चीनमध्ये कागद सर्वात प्रथम वापरात आला. कागदाचा वापर सुरु झाल्यानंतरही लिखाण दुर्मिळच होते. आधुनिक जगात छापखान्याचा शोध लागल्यानंतर लिखाणाचे स्वरुप बदलले. लिहिलेले ग्रंथ अनेक प्रतीत निघू लागले. भारतात ज्ञानाच्या सार्वत्रिकरणाची प्रक्रिया १९व्या शतकात सुरू झाली. त्यामुळे तोपर्यंतची पुरावे हस्तलिखित स्वरूपात आहेत. संत वांङमय हस्तलिखित स्वरूपातच उपलब्ध आहे. या हस्तलिखित कागदपत्रातूनच अनेक अज्ञात

प्रतिभावंत कवींचा लेखकांचा शोध लागला. वाङ्मयीन हस्तलिखिते जशी उपलब्ध आहेत तसेच दरबारी कागदपत्रेही उपलब्ध आहेत.

## ६.३ पुराभिलेखीय साधनांचे प्रकार -

१. व्यक्तीगत संग्रह मठमंदिर विहारातील संग्रह

२. जहागीरदार वतनदारांच्या लादन्यातील संग्रह

३. धार्मिक ग्रंथ, प्रवासवर्णने आत्मचरित्रे स्थानपोथ्या

४. सरकारी दरबारी असलेला संग्रह - नागपूर, कोल्हापूर, इंदोर, हैद्राबाद, झाशी अशा संस्थानातील कागदपत्रे

५. नाटक, कथा, बखरी तवारिखा व्यक्तीगत कादंबरी करीने पत्रव्यवहार सरकारी कंपनीचा कागदपत्रे पत्रव्यवहार

**समकालीन लेखन : -**

पुराभिलेखीय पुराव्यांमध्ये समकालीन लिखाण विश्वासनिय ठरते आणि म्हणूनच अव्वल दर्जाचा पुरावा म्हणून त्याचा उल्लेख होतो. चीन मध्ये इ.स. पूर्व १८६६ च्या दरम्यान चीनी लेखन कलेची उत्क्रांती झाली. फुत्सी याने चित्रलिपी प्रचारात आणली. इतिहास लिहीला जाण्याची पद्धतही रुढ झाली. समकालीन इतिहास नोंदवले गेले. समकालिन नोंदी इतिहासाचा महत्वपूर्ण पुरावा मानला जातो. आपल्याकडेही अशा समकालीन नोंदी आढळतात. मौर्य कालखंडातील कौटिल्याचे अर्थशास्त्र असेच समकालिन म्हणून महत्वाचे ठरते. सातवाहन काळातील गाथा सप्तशती तत्कालिन समाजाचे चित्रण करणारा महत्वाचा समकालीन पुरावा आहे. चक्रधरस्वामींचे लिळाचरित्र असेच समकालीन लिखाण व यादव काळाचे महत्वपूर्ण पुरावा म्हणून संबोधला जातो.

मध्ययुगात अशा प्रकारचे समकालीन लिखाण मोठ्या प्रमाणात झाले. प्राचीन व मध्ययुगातील परकिय प्रवाश्यांनी लिहिलेली भारताची प्रवासवर्णनेही समकालीन लिखाण म्हणूनच विश्वासनीय पुरावा ठरतो. इ.स.पूर्व ४ थ्या शतकातला मॅगस्थनीज, त्यानंतर इ.स.पूर्व १ ल्या शतकातला एक अनामिक ग्रीक प्रवासी पेरिप्लस ऑफ दि युरेथ्रिएन सी या ग्रंथाचा लेखक, त्यानंतर इ.स.च्या २ या शतकातील टॉलेमी हे सर्व युरोपीय प्रवासी त्या त्या काळातील भारतीय परिस्थितीचे चित्र रेखाटतात. सातवाहनांचा व्यापार त्या साम्राज्यातील व्यापारी मार्ग, व्यापारी शहरे यांची सविस्तर नोंद पेरिप्लस ऑफ दि युरेथ्रियन सी या ग्रंथात येते. त्यात महाराष्ट्र, गुजराथ समुद्र किनाऱ्यावरील बंदरे, भृगुकच्छ, सुरपारक, कलियाण यांचा उल्लेख येतो. म्हणूनच ही प्रवास वर्णनेही समकालीन विश्वासनीय पुरावा ठरतो. तीच अवस्था चीनी व अरब प्रवाश्यांच्या प्रवासवर्णनाची आहे. फाहीयान, ह्युएनत्संग, इत्सींग हे चीनी प्रवासी अल्बेरुनी इब्न बतुता, इब्न खल्दून सारखे अरब प्रवासी यांची प्रवास वर्णनही महत्वाचा पुरावा ठरतो कारण ते लिखाण समकालीन असते म्हणून.

मध्ययुगातील बातमीपत्रे, अखबार व आत्मवृत्ते यांचाही समावेश समकालीन कागदपत्रांमध्ये होतो. रोजनिशी, अखबार नामा, मृत्युपत्रे, पत्रव्यवहार, सार्वजनिक कागदपत्रे, वृत्तपत्रे,

आठवणी यांचा समावेश होतो. सार्वजनिक कागदपत्रे ही सर्वांसाठी असतात, त्यात राज्यशासन व संबंधित घटकाची माहिती असते. पत्र व्यवहारांमध्ये राज्यकारभागाची पत्रे, शासनाची व्यावहारीक पत्रे, खाजगी पत्रे यांचा समावेश होतो. तसेच जमाखर्चाचा पैसा येणे व जाणे, मोहिमांचा खर्च, राज कुटुंबांचा खर्च इत्यादीचा समावेश होतो.

अशीच समकालीन लिहिली गेलेली चरित्रे ही महत्वाची ठरतात. शिवाजी महाराजांच्या काळातले परमानंद रचित ' शिवभारत ' किंवा सम्राट अकबराच्या हयातीत रचलेले अबुल फजलचे 'अकबरनामा ' समकालीन म्हणूनच विश्वसनीय मानले जाते.

**१) धार्मिक ग्रंथ : -**

पुराभिलेखीय साधनांच्यामध्ये सर्वात प्राचीन लिखाण म्हणून धार्मिक ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल. वैदिक वाङ्मय, पुराणे व महाकाव्ये, बौद्ध व जैन वांग्मय असे धार्मिक ग्रंथ आहेत. ऋग्वेद हा तर सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. भारतातील वेद वाङमय, ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद आणि सामवेद, रामायण व महाभारत ही महाकाव्ये, उपनिषद, ब्राम्हण आणि आरण्यके हे ग्रंथ तसेच दिपवंश, महावंश ही बौद्ध महाकाव्ये, महापरिनिर्वाण सूत्र हा ग्रंथ महत्वपूर्ण असे पुराभिलेखीय साधने आहेत. या ग्रंथाप्रमाणेच इसवीसनाच्या सहाव्या-सातव्या शतकापासून ते सतराव्या-आठराव्या शतकापर्यंत निर्माण झालेले अनेक धार्मिक ग्रंथही पुराभिलेखीय पुरावेच आहेत. या ग्रंथरचनेतून शैवपंथ, वैष्णवपंथ, शाक्तपंथ यांची वाटचाल रेखाटली गेली. व्दैत-अव्दैताविषयीचे चिंतन चालू झाले. भक्ती पंथाने संतवाङमयाला प्रेरणा दिली. हे सारे वाङमय हस्तलिखित स्वरुपात उपलब्ध झाले. अजूनही हजारो ग्रंथ मठा - मंदिरातील लादन्यामधून धुळ खात पडले आहेत. त्या सर्वांमधून अज्ञात माहितीचा शोध घेतला गेला पाहिजे. गतकालीन विचार विश्वाचा हा पुरावा या पुराभिलेखातून उपलब्ध होतो. त्या दृष्टीने साऱ्याच धर्माचे हे धर्मग्रंथ इतिहासाचा पुरावा ठरतात.

**२) चरित्र ग्रंथ : -**

हस्तलिखित स्वरुपात उपलब्ध झालेला पुराभिलेखीय पुरावा म्हणजे चरित्रग्रंथ होत. प्राचीन काळी चरित्रलेखनाची परंपरा आपल्याकडे फारशी प्रचलित नव्हती. विशाखादत्ताने रचलेले ' बुद्धचरित्र ' आणि बाणभट्टाचे ' हर्षचरित्र ' हे दोनच चरित्रग्रंथ सुरुवातीच्या काळातले म्हणून उल्लेखनीय आहेत. पुढे विक्रमांकदेव चरित्र रचीले गेले. अशा प्रकारचे चरित्र लेखन मध्ययुगात अधिक झाले. नंतर अरेबिक व पर्शियन भाषेत चरित्र लिहिली जाऊ लागली. गुलबदन बानु बेगम या मोगल राजकन्येने आपल्या भावाचे हुमायुनाचे चरित्र हुमायुननामा लिहिले. अकबराचे चरित्र लिहिले गेले. जहांगीर नामा, शहाजहाननामा लिहिला गेला. पुढे हिच परंपरा चालू राहिली. शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले गेले. परमानंदाचे ' शिवभारत ' म्हणून ते प्रसिद्ध आहे. या चरित्रग्रंथाप्रमाणेच आत्मचरित्र ही उल्लेखनीय ठरते ' तुझुक - ई - बाबरी किंवा बाबरनामा हे एकमेव आत्मचरित्र. या चरित्र आत्मचरित्रातून इतिहासाला उपयुक्त अशी माहीती मिळते म्हणूनच हे ग्रंथ उल्लेखनीय पुराभिलेखीय पुरावा ठरतात.

**३) प्रवासवर्णने : -**

भारतात येवून गेलेल्या परकीय प्रवाश्यांनी लिहिलेली प्रवास वर्णनेही मुळात हस्तलिखितांच्या रुपात तिकडे युरोपात, चीनमध्ये व मध्य आशियात पुराभिलेखांच्या स्वरुपात सापडली. नंतर

अलीकडे ती प्रकाशित झाली. ही प्रवासवर्णने इतिहासाचा अत्यंत मोलाचा पुरावा होय. मेगॅस्थनीज, पेरिब्लस, टॉलेमी हे सुरुवातीचे तीन्ही परकीय प्रवासी युरोपातून भारतात आले होते. त्याची प्रवासवर्णने उपलब्ध झाल्यानंतर भारताच्या गतकालीन वाटचालीचे, मौर्य सातवाहन काळातले चित्र स्पष्ट झाले. त्या काळाच्या अभ्यासाचा विश्वासनीय पुरावा वरील प्रवास वर्णनातून उपलब्ध झाला. सेलूकस निकटरचा राजदूत मेगॅस्थेनीस हा चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात होता. त्याचा इंडिका हा ग्रंथ साधन म्हणून उपयोगी मानला जातो. गुप्त काळापासून भारताचा रोमशी असलेला व्यापार थोडासा मंदावला. युरोपीय संबंधापेक्षा चीनशी संबंध वाढले. फाहीयान हा चीनी बौद्ध भिक्षू भारतात आला. त्याचे प्रवासवर्णन चीनमध्ये हस्तलिखित स्वरुपातच उपलब्ध झाले आणि भारतातील गुप्तकालीन समाजाविषयी, बरीचशी माहिती उजेडात आली. यानंतर भारतात आलेले दोन्हीही परकीय प्रवासी चीनी बौद्ध भिक्षूच होते. सातव्या शतकात यूएनत्संग हा बौद्ध भिक्षू भारतात आला. त्यांच्या प्रवासवर्णनातुन भारतातील बौद्ध विद्यापीठे, तेथील ज्ञान परंपरा, ग्रंथालये, विद्यापीठातील प्रवेशपद्धती या सर्वांविषयी अत्यंत महत्वपूर्ण माहिती नोंदवलेली आढळते. हे प्रवासवर्णन तसेच इत्सींग या बौद्धभिक्षूचे प्रवासवर्णनही तिकडे चीनमध्ये हस्तलिखित स्वरुपात सापडले. त्यांनी लिहून ठेवलेल्या माहितीवरून भारताच्या तत्कालीन धार्मिक व सामाजिक परिस्थितीचे ज्ञान होते. मध्ययुगात इब्न बतुता, इब्न खल्दून, मार्को पोला या सारखे अनेक प्रवासी भारतात येवून गेले. त्यांच्या नोंदी ही महत्वाचा पुरावा ठरतात. इसवी सनाच्या १५ व्या शतकाच्या अखेरीस वास्को - द - गामा हा प्रवासी समुद्रमार्गे भारतात कलीकतला येवून पोहचला. त्याने भारताला येणाऱ्या समुद्रमार्गाचा लावलेला हा शोध हस्तलिखित स्वरुपातच प्रवासवर्णनाच्या पद्धतीने नोंदवून ठेवलेला होता. तात्पर्य ही सारीच प्रवासवर्णने म्हणजे विश्वसनीय पुराभिलेखीय पुरावा होय.

### ४) नाटक, कथा, कादंबरी : -

कथा, काव्य किंवा कादंबरी या वाङमयीन अभिव्यक्ती जरी असल्या तरी इतिहासाच्या त्या पुरावाही ठरु शकतात. मात्र इतिहासाचे हे साधन म्हणून वापरताना इतिहासकाराला ते काळजीपूर्वक वापरावे लागते. या साधनांमधील खरेपणा तपासून पहावा लागतो. मूळ साधने उपलब्ध नसतात तेव्हा या साधनांचे महत्त्व खूप असते. कित्येकदा या वाङमयीन अभिव्यक्तींनी हाताळलेले विषय ऐतिहासिक, प्रत्यक्ष घडलेल्या राजकिय घटनाशी संबंधित असतात. तेंव्हा तर ते लिखाण इतिहासाचा पुरावा ठरतेच. परंतु निखळ वाङमयीन अभिव्यक्ती जरी असली, पूर्णपणे काल्पनिक कथानक जरी असले तरी कथानकाच्या मांडणीवर वर्णनावर, तत्कालिन समाजाचा प्रभाव पडलेला असतो पोषाखाचे वर्णन असेल, चालण्या-वागण्या-बोलण्याच्या पद्धती असतील. खाण्या-पिण्याचे संदर्भ असतील या प्रत्येक ठिकाणी लेखक ज्या वातावरणात राहतो, ज्या काळात वावरतो, त्याचे प्रतिबींब उमटतेच म्हणूनच हे वाङमय प्रकारही इतिहासाचे पुरावे ठरतात. जातक कथा, पंचतंत्र कथा, गाथा सप्तशती या कथा असोत की मेघदूतासारखे महाकाव्ये असो अथवा कालीदास, भास्त, भवभूतीची नाटके असोत, तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब घेऊनच या साऱ्या वाङमयीन अभिव्यक्ती साकारतात म्हणूनच हे सारे पुराभिलेखीय लिखाण इतिहासाचा पुरावा ठरतात. मात्र ते जसेच्या तसे वापरता येत नाही. त्यातील घटनांची योग्य परीक्षण करून इतिहासकाराला वापरावे लागते.

**५) बखर वाङमय : -**

१८ व्या शतकात आणि १ ९ व्या शतकाच्या पूर्वार्धात मराठेशाहीच्या पराक्रमाची नोंद करणारे लिखाण बखर वाङमयाच्या स्वरुपात लिहिले गेले. मराठ्यांच्या इतिहासातील अनेक महत्वपूर्ण प्रसंगाच्या हकीगती या बखरीतून नोंदवल्या गेल्या. ९१ कलमी बखर, सभासद बखर अशा काही महत्वाच्या बखरी उल्लेखनीय. या बखरीतून कांही प्रसंगाची माहिती उपलब्ध झाली पण ती ही अतिशयोक्त स्वरुपात असते. बखरींचे स्वरुप बरेचसे चरित्र रेखाटनाचे असते. कल्पनाविलास, अतिशयोक्ती, भाषेचा फुलोरा घेऊनच बखरी साकारल्या गेलेल्या आहेत. बखरकारांची वृती निखळ वस्तुनिष्ठ नाहीच. तर त्या पूर्वग्रहदुषित आहेत. असे असले तरी एका विशिष्ट मर्यादिपर्यंत बखरीतून इतिहासाला पूरक अशी माहिती मिळते. त्या दृष्टीने बखरीच्या स्वरुपातला पुराभिलेखीय पुरावा महत्वाचा ठरतो.

**६) तवारिखा, करिने, शकावल्या : -**

इसवीसनाच्या १२ व्या शतकानंतर अरेबिक आणि पार्शियन भाषेतून तारिख तवारिखा आणि करीने लिहिण्याची प्रथा रुढ झाली. करिना म्हणजे हकिकत होय. अनेक सरदारांनी आपल्या जहागिरीमधील घडामोडींचे वृत्तांत लिहून ठेवलेले आहेत. दिल्ली सल्तनतीतील दरबारी लोकांनी अशा तारीखा तवारिखा म्हणजे इतिहास स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून ठेवले. मोगल काळातही असे इतिहास लिहिले गेले. यांना इतिहास म्हणून जरी संबोधले जात असले तरी आधुनिक काळातली वस्तुनिष्ठता त्या लिखाणात नव्हती. बखरी सारखेच हेही लिखाण आपल्या मालकाचे म्हणजे बादशाहचे राजाचे गुणवर्णन करण्यासाठी,पराक्रम सांगण्यासाठी लिहिले गेले. येथेही कल्पनाविलास, अतिशयोक्ती, वस्तूस्थितीचा विपर्यास या साऱ्या गोष्टी होत्याच. मोगलांनी तर खाफीखानासारखे इतिहासकारच नेमले होते. या काळातले छोटे-मोठे सरदार जहागीरदारही करीने म्हणजे हकिगतीच्या नोंदी ठेवीत. शकावल्यांच्या स्वरुपात हे लिखाण असे. मध्ययुगीन काळात पौराणिक परंपरा असलेल्या शकावल्या व संबंधित घराण्याच्या राजकीय घडामोंडीचा तपशील असलेल्या शकावल्या असे दोन प्रकार पडतात. शकावल्यांमध्ये तारीखवार नोंदी असतात. त्यामुळे अधिक विश्वासार्ह मानल्या जातात. उदा - जेधे शकावली. या तवारिखा, करीने, शकावल्या हस्तलिखित स्वरुपातच सापडल्या व त्या पुराभिलेखागारात सांभाळून ठेवल्या आहेत. इतिहासाचा पुरावा म्हणून त्याचा उपयोग होतो.

मजहर म्हणजे न्याय मिळविण्यासाठी केलेली कैफियत होय. यात दोन्ही बाजुंची मते नोंदलेली असतात. त्याचाही उपयोग होता. मात्र खोट्या साक्षी तपासून घ्याव्या लागतात.

**कूळकटी** - आपल्या वंशाची वंशावळ तयार करून घेणे हे मध्ययुगात प्रतिष्ठेचे मानले जाई. त्यालाच कुळकटी असे म्हणतात. सामान्यपणे वेगवेगळ्या राज घराण्याच्या वंशाच्या वंशवेली व त्यातील बदल दाखवलेले आहेत. वंशावळीमध्ये अनेक पिढ्यांची माहिती दिली गेलेली असून जन्ममृत्यूच्या नोंदी मात्र यात नसतात. कर्तबगार व्यक्तीच्या बाबत काही माहिती दिलेली असते. विविध राजघराण्यांची माहिती मिळवण्यासाठी कुळकटी अधिक उपयोगी पडतात.

### ७) व्यक्तीगत पत्रव्यवहारः-

दिल्ली सल्तनत, मोगल दरबार, विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर, बीदर व वऱ्हाड या ठिकाणच्या सुलतानशाह्या, यांच्या नोकरीत असणाऱ्या असंख्य जहागीरदार, वतनदाराच्या कडून बादशहाशी झालेला पत्रव्यवहार हस्तलिखित स्तरुपातला सगळ्यात विश्वसनीय पुराभिलेखीय पुरावा होय. असंख्य मराठा, रजपूत सरदारांच्या वाड्यात, किल्यात, गढ्यावर हा पत्रसंग्रह उपलब्ध झाला व अजूनही उपलब्ध होऊ शकतो. यातूनच कित्येक लढायांची माहिती प्रकाशात येते. कित्येकाच्या संग्रही लढायांची कागदपत्रे सापडू शकतात. हा पत्रव्यवहार कित्येकदा सामान्य शिपायाच्या व्यक्तीगत संग्रहातही उपलब्ध होऊ शकतो. त्याच्याकडे एखाद-दुसरेच महत्वाचे पत्र असेल तर जहागीरदार-वतनदाराकडचा पत्रव्यवहार मोठा असेल. या बरोबरच बादशाहाचा पत्रव्यवहारही महत्वाचा पुरावा ठरतो. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे इतिहासाचा अनमोल पुराभिलेखीय पुरावा आहे. जो राज्य पुराभिलेखय पुरावा होय. इंग्रजी अमदानीतील निरनिराळ्या गव्हर्नर जनरलसचा पत्रव्यवहार, व्हॉईसरॉयचा पत्रव्यवहार, लंडनच्या इंडिया ऑफीस ग्रंथालयात संरक्षित ठेवलेला आहे. भारतीय स्वातंत्र चळवळीचे अनेक धागेदोरे, पंडीत जवाहरलाल नेहरु, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, लोकमान्य टिळक यांच्या पत्रव्यवहारातून स्पष्ट होतात. हा सारा पत्रव्यवहार इतिहासाचा अनमोल पुरावा होय. भारतीय स्वातंत्र्य चळवळीसंबंधी व हैद्राबादच्या मुक्ती संग्रामासंबधीची असंख्य कागदपत्रे, वैयक्तिक संग्रहातही असण्याची शक्यता आहे. ही कागदपत्रे, पत्रव्यवहाराच्या स्वरुपात, गुप्त व भूमिगत चळवळी संबंधात, आपल्या परिसरात घडलेल्या एखाद्या प्रसंगा संबंधात, सत्याग्रहासंबंधात किंवा सशस्त्र कारवाई संबंधात असू शकतात. अशी हजारो कागदपत्रे अभ्यासल्यानंतर गतकालीन वाटचाल अधिकाधिक स्पष्ट होत जाते. सर्व बारकाव्यासह सर्वकश, सर्वसमावेशक इतिहास रेखाटला जाऊ शकतो. मोठमोठ्या नेत्यांची पत्रे राष्ट्रीय पुराभिलेखागारात अभ्यासायला मिळतात परंतू सामान्य माणसांचे चळवळीतील योगदान हे त्यांच्या स्वतःच्या संग्रही असलेल्या कागदपत्रातूनच स्पष्ट होणार. म्हणून त्यांचा शोध घेणे हा इतिहास संशोधनाचा लेखनाचा महत्वपूर्ण भाग ठरतो. हैद्राबादच्या कॉंग्रेस कार्यालयाने, औरंगाबादच्या स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेने अशी काही कागदपत्रे संकलीत केली आहेत.

वैयक्तिक कागदपत्रांमध्ये आत्मचरित्र, रोजनिशी व इतर खाजगी पत्रांचा समावेश होतो. रोजनिशी हे वैयक्तिक लेखन असते. त्यामध्ये लेखकाने स्वतःशीच केलेला एक संवाद असतो तर खाजगी पत्रांमधून व्यक्तीच्या भावभावनांचे मोकळे दर्शन घडते.

### ८) स्थानपोथ्या व आख्याने वगैरे : -

मराठेशाहीतील काही महत्वाच्या घटनांवर आख्याने रचिली गेली होती. 'पर्णाल पर्वतगृहण अख्यान ' असेच एक अख्यान आहे. पन्हाळगडाच्या वेढ्याचा प्रसंग वर्णन करणारे अशी आख्याने व स्थानपोथ्या १२ व्या शतकापासून आपल्याकडे रचिल्या जाण्याची परंपरा निर्माण झाली होती. या पोथ्यांना महत्व प्राप्त होण्यासाठी हे अख्यान कुठल्या तरी पुराणावर आधारलेले असल्याचा दाखला उल्लेखीला जायचा. निरनिराळ्या स्थानांचे महात्म्य प्रतिपादन्याच्या दृष्टीने स्थान पोथ्या रचिल्या गेल्या. इतिहासाचा तो ही महत्वपूर्ण पुरावा ठरतो.

### ९) सरकारी कागदपत्रे : -

इंग्रजी अमदानीत ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात किंवा नंतर ब्रिटीश राज्यकारभारात भारतात प्रशासन व्यवस्था निर्माण झाली. त्यापूर्वी ही मोगल काळात प्रशासनात काही प्रमाणात एकसूत्रीपणा आला होता. परंतु ब्रिटीशांनी सरकारी दफ्तर व्यवस्थितपणे सांभाळले. प्रशासनातली कागदपत्रे व्यवस्थीतपणे रेकार्डरुममध्ये ठेवली. केंद्रीय पुराभिलेखागार उभारले. कागदपत्रांच्या गुप्ततेविषयीचा कायदा केला. या कायद्यानुसार सरकारी कागदपत्रे ३० वर्षे पर्यंत गुप्त व सरकारी मालकीची मानली जातात. ३० वर्षानंतर या कागदपत्रांची छाननी होते. महत्वाची ऐतिहासिक कागदपत्रे प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयातून, जेलमधून, डि.एस.पी. कार्यालयातून, राज्याच्या सचिवालयातून केंद्रीय अभिलेखागारात पाठवीली जातात. तेथे ती अभ्यासकांसाठी उपलब्ध होतात. भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या काळातील महत्वपूर्ण सरकारी कागदपत्रे, इंग्रज सरकारचे निर्णय, वाटाघाटी, योजना या संबंधीच्या मूळ हस्तलिखित फाईल्स, दिल्लीच्या राष्ट्रीय पुराभिलेखागारात व लंडन येथील इंडीया ऑफीस संग्रहालयात संरक्षित आहेत. हैद्राबाद मुक्ती संग्रामासंबंधीच्या असंख्य फाईल्स येथेच सापडतात. अलीकडच्या इतिहासासंबंधीची कागदपत्रे जशी या पुराभिलेखागारात संरक्षीत आहेत तशीच १७ व्या शतकापासून ते १ ९ व्या शतकापर्यंतच्या भारतातील वाटचाली संबंधातील असंख्य कागदपत्रेही तेथे आहेत. वा. सि.बेंद्रे यांनी लंडनमधील कागदपत्राच्या अभ्यास करून संभाजी महाराजांच्या चरित्राचे पुर्नमुल्यांकन केले आहे. हे अभिलेखागार व त्यातील सरकारी दस्तऐवज इतिहासाचा सर्वात जास्त पुरावा आहे. इतिहासातील मोठमोठ्या विभुतींच्या हस्ताक्षरातली पत्रे, त्यांच्या हस्ताक्षरातल्या नोंदी, निर्णय या फाईल्स मधून आढळतात. लंडन, दिल्ली शिवाय भारतातल्या प्रत्येक राज्यातल्या राजधानीत पुराभिलेखागार आहेत व पुराभिलेख संचलनालय नावाचे स्वतंत्र खाते आहे. मुंबईचे राज्य पुराभिलेखागार, मद्रास व कलकत्ता येथील पुराभिलेखागार आधुनिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहेत. हैद्राबादच्या राज्य पुराभिलेखागारात कंपनी सरकारचा पत्रव्यवहार आढळतो.

केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा परिषदा, महानगरपालिका या सार्वजनिक संस्था मधून काही प्रकाशित माहिती होत असते. विविध अहवाल प्रकाशित होत असतात. सहकारी संस्था, खाजगी संस्था याही आपली प्रकाशने, ताळेबंद व वार्षिक अहवाल प्रकाशित करतात. वर्तमानपत्रे ही प्रकाशित झालेली आहेत. ते सुद्धा पुराभिलेखागारात सुरक्षितपणे जतन करून ठेवलेली असतात. त्याचा उपयोग इतिहास लेखनासाठी होतो.

### आपली प्रगती तपासा -

१.पुराभिलेखीय साधनांचे प्रकार सांगा.

**संशोधन संस्थाचे पुराभिलेख संग्रह :-** दिल्लीचे राष्ट्रीय पुराभिलेखागार व राज्याराज्यामधील राज्य पुराभिलेखागारांशिवाय आपल्या देशात संशोधन संस्थांचे स्वतंत्र हस्तलिखित कागदपत्रांचे संग्रह आहेत. तंजावरचा सरस्वती महाल संग्रह असाच अत्यंत समृद्ध आहे. मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधीत अशी मोडी लिपीतील हजारो कागदपत्रे या संग्रहात संरक्षित आहेत. मद्रास, कलकत्ता, त्रिवेंद्रम इथे असे संग्रह आहेत. महाराष्ट्रात धुळ्याला राजवाडे संशोधन मंडळ, पुण्याला भारत इतिहास संशोधन मंडळ व पेशवा दफ्तर, कोल्हापूरला राजर्षि शाहू संशोधन संस्था, नागपूरला विदर्भ संशोधन मंडळ, नांदेडला गोदावरी संशोधन मंडळ आणि औरंगाबादला एकनाथ संशोधन मंडळ, अहमदनगरचे इतिहास संशोधन मंडळ या संशोधन संस्थांच्या संग्रहातही हस्तलिखितांचा मोठा संग्रह आहे. त्याशिवाय डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या संग्रही देखील काही हस्तलिखित आहेत.

गेल्या पन्नास पंचाहत्तर वर्षाच्या काळात महाराष्ट्रातील संशोधकांनी इतिहासाचार्य राजवाडेंची परंपरा काही प्रमाणात चालू ठेवली. खेडीपाडी धुंडाळली. मठा मंदिरातील संग्रह तपासले. जहागीरदार-वतनदारांच्या लादन्या शोधल्या व त्यातून हा हस्तलिखितांचा संग्रह उभा राहिला. पुण्याचे महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, ग.ह. खरे, नागपूरचे महामहोपाध्याय वि.वा. मिराशी, नांदेडचे वि.अं. कानोले यांनी सारे आयुष्य हस्तलिखितांच्या शोधात घालवले. त्यातून हाती आला तो महत्वपूर्ण इतिहासाचा पुरावा.

## ६.४ भारतातील अभिलेखागारे व त्यांची जडणघडण :

युरोपीय देशामध्ये अभिलेखागार या संकल्पनेचा उदय झाल्यानंतर भारतातही अभिलेखागार किंवा दफ्तरखाने सुरू झाली. मध्ययुगीन काळात भारतामध्ये अभिलेखागार आढळतात. मोगलकाळातही कागदपत्रांचे जतन केले जात असे. जतनासाठी दफ्तरखाने होती. त्यानंतर ब्रिटिशांच्या काळात व त्यांच्यानंतरही भारतात दफ्तरखान्यांचे जतन भारतातील अभिलेखागारे व त्यांची जडणघडण : भारतातील अभिलेखागारे व त्यांची जडणघडण पुढीलप्रमाणे पाहता येईल : १) मध्ययुगीन कालखंड २) मोगल कालखंड ३) ब्रिटिश कालखंड ४) स्वातंत्र्योत्तर कालखंड

### १) मध्ययुगीन कालखंड :

भारतात अभिलेखागारे मध्ययुगामध्येही असल्याचे आढळून येतात. मध्ययुगात व त्या अगोदरच्या काळामध्ये राजघराण्यांकडून त्यांच्या शासकीय कागदपत्रांचे जतन करण्याची पद्धत होती. शासकीय विभागांमध्ये दफ्तरखाने होते व प्रत्येक खात्याची स्वतंत्र दफ्तरे असत.

### २) मोगल कालखंड :

मोगल काळातही ही पद्धती तशीच चालू राहिली ; परंतु मोगल राज्यकर्त्यांनी त्यास सुरक्षिततेची जोड दिली. या काळात शासकीय दफ्तरांच्या जोडीला खासगी संस्था, व्यक्तीही स्वतःची दफ्तरखाने चालवित असत ; परंतु त्यास सामुदायिक शिस्तपद्धती नव्हती.

### ३) ब्रिटिश कालखंड :

ब्रिटिशांच्या शासन व्यवस्थेअगोदर ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल असताना त्यांनी दफ्तरखान्यात वाढ केली होती. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनी दुसऱ्या बाजीरावाकडून इ.स. १८१८ मध्ये मराठी राज्याची सूत्रे हाती घेतली. त्यावेळी त्यांनी पेशव्यांची कागदपत्रे व दफ्तरखाना मिळविला होता. एलफिन्स्टन यांनी आपले सहकारी कॅप्टन जॉन मॅकलोड यांच्याकडे हे काम सोपविले होते. नाना फडणवीस यांनी मराठ्यांचे दफ्तर अत्यंत व्यवस्थितपणे जोपासलेले होते ; परंतु कंपनी सरकारला त्यातील फक्त महसुलाशीच घेणे असल्याने त्यांचा अहवाल त्या अनुषंगाने तयार करण्यात आला होता ; परंतु तो करताना भारतीय जीवनाचा जवळून मागोवा घेण्यासाठी त्यांनी विविध भागांत विखुरलेले मराठ्यांचे दफ्तर एकत्र आणण्यास सुरुवात केली. त्यासाठी जहागीरदार, सरदार यांचे सहकार्य घेण्यात आले. अर्थात त्यातील महत्त्वाचा भाग आधीच काढून घेण्यात आल्याने उर्वरित भाग जाळून टाकण्याचाही सल्ला देण्यात आला होता. तसेच दफ्तरखाने हे अत्यंत खर्चिक असल्याने शासनाला त्यावर खर्च करण्याचा इरादा नसल्याने जिल्ह्याच्या संदर्भातील दफ्तरे त्या विभागाकडे देऊन सर्वसामान्य सूची पुणे - मुंबई येथे ठेवण्यात यावी असे सुचविण्यात आले व त्याच वेळी कागदपत्रांची सूची तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले. १८५१ ते १८६० याकाळात या स्वरूपाच्या विविध याद्या करण्यात आल्या व या याद्या प्रकाशित करण्याबाबत भारतीय ब्रिटिश शासनाची सूचना असूनही प्रकाशनात दिरंगाई करण्यात येत असे. विशेष म्हणजे हे दफ्तरखाने पाहण्याची भारतीयांवर मनाई करण्यात आली. त्यामुळे दफ्तरखाने सुरू व्हावे, कागदपत्रांची सूची प्रकाशित व्हावी यासंदर्भात चळवळ उदयास आली. न्या. म. गो. रानडे यांनी Deccan Vernacular Society चे अध्यक्ष या नात्याने पेशव्यांकडे रोजनिशा प्रकाशित करण्याचा आग्रह धरला. परिणामी त्यांच्या पहिल्या खंडात त्यांनी विस्तृत प्रस्तावना देऊन दफ्तरखान्यात असलेल्या कागदपत्रांची, दफ्तरांची ओळख सर्वसामान्य मराठी जनतेला करून दिली. १९०७ मध्ये नाशिकचे कलेक्टर ए.एम.टी. जॅक्सन यांनी दफ्तरांतील कागदपत्रांचे महत्त्व विशद करणारा अहवाल शासनास सु करून त्या संदर्भातील सूचीबाबत प्रस्ताव मांडला. याच दरम्यान दफ्तरखाने भारतीयांना संशोधनार्थ मिळावे यासाठी चळवळ उदयास आली व भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेतून त्यास रचनात्मक आकार मिळाला. मार्च १९१९ मध्ये ' भारतीय ऐतिहासिक पुराभिलेख ' आयोगाची स्थापना करण्यात आली या आयोगाच्या वेगवेगळ्या बैठकांमधून सर जदुनाथ सरकार, रशब्रुक विल्यम्स, बी. के. ठाकूर यांसारख्य सदस्यांनी अभिलेखागारे खुली ठेवण्याबाबत वारंवार मागणी केल्यामुळे १९२९ पासून या संदर्भातील धोरण स्वीकारण्यात आले. भारतीय इतिहास परिषदेच्या स्थापनेनंतर त्यास शिस्तबद्ध वळण लागले.

### ४) स्वातंत्र्योत्तर कालखंड :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने दफ्तरखाने जतन करण्यावर, त्यांची देखभाल करण्यावर विशेष लक्ष दिले. सद्यस्थितीत प्रत्येक राज्यातून विविध शासकीय, निमशासकीय, खासगी दफ्तरखाने असून त्यांच्या खर्चाची तरतूद शासनाच्या अंदाजपत्रकात केली जाते. आयोगाची दरवर्षी बैठक बोलवण्यात येऊन त्या कामावर देखरेख ठेवून मार्गदर्शन केले जाते. दिल्ली येथे 'राजकीय अभिलेखागार' ही सर्वात मोठी संस्था असून तेथील विविध प्रकारची कागदपत्रे अत्यंत मोलाची आहेत.

सारांश : अशाप्रकारे भारतात विविध अभिलेखागारे आहेत. प्राचीन काळापासून ते आधुनिक इतिहासाच्या कागदपत्रे या अभिलेखागारांमध्ये जतन करून ठेवण्यात आली आहेत. गतकाळातील माहिती जाणून घेण्यासाठी या कागदपत्रांचा उपयोग होतो.

**आपली प्रगती तपासा -**

१.भारतातील अभिलेखागारे व त्यांची जडणघडणाची माहिती द्या.

## ६.५ मुंबईचे शासकीय पुराभिलेखागार

माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनी मुंबईत कागदपत्रे, दफ्तरे यांची योग्य व्यवस्था करण्याच्या दृष्टीने पुढाकार घेऊन शासकीय कागदपत्रांसाठी दफ्तरखान्यांची व्यवस्था ठेवलेली होती. सध्या एलफिस्टनच्या कॉलेजच्या आवारात शासकीय अभिलेखागार उभारण्यात आहे. येथे ईष्ट कंपनी सरकारच्या राजवटीपासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतची महत्त्वाची शासकीय कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यात आलेली आहेत. त्यात अजूनही भर पडत आहे. हा दफ्तरखाना म्हणजे पश्चिम भारताच्या सर्वंकष इतिहासास अत्यंत उपयुक्त असा अनमोल खजिना आहे. महाराष्ट्र शासनाची या दफ्तरखान्यास राज्यातील प्रमुख दफ्तरखाना म्हणून मान्यता प्राप्त झालेली आहे.

**अ) मुंबई पुराभिलेखागाराची निर्मिती :**

व्यापार करण्याच्या निमित्ताने ब्रिटिशांनी भारतात आगमन केले आणि हळूहळू संपूर्ण भारतावर आपले राज्य प्रस्थापित केले. भारतात आल्यावर त्यांनी सर्वप्रथम सुरत येथे आपली वखार स्थापन केली होती. व्यापार वाढीसाठी त्यांना भारतात इतर ठिकाणी पत्रव्यवहार करावा लागत असे. हा पत्रव्यवहार त्यांच्या व्यापारासाठी आणि भारतात आपले पाय रोवण्यासाठी ब्रिटिशांना उपुयक्त होता. म्हणूनच त्यांनी हा पत्रव्यवहार, अन्य कागदपत्रे जपून ठेवण्यासाठी मुंबई पुराभिलेखाची स्थापना १८२१ मध्ये केली. एलफिन्स्टने या इंग्रज अधिकाऱ्याने पत्रव्यवहार जपून ठेवण्यासाठी 'सर्चर रेकॉर्ड कीपर' या पदाची निर्मिती केली. विल्यम विसेन क्राफ्ट या अधिकाऱ्याची नेमणूक या पदासाठी केली. सध्या मुंबईच्या एलफिन्स्टने कॉलेजच्या आवारात शासकीय अभिलेखागार उभारण्यात आला आहे.

**ब) मुंबई पुराभिलेखागारातील विविध विभाग :**

कागदपत्रे व्यवस्थित जतन केले जावेत, त्यांना नीट हाताळता यावे यासाठी अभिलेखांचे विभाग करण्यात आलेले आहेत. विभागाचे नाव १) पब्लिक डिपार्टमेंट २) सिक्रेट ॲन्ड पोलिटिकल डिपार्टमेंट ३) रेव्हेन्यू डिपार्टमेंट ४) कमर्शियल डिपार्टमेंट ५) मिलिटरी डिपार्टमेंट ६) ज्युडिशियल डिपार्टमेंट ७) सेपरेट डिपार्टमेंट ८) फायनान्शियल डिपार्टमेंट ९) एक्सेल सिॲस्टिकल डिपार्टमेंट १०) मरीन डिपार्टमेंट ११) मिन्ट डिपार्टमेंट

**क) मुंबई शासकीय अभिलेखागारातील कागदपत्रे** :

मुंबई शासकीय अभिलेखागारात पुढील कागदपत्रांचा समावेश होतो :

१) वखार व रेसिडेंट कागदपत्रे, २) सचिवालयातील शासकीय कागदपत्रे, ३) किरकोळ दफ्तर, ४) खासगी दफ्तर, ५) छापील दफ्तर

**१) वखार व रेसिडेंट कागदपत्रे :** वखार व रेसिडेंट कागदपत्रांमध्ये

अ) इ.स. १६५ ९ ते इ.स. १७८६ या कालखंडातील रोजनिशा (संख्या ५१३).

ब) मुंबईच्या शासकीय कार्यालयाकडे आलेली सर्व पत्रे किंवा आवक टपाल (संख्या ६४).

क) मुंबई शासनाद्वारे बाहेर पाठविलेली पत्रे / जावक टपाल (४३ खंड)

ड) इतर विविध खात्यांचे कागद १२३५ फाइल्समध्ये ठेवण्यात आले व याच विभागात २७ मालिकांमधून बखारी व रेसिडेंटचा संपूर्ण पत्रव्यवहार आहे. त्यात पुणे, बाणकोट, सुरत, कारवार, भडोच, बेलापूर, ठाणा, करंजा, सिंध, बुशीर, बसरा, कोल्हापूर, रेवा, कांटा, जंजिरा, राजपिपला, बडोदा येथील वखारी व रेसिडेंटच्या कागदपत्रांचा समवेश होतो.

**२) सचिवालयातील शासकीय कागदपत्रे :** यात भाग २, ४, ५, ३ ९ दैनंदिन्या, ११३५ आवक, १२१६ जावक, १ ९ ५ सभावृत्तांत पुस्तिका २, ९ ५, ६४४ फाईल्स यांचा समावेश आहे त्यांची मांडणी २५ मालिकांमध्ये करण्यात आलेली आहे. यात साधारणतः गोपनीय व राजकीय विभाग, न्याय प्रशासन विभाग, किनारा व जंगल खाते, पुनर्बांधणी व शेतीखाते, दुष्काळ खाते, स्वतंत्र खातेविभाग, धार्मिक बाबींचे खाते, टांकसाळ, परकीय संबंध खाते, शिक्षण, कायदा, तारायंत्र विभाग इत्यादी प्रत्येक मालिकेमध्ये दैनंदिन्या, सभावृत्तांत, कामकाजाचे ठराव, आवक / जावक इत्यादी भाग आढळतात.

**३) किरकोळ दफ्तर :** या विभागात ५८ मालिका असून त्यात विविध विभागांचा व दफ्तरांचा समावेश आहे. मुंबईमध्ये गव्हर्नरांचे दौरे, त्यांच्या खासगी सचिवाचे दफ्तर, विविध ठिकाणच्या पाहणीचे अहवाल, परकीय सत्तांबाबत अहवाल, वॉर्डेन यांचे सेलेक्शन्स, पुण्यातील वकिलाती कागदपत्रे (१७५ ९ -१७७ ९), पर्शियन आखातातील मोहिमा, मॅलेट यांच्या कलकत्ता दौऱ्याचा वृत्तांत (१७८५-८६), बगदाद मोहीम (१८०१-१८०७), गोव्याची वकालत, अरेबिया व मोरवा मोहीम, अबकारी कर पुनआकारणी समिती, पोर्तुगीज भाषेतील १७१७-१७४१ अखेरचे दफ्तराचे ६ खंड, रत्नागिरी दैनंदिनी, पावडर हाऊस समितीचा अहवाल, धारवाडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या दैनंदिन्या, मुंबई प्रवेश बँकिंग व वस्त्रोद्योग कामगार चौकशी समितीचा अहवाल, इंडिया ऑफिसकडून आलेल्या कागदपत्रांचे १६६० ते १६८ ९ या काळातील १८ खंड, दक्षिणापुरस्कार समितीचे अहवाल, सार्वजनिक शिक्षणखाते १८५१ ते १८६८ मधील कागदपत्रे, उच्च न्यायालयाचे दफ्तर इत्यादी.

**४) खासगी दफ्तर :** मुंबई अभिलेखागाराच्या ४ थ्या विभागात पूर्वीच्या राज्यकर्त्यांची त्यांची राज्ये हस्तगत करण्याबरोबर मिळविलेली दफ्तरे असून त्यामध्ये ९ ११ रूमालांची ३१ दफ्तरे आहेत, ९ १ लाख कागदपत्रे आहेत. यातील प्रमुख दफ्तरे म्हणजे अहमदनगर, नाना फडणवीसांचे बनारसकडील दफ्तर, मेणवली, जयराम स्वामी, पाटणकर, हेरवाडकर,

कोल्हापूरचे शिर्के, रहिमतपूरचे माने, चालुक्य, रा. ब. पारसनीस यांनी जमविलेले दफ्तर, सांगली, चांदवड, सावंतवाडी इत्यादींचा समावेश होतो.

**५) छापील दफ्तर** : छापील दफ्तरात वृत्तपत्रे, गॅझेटस्, छापील प्रकाशित ग्रंथ, विविध प्रकारचे विभागांचे नकाशे, वृत्तपत्रांमध्ये दि बॉम्बे क्रॉनिकल, फोर्ट सेंट जॉर्ज गॅझेट, बॉम्बे गॅझेट, टाईम्स ऑफ इंडिया, सरकारी वार्षिक अहवाल, ७०४० ऐतिहासिक नकाशे असून या विभागातील एकूण छापील कागदपत्रांच्या खंडांची संख्या साडेआठ • लाखांवर जाते. मुंबई दफ्तरखान्याच्या पर्शियन विभागात खुतूहाते शिवाजी, फुत्तूहाते अलमगिरी, हस्र अंजुमन, सावंतवाडी द्वैभाषिक फर्मान, फिरोजशहा बहामनी, पहिला अली आदिलशहा, दुसरा इब्राहिम आदिलशहा, महंमद आदिलशहा यांची फर्माने इत्यादी बाबत कागदपत्रे आहेत.

**साराश :** अशाप्रकारे १८२१ मध्ये स्थापन झालेल्या मुंबई अभिलेखागारामध्ये विविध प्रकारच्या कागदपत्रांचे जतन केलेले आहे. ब्रिटिशांच्या व्यापारापासून, त्यांच्या राजवटीपासून ते स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंतची सर्व कागदपत्रे येथे जतन करण्यात आली आहे. ब्रिटिशकालीन इतिहास जाणून घेण्यासाठी ही कागदपत्रे अतिशय उपयुक्त ठरतात.

**आपली प्रगती तपासा-**

१.मुंबईचे शासकीय पुराभिलेखागाराची माहिती अधोरेखित करा.

## ६.६ पुण्याचे शासकीय अभिलेखागार:

पेशवेकालीन कागदपत्रांची तसेच ब्रिटिशांच्या प्रशासन व्यवस्थेतील विविध प्रकारच्या कागदपत्रांची जोपासना करण्यासाठी १८८१ मध्ये पुणे अभिलेखागाराची निर्मिती करण्यात आली. जवळजवळ दोनशे ते अडीचशे वर्षांचा इतिहास जाणून घेता येईल एवढ्या कागदपत्रांचे जतन या अभिलेखागारात केलेले आहे. पुण्याचे शासकीय अभिलेखागार हे पेशवे दफ्तर, एलिनेशन ऑफिस व आता विभागीय अभिलेखागार या नावांनी ओळखले जाते. पुण्याचे शासकीय अभिलेखागार : पुण्याच्या शासकीय अभिलेखागारात कागदपत्रांची पुढीलप्रमाणे विभागणी केलेली आहे : १) कागदपत्रे, मार्गदर्शन पत्रिका, खंड प्रकाशन २) विविध भाषांमधील कागदपत्रे ३) मराठी विभागात विविध दफ्तरांचा समावेश

**१) कागदपत्रे, मार्गदर्शन पत्रिका, खंड प्रकाशन :**

न्या. रानडे यांनी कागदपत्रांची विस्तृत सूची प्रकाशित करण्याबाबत प्रयत्न केले व रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी पुढे 'मार्गदर्शन पत्रिका' प्रकाशित केली. त्यानंतर त्यांनी ४५ खंड संपादित करून प्रकाशित केले. पुण्याच्या रेसिडेन्सी कागदपत्रांचे १५ खंड सर जदुनाथ सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली व संपादकत्त्वाखाली प्रकाशित झाले. डॉ. पी. एम. जोशी, डॉ. वि.गो. खोबरेकर यांनी पेशवे दफ्तरातील कागदपत्रांच्या नव्या मालिका प्रकाशित केल्या.

**२) विविध भाषांमधील कागदपत्रे :**

पुण्यातील अभिलेखागारांमध्ये पेशव्यांच्या कालखंडातील कागद व ब्रिटिश राजवटीतील कागद हे मराठी, इंग्रजी, कानडी, गुजराथी, पर्शियन भाषेमध्ये आहेत. तसेच मोडी लिपीतील ही काही कागदपत्रे आहेत. जवळजवळ ४ कोटी कागदपत्रांचे एकूण ३९,००० रूमाल आहेत. त्यात मराठीचे २९,५००, पर्शियन ७०, गुजराथी ६५०, इंग्रजी कागदपत्रांच्या १०,५०० फाईल्स व रूमाल आहेत.

**३) मराठी विभागात विविध दफ्तरांचा समावेश :**

मराठी विभागाची १२ भागांत विभागणी केलेली असून त्यात शाहूदफ्तर, आंग्रेदफ्तर, सातारा महाराजांचे जमाव दफ्तर, कर्नाटक दफ्तर, सोलापूर दफ्तर, इनाम कमिशनच्या चौकशीसंबंधीची कागदपत्रे, ब्रिटिशपूर्व काळातील कागदपत्रे, ब्रिटिश काळातील कागदपत्रे, हक्क आयोग कागदपत्रे, सक्त कागदपत्रे यांचा समावेश आहे. तसेच जमावाच्या रूमालांचे प्रमाण मोठे असून त्यात ७५०० रूमाल आहेत.

अ) शाहू महाराजांचे दफ्तर ब) पेशव्यांचे ८ दफ्तर क) सातारा महाराजांचे दफ्तर, ड) आंग्रे दफ्तर, इ) जमाव विभाग

अ) शाहू महाराजांचे दफ्तर : हे फक्त ५६ रूमालांचे छोटेखानी आहे. शाहू महाराजांच्या मृत्यूपर्यंतचे म्हणजे १७४९ पर्यंतचे कागद त्यात आहेत. त्यानंतरची कागदपत्रे सातारा महाराजांच्या दफ्तरात समाविष्ट करण्यात आली. इ.स. १८६५ अखेरपर्यंतची मराठी कागदपत्रे या विभागात आहेत. या अभिलेखागारात २५० वर्षांची कागदपत्रे आहेत. साधारणतः शाहू महाराजांच्या दफ्तरात रोजचे हिशेब, रोखीचे हिशेब, ग्रामीण भागाचे वृत्तांत, देणग्यांच्या कीर्दी, वतन इनाम, दानधर्माचे हिशेब, शासकीय सेनाधिकाऱ्यांचे अहवाल पत्रव्यवहार, किल्ल्याच्या संदर्भात अहवाल, खासगी व घरगुतीसंबंधी कागदपत्रे, सनदा, पत्रांच्या नकला, मंत्र्यांचे अहवाल आणि इतर किरकोळ पत्रव्यवहार यांचा समावेश आहे.

ब) पेशव्यांचे दफ्तर : पेशवे दफ्तराची आठ भागात विभागणी केलेली आहे.

१) रोजकीर्द- ही दैनंदिनी म्हणून ओळखली जाते. हुजूर रोजकिर्दीत ३ प्रकारचे हिशेब असतात.

२) घडणी दफ्तर- रोजकिर्दीची सविस्तर माहिती घडणी दफ्तरातून मिळते.

३) जाबसाली - जाबसालीमध्ये पत्रव्यवहारांची कागदपत्रे आहेत.

४) आजमास - या कागदपत्रांमध्ये राज्याच्या विविध प्रांतांच्या व प्रशासकीय विभागांच्या महसुलासंबंधी अंदाज देणाऱ्या कागदपत्रांचे रूमाल असून ते पेशव्यांच्या केंद्रीय कार्यालयाकडून तयार होत असत. सालवार व प्रांतवार अशी त्यांची रचना आहे. सातारा, नगर, पुणे, उत्तर कोकण, गुजरात, मोगलाई हिंदुस्थान या विभागांमध्ये आजमास कागद आहे.

' जमाव ' विभागातील कागद ब्रिटिशांनी आपल्या वेगवेगळ्या विभागाधिकाऱ्यांकडून मागविलेले महसुलाचे अंदाज सांगणारे आहेत. या प्रकारची जवळजवड सव्वा पाच हजार दफ्तरे आहेत.

५) पागा - दफ्तरातून घोडे व त्यासाठीचे तबेले यांवरील खर्चाची व अन्य माहिती मिळते.

६) पथक - या दफ्तरात पलटणी, घोडदळ, शस्त्रगारासंबंधी खर्च, नोकरांचे पगार यासंदर्भात असलेले पथक दफ्तरात मिळतात.

७) चिटणीसांचे दफ्तर- या दफ्तरात राजकीय स्वरूपाची कागदपत्रे ठेवण्यात आली आहेत.

८) सुटी असलेली कागदपत्रे : विखुरलेले कागद कोणत्याही विशिष्ट विषयावरील नाहीत.

क) सातारा महाराजांचे दफ्तर : या दफ्तरातून साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह महाराज व शहाजी राजे यांच्या कारकिर्दीची माहिती मिळते.

**ड) आंग्रे दफ्तर :**

पश्चिम किनारपट्टीवरील आंग्रे यांचे नाविक आरमार ताब्यात घेतल्यानंतर (१८४०) एकत्रित केले विविध कागदपत्रे जतन केली आहेत. यामध्ये रोजकिर्द वेगवेगळ्या किनारी जिल्ह्यांची बंदरांची चौल, नागोठणे, कुडाळ, माणिकगड, अवचितगड, रेवदंडा, सुवर्णदुर्ग या बंदरांची माहिती आहे.

**इ) जमाव विभाग :**

पुणे अभिलेखागारामधील ' जमाव ' विभाग हा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तसेच इ.स. १८४३ मध्ये गोल्डस्मिथ यांच्याकडे इनामांची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या आयोगाकडे नागरिक, ग्रामव्यवस्थेतील विविध वंशपरंपरागत अधिकारी, देशमुख, सरदेशमुख, पाटील, कुलकर्णी यांनी कागदपत्रे सादर केली व वतनदार, सनदाप्राप्त व्यक्ती यांनी दस्तऐवज सादर केले. यात साधारणतः सनदा, निवाडापत्रे, मझहर, कैफियती, हिंदुस्थान, कोकण भागातील हिशेबाची कागदपत्र इत्यादींचा समावेश आहे. या आयोगाचे कामकाज इ. स. १८६३ पर्यंत चालू होते. वरील कागदपत्रे ही मराठ्यांच्या इतिहासातील अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर प्रकाश टाकणारी आहेत. उदा. गावचे हिशेब, कुटुंबाच्या जमिनी, इतर मिळकती, त्यांचे हिशेब यांचा समावेश होतो. तसेच दस्तऐवजांचे नगर, नाशिक, पुणे, खानदेश कोकण, गुजरात, सातारा, मोगलाई असे विभाग केलेले होते. या कागदपत्रांतून संशोधकांना मराठी राज्याचा विस्तार, दळणवळणाची साधने, वजने, मापे, विविध प्रकारचे कर, विविध शासकीय अधिकार पदे, सामाजिक व आर्थिक स्थिती बद्दलचे अनेक पुरावे मिळतात. याशिवाय येथील काही कागद शिवकालाचे व विजापूरच्या आदिलशाहीचेही आहेत. दहाव्या विभागात ब्रिटिश राजवटीच्या प्रशासनाची सर्व कागदपत्रे आहेत. जमिनीच्या पाहणीचे अहवाल व तत्संबंधी कागदपत्रे दख्खनच्या कमिशनरच्या कार्यालयातील पत्रव्यवहार सरदार संस्थानिक यांच्याकडील वकिलांचे अहवाल, पत्रव्यवहार व अमानतदारांच्या नोंदवह्या, पुणे, नगर व खानदेश, दक्षिण कर्नाटक येथील जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेले अहवाल, हिशेब, पत्रे यांचे येथे एकत्रिकरण करण्यात आलेले आहे. एलफिन्स्टन यांच्या सूचनेनुसार विविध प्रकारची माहिती गोळा करण्यात आलेली होती. या कागदपत्रांमधून १९ व्या भारताच्या पश्चिम शतकाच्या

इतिहासाबद्दल महत्त्वपूर्ण माहिती मिळते. पुणे अभिलेखागारातील अकराव्या विभागात हक्क आयोगाच्या मराठी कागदपत्रांचे रूमाल आहेत. पर्शियन विभागातील रूमालांमधून पेशव्यांच्या विविध वकिलांकडून आलेले अहवाल व पत्रव्यवहार आहेत. जमाव विभागात बरेच रूमाल गुजरातकडील मुंबई इलाक्याचे आहेत. इंग्रजी विभागातील सर्व कागदपत्रे फाईल्समध्ये ठेवलेली असून त्याच्या सोळा याद्या आहेत. त्यातील १ ते ४ याद्यांमध्ये इनाम आयोग, ५ व्या यादीत सातारा रेसिडेन्सीचे पत्रव्यवहार, व्या यादीत पुण्याच्या वकिलातीचे कागद, छापील पुस्तके, ७ व्या यादीत उतारे व यादी, ८ वी कार्यालयासंबंधी, ९ वी यादी सरदारांकडील वकील, १० वी दख्खन कमिशनर, ११ वी यादी उत्तरेकडील प्रशासन, १२ व १३ वी यादी गॉर्डन व ग्रिफिथ या इनाम आयुक्तांची १४ मध्ये पुन्हा इनाम आयोग, शेवटच्या १५ व १६ व्या यादीत कोकण विभागांची कागदपत्रे आहेत.

सारांश : अशाप्रकारे इतिहासकालीन कोट्यावधी कागदपत्रांचे जतन पुण्याच्या अभिलेखागारामध्ये केलेले आहे. भारतीय इतिहासकारांना तसेच संशोधकांना इतिहास लेखनासाठी हा अभिलेखागार अतिशय उपयुक्त ठरला आहे.

**आपली प्रगती तपासा –**

१.पुण्याचे शासकीय अभिलेखागारावर टीप लिहा.

## ६.७ भारत इतिहास संशोधक मंडळाचा दफ्तरखाना :

ब्रिटिशांना भारतात आपले साम्राज्य बळकट करण्यासाठी येथील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती समजावून घेण्याची गरज निर्माण झाली. यातून साम्राज्यवाद्यांनी भारतीय इतिहास लेखनाला प्रारंभ केला. मात्र या इतिहासलेखनातून त्यांनी त्यांच्या संस्कृतीविषयीचा अभिमान आणि भारतीय संस्कृतीबद्दलचा दुराभिमान व्यक्त होत होता. या इतिहासलेखनामुळे भारतीयांना सुद्धा आपला इतिहास जगासमोर मांडण्याची प्रेरणा मिळाली आणि त्यातून राष्ट्रवादी लेखनाला सुरुवात झाली. भारतीय इतिहास जगासमोर मांडला जावा, यासाठी भारतीय इतिहासविषयक कागदपत्रांची जमवाजमव करणे आणि त्यांचे जतन करणे असे प्रयत्न होऊ लागले.

**अ) भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना :**

ब्रिटिशांनी साम्राज्यवादी दृष्टिकोनातून इतिहास लेखनाला प्रारंभ केला तसा भारतीयांनी लोकांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी लेखनास प्रारंभ केला. या इतिहासकारांच्या प्रयत्नांना संस्थात्मक रूप प्राप्त झाले. ७ जुलै, १९१० रोजी विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना केली.

**ब) भारत इतिहास संशोधक मंडळाचे उद्देश :**

वि. का. राजवाडे यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना करून त्याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली :

१) भारतीय इतिहासाच्या साधनांचा शोध घेणे, त्यांचा संग्रह आणि जतन करणे.
२) भारतीय ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करणे आणि त्यांचे प्रकाशन करणे.
३) भारतीय इतिहास व संस्कृतीचे अध्ययन व संशोधन करणे.

**क) भारत इतिहास संशोधक मंडळातील कागदपत्रे :**

भारत इतिहास संशोधक मंडळात विविध प्रकारची कागदपत्रे, हस्तलिखिते, विविध भाषांमधील कागदपत्रे आहेत. विविध विषयांवरील ३३,००० पेक्षा अधिक हस्तलिखिते, ग्रंथ उपलब्ध आहेत. जुनी हत्यारे, वस्तू, नकाशे, आलेख अशी विविध साधने देखील येथे उपलब्ध आहेत. प्रशासकीय, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सामाजिक अशा विविध प्रकारची कागदपत्रे येथे आहेत. विविध प्रकारच्या, दफ्तरांचे जतन करून त्यामध्ये विशिष्ट प्रकारच्या ग्रंथांचे कागदपत्रांचे जतन केले आहे.

१) ग. ह. खरे यांचे दफ्तर २) ओतुरकर दफ्तर ३) काळे - दाभोळकर दफ्तर, ४) मेहेंदळे दफ्तर ५) केळकरांचे दफ्तर ६) चंद्रचुडांचे दफ्तर ७) तुळशीबागवाले यांचे दफ्तर

१) ग. ह. खरे यांचे दफ्तर : या दफ्तरामध्ये वाईकर देशपांडे, जुन्नरकर - देशपांडे, लक्ष्मेश्वर देसाई अशा इतिहासकालीन अनेक घराण्यांविषयीची माहिती जतन करून ठेवली आहे.

२) ओतुरकर दफ्तर : ओतुरकरांनी जमा केलेल्या दफ्तरात मोडी व पर्शियन भाषेतील कागदपत्रे उपलब्ध आहेत.

३) काळे - दाभोळकर दफ्तर : काळे- दाभोळकर यांनी ग्वाल्हेर येथील शिंदे यांच्या लष्करासंबंधीचे हिशेब व अन्य माहितीविषय कागदपत्रे जतन केली आहेत

४) मेहेंदळे दफ्तर : भाऊसाहेबांच्या बखरीतील काही भाग, हनुमंत स्वामी बखर, शकावल्या व जंत्री अशी अनेक कागदपत्रे या दफ्तरात आढळतात.

५) केळकरांचे दफ्तर : स्वामी चिदंबर दीक्षित व बापू गोखले यांचा पत्रव्यवहार, पुरंदर व वज्रगड, विजयदुर्ग, जंजिरा येथील हक्कासंबंधीचे कागदपत्रे केळकरांनी जमा केले आहे.

६) चंद्रचुडांचे दफ्तर : या दफ्तरात ३० हजार कागदपत्रे आहेत. उत्तरेकडील मराठ्यांच्या राजकारणासंबंधी हे सर्व कागदपत्रे आहेत.

७) तुळशीबागवाले यांचे दफ्तर : यामध्ये ५० हजारांहून अधिक कागदपत्रे उपलब्ध आहेत. वैयक्तिक दैनंदिनी, रोजचे हिशेब, रोजकीर्द याप्रकारच्या कागदपत्रांचा समावेश यामध्ये आहे.

सारांश : अशाप्रकारे अनेक कागदपत्रे, हस्तलिखिते, ग्रंथांचा समावेश भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये आहे. भारताच्या भव्य इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी येथील साधने अतिशय उपयुक्त ठरतात. वि. का. राजवाडे यांनी या मंडळाची स्थापना करून भारतीय इतिहासाचा अनमोल ठेवा भारताला प्राप्त करून दिला आहे.

## ६.८ कोल्हापूर येथील पुराभिलेख :

ब्रिटिशपूर्व काळात रायगडावर मराठ्यांचा दफ्तरखाना तयार केला गेला होता. मराठ्यांच्या राज्य व्यवस्थेविषयी, तसेच निरनिराळे व्यवहारासंदर्भात कागदपत्रे या दफ्तरखान्यात होती. मात्र मोगलांनी हा दफ्तरखाना जाळून तत्कालीन सर्व कागदपत्रे नष्ट केली. त्यानंतर राजर्षी शाहू महाराज व पेशवे काळातील पत्रव्यवहार, कागदपत्रे तसेच इतर साधनांचे जतन कोल्हापूर येथील पुराभिलेखनात केलेले आहे. इ.स. १६६४ ते १८८४ या काळातील कागदपत्रे या पुराभिलेखागारात आहेत.

कोल्हापूर येथील पुराभिलेखांची सूची पुढीलप्रमाणे आहे : १) गावानुसार दफ्तरता २) सर लष्करी जबाबी ३) अठरा ४) पागा ५) हुजुर खजिना ६) हुजूर जमेनिसी ७) कागल जमाबंदी ८) कागल नगदी ९) बावडा दफ्तर १०) विशाळगड नगदी ११) गुरु महाराज १२) इचलकरंजी जबाबी कारखाना १३) चिटणीस दफ्तर

१) गावानुसार दफ्तरता : १८४४-१८६० या दरम्यान महसूलाशी संबंधित कागदपत्रांचे जतन या संग्रहामध्ये केलेले आहे

२) सर लष्करी जबाबी : १८४०-१८६० या काळातील लष्करातील आर्थिक बाबींशी संबंधित कागदपत्रांचा समावेश या संग्रहामध्ये आहे.

३) अठरा कारखाना : १८४०-१८६० या काळातील इनाम म्हणून प्राप्त झालेल्या जमिनीच्या कागदपत्रांचा समावेश या संग्रहात आहे.

४) पागा : १८४०-१८६० या काळातील पागांविषयक कागदपत्रे १९८ रूमालांमध्ये जतन करून ठेवली आहेत.

५) हुजुर खजिना : १८४०-१८६० मधील कोल्हापूर संस्थानांच्या आर्थिकबाबींविषयी तसेच खजिन्याविषयीची माहिती या संग्रहात जतन करून ठेवली आहे.

६) हुजूर जमेनिसी : कोल्हापूर संस्थानच्या विविध विभागांच्या आर्थिक व्यवहारांविषयीचे कागदपत्र ३१० रूमालांमध्ये जतन करून ठेवली आहे.

७) कागल जमाबंदी : १८४०-१८६० या काळातील संस्थानिकांचा मासिक खर्च याविषयी माहिती १०४ रूमालांमध्ये जतन करून ठेवली आहे.

८) कागल नगदी : किरकोळ खर्चाविषयी माहिती १२२ रूमालांमध्ये जतन करून ठेवले आहे.

९) बावडा - दफ्तर : या दफ्तरामध्ये २९९ रुमाल आहेत. यामध्ये शिवकाळासंबंधीची माहिती जतन केलेली आहे.

१०) विशाळगड नगदी : १७६०-१८४८ मधील जमाबंदीविषयीची माहिती १९९ रूमालांमध्ये जतन करून ठेवली आहे

११) गुरु महाराज : १८७०-१९९५ मधील संस्थानिक व पोलिटिकल एजंट यांच्यातील पत्रव्यवहार या संग्रहामध्ये आहेत १२) इचलकरंजी जबाबी : हा संग्रह ६० रूमालांमध्ये असून याद्वारे कोल्हापूरचे छत्रपती व इचलकरंजीचे जहागिरदार यांच्या संबंधाविषयीची माहिती मिळते.

१३) चिटणीस दफ्तर : १७५०-१८६० दरम्यानचे संस्थानिक आणि जहागिरदार यांचा पत्रव्यवहार १०० रूमालांमध्ये जतन केला आहे.

सारांश : कोल्हापूर पुराभिलेखागारामध्ये विविध भाषांवर आधारित ५,७३३ ग्रंथ आहेत. १६००-१९ ६० या दरम्यानचा महाराष्ट्राचा इतिहास जाणून घेण्यास हे ग्रंथ अतिशय उपयुक्त ठरतात. अशाप्रकारे इतिहास संशोधनाच्या दृष्टीने हा पुराभिलेखागार अतिशय उपयुक्त आहे.

आपली प्रगती तपासा-

१. भारत इतिहास संशोधन मंडळातील ऐतिहासिक कागदपत्राची माहिती द्या.

___

___

___

२. कोल्हापूर अभिलेखागाराचे वर्णन करा.

___

___

___

## ६.९ डेक्कन कॉलेजमधील संग्रहालय व अभिलेखागार

ब्रिटिशांच्या कालखंडात पुणे येथे डेक्कन कॉलेजची स्थापना झाली. इ.स. १९२५ मध्ये सातारा येथे रा. ब. पारसनीस यांनी ऐतिहासिक कागदपत्रांचा जो संग्रह केला तो संग्रह पारसनीस दफ्तर म्हणून जतन करून ठेवला आहे. पुढे या दफ्तरामध्ये अनेक ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन केले जाऊ लागले. त्यामुळे हा दफ्तरखाना प्रचंड झाला. मुंबई शासनाने हा दफ्तरखाना विकत घेतला आणि साताऱ्यातून या दफ्तरखान्याचे पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये स्थलांतर करण्यात आले. १७५० ते १८५० मधील इतिहासावर प्रकाश टाकणारी विविध संदर्भातील कागदपत्रे, भूर्जपत्रे, हस्तलिखिते, ताम्रपट, ग्रंथ, नकाशे, आराखडे अशा विविध साधनांचा समावेश आहे.

डेक्कन कॉलेजमधील संग्रहालय व अभिलेखागार विषयी माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) कागदपत्रांची वर्गवारी २) खासगी कागदपत्रे ३) हस्तलिखिते ४) नकाशे आणि चित्रसंग्रह

१) **कागदपत्रांची वर्गवारी:** डेक्कन कॉलेजमधील संग्रहालयात २५ हजार कागदपत्रे आहेत. त्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणे केलेली आहे. अ) छत्रपतींचे चाळीस कागद ब) पेशव्यांचे दीड हजार क) पेशवे दरबारातील इतर सरदारांचे बारा हजार ड) हैदराबादच्या निजामाशी झालेल्या पत्रव्यहारांचे चार हजार इ) म्हैसूरच्या हैदर - टिपूबरोबरच्या पत्रव्यवहारांचे तीनशे फ) पोर्तुगीज, फ्रेंच व ब्रिटिश यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारांचे नऊशे ग) हिंगण्यांबरोबर झालेल्या पत्रव्यवहारांचे साडेसातशे ह) खर्चाच्या लढाईचे साडेसहाशे कागद ळ) कित्तुरची लढाई जंजिरा मोहिम व पहिल्या इंग्रज मराठा युद्धासंबंधी बाराशेपेक्षा अधिक कागदपत्रे.

२) **खासगी कागदपत्रे:** या दफ्तरखान्यात काही खासगी स्वरूपाचीसुद्धा कागदपत्रे आहेत. निंबाळकर, खेमकर - सावंत, चिटणीस, केसकर, मोहिते, घाडगे, महाडिक, देशमुख, होळकर, नागपूरकर, भोसले, शिवापूरचे देशपांडे, नेवाळकर, रायरीकर, बिवलकर, जगताप, देसाई, निपाणीचे देसाई, रायरीकर, नेवाळकर इत्यादींचे खासगी स्वरूपाची कागदपत्रे उपलब्ध आहेत.

३) **हस्तलिखिते:** डेक्कन कॉलेजच्या अभिलेखागारात कागदपत्रांबरोबर विविध प्रकारची हस्तलिखितांचेसुद्धा जतन केलेले आहे. इकबाल नामा - ए - जहांगिरी ' हे हस्तलिखित ' इन्शा - ए - अबु फझल ' हा अबुल फझल यांच्या पत्रव्यवहारांचा संग्रह, सुलसत - उल - तवरिख हा भारताच्या इतिहासावर लिहिलेला ग्रंथ, महाभारताचे पर्शियन भाषेत झालेले भाषांतर ' यझम्नामा ' हा ग्रंथ, ऐने - अकबरी, निमत खान - ए - अली यांचा समग्र लेखसंग्रह, ' मीरत - ए - सिकंदरी ' हा गुजरातचा इतिहास, ' भूपती किरत ' हे सूरदासांचे हिंदीतील काव्य, शिवाय भूर्जपत्रे, ताम्रपट अशी साधने सुद्धा या अभिलेखागारात आहेत.

४) **नकाशे आणि चित्रसंग्रह:** विविध प्रकारच्या नकाशांचा समावेशही या अभिलेखागारात केला आहे. खर्डा, श्रीरंगपट्टण, तळेगाव, वॉर्टलू या युद्धाची व्यूहरचना दाखविणारे नकाशे आहेत. मुघल साम्राज्याचा नकाशा, शिवाय मुंबई, कोलकाता, मद्रास, प्लासीची लढाई, परकीय देश अशा विविध नकाशांचे जतन येथे केलेले आहे. नकाशांबरोबर विविध प्रकारच्या चित्रांचे देखील संग्रह येथे केलेले आहेत. त्यामध्ये फोर्ट विल्यम, वखार, तापी तीरावरून दिसणारे सुरत शहर, नागपूर, मुंबई या शहरांची चित्रे आहेत.

अशाप्रकारे डेक्कन कॉलेज येथील संग्रहालयात शासकीय, निमशासकीय तसेच खासगी प्रकारच्या कागदपत्रांचे जतन करून ठेवण्यात आले आहे. विविध प्रकारची हस्तलिखिते, नकाशे, चित्रांचे संग्रह देखील केलेले आहेत. इतिहास संशोधकाच्या दृष्टीने या अभिलेखागाराला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**आपली प्रगती तपासा-**

पुरातत्वीय अवशेषाच्या संदर्भात डेक्कन कॉलेज येथील अभिलेखागाराचे महत्त्व अधोरेखित करा.

## ६.१० सारांश

इतिहासलेखनात संदर्भ साधने खुप महत्वाची असतात. साधनांशिवाय इतिहास लेखन अर्थहीन आहे. लेखनकला अवगत झाल्यानंतर सालपत्रावर कागदावर हस्तलिखित व टाईपराईचा व मुद्रण कलेचा शोध लावल्यानंतर कागदावर अनेक प्रतीत छापले जाऊ लागले. मध्ययुगीन व आधुनिक काळात इतिहासाची हे लिखित पुरावे इतिहास लेखनासाठी साधने म्हणून वापरले जाऊ लागले. ही साधने विविध भागा नील अभिलेखागारात जतन करून ठेवलेली असतात. लिखित साधने सापडल्यानंतर ती या अभिलेखागारात दिली जातात. राष्ट्रीय अभिलेखागारे राज्य अभिलेखागारे विद्यापीठांची अभिलेखागारे जिल्हा अभिलेखागारे खासगी अभिलेखागारे असतात.उदाहरणार्थ दिल्ली अभिलेखागार बिकानेर अभिलेखागार मुंबई पुराभिलेगार भारत इतिहास संशोधक मंडळ अभिलेखागार पुणे दफ्तरखाना अभिलेखागार कोल्हापूर येथील अभिलेखागार असे अभिलेखागारे असून तेथील कागदपत्रे इतिहास लेखनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहेत. तेथे विविध प्रकारच्या फाईल्स व रुमालां मध्ये कागदपत्रे जतन करून ठेवलेली असतात. तसेच गतकालातील वर्तमानपत्रे सुद्धा असतात. बदलत्या काळानुसार साधनांचे स्वरूप बदलत आहे. आज फोटो, ऑडिओ व व्हिडिओ रेकॉर्डिग ही साधने सुद्धा वापरली जातात. विविध अभिलेखागारे तंत्रज्ञानाचा वापर करून ई स्वरूपात आपल्या पोर्टलद्वारे साधने उपलब्ध करून देतात. ते पीडीएफ स्वरूपात असतात.

## ६.११ प्रश्न

प्र. १ भारतातील अभिलेखागारे व त्यांची जडणघडण यावर माहिती लिहा.

प्र. २ पुण्याच्या शासकीय अभिलेखागाराची माहिती द्या.

प्र. ३. भारत इतिहास संशोधक मंडळाचा दफ्तरखाना यावर थोडक्यात माहिती लिहा.

प्र. ४. कोल्हापूर येथील पुराभिलेखासंदर्भात माहिती लिहा.

प्र. ५. डेक्कन कॉलेजमधील संग्रहालय व अभिलेखागार याविषयी माहिती लिहा.

## ६.१२ संदर्भ

१) गॅराघन जीएस, गाइड टू हिस्टोरिकल मेथड, न्यूयॉर्क, फोर्डहॅम युनिव्हर्सिटी प्रेस, १९९६.

२) गॉटस्टेक, एल., अंडरस्टँडिंग हिस्ट्री, न्यूयॉर्क, अल्फ्रेड ए. नॉफ, १९५१.

३) मॅकमिलन जे.एच. आणि शुमंदर एस., रिसर्च इन एज्युकेशन: अ कन्सप्च्युअल इंत्रोडक्शन बोस्टन एमए: लिटल ब्राउन आणि कंपनी, १९८४.

४) शेफर आर.जे., गाईड तू हिस्टोरिकल मेथड, इलियन्स: डोर्सी प्रेस, १९७४.

५) शांता कोठेकर, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, तिसरी आवृत्ती, २०११.

६) श्रीनिवास सातभाई, इतिहास लेखन शास्त्र, विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११.

७) प्रभाकर देव, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९७.

८) सरदेसाई बी. एन., इतिहास लेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४

९) गोखले शोभना, पुराभिलेख विद्या,

१०) गायकवाड, डॉ सरदेसाई, हनुमाने - इतिहास लेखन शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१

❄❄❄❄❄❄❄

# ७

# तथ्य संकलन पद्धती

**घटक रचना**

७.१ उद्दिष्टे

७.२ प्रस्तावना

७.३ इतिहासाचे साधन म्हणजे काय?

७.४ ऐतिहासिक साधनांचे महत्व व स्वरूप

७.५ ऐतिहासिक साधनांचे प्रकार

७.६ ऐतिहासिक साधनसामुग्री संकलन पद्धती

७.७ सारांश

७.८ प्रश्न

७.९ संदर्भ

## ७.१ उद्दिष्टे

या प्रकरणाच्या अभ्यासातून आपणास –

१) ऐतिहासिक साधनसामुग्री म्हणजे काय समजेल.

२) ऐतिहासिक साधनांचे महत्व समजेल.

३) ऐतिहासिक माहिती संकलनाच्या साधनांची माहिती होईल.

४) ऐतिहासिक माहिती गोळा करण्याच्या पद्धती समजतील.

५) ऐतिहासिक माहिती संकलनाची प्रक्रिया समजेल .

६) ऐतिहासिक माहिती गोळा करतांना येणाऱ्या अडचणी समजतील .

## ७.२ प्रस्तावना

संशोधकाने संशोधन समस्येची व संशोधनाचा दृष्टीकोन निश्चिती केल्यानंतर कोणत्या पद्धतीने संशोधन करायचे आहे? हे निश्चित करायचे असते. संशोधकाला आपल्या संशोधन समस्येच्या संदर्भात विविध विश्वसनीय माहिती गोळा करावी लागते. प्राप्त झालेल्या विश्वसनीय माहितीच्या आधारावर निष्कर्ष काढावे लागतात. ऐतिहासिक साधनांशिवाय इतिहास इतिहास लेखन करता येत नाही. ऐतिहासिक साधने ही इतिहास लेखनाचा मूळ आधार आहेत. गोळा केलेल्या ऐतिहासिक साधनांच्या आधारेच इतिहास लेखन करता येते. म्हणूनच 'Introduction of

the study of History' या ग्रंथात 'No Document, No History' असे प्रो. लॉजीलॉस व सेनबॉस यांनी म्हटले आहे.

संशोधकांनी संशोधनाची समस्या व संशोधांचा दृष्टीकोन निश्चित केल्यानंतर संशोधन करण्याकरिता कोणती साधने वापरावी लागतील? संशोधांच्या अनुषंगानी आवशक साधने कुठे सापडतील? संशोधनासाठी माहिती गोळा करण्याच्या कोणत्या पद्धती आहेत? माहिती गोळा करण्यासाठी कोणत्या पद्धतीचा वापर करायचा? संशोधन सुरु करण्यापूर्वी अशा विविध प्रश्नांची उत्तरे संशोधकाला शोधायची असतात.

## ७.३ इतिहासाचे साधन म्हणजे काय?

ऐतिहासिक संशोधनात साधनांचे साधनांचे महत्वपूर्ण स्थान आहे. साधनांशिवाय इतिहास लेखन करता येत नाही. साधन या शब्दाला इंग्रजीत Source म्हणतात. प्रो. लॉजीलॉस व सेनबॉस यांनी Source याऐवजी Document या शब्दाचा उपयोग केला आहे. 'Introduction of the study of History' या ग्रंथात 'No Document, No History' असे प्रो. लॉजीलॉस व सेनबॉस यांनी म्हटले आहे, यावरून इतिहास व साधने यातील सबंध लक्षात येतो. इतिहासाचे साधन म्हणजे इतिहास संशोधन करीत असतांना पुरावा म्हणून वापरण्यात येणाऱ्या वस्तू व दस्ताऐवज, किवा ज्याद्वारे घटनेची माहिती मिळते, त्यास इतिहासाची साधने म्हणतात. प्राचीन काळापासून इतिहास लेखन विविध पद्धतीने व वेगवेगळ्या स्वरुपात झाले आहे. "केवळ साधनांचा अभ्यास इतिहास-लेखनासाठीपुरेसा नाही, मात्र त्याखेरीज इतिहास आकार घेत नाही हेही तितकेच सत्य आहे." असे आर्थर मार्विक इतिहास लेखनात साधनांचे महत्त्व स्पष्ट करताना म्हणतात.

इतिहास एक शास्त्र आहे. शास्त्रामध्ये पुरावा आवश्यक असतो. 'साधन' हे शास्त्राचा मुख्य आधार असतो. शास्त्रामध्ये कोणतीही बाब पुराव्याशिवाय सिद्ध करता येत नाही. हाच नियम इतिहासालाही लागू होतो. इतिहासालाशास्त्राचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी ऐतिहासिक साधने इतिहास लेखनासाठी महत्त्वाची आहेत .यावरून साधनांचे महत्त्व लक्षातयेते. ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करतांना इतिहासकाराकडे ऐतिहासिक दृष्टीकोन असायला पाहिजे. त्यासोबतच इतिहासकाराच्या मनामध्ये साधनांविषयी संशय निर्माण करता आल पाहिजे. सत्य घटनांचा शोध घेण्याच्या क्षमतेसोबतच साधनांचे परीक्षण करण्याची दृष्टी असणे आवशक आहे. भूतकाळातील घटना, समाज जीवन व संस्कृतीचे पुरावे म्हणजेच इतिहासाची साधने आहेत. इतिहासाचे साधन म्हणजे ज्याच्या साहाय्याने आपणाला इतिहासाच्या एखाद्यापैलूचे किंवा प्रत्यक्ष इतिहासाचे ज्ञान होते त्याला साधन म्हणतात.

## ७.४ ऐतिहासिक साधनांचे महत्व व स्वरूप

इतिहासात भूतकाळात घडून गेलेल्या मानवी जीवनातील घटना व घडामोडींचा अभ्यास केला जातो. भूतकाळात घडून गेलेल्या मानवी जीवनातील घटनांचा व परिवर्तनाचा आलेख इतिहासात आढळतो. ऐतिहासिक साधनांशिवाय इतिहास लेखन होऊ शकत नाही. इतिहास लेखनाकरिता ऐतिहासिक साधन सामुग्री कागदपत्रे, इमारती, मंदिरे, कलाकृती, कलावस्तू इत्यादी स्वरुपात उपलब्ध असते. संशोधकाला भूतकाळातील ज्ञान तत्कालीन कागदपत्रे व वस्तूंच्या माध्यमातून प्राप्त करावे लागते. ऐतिहासिक साधन सामुग्री ही इतिहास लेखनाचा

मुख्य आधार असतो. ऐतिहासिक साधन सामुग्रीच्या आधारे संशोधकाला भूतकाळातील घटनांची पुनर्निर्मिती करावयाची असते. ऐतिहासिक साधनाचे महत्व "No document, no history" सर्वपरिचित विधानातून स्पष्ट होते. भूतकाळातील घटनांची पुनर्बांधणी करण्यासाठी संशोधकाला आवशक ऐतिहासिक साधने विविध ठिकाणाहून गोळा करावी लागतात. विविध ठिकाणाहून गोळा केलेल्या साधनांमधून विस्वसार्य साधनांची निवड संशोधकाला करावी लागते.

संशोधकाला ऐतिहासिक माहिती विविध ठिकाणाहून गोळा करून ऐतिहासिक माहिती देणाऱ्या पुराव्यांची, कागदपत्रांची विस्वसनीयता तपासणे हा संशोधकासमोरचा प्रश्न असतो. या सर्व प्रश्नांना उत्तरे शोधत संशोधकाला पुरावे गोळा करावी लागतात. History in a Changing World या ग्रंथात जाफ्रे बॅरक्ला यांनी संशोधकाला सापडणाऱ्या पुराव्यांचे वर्णन अपूर्ण, सदोष व तुटपुंजे असे केले आहे, संशोधक या प्राप्त पुराव्यामधून भूतकाळातील महत्वाच्या घटनांचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो असे म्हणतात. आर्थर मार्विक यांनीही The Nature of History या ग्रंथात ऐतिहासिक साधनांच्या संदर्भात सखोल चर्चा केली आहे, संशोधकांनी ऐतिहासिक साधने कुठे शोधायची? ऐतिहासिक साधनांचे स्वरूप काय असते? ऐतिहासिक साधनाशिवाय इतिहास लिहिता येत नाही काय? असे अनेक प्रश्न आर्थर मार्विक यांनी उपस्थित केले आहे.

आर्थर मार्विक म्हणतात कि, इतिहास लेखनाकरिता फक्त साधनांचा अभ्यास पुरेसा नाही, मात्र साधनांशिवाय इतिहास आकारही घेत नाही. एकोणिसाव्या शतकापासूनच इतिहाचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करण्यावर इतिहासकारांनी भर दिला आहे. त्या अनुषांगणी ऐतिहासिक साधनांची वर्गवारी, ऐतिहासिक साधनांचा वापर कसा करायचा, ऐतिहासिक साधनांमधून सत्य कसे शोधायचे याचे काही नियम ठरवून देले आहे. इतिहासाच्या व्याप्ती बरोबरच संदर्भ साधनांचीही व्याप्ती वाढत आहे. संशोधकाला संशोधन विषयाच्या अनुषंगानी व काळानुसार साधनांची निवडकरावी लागते.काळानुसार साधनांचे स्वरूप बदलत जाते. जसे इतिहास पूर्व काळातील संशोधन करायचे असल्यास पुरातात्विक साधनांचाच वापर करावा लागेल. पुराव्यांच्या म्हणजे साधनांच्या स्वरूपात काळानुसार बदल होत जातो. विसाव्या शतकात संदर्भ साधनांची व्याप्ती वाढली आहे.कोणतीही घटना घडत असताना तिचे स्वरूप ऐतिहासिक असेलच असे नाही.

## ७.५ ऐतिहासिक साधनांचे प्रकार

इतिहास हे शास्त्र आहे व शास्त्रात पुराव्याशिवाय कोणतीही बाब सिद्ध करता येत नाही. साधने हि इतिहास लेखनाचा आत्मा आहेत. इतिहास लेखनासाठी उपलब्ध साधनांची वर्गवारी करणे उपयुक्त ठरते. ऐतिहासिक साधनांच्या वर्गीकरणाच्या प्रामुख्याने तीन प्रमुख पद्धतींचा अवलंब केला जातो. त्यामध्ये साधनांच्या निर्मितीचा काळ, लिखित साधनांचा आशय व निर्मितीमागचा हेतू लक्षात घेऊन इतिहासकारांनी ऐतिहासिक साधनांचे दोन भागात वर्गीकरण केले आहे. १) प्राथमिक साधने २) दुय्यम साधने या दोन साधनांचेही अनेक उप प्रकार आहेत.

**प्राथमिक साधने :-**

प्राथमिक साधने इतिहास संशोधनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहेत. प्राथमिक साधनांना मूळ साधने म्हणूनही ओळखले जाते. घटना घडत असतांना किंवा घटनेच्या जवळच्या कालखंडात लिहिल्या गेलेली हस्तलीखे किवा वस्तुरूप पुरावे यांना प्राथमिक साधने म्हटले जाते. प्राथमिक साधनाशिवाय इतिहासाला मूर्त रूप येत नाही. संशोधक अभ्यास करीत असलेल्या काळातील समकालीन साधने ही प्राथमिक साधने आहेत. संशोधक एखाद्या घटनेचा किंवा प्रसंगाचा अभ्यासकरीत असेल तर, घटनेत सहभागी असलेल्या व्यक्तींची घटनेसंबंधीची कागदपत्रे प्राथमिक साधनांत मोडतात. त्याशिवाय त्या घटनेत सहभागी नसलेली, परंतु ती घटना प्रत्यक्ष डोळ्यांनीपाहिलेल्या व्यक्तींनी त्याच वेळी लिहून ठेवलेली कागदपत्रे ही प्राथमिक साधने आहेत. संशोधन विषयाच्या काळातील एखाद्या व्यक्तीने लिहून ठेवलेले आत्मवृत्त, दिनवृत्त हे प्राथमिक साधनआहेत. एखाद्या व्यक्तीने समकालीन व्यक्तीसंबंधी केलेलेलिखाणही प्राथमिक साधन मानले जाते.

लिखित साधनांशिवाय संशोधन काळातील इमारती, स्थापत्य, मंदिरे, पुरावषेस, मूर्ती, नाणी यांचाही प्राथमिक साधनात समावेश होतो. प्रा. कार्ल गुस्तावसन यांनी The Preface to history या ग्रंथात “एका ठिकाणी सापडणारी, त्याशिवाय इतरत्र न सापडणारी, मूळ स्वरूपातील, त्यात कोणताही बदल न झालेली, किवा त्यावर कोणतीही प्रक्रिया न झालेली समकालीन साधने” अशी प्राथमिक साधनांची व्याख्या केली आहे. डॉ. शांता कोठेकर यांनी इतिहास तंत्र व तत्वज्ञान या ग्रंथात प्राथमिक साधने कशाला म्हणायची याबद्धल पुढील प्रमाणे माहिती सांगितली आहे.

१) संशोधन विषयाच्या काळातील समकालीन साधने .

२) संशोधन विषयाचा घटनेत सहभाग असलेल्या व्यक्तींची त्यासबंधीची कागदपत्रे.

३) प्रत्यक्ष घटनेत सहभागी नसलेलीपरंतु प्रत्यक्ष घटना डोळ्यांनी पाहिलेल्या यक्तिने लिहून ठेवलेली कागद पत्रे.

४) एखाद्या व्यक्तीचे आत्मवृत्त, दिनवृत्त.

५) एखाद्या व्यक्तीने समकालीन व्यक्ती सबंधी लिहिलेले लिखाण.

६) समकालीन वस्तुरूप साधने .

**दुय्यम साधने:-**

इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण करण्याच्या दृष्टीने प्राथमिक व दुय्यम या दोन मुख्य भागात विभागले आहेत. संशोधनाच्या दृष्टीकोनातून प्राथमिक साधनाइतकेच दुय्यम साधनांना महत्व आहे. एखादी घटना घडून गेल्यानंतर स्मरण शक्तीच्या आधारावर लिहिलेले ग्रंथ, त्याच प्रमाणे भूतकाळातील घटनेबाबत केवळ ऐकीव माहितीच्या आधारे लिहिलेले ग्रंथांचा दुय्यम साधनांमध्ये समावेश होतो. प्राथमिक साधनावरच दुय्यम साधने अवलंबून असतात, त्यामुळे साधने दुय्यम असली तरी त्यांची विस्वसार्यता प्राथमिक साधनाएवढीच असते.

दुय्यम साधने ही संशोधन विषयाचे साकल्याने ज्ञान होण्यासाठी आणि त्या विषयाची प्राथमिक चौकट तयार करण्यासाठीसंशोधकाला प्रथम दुय्यम साधने अभ्यासायची असतात. त्याच प्रमाणे संशोधन विषयाच्या उपलब्ध माहितीतील उणीवा शोधण्यासाठी दुय्यम साधने उपयोगी ठरतात. दुय्यम साधनामुळे संशोधन कार्याला नवी दिशा मिळू शकते.

## ७.६ ऐतिहासिक साधनसामुग्री संकलन पद्धती

ऐतिहासिक माहिती ही इतिहास लेखनाचा मुख्य आधार आहे. संकलितकेलेल्या माहितीच्या आधारेच इतिहास लिहला जातो. संशोधनाचा विषय व्यवस्थित समजून घेतल्यानंतर संशोधनासाठी आवशक साधने गोळा करणे महत्वाचे असते. ऐतिहासिक माहितीवरच संशोधांची चौकट उभी राहते. संशोधनाच्या अनुषांगणी साधनसामुग्री गोळा करण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर संशोधकांनी करायचा व कोणत्या पद्धतीने करायचा हे निश्चित झाल्यानंतर संशोधनासाठी आवशक साधनसामुग्री कशी गोळा करायची? असे प्रश्न उपस्थित होतात. संशोधनाकरिता ऐतिहासिक साधन सामुग्री गोळा करण्यासाठी साधारणपणे चार पद्धतींचा वापर केला जातो.

१) सर्वेक्षण किवा निरीक्षण पद्धती.

२) प्रश्नावली पद्धती

३) मुलाखत पद्धती

४) टिपणे तयार करण्याची पद्धती.

संशोधकाला संशोधनाकरिता साधनसामुग्री गोळा करण्यासाठी आवश्यकतेनुसार साधन सामुग्री गोळा करण्याच्या पद्धतींचा वापर करावा लागतो. कोणत्या पद्धती वापरावयाच्या हा निर्णय संशोधन विषयाच्या स्वरूपानुसार संशोधकांनी घ्यावयाचा असतो.

**सर्वेक्षण किवा निरीक्षण पद्धती :-**

निरीक्षण म्हणजे काळजीपूर्वक पाहणे. आपल्या दैनदिन जीवनात आपण अनेक गोष्टी पाहत असतो, आपल्या त्या पाहण्यामागे कोणताही हेतू नसतो, ते पाहन प्रासंगिक असते त्यामागे कोणताही उद्देश नसतो. माहिती गोळा करण्याच्या सर्वेक्षण किवा निरीक्षण पद्धतीमध्ये निरीक्षण हे प्रासंगिक पाहण्यापेक्षा वेगळे आहे. यात एका निश्चित उद्देशांनी पद्धतशीरपणे सर्वेक्षण केले जाते. सर्वेक्षण किवा निरीक्षण पद्धतीमध्ये संशोधक त्याच्या सर्व ज्ञानेंद्रियांचा एकात्मिक पद्धतीने वापर करतो. संशोधनासाठी माहिती गोळा करण्यासाठी हे सर्वोत्तम वैज्ञानिक साधनांपैकी एक आहे.

संशोधनासाठी माहिती गोळा करीत असतांना निरीक्षण काळजीपूर्वक आणि पद्धतशीरपणे केले पाहिजे. निरीक्षणाच्या आधारे डेटा संकलित केला जातो, त्याचे विश्लेषण केले जाते, प्रक्रिया केली जाते आणि संशोधनासाठी वापरली जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे निःपक्षपाती निरीक्षणाची गरज. निरीक्षकाचा अनुभव स्वतःसाठी अनोखा आणि विलक्षण असतो. सामाजिक विज्ञानातील संशोधनासाठी डेटा संकलनाची ही सर्वात उपयुक्त पद्धत आहे. माहिती गोळा करण्याची निरीक्षण पद्धत सर्वात जुनी आहे.सर्वेक्षणाचे किवा निरीक्षणाचे तंत्र

शास्त्रज्ञ आणि सामाजिक शास्त्रज्ञ दोघेही वापरतात. निरीक्षण पद्धत अविश्वसनीय आहे अशी टीका केली जाते, परंतु ती अधिक शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास मर्यादांवर मात करता येते.डेटा संकलनाची ही पद्धत सर्वात जुन्या पद्धतींपैकी एक आहे. जेव्हा वस्तुनिष्ठता, पक्षपातीपणापासून मुक्त, विश्वासार्हता आणि पद्धतशीरता यांसारखे निकष पाळणे आवशक आहे. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडांतील विषयांचे संशोधन करताना सर्वेक्षण किवा निरीक्षण पद्धतीचा वापर केला जातो. संशोधन विषयाच्या अनुषंगाने ज्या ज्या ठिकाणी माहिती मिळेल त्या स्थळांना भेटी देऊन आवशक माहिती संशोधक गोळा करीत असतो. प्राचीन व मध्ययुगीन इतिहास संशोधनासाठी सर्वेक्षण किवा निरीक्षण पद्धत उपयोगाची आहे. सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करीत असतांना, सर्वेक्षणाचे तंत्र अवगत असावे लागते. प्रत्येक मनुष्य आपल्या सभोवतालच्या गोष्टींचे निरीक्षण करतो, बऱ्याच वेळा ते प्रासंगिक आणि कोणत्याही हेतूशिवाय असते. मात्र संशोधनासाठी माहिती गोळा करीत असतांना सर्वेक्षण किवा निरीक्षण एका विशिष्ठ हेतूने केले जाते, आणि तपशीलवार डेटा संकलित केला जातो. एखादी  घटना किंवा वर्तन निरीक्षणाद्वारे रेकॉर्ड केले जाते. त्यासाठी नियोजन करावे लागते सोबतच सर्व ज्ञानेंद्रियांचा वापर करावा लागतो. सर्वेक्षण किवा निरीक्षण पद्धतीद्वारे संकलित केलेल्या माहितीमुळे विज्ञान आणि सामाजिक विज्ञानांसह अनेक विषय विकसित झाले आहेत. मानववंशशास्त्रज्ञांनी निरीक्षणाच्या आधारे अनेक सिद्धांत तयार केले आहे. सर्वेक्षण पद्धतीचा वापर करतांना संशोधकांनी खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे, असे डॉ. श्रीनिवास सातभाई यांनी आपल्या इतिहास लेखनशास्त्र या ग्रंथात सांगितले आहे.

१) संशोधन विषयासंदर्भात स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती गोळा करावी.

२) सर्वेक्षण करतांना सबंधित स्थळांची वैशिष्टे, कालखंड, स्थानिक महत्व इत्यादी सूक्ष्म नोंदी घ्याव्यात.

३) सर्वेक्षणातून हाती आलेल्या माहितीचे चिकित्सक पद्धतीने विस्लेषण करणे.

४) प्राप्त झालेल्या माहितीची इतर पुराव्यांच्या आधारे विश्वसनीयता तपासून पहावी.

५) संशोधन विषयासंदर्भात काही नवीन माहिती मिळते का? याची नोंद घ्यावी.

६) सर्वेक्षणातून मिळणारी माहिती कुठल्या माहितीशी साम्य दर्शविणारी आहे?ते पाहावे.

७) संकलित केलेल्या माहितीच्या आधारे अचूक निष्कर्ष काढावेत.

सर्वेक्षण किवा निरीक्षण पद्धतीच्या माध्यमातून मिळणाऱ्या माहितीचा उपयोग संशोधनात प्राथमिक साधने म्हणून केला जातो.

**प्रश्नावली पद्धती:-**

आधुनिक किवा समकालीन इतिहास संशोधनाकरिता माहिती संकलनासाठी प्रामुख्याने प्रश्नावली पद्धतीचा अवलंब केला जातो. प्रश्नावली पद्धतीद्वारे संशोधनाकरिता अप्रत्यक्ष रित्या माहिती संकलित केल्या जाते. प्रश्नावली पद्धतीने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण करून विश्वासार्ह निष्कर्ष काढून त्यांचा वापर पुरावा म्हणून संशोधक करू शकतो. सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहासाच्या संशोधनाकरिता माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली

पद्धतीचा उपयोग केला जातो. प्रश्नावली पद्धतीमुळे वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या अनेक व्यक्तींकडून संशोधनाशी सबंधित माहिती गोळा करता येते. प्रश्नावली पद्धतीच्या माध्यमातून गोळा केलेल्या माहितीच्या आधारे इतिहास लेखन करतांना तटस्थपणे मांडणी करणे आवश्यक असते.

प्रश्नावली पद्धतीद्वारे विषयाच्या संदर्भात माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली अचूक व काळजीपूर्वक तयार करावी लागते. प्रश्नावली पद्धतीमध्ये संशोधकाला संशोधन विषयाच्या अनुषंगाने माहिती गोळा करण्यासाठी विविध स्थळांना भेटी न देता वेगवेगळ्या व्यक्तींकडून माहिती मिळविणे हा प्रश्नावली पद्धतीचा उद्देश असतो. प्रश्नावली पद्धतीद्वारे माहिती संकलित करीत असतांना संशोधनाच्या संदर्भात कोणत्या मुद्यांची माहिती गोळा करायची व ती माहिती कोणाकडून गोळा करायची या बाबींचा विचार संशोधकाला करावा लागतो.

प्रश्नावली तयार करतांना घ्यावयाची काळजी:- प्रश्नावली कशी तयार करायची या संदर्भात डॉ. शांता कोटेकर यांनी त्यांच्या इतिहास संशोधन : स्वरूप व तंत्र या ग्रंथात पुढील प्रमाणे सांगितले आहे. १) प्रश्नावलीची विभागणी दोन भागात करावी, पहिल्या भागात उत्तरे देणाऱ्या व्यक्तीची वैयक्तिक माहित, त्याचे नाव, पत्ता, वय, व्यवसाय,शिक्षण इत्यादी प्रश्न असावेत, या माहितीवरून माहिती देणाऱ्याची पात्रता कळते. २) प्रश्नावलीच्या दुसऱ्या भागात विषयासंबंधीचे प्रश्न असावेत. ३) प्रश्नाचे स्वरूप वस्तुनिष्ठ व स्पष्ट असावे. ४) प्रश्नांच्या क्रमात मुद्यांची सरमिसळ होणार नाही याची दक्षता संशोधकांनी घ्यावे. ५) संशोधनाच्या संदर्भात वेगवेगळ्या मुद्यांची माहिती हवी असल्यास प्रश्नांची वेगवेगळ्या भागात वर्गवारी करावी. ६) संशोधक मिळालेल्या माहितीचा दुरुपयोग करणार नाही याचा विस्वास संशोधकाने उत्तरदात्याला देणे आवश्यक आहे, कारण त्यामुळे उत्तर मनमोकळे पणे मिळू शकतील.

प्रश्नावली पद्धतीद्वारे माहीती गोळा करतांना प्रश्नांची उत्तरे दोन पद्धतीने संशोधक प्राप्त करू शकतो. एक उत्तरे कशी द्यायची याचे स्वातंत्र्य उत्तरदात्याला देणे. दुसरे प्रश्नांची उत्तरे प्रश्नावलीत नमूद करणे. संशोधकाला एखाद्या घटनेविषयी मत जाणून घ्यायचे असेल तर प्रश्नाचे पर्याय देणे सोयीचे ठरते. संशोधकाला विस्तृत माहिती हवी असेल तर उत्तरदात्याकडून खुल्या स्वरुपात उत्तर मागविणे आवश्यक असते.

प्रश्नावली पद्धतीद्वारे माहिती गोळा करतांना येणाऱ्या अडचणी:- संशोधकाला प्रश्नावली पद्धतीद्वारे माहिती गोळा करतांना साधारणत: पुढील प्रमाणे अडचणी येतात. १) प्रश्नावली दिलेल्या सर्व उत्तरदात्यांकडून माहिती भरून येईल याची शक्यता कमी असते. २) कधी कधी पूर्ण प्रश्नावल्या भरून येत नाही. ३) काही प्रश्नांची उत्तरे संदिग्ध असतात, उत्तरे मुद्याला धरून नसतात.

प्रश्नावली पद्धतीद्वारे मिळालेल्या माहितीमधून संशोधकाला आवश्यक ती माहिती निवडावी लागते, त्या माहितीचे पृथकरण करून वर्गीकरण व विश्लेषण करावी लागते. त्यातून निष्कर्ष काढून उपलब्ध माहितीचा पुरावा म्हणून संशोधक आपल्या संशोधनात करू शकतो.

**मुलाखत पद्धती :-**

संशोधनासाठी माहिती गोळा करतांना माहिती गोळा करण्याच्या इतर साधनांप्रमाणेच गतकालीन घटनेसंदर्भात समकालीन व्यक्तीची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन संशोधनासाठी

आवश्यक माहिती गोळा करता येते. समकालीन विषयासाठी संशोधन करतांना माहिती गोळा करण्याची मुलाखत पद्धती उत्तम साधन आहे. मुलाखत पद्धतीमुळे संशोधन विषयाशी सबंधित व्यक्तींकडून जास्तीत जास्त माहिती मिळविता येते. संशोधकांनी मुलाखत पद्धतीचा वापर करतांना मुलाखतीची उद्दिष्टे,स्वरूप व व्याप्ती याचा विचार करणे आवशक असते. मुलाखत पद्धती हा प्रश्नावली पद्धतीचा दृष्य प्रकार आहे. मुलाखत पद्धतीमध्ये प्रश्नकर्ता व उत्तरदाता यांचा प्रत्यक्ष संपर्क येत असतो. त्यामुळे जास्तीत जास्त माहिती संशोधकाला मिळू शकते.

**मुलाखत पद्धतीच्या मर्यादा:-** डॉ. श्रीनिवास सातभाई यांनी त्यांच्या इतिहास लेखनशास्त्र या ग्रंथात मुलाखत पद्धतीच्या काही मर्यादा पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

१) समकालीन इतिहास लेखनाकरिताच मुलाखत पद्धतीचा उपयोग होतो.

२) मुलाखत पद्धतीद्वारे मिळालेली माहिती अचूक असेलच याची खात्री नसते.

३) मुलाखतीमधून मिळालेली माहिती पूर्वग्रहदुषित असू शकते.

४) संशोधकाला अपेक्षित असलेलीचं माहिती मिळेल असे नाही.

५) मुलाखत ही जीवंत व्याक्तीचीच घेता येते.

**मुलाखत पद्धतीचे फायदे:-** समकालीन संशोधन विषयासाठी माहिती गोळा करण्याची मुलाखत पध्दती हे उत्तम साधन आहे. मुलाखत पद्धतीचे फायदे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) मुलाखत पद्धतीमध्ये संशोधक व मुलाखतदार यांच्यात प्रत्यक्ष संवाद होत असल्यामुळे मुलाखतदाराची मानसिकता पाहुन संशोधकाला हवी ती माहिती विचारता येते.

२) मुलाखत पद्धतीद्वारे प्रत्यक्ष संवाद होत असल्यामुळे संशोधन विषयाच्या संदर्भात नवीन मुदे, नवीन पैलू समोर येतात, त्यामुळे संशोधनाला एक नवीन दिशा मिळते.

३) मुलाखत ही ध्वनीफितीच्या स्वरुपात जतन करून ठेवता येते, मुलाखत ध्वनी मुद्रित अथवा मुलाखतीचे चित्रीकरण केल्यास पुन्हा पुन्हा अभ्यासासाठी संशोधकाला उपयुक्त ठरू शकते.

**मुलाखत घेतांना घ्यावयाची काळजी:-** संशोधकाला मुलाखतीमधून मिळणारी माहिती पुरावा म्हणून वापरायची असल्यामुळे मिळालेल्या माहितीची विस्वसनियता पडताळून पाहणे गरजेचे आहे. डॉ. शांता कोटेकर यांनी मुलाखत घेतांना संशोधकांनी पुढील प्रमाणे मुलाखतीची पूर्व तयारी करावी असे सांगितले आहे.

१) संशोधकाला मुलाखतदाराची संपूर्ण माहिती असायला पाहिजे.

२) मुलाखत घेतांना मुलाखत घेणारा व देणारा यांच्यात सुसंवाद निर्माण व्हायला पाहिजे.

३) मुलाखतदाराची मानसिकता, त्याच्या आवडी निवडी, विचार प्रणाली तसेच मुलाखत दाराला सोयीची वेळ असेल तीच वेळ मुलाखतीसाठी निधारित केली पाहिजे.

४) संशोधन विषयासाठी अपेक्षित माहितीची पूर्वकल्पना मुलाखतदाराला संशोधकाने दिल्यास जास्तीत जास्त माहिती मिळविता येईल.

५) मुलाखतीपूर्वी विचारावायाच्या प्रश्नांची निश्चिती करावी.

संशोधनाकरिता माहिती गोळा करण्यासाठी मुलाखत घेणे हे एक तंत्र आहे, त्याचा कौशल्याने वापर करणे आवश्यक आहे. मुलाखतीद्वारे मिळणारी माहिती ही संशोधक पुरावा म्हणून वापरत असल्यामुळे मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीची विस्वसनियता तपासून पाहणे आवशक आहे. संशोधनासाठी माहिती गोळा करण्याची मुलाखत पद्धत उपयुक्त असली तरी यातील मर्यादा लक्षात घेऊन संशोधकांनी मुलाखत पद्धतीचा उपयोग करणे उचित ठरेल.

**आपली प्रगती तपासा-**

**१. ऐतिहासिक संशोधनातील प्रश्नावली पद्धतीचे महत्त्व वर्णन करा.**

**२. मुलाखत पद्धतीतील तंत्रे स्पष्ट करा.**

## ७.७ सारांश

संशोधकाने संशोधन समस्या दृष्टीकोन निश्चिती केल्यानंतर संशोधकाला आपल्या संशोधन विषयाच्या संदर्भात विविध विश्वसनीय माहिती गोळा करावी लागते. ऐतिहासिक साधनांशिवाय इतिहास इतिहास लेखन करता येत नाही. ऐतिहासिक माहिती मिळविण्यासाठी कोणत्या स्त्रोत साधनांचा वापर संशोधकाने करावयाचा कोणत्या पद्धतीने करायचा याचा विचार संशोधकांनी करायचा असते. संशोधनाकरिता सर्वेक्षण किवा निरीक्षण पद्धती, प्रश्नावली पद्धती, मुलाखत पद्धतीच्या माध्यमातून साधन सामुग्री गोळा केल्या जाते. माहिती गोळा करण्याच्या या सर्व पद्धतीच्या मर्यादा व फायदेही आहेत. संशोधक संशोधन विषयाच्या अनुषंगानी माहिती गोळा करण्याकरिता एक किवा सर्वच माहिती संकलनाच्या पद्धतींचा उपयोग करणे उचित ठरेल.

## ७.८ प्रश्न

अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) इतिहासाचे साधन म्हणजे काय?

२) ऐतिहासिक साधनांचे प्रकार सांगा?

३) ऐतिहासिक साधन सामुग्री संकलन पद्धतींची माहिती लिहा?

ब) टीप लिहा

१) प्राथमिक साधने

२) दुय्यम साधने

## ७.९ संदर्भ

१) डॉ. शांता कोठेकर, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर,२००५.

२) डॉ. श्रीनिवास सातभाई, इतिहास लेखनशास्त्र, शशिकांत पिंपळापुरे, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, २०११.

३) प्रभाकर देव, इतिहास - एक शास्त्र, कल्पना प्रकाशन नांदेड, २००२.

४) प्रशान्त देशमुख, इतिहासाचे तत्वज्ञान, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, २००५.

❄❄❄❄❄❄❄

# ८

# स्त्रोतांचे विश्लेषण आणि सामान्यीकरण

**घटक रचना**


८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ सामान्यीकरण

८.३ ऐतिहासिक दृष्टिकोण आणि सामान्यीकरण

८.४ सामान्यीकरणाची उपयुक्तता

८.५ सामान्यीकरणातील अडचणी

८.६ ऐतिहासिक घटनांचे विश्लेषण

८.७ सारांश

८.८ प्रश्न

८.९ संदर्भ


## ८.० उद्दिष्टे

हे प्रकरण वाचल्यानंतर

- सामान्यीकरण आणि त्याची संशोधनातील अपरिहार्यता समजून येईल
- माहिती स्त्रोत आणि त्यांच्यापासून मिळालेल्या माहितीचे सामान्यीकरण याची माहिती मिळेल
- ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण व विश्लेषणासाठी उपयुक्त बाबी समजतील

## ८.१ प्रस्तावना

इतिहास वस्तुस्थितीने मांडला जातो आणि वस्तुस्थितीचे संकलन करण्याच्या माध्यमाला सामान्यीकरण असे म्हणतात. ऐतिहासिक तथ्ये सादर करण्याच्या संपूर्ण व्यवस्थेमध्ये सामान्यीकरण मूळ आहे. इतिहासकार भूतकाळाची माहिती गोळा करतात आणि कालक्रमानुसार क्रमबद्ध करतात. त्यानंतर त्याचा अर्थ प्रकट होतो. ऐतिहासिक सामान्यीकरण म्हणजे तथ्यांमधील संबंध होय. ही सरलीकरणाची एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. संशोधक सर्व घटनांमधील एकमेकांशी संबंधीत अशी सामान्य वैशिष्ट्ये शोधून काढतो. सामान्यीकरण या कल्पनेत ऐतिहासिक बाबी एकमेकांना सदृश असतात. या साधनाद्वारे इतिहासकारांना त्यांची संशोधन सामग्री समजते आणि इतरांना त्यांची तथ्ये समजून देण्याचा प्रयत्न ते करतात. घटना इत्यादींचे विश्लेषण आणि स्पष्टीकरण नेहमीच सामान्यीकरणाद्वारे केले जाते.

## ८.२ सामान्यीकरण

सामान्यीकरण करणे ही खूप गुंतागुंतीची प्रक्रिया आहे, ज्यात इतिहास लेखनातल्या सर्व महत्वाच्या ठिकाणांची स्पष्ट माहिती असते. ऐतिहासिक माहिती काळजीपूर्वक गोळा केली जाते, तपासली जाते आणि छाननी केली जाते, गटबद्ध केली जाते, नंतर विविध वेगळ्या प्रकारच्या प्रक्रियेतून ती माहिती जात असते. याकरिता भिन्न कौशल्य आवश्यक आहे, जिथे ऐतिहासिक संश्लेषण सादर करण्यासाठी बरेच निरीक्षण आवश्यक आहे. ही प्रक्रिया आपल्याला असंख्य तथ्यांमधील कोणत्या प्रकारचे नातेसंबंध अस्तित्त्वात आहे हे सांगते. हे विश्लेषणाचे उच्च स्वरूप आहे.

सामान्यीकरणातून तयार केलेल्या सूत्राने काही स्वीकारलेल्या मानकांची पुष्टी करता येते. ऐतिहासिक तथ्ये गोळा करताना नवीन नोंदी शोधण्यासाठी सखोल शोध घेऊन परिस्थितीशी सामोरे जावे लागते ज्यायोगे माहितीतील कमतरता दूर करता येते. सामान्यीकरणामध्ये नावे व तारखा वगळता संपूर्ण कालावधीसाठी एकसमानता मिळवून तयार केलेली सूत्रे वापरली जातात. सूत्रात वापरलेली भाषा फक्त वर्णनात्मक शब्दांचा वापर करून सोपी, अचूक आणि स्पष्ट असणे आवश्यक आहे. सामान्य तथ्ये आणि अद्वितीय तथ्यांमधील फरक असणे आवश्यक आहे. सामान्य तथ्ये अशा घटना असतात ज्यांची वारंवार पुनरावृत्ती होते. आपल्याला व्याप्ती आणि कालावधी निश्चित करावा लागतो. समान सूत्रानुसार सर्व वैयक्तिक प्रकरणे एकत्रित करून समावेशक तथ्ये एकत्र केली जातात व अखेर जुळणारे निष्कर्ष कढले जातात.

एखादी विशिष्ट प्रथा किंवा सवय कशी विकसित झाली आहे, याबद्दल आपण एखादे सूत्र तयार करणार असल्यास, त्यातून पुढे गेलेल्या विविध गोष्टी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. सवयीतील सर्व बदलांची तुलना केल्यास, उत्क्रांतीचा सामान्य मार्ग निश्चित करणे शक्य होईल. सर्व निष्कर्ष एका ठराविक साच्याच्या घटनेच्या पुनरावर्तीची पुष्टी करतात आणि त्या घटनेतील सामान्य वैशिष्ट्ये दर्शवितात. बी. शेख अली यांच्या मते, जेव्हा ठरविक कृतींचे इतर अनुकरण करतात तेव्हा तो पहिला टप्पा आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अनुकरण व मान्यता यानंतर नविन विचार रुजतो. वापर परंपरा बनते आणि त्याचे रुपांतर अनिवार्य रीती किंवा नियमात होते. ही परंपरा आणि अधिकाराची शेवटची अवस्था आहे. शेवटी काही समाजामध्ये या नियमावर टीका केली जाते आणि तर्कसंगत बदलावर परिणाम होतो. सुधारणांचा हा टप्पा आहे. एखाद्या इतिहासास टप्प्याटप्प्याने अभ्यास करण्यास, निसर्गाचा शोध घेण्यास आणि योग्य शब्दांत वर्णन करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. हे वेळ आणि रिक्त स्थानांमध्ये अस्तित्त्वात असलेल्या सामान्य तथ्यांचा संदर्भ देते. येथे नक्की काय केले जाते ते म्हणजे प्रत्येक टप्प्यावर सवयीतील बदलाची पद्धत काळजीपूर्वक पाळणे आणि इतर भागातल्या सवयीच्या संदर्भात हे तपासून पहाणे आणि त्या पद्धतीमध्ये समानता अस्तित्त्वात असल्याचे शोधून काढणे. जर उत्तर सकारात्मक असेल तर असा निष्कर्ष काढू शकतो की बहुतेक प्रत्येक बाबतीत वर्तणुकीची पद्धत समान आहे. जर आपल्याला युद्धासाठी जबाबदार घटक जाणून घ्यायचे असतील तर आपल्याला खोल मानवी हेतू, महत्त्वाकांक्षा, लोभ याची चौकशी करण्याची गरज आहे.

जर आपल्याला एखाद्या वर्णनाचे आकलन करण्यासाठी सूत्राची आवश्यकता असेल तर दोन नैसर्गिक प्रलोभन आहेत ज्याचा आपण काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे. जेव्हा एखादी व्यक्ती स्वत:ची स्तुती करते तेव्हा आपण त्याच्या सर्व दाव्यांवर विश्वास ठेवण्यापूर्वी आपण सावधगिरी बाळगली पाहिजे. दुसरे म्हणजे काल्पनिक बाबींचा वापर करण्याचा धोका टाळला पाहिजे.

## ८.३ ऐतिहासिक दृष्टिकोण आणि सामान्यीकरण

सामान्यीकरणे हाती घेतलेल्या काही इतिहासकार आणि समाजशास्त्रज्ञ म्हणजे- कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, मार्क ब्लॉच, फर्नांड ब्रूडेल, एरिक हॉब्सबॉम, इमॅन्युएल वालरस्टाईन, कॉम्त यांनी घटनांचे वर्गीकरण, विश्लेषण व सामान्यीकरण केले आहे. त्यानंतर ज्ञानामध्ये प्रगती झाली. टप्प्याटप्प्याने सर्व संकल्पना आणि ज्ञान प्रकट होते त्यासाठी मुलभूत अभ्यासाची गरज आहे. या ऐतिहासिक ज्ञानाचे काही प्रकार आहेत. सत्य किंवा काल्पनिक; मूर्त किंवा अमूर्त; आणि वैज्ञानिक किंवा सकारात्मक. अखेरचा टप्पा अर्थात पॉझिटिव्ह स्टेज म्हणजेच प्रत्यक्षवादी दृष्टिकोनाचा आहे. कॉम्त यांनी मापन केले की या टप्प्यात विज्ञान आणि उद्योग यांचे वर्चस्व आहे. म्हणूनच मध्यकालीन काळाच्या इतिहासावरील ईश्वरी संकल्पनेचा धार्मिक प्रभाव त्याच्याद्वारे नाकारला गेला. कॉम्तने हा वैज्ञानिक आगमनात्मक मार्ग, ज्यायोगे तथ्यांचे निरीक्षण, प्रयोग आणि नंतर सामान्य कायद्यांची निर्मिती यांचा समावेश होता, त्यास इतिहासाच्या लेखनातही लागू केला.

अनुभववाद्यांच्या मते परंपरा, अनुमान, सैद्धांतिक तर्क किंवा कल्पनाशक्तीद्वारे मिळविलेले ज्ञान हे ज्ञानाचे योग्य रूप नाही. तसेच धार्मिक प्रणाली, तार्किक अनुमान, नैतिक उपदेश आणि साहित्य यांच्याद्वारे मिळविलेले ज्ञानाचे शरीर सत्यापित आणि विश्वसनीय नाहीत. त्यांच्या मते अनुभवाने मिळालेले किंवा अनुभवजन्य ज्ञान अधिक उपयुक्त व विश्वसनीय असते. सकारात्मकवादी किंवा प्रत्यक्षवादी इतिहासकार असे मानत होते की ज्ञानाचे एकमात्र वैध स्वरुप म्हणजे ज्याचे सत्य प्रस्थापित केले जाऊ शकते. सकारात्मकवादी आणि अनुभववादी इतिहासकार दोघेही ज्ञानाचे अव्यवहार्य आणि सत्य न समजणारेअसे अनुमान नाकारतात. जॉन लॉक, जॉर्ज बर्कले, डेव्हिड ह्यूम आणि जॉन स्टुअर्ट मिल हे महत्त्वाचे अनुभवजन्य इतिहासकार होते. त्यांच्या तत्वज्ञानाचा मुख्य गाभा असा आहे की सर्व ज्ञानात केवळ अनुभव आणि अनुभवांच्या माध्यमाने प्राप्त झालेल्या तथ्यांचा समावेश असतो. तर, अतींद्रिय शक्तीने जगाविषयी कोणतेही केलेला दावा अथवा तार्किक अनुमानांना वास्तविकतेचा पाया नसतो. इतिहासतज्ञांनी अनुभववादी तत्वानुसार भूतकाळातील संबंधात असलेल्या पुराव्यांवर भरवसा ठेवला पाहिजे. समकालीनांनी भावनांच्या आधारे अभ्यास न करता वस्तुस्थितीदर्शक दृष्टीकोणातून जर इतिहासकारांनी या स्त्रोतांकडे बारकाईने पाहिले तर ते भूतकाळाचे खरे चित्र सादर करू शकतात. रांकेच्या मते भूतकाळाचे विश्लेषण वर्तमानकाळातील परीस्थीतीनुसार न करता भूतकाळातील प्रचलित समाजव्यवस्थेच्या मापदंडानुसार व्हायला हवी. मागील काळातील लोकांची मनोवृत्ती व वागणूक त्या युगाच्या मानसिक व प्रचलित मापदंडाद्वारे समजली पाहिजे. इतिहासकारांच्या समकालीन मापदंडाने याकडे पाहिले जाऊ नये. रांके ऐतिहासिक स्त्रोतांच्या उपयुक्ततेबाबत बाबतीत गंभीर असला तरी त्यांच्यावर त्याचा आंधळा विश्वास नाही. ऐतिहासिक स्त्रोत हे विश्वसनीय असले पाहिजे हे त्याला मान्य होते.

भांडवलशाही सामाजिक निर्मितीच्या विरोधाभासाचे स्पष्टीकरण करणे ही मार्क्सची प्राथमिकता होती. भांडवल निर्मितीची आर्थिक व्याख्या आणि त्याचे मानवी जीवनातील करी हा मार्क्सने त्यांचे जीवनकार्य असल्याचे मानले. एखाद्या वस्तूचे मूल्य हे उत्पादन करण्यासाठी आवश्यक असलेल्या सामाजिकरित्या आवश्यक श्रम वेळेद्वारे निश्चित केले जाते. कामगार शक्ती ही एक वस्तू आहे व त्याचबरोबर वेतनाचीही देवाणघेवाण होते. कामगार शक्तीचे मूल्य कामगार आणि त्याच्या कुटुंबाचे अस्तित्व आणि देखभाल करण्यासाठी आवश्यक असलेल्या मूल्याच्या समान असते. शेतीवर काम करणाऱ्या शेतमजुराला दिल्या जाणाऱ्या वेतनापेक्षा त्याच्या क्रयशक्तीचे मूल्य अधिक असते.

सबल्टर्न हा ऐतिहासिक लेखनप्रवाह अलीकडील काळात विकसित होऊ लागला आहे. सबल्टर्न अभ्यासानुसार समाजातील निम्न वर्गातील लोकांना प्रकाशात आणले. सबल्टर्न हा शब्द निम्न वर्ग आणि दुर्लक्षित असणाऱ्या सामाजिक गटांचे वर्णन करतो आणि त्यांचा इतिहास जाणून घेण्यात रुची दर्शवतो. गायत्री स्पिवाक यांनी सबल्टर्न इतिहासलेखनाच्या मर्यादा दाखवताना हे स्पष्ट केले कि वंचित घटकाबद्दल इतिहास लेखन करणाऱ्या इतिहासलेखकाना प्रस्थापित ऐतिहासिक परीभाषेतच बोलावे लागते. त्यांना स्वताची वेगळी परिभाषा तयार करता येत नाही. त्यामुळे नवीन अनुभव किंवा नव निर्मिती जुन्याच भाषेत मांडल्यामुळे त्यांच्या लेखनाला मर्यादा येतात. शोषित किंवा वंचित प्रवर्गाच्या समस्या आणि त्या विषयी भारतीय महिलांच्या परिस्थितीकडे लक्ष वेधून घेत आहे, कारण वसाहतवादी व प्रस्थापित इतिहासलेखनाच्या पुरुषवाचक सज्ञांचा वापर असल्यामुळे महिलांच्या समस्यांना वस्तुस्थितीदर्शक लेखन करणे अवघड जाते. अशा प्रकारच्या इतिहास लेखनात दुर्लक्षित अशा घटकांचा कोणताही इतिहास नसतो आणि त्यांना बोलताही येत नाही म्हणून महिलावाचक इतिहास लेखनाला सबलटर्नला ऐतिहासिक खात्यांमध्ये खरे प्रतिनिधित्व होऊ शकत नाही. डेव्हिड अर्नोल्ड यांनी आदिवासींच्या बंडखोरी आणि मद्रास दुष्काळ (१८७६-७८) यासारख्या आदिवासी बंडखोरांसारख्या आत्तापर्यंत दुर्लक्षित विषयांची निवड केली आहे. ते समकालीन सामाजिक-राजकीय परिस्थितीत शेतकऱ्यांच्या चेतना आणि कृती यावर देखील लिहित आहेत. ग्यान पांडे यांनी १९१९-१९२२ मध्ये अयोध्या येथील शेतक-यांच्या बंडखोरीचा आणि भारतीय राष्ट्रवादावर होणाऱ्या परिणामांची माहिती दिली आहे. स्टीफन हेमिंगहॅमने १९४२ च्या भारत छोडो चळवळीत बंडखोरीचे द्वैत स्वरूप दर्शविले.

मिशेल फुको (१९२७-८४) उत्तर आधुनिक इतिहासाचा एक वेगळादृष्टीकोन देतो. ऑर्डर ऑफ थिंग्ज, द आर्किऑलॉजी ऑफ नॉलेज, त्यांच्या लेखनात सामाजिक जीवनातील अर्थ, सामर्थ्य आणि सामाजिक वर्तन यांच्यातील संबंध स्पष्ट करण्यासाठी त्यांनी 'डिसचर्व्हिव्ह रेजिव्हम', 'एपिसटिम' आणि 'वंशावळी' या संकल्पना मांडल्या.

## ८.४ सामान्यीकरणाची उपयुक्तता

इतिहासकारांचे कार्य माहितीच्या वैधतेची चाचणी करणे किंवा त्यांची सत्यता प्रमाणित करणे आणि त्याचे स्पष्टीकरण देणे म्हणजेच त्यासंदर्भात सामान्यीकरण करणे आहे. एखाद्या विशिष्ट विषयाची निवड करणे किंवा एखाद्या विशिष्ट विषयावर जोर देणे हे संशोधनाच्या ऐतिहासिक स्वरूपाच्या अनुसार स्वयंचलितपणे किंवा हेतुपुरस्सर अनुसरण केले जाते. ऐतिहासिक शोध घेण्याच्या प्रक्रियेमध्ये इतिहासकार काही वेळेस परिस्थितीनुसार तर कधी आपल्या

आवडीनुसार विषयाची निवड करतात. त्यानुसार इतिहासकार कधी आपल्याला साध्य करायच्या उद्दिष्टानुसार सामग्रीची निवड करतो तर कधी मिळालेल्या ऐतिहासिक सामग्रीनुसार नवीन विषयाची मांडणी करतो. काही वेळेस काही गृहीतके मनाशी बांधूनच त्यानुसार अपेक्षित परिणाम साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. काही वेळेस मिळालेल्या माहितीस सत्य समजून तिचे सामान्यीकरण केले जाते तर काही वेळेस मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून मगच सामान्यीकरण केले जाते. एकत्रित तथ्ये व्यवस्थित करणे आणि गटबद्ध करणे आवश्यक आहे. स्पष्टीकरण आणि कार्यकारण, प्रेरणा आणि प्रभाव या दोन्ही गोष्टींचा समावेश आहे. इतर भाषांमध्ये, विश्लेषण इतिहासासाठी एक शिस्त म्हणून महत्त्वपूर्ण आहे. जमीनदार, शेतकरी, गुलाम किंवा भांडवलदार एखाद्या माहितीपटाप्रमाणे यांचे वर्णन इतिहासलेखनात येते पण प्रत्यक्षात तो सामान्यीकरणाचा परिणाम आहे.

ब्रिटिशांनी मध्ययुगीन काळाला मुस्लीम राजवटीचा काळ तर प्राचीन भारत हा हिंदू राजवटीचा काळ म्हणून संबोधित केले. परंतु त्यांनी आपल्या राजवटीचे वर्णन मात्र ख्रिश्चन राजवट असे वर्णन केले नाही कारण हा संदेश त्यांच्या लिहिलेल्या आधारे अप्रत्यक्षपणे इतिहासाच्या धर्माच्या आधारे विभागल्या गेलेल्या सामान्यीकरणाद्वारे थेट पसरतो. संसदीय भाषणावरील व संसदेच्या कार्यालयीन पुराव्यांवर आधारिक इतिहास म्हणजे राजकारण आणि सरकारच्या धोरणांचे मुख्य निर्देशक असते. सरकारच्या कार्याचे सामान्यीकरण त्यातून दिसून येते. आजही वृत्तपत्रांद्वारे प्रसूत गेलेले तथ्य किंवा बातम्या अथवा लेख हे पत्रकार, संपादक आणि वर्तमानपत्रांचे मालक यांच्या सामान्य विचारांचे परिणाम आहेत. त्यांच्या आधीच्या धारणेच्या प्रभावानेच हे सर्व घडत असते किंबहुना त्यांनी दिलेल्या लेखातून त्यांच्या विचारांचा प्रभावाने विशिष्ट घटकाबद्दल अथवा समूहाबद्दल सामान्यीकरण दिसून येते.

१) सामान्यीकरणामुळे इतिहासकारांना अनुमान काढण्यास मदत होते आणि कारण आणि परिणाम किंवा परिणामांची साखळी तयार करतात. ते त्याला तारखेचे विश्लेषण, अर्थ लावणे आणि स्पष्टीकरण करण्यास सक्षम करते.

२) सामान्यीकरण इतिहासकारांना नवीन तथ्ये आणि स्त्रोत शोधण्यासाठी उद्युक्त करते. बऱ्याचदा नवीन स्त्रोतांना फक्त नवीन सामान्यीकरणांद्वारे योग्यप्रकारे आकलन केले जाऊ शकते.

३) सामान्यीकरण इतिहासाच्या विद्यार्थ्याला निबंध, अध्यायन, संशोधन पेपर याबाबतीत मदत करते. सामान्यीकरण देखील त्याने गोळा केलेली तथ्ये त्याच्या संशोधनाच्या विषयाशी संबंधित आहे कि नाही हे शोधण्यात सक्षम करते.

४) सामान्यीकरण इतिहासकारांना चर्चेसाठी आणि त्यातून फलदायी निष्कर्षाची प्रक्रिया सुरू करण्यास प्रवृत्त करते. दुसऱ्या इतिहासकाराने केलेय कामात सादर केलेल्या सामान्यीकरणाशी काहीजण सहमत असतील आणि त्यामध्ये संशोधन आणि विचार करण्यासाठी नवीन मार्गदर्शक शोधतील.

## ८.५ सामान्यीकरणातील अडचणी

१) इतिहासात प्रत्येक घटना एकपरीने अनोखी असते. परंतु काहीवेळेस असे दिसून येते कि त्यांच्यात काही समानता असूनही वेगळे वैशिष्ट्य असते. त्यामुळे त्यांची एकमेकासोबत तुलना होते. जोपर्यंत अज्ञात गोष्टीची आपल्याला माहिती असलेल्या गोष्टीशी तुलना केली जात नाही तोपर्यंत आपण आकलन करू शकत नाही. एखादी घटना अद्वितीय किंवा विशिष्ठ आहे कि नाही हे दुसऱ्या घटनासोबत तुलना केल्याशिवाय आपल्याला समजत नाही. आहे. अशा परिस्थितीत इतिहासकार अद्वितीय आणि सामान्य यांच्यातील संबंधांचा अभ्यास करतो. उदाहरणार्थ, भारतीय राष्ट्रीय क्रांती ही अद्वितीय आहे परंतु त्याची विशिष्टता इतर क्रांतींशी तुलना करूनच समजली जाऊ शकते.

२) पुष्कळ विचारवंतांचे असे मत आहे की अनेक सामान्यीकरणांची अपुरी चाचणी केली जाते. इतर राष्ट्रवादी क्रांतींनी हिंसाचार केला म्हणून भारतीय राष्ट्रीय क्रांती हिंसकही झाली पाहिजे. हे एक चुकीचे सामान्यीकरण होवू शकते. जागतिकीकरणामुळे काही देशांमध्ये प्रगती झाली त्यामुळे सर्व देशांमध्ये तशीच प्रगती होण्याची शक्यता आहे, हे एक सामान्यीकरणाचे उदाहरण आहे.

३) मोजमाप ही एक अचूक वैज्ञानिक प्रक्रिया आहे. परंतु केवळ ठोस गोष्टींसहच हे लागू केले जाऊ शकते. अमूर्त गोष्टी किंवा कल्पना कोणत्याही परिमाणामध्ये मोजल्या जाऊ शकत नाहीत. हे मनोवैज्ञानिक स्वरुपाच्या तथ्यांबद्दल देखील उपयुक्त नाही.

**आपली प्रगती तपासा –**

१. इतिहास संशोधनातील साधनांचे सामान्यकरणाची प्रक्रिया म्हणजे काय?

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

२. सामान्यीकरणाची उपयुक्तता सांगा.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

## ८.६ ऐतिहासिक घटनांचे विश्लेषण

इतिहासाच्या इतिहासातील प्रतिमांचे प्रतिबिंबित केलेल्या प्रतिमांची चलत रचना तयार करण्यासाठी इतिहासकारांना ऐतिहासिक सामग्रीचा अर्थ लावणे आवश्यक आहे. यामुळेच समान ऐतिहासिक दस्तऐवज अभ्यासूनही निष्कर्ष वेगवेगळे असतात. त्यांच्या धरणांचा त्यांच्या इतिहासलेखानावर व सामन्यीकरण प्रक्रियेवर पडत असतो.

### ८.६.१ साम्राज्यवादी विचारसरणीतून भारताचे इतिहासलेखन

साम्राज्यवादी विचारसरणीतून भारताचे इतिहासलेखन हे भारतीय संस्कृतीवर हल्ला करते. जेम्स मिलच्या पुस्तकात स्पष्टपणे दिसून येतो. त्यांनी आपल्या इतिहासात आणि हिंदू सभ्यतेच्या अहवालात लिहिले आहे की भारतीय गुणांमध्ये उद्धट आणि कनिष्ठ आहेत. त्याचप्रमाणे, अलेक्झांडरने केलेले भारतावरील आक्रमणाचे समर्थन करतांना दुसरे ब्रिटीश इतिहासकार व्हिसेट स्मिथ याने हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की युरोपियन लोक भारतीयांपेक्षा युद्धामध्ये श्रेष्ठ होते. तो पुढे म्हणतो की भारतातील कायम राजकीय अराजक, एकत्र येण्याची आणि स्वतःवर योग्यरित्या राज्य करण्याची त्यांची असमर्थता यामुळे भारतीयांना नेहमीच परकीय आक्रमकांची पर्यायाने बाहेरील लोकांची शासक म्हणून गरज होती. याचमुळे ब्रिटीशांचे शासन भारतात प्रस्थापित  झाले. माउंट स्तुअर्त एल्फिन्स्टन्स नमूद करतो की भारतात परदेशी व्यापार हा प्रामुख्याने ग्रीक आणि अरब करत आलेले होते आणि अरबांनी भारतावर मात केली. ब्रिटिश इतिहासकारांनी अनेकदा भारतीय संस्कृतीला कमी लेखण्याचा प्रयत्न केला. भारतीय लोकांनी ग्रीक लोकांकडून आपली संस्कृती घेतली असावी असा त्यांनी अंदाज वर्तवला परंतु ते सिद्ध करणारा कोणताही पुरावा मात्र दिला नाही. खभारतातील अंधश्रद्धा व वाईट चालीरीती यांच्यावर टीका करून त्यांनी आपल्या राजकीय वर्चस्वाचे समर्थन केले.

भारतीय समाजातील अपराधी आणि सती प्रथेवर त्यांनी टीकास्त्र सोडले परंतु त्यासोबतच पद्धतशीरपणे युरोपमध्ये समाजातील गुलामी प्रथा व धार्मिक पगडा याकडे दुर्लक्ष केले. यामुळे भारतीय इतिहासकार आणि तत्वज्ञानी त्यांच्या संस्कृती आणि संस्कृतीवरील हल्ल्याचा बचाव करण्यासाठी स्वतःच तयार झाले ज्यामुळे जे ऐतिहासिक लेखन घडले, याला भारतीय इतिहासलेखनाचा राष्ट्रवादी प्रवाह म्हणून ओळखले जाऊ लागले. अशारितीने वेगवेगळ्या लोकांमध्ये ऐतिहासिक साहित्याचे स्वरूप, गुणवत्ता आणि प्रमाणात फरक आहेत.

### ८.६.२  भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांचा मतप्रवाह

ब्रिटिश साम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या भारताविरूद्धच्या पूर्वग्रहांच्या प्रतिक्रियेत भारतीय इतिहासकारांचा मतप्रवाह अस्तित्वात आला. इतिहासाच्या  शोधात राष्ट्रीय अस्मिता शोधणे आणि भारताला राष्ट्रवादी राज्य सिद्ध करणे या उद्देशाने भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखन केले गेले. भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांच्या नवीन पिढीने राष्ट्रीय अभिमानाने इतिहासलेखन केले आणि त्यांची राष्ट्रीय संस्कृती युरोपियन लोकांच्या विशेषत: ब्रिटीश इतिहासकारांच्या भारतीय राष्ट्र आणि राष्ट्रवादाविरोधात घडणाऱ्या बदलांच्या विरोधात उंचावण्याचा प्रयत्न केला. आर.सी.मजुमदार म्हणतात की युरोपियन इतिहासकारांनी भारतीय राष्ट्रीय समस्यातील अनेक मुद्द्यांचा गैरसमज केला आणि त्यांच्या लेखनात सर्वत्र

त्यांची चुकीची माहिती दिली. ज्या भारतीय इतिहासकारांनी त्यांची दुरुस्ती केली आणि प्रसंगी असे करताना भारतीय राष्ट्रवादी प्रेरणा रुजतील असे लेखन देखील केले त्यांना भारतीय राष्ट्रवादी इतिहासकार म्हणून ओळखले जाऊ लागले.

राजनारायण, बंकिमचंद्र चटर्जी यासारख्या भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी त्यांच्या लिखाणात भारतीय धर्म आणि समाजाचा बचाव केला. भारतीयांनी तसेच युरोपियन संशोधन विद्वानांनी केलेल्या पुरातत्व संशोधनाने भारतीय संस्कृतीवरील आघात परतवून लावले. प्राचीन भारतीय युरोपियन संस्कृतीपेक्षा कितीतरी पुढे असल्याचे दाखले त्यांच्या लेखनात येत असत, पर्यायाने आतादेखील भारतीय पुढे असल्याचे प्रतिबिंबित केले गेले. ब्रिटिश इतिहासकारांनी भारतातील राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेला प्रत्येक टप्प्यावर कमी लेखण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले की भारतात अनेक पंथ आणि पंथ आहेत. म्हणूनच, ते एक राष्ट्र होण्यासाठी पात्र होऊ शकले नाही. परंतु इतिहासकार आर. के. मुखर्जी यांनी त्यांच्या 'भारतीय मूलभूत एकता' या अभ्यासपूर्ण प्रबंधात हिंदूंमध्ये धार्मिक एकता, अध्यात्मिक सहवास आणि अखिल भारतीय साम्राज्याचा त्यांचा आदर्श यापूर्वी भारतीय राष्ट्रवादाचा पाया निर्माण केल्याचा उल्लेख केला आहे.

### ८.६.३ १८५७ चे बंड

इ.स. १८५७ च्या बंडखोरीविषयी इतिहासकारांनी वेगळी मते दिलेली आहेत. उठाव पूर्वनियोजित आणि संघटित नियोजनाचा परिणाम, किंवा तो एक उत्स्फूर्त उदय होता, तर चरबीयुक्त काडतुसे जारी केल्याने संतप्त झालेल्या शिपाई यांचा उठाव होता इत्यादी मते व्यक्त केली. बऱ्याच लेखकांची उठावाच्या स्वरूपाविषयी भिन्न आणि विरोधाभासी मते देखील आहेत. हा विद्रोह होता की राष्ट्रीय स्वातंत्र्याचा युद्ध यावरून बरीच मते पुढे आली आहे. एस.बी. चौधरी यांनी, १८५७ च्या बंडाचा विचार केला की 'परकीय सत्तेला आव्हान देण्याचा अनेक वर्गातील लोकांचा पहिला संयुक्त प्रयत्न, असे वर्णन केले आहे. आर.सी. मुझुमदार सारख्या विद्वान इतिहासकाराने, सर्वसामान्यांनीही यात भाग घेतला असला तरी हे बंड मुख्यत्वे शिपायांचे काम असल्याचे मत व्यक्त केले आहे. पुढे आणखी एक मत होते की विदेशी सत्ताधीशांना देशाबाहेर घालवण्यासाठी आणि ते पूर्णपणे स्वतंत्र करण्यासाठी हा बंड हा स्वातंत्र्याचा राष्ट्रीय युद्ध आहे. ब्रिटिशांच्या भारतावरील हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी, भारतीय इतिहासकारांनी त्यांच्या इतिहासाचा पुनर्वापर करायला सुरुवात केली आणि देशाबाहेर राष्ट्रवादाला ओढायला सुरुवात केली. विनायक दामोदर सावरकर यांनी १८५७ च्या उठावाच्या इतिहासाचे पुनर्लेखन करून त्याला भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध म्हटले. एस.बी.चौधरी यांच्या 'भारतीय सैन्यात मध्ये नागरी बंड' म्हणून हा उठाव हे राष्ट्रीय स्वातंत्र्य युद्ध म्हणून दर्शविले. ब्रिटीशांच्या विखारी प्रचाराला रोखण्यासाठी हिंदू-मुस्लिम यांच्यात एकी नसणे हा एक मोठा अडथळा होता. भारतीय इतिहासाच्या पुनर्व्याख्याणाची प्रक्रिया पुढे ताराचंद यांनी पुढे केली. त्यांच्या या पुस्तकात, "भारतीय संस्कृतीवरील इस्लामचा प्रभाव" या पुस्तकात, हिंदू-मुस्लिम संस्कृती एकत्रितपणे त्यांना भारतीय राष्ट्रात एकत्रित केल्याचा दावा आहे. अशाप्रकारे, भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन हा भारतीय राष्ट्रवादी प्रवाहाचा प्रमुख विषय बनला.

### ८.६.४ मार्क्सवादी स्पष्टीकरण

भारतीय इतिहासलेखनाच्या मार्क्सवादी इतिहास लेखनप्रवाहात कथालेखन व वर्णनात्मक पासून स्पष्टीकरणात्मक व अर्थ लावणा-या या इतिहासाच्या लेखनात बदल घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले. परिवर्तनाच्या या प्रक्रियेत या इतिहासकारांनी वस्तुस्थितीचे वर्णन करण्याकरता, इतिहास आहे हे सिद्ध करण्यासाठी घटनांवर नव्हे तर घटनेमागील आर्थिक व राजकीय हालचालींवर अधिक जोर दिला. त्यांनी फक्त घटनांचे वर्णनच केले नाही. त्या इतिहासकारांचे स्पष्टीकरण कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक तत्वज्ञानापासून म्हणजेच द्वंद्वात्मक भौतिकवादातून आले आहे. या नवीन दृष्टिकोनचे सार हे सामाजिक आणि आर्थिक संस्था यांच्यातील संबंध आणि ऐतिहासिक घटनांवरील परिणामाच्या अभ्यासामध्ये आहे. उदाहरणार्थ, मनातील वेगवेगळ्या प्रश्नांच्या संचासह स्त्रोतांचे पुन्हा वाचन हे यात अपेक्षित आहे. डी. डी. कोसंबी यांनी मृत भूतकाळाचा अभ्यास करण्यासाठी तुलनात्मक पद्धत आणि अन्वेषणचे अंतःविषय तंत्र अवलंबिले. याच्या मदतीने भूतकाळाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला पुरातत्व स्त्रोतांचा तसेच त्यांनी संस्कृत आणि व्युत्पत्ती विषयक विश्लेषणाचा वापर आर्य व गैर-आर्य घटकांचा अभ्यास करण्यासाठी केला.

बिपन चंद्रा यांनी आपल्या 'इंडिअन स्ट्रगल फॉर इंडीपेंडन्स' मध्ये केंब्रिज स्कूल आणि भारतीय राष्ट्रवादीच्या साम्राज्यवादी दृष्टिकोनापेक्षा भिन्न असल्याचे मत मांडले आणि असे मत मांडले की भारतीय राष्ट्रीय चळवळ ही ती काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. ते पुढे नमूद करतात की भारतीय राष्ट्रीय चळवळीस संरचित बुर्ज्वा चळवळ म्हणून संबोधतात. आपल्या 'आधुनिक भारतातील जातीयवाद' मध्ये, बिपन चंद्रा यांनी हे नाकारले, की जातीयवाद हा केवळ ऐतिहासिक अपघात किंवा द्वंद्वात्मक षड्यंत्रांचे उत्पादन आहे . ते वसाहतवादाच्या उपज उत्पादनांपैकी एक होते. जमातवाद हा बऱ्याचदा विकृत स्वरुपात पुढे येतो. त्याचे सामाजिक तणाव किंवा वर्ग संघर्ष म्हणून चुकीचे वर्णन केले जाते. जातीयवादाचे विश्लेषण करताना ते म्हणतात की ते १८५७ ते १९३७ या काळात जातीयवादाचे स्वरूप काहीसे मवाळ होते. पुढे १९३७ नंतर जमातवाद द्वेष, भीती मानसशास्त्राचे आणि असमंजसपणाच्या राजकारणावर आधारित फासीवादी बनले, ब्रिटीशांनी जातीय रंगवला आणि मुस्लिम लीगला मुस्लिमांचा एकमेव अधिवक्ता म्हणून मान्यता दिली .

### ८.६.५ अहिंसेच्या तत्त्वाचे आर्थिक विश्लेषण

भारतीय मार्क्सवादी इतिहासशास्त्रज्ञांनी, इसवीसनपूर्व सहाव्या शतकामध्ये बौद्ध आणि जैन धर्माच्या अहिंसेच्या तत्वाचा पुरस्कार केला, त्यामागे एक आर्थिक कारण असल्याचे स्पष्टीकरण दिले. डी.डी.कोसंबी म्हणतात की पाली कथांच्या आधारे हे स्पष्ट होते कि प्राणी आहुती दिल्या जाणारी यज्ञांमध्ये वैदिक विधी नुसार मोठ्या प्रमाणात जनावरांची कत्तल केली गेली, ज्यामुळे गंगा खो-यातील नवीन कृषीसंस्कृतीला शेतीवर गुरेढोरांची अविश्वसनीय टंचाई निर्माण झाली. वस्तुतः या कृषीसंस्कृतीला लोकसंख्या पोसण्यासाठी शेतीतून शेती मिळण्यासाठी पशुधन संपत्तीची जपणूक व वृद्धिंगत करणे आवश्यक होते. कोसंबी पुढे म्हणतात की, यज्ञ, जैन आणि बौद्ध धर्मासाठी विनामुल्य प्राण्यांची संख्या वाढवून नियमित शेतीवर येणारा ताण टाळण्यासाठी, इसवीसनपूर्व सहाव्या शतकामध्ये पशुपालन, गोवंश हत्याबंदीची व मधमाश्या पाळण्याची प्रथा तयार केली गेली.

### ८.६.६ जातीचा अर्थ

इरफान हबीब यांनी आपल्या 'इंटरप्रिटींग ऑफ इंडिअन हिस्टरी' मध्ये इतिहासाच्या वर्णनावर नव्हे तर अर्थ लावण्यावर भर दिला. ते म्हणतात की भूतकाळाचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे कारण इतिहासकार ज्या गोष्टींना भूतकाळाचा पुरावा मानतात त्या गोष्टी त्या घटना पुन्हा घडवून आणू शकत नाहीत.इतिहासात काही संदर्भ रिक्त असतात. समाज कसा चालतो,एखादी गोष्ट करण्यासाठी लोक कशा प्रकारे प्रवृत्त होतात आणि विविध परिस्थितीत विविध गोष्टी करण्यास ते कसे सक्षम आहेत हे समजून या रिक्त जागा भरल्या जाऊ शकतात. अशा प्रकारे इतिहासकारांच्या वैयक्तिक निर्णयामुळे आणि चुकांच्या मदतीने केलेले स्पष्टीकरण इतिहास अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत करते. त्याच कार्यात ते म्हणतात की मध्ययुगीन भारतीय अर्थव्यवस्थाही सरंजामी अर्थव्यवस्थेपेक्षा वेगळी सामाजिक रचना होती. कामगार प्रक्रियेच्या आधारे, अतिरिक्त मूल्याचे निष्कर्ष काढून आणि अतिरिक्त उत्पादन वितरणाच्या आधारावर ते असे सांगतात. इरफान हबीब यांनी 'भारतीय इतिहासातील जात आणि पैसा' या दुसऱ्या कामात असे म्हटले आहे की, श्रम विभागून जात हा सर्वात कठोर प्रकार होता, तो भाग आणि उत्पादनाशी संबंधित होता. या कठोर प्रकारच्या वर्गाच्या शोषणाचे मुख्य लाभार्थी वैद्यकीय समाजातील कुलीन आणि जमीनदार यांचे शासक वर्ग होते.

### ८.६.७ अकबराच्या धोरणांचे विश्लेषण

१५८९-९० मध्ये अकबरने अबुल फजलला त्याच्या कारकिर्दीचा इतिहास तयार करण्याचे आदेश दिले. अबुल फजलला मदत करण्यासाठी सक्षम लोक नियुक्त करण्यात आले होते. अबूल फझल अकबराला वैश्विक मनुष्य म्हणून सादर करतो. अकबराचे ध्येय असे होते की तो लोकांना रूढीवादी बाबींपासून मुक्ती देइल आणि त्यांना सत्याकडे घेऊन जाईल आणि समरसतेचे वातावरण तयार करेल, जेणेकरून भिन्न पंथांचे लोक शांतता व सौहार्दाने जगू शकतील.

अकबर याने बदायुनीला महाभारतचे संस्कृत भाषांतर पर्शियन भाषेत करण्यासाठी नियुक्त केले. बदायुनी हा इतिहासाचा आणि साहित्याचाही विद्यार्थी होता. अकबराच्या कारकिर्दीची योग्य जाणीव होण्यासाठी हे अबुल फजलच्या अकबरनामाबरोबरच बदायनींचे दुसरे खंड अभ्यासणे गरजेचे आहे. अबुल फजल अकबराची स्तुती करण्यास उदार आहे तर बदायुनी अकबरच्या धार्मिक धोरणावर कडक टीका करतो.

### ८.६.८ छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा अर्थ

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याविषयी विविध सांस्कृतिक अर्थ आहेत. हिंदवी स्वराज ही सामाजिक-राजकीय चळवळींकरिता, देशाभिमान वाढवण्यासही आणि इतर संदर्भात वापरली जाणारी संज्ञा आहे. सतराव्या शतकापासून महाराष्ट्राची राजकीय क्रियाशीलता, राजा शिवाजींचा आदर्श आणि आधुनिक शिक्षणाचा प्रभाव महाराष्ट्रातील विशिष्ट राष्ट्रवादी भावनेच्या दृष्टीने अनुकूल होता. जोतिराव फुले, बाळ गंगाधर टिळक, वि. दा. सावरकर, वि. का. राजवाडे आणि इतर अनेक विचारवंतांनी आणि इतिहासकारांनी राजा शिवाजीने स्थापलेल्या स्वराज्याविषयीचे आपले भाषांतर सादर केले.

जोतिराव फुले यांनी राजा शिवाजी यांचे कुळवाडिभूषण असे वर्णन केले, म्हणजे शेती करणारे आणि सामान्य लोकांसाठी काम करणारा राजा. जोतिरावांनी जून १८६९ मध्ये शिवाजीराजांवर पोवाडा प्रकाशित केला. गायी आणि ब्राह्मणांचे रक्षक म्हणून शिवाजीची विद्यमान प्रतिमा जोतिरावांनी नाकारली. फुले यांच्या म्हणण्यानुसार शिवाजी बहुजनांचे राजा होते.

प्रख्यात इतिहासकार जदुनाथ सरकार यांनी आपल्या 'शिवाजी अंड हिज टाईम्स' मध्ये म्हटले आहे, राजा शिवाजी यांचे धार्मिक धोरण अतिशय उदारमतवादी होते. नरहर कुरूंदकर यांनी श्रीमान योगी या कादंबरीच्या प्रस्तावनेत शिवाजी महाराज यांना धार्मिक म्हणून संबोधले आहे,पण ते धर्मांध नव्हते असे देखील म्हटले आहे. वि. दा. सावरकर यांचे लेखन शिवाजी राजांना हिंदूंचा राष्ट्रीय नायक म्हणून प्रक्षेपित करणारे होते. समकालीन पाश्चात्य लेखकांनी आणि प्रवाशांनी शिवाजी महाराजांचा सजगपणा, धाडस, सर्व धर्मांचा आदर करण्याचे धोरण याविषयी संदर्भ नमूद केले आहेत.

**आपली प्रगती तपासा-**

१. ऐतिहासिक संशोधनात विश्लेषणाच्या पद्धतीचे महत्त्व सांगा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## ८.७ सारांश

ऐतिहासिक स्त्रोतांचे सामान्यीकरण आणि अर्थ लावणे हे ऐतिहासिक लिखाणातील प्रमुख घटक आहेत. सामान्यीकरण त्यांच्यासंदर्भात नवीन समर्थन देण्यास किंवा प्रतिवाद करणाऱ्या पुराव्यांच्या शोधास प्रोत्साहित करते. इतिहासकारांच्या शब्दात भूतकाळाचा अर्थ लावणे, हे पूर्वी काय घडले याचे अभ्यासपूर्ण विवेचन असते. इतिहासकारांचे मुख्य काम म्हणजे भूतकाळाच्या वर्णनांवर आधारित माहिती आणि तथ्ये नोंदवणे आणि पक्षपातीपणा न घेता घटनांचा संपूर्ण क्रम लावणे हे आहे.

## ८.८ प्रश्न

१) इतिहास लेखनात सामान्यीकरणाचे महत्त्व सांगा.

२) इतिहासातील स्पष्टीकरण आणि सामान्यीकरणाची भूमिका सपष्ट करा.

३) इतिहासाच्या स्त्रोतांच्या स्पष्टीकरणासाठी जबाबदार असलेल्या घटकांची थोडक्यात माहिती द्या.

## ८.९ संदर्भ

१) आर. जी. कोलिंगवुड, इतिहास आणि तत्त्वज्ञानातील इतिहासातील इतर लेखांची तत्त्वे (संपादन. विल्यम एच. ड्रे आणि डब्ल्यू. जे. व्हॅन डर ड्यूसेन), २००१.

२) बी. शेक अली, इतिहास: इट्स थियरी आणि मेथड्स, मॅकमिलन पब. दिल्ली, १९८८.

३) जे. एन. सरकार, शिवाजी अँड हिज टाईम्स

४) ए. आर. कुलकर्णी, शिवाजीच्या युगातील महाराष्ट्र, डायमंड प्रकाशन, पुणे.

❄❄❄❄❄❄❄

# ९

# तळटीपा आणि ग्रंथसूची

**घटक रचना**


९.१ उद्दिष्टे

९.२ प्रस्तावना

९.३ तळटीपांचे महत्व

९.४ तळटीपा देण्याचे उद्देश

९.५ तळटीपांचा वापर

९.६ तळटीपांचे प्रकार

९.७ तळटीपा देण्याच्या पद्धती

९.८ तळटीपा देण्याचे सामान्य तंत्र

९.९ तळटीपा कुठे द्याव्यात

९.१० तळटीपांचा दुरुपयोग

९.११ तळटीपांचे फायदे

९.१२ ग्रंथसूची

९.१३ सारांश

९.१४ प्रश्न

९.१५ संदर्भ


## ९.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर विद्यार्थी सक्षम होतील.

१) तळटीपांचे तर्क समजून घेण्यात्त विद्यार्थी सक्षम होतील.

२) संशोधन कार्यात तळटीपांचा वापर विद्यार्थी समजून घेतील.

3) तळटीपांचे विविध प्रकार आणि त्यांचे वापर विध्यार्थी समजतील.

४) तळटीपांचे तोटे आणि तळटीपांचे गैरवापर विद्यार्थ्यांना समजेल.

५) ग्रंथसूचीच्या विविध पद्धती विद्यार्थांना समजेल.

## ९.२ प्रस्तावना

संशोधनकार्य करीत असतांना तळटीपा हा इतिहास लेखनाचा अनिवार्य भाग आहे. संशोधनात तळटीपा या तंत्राला विशेष महत्व आहे. संशोधन कार्य करित असतांना संशोधक संशोधन विषयाच्या अनुषंगानी अनेक प्राथमिक व दुय्यम साधनांमधून माहिती संकलित

करीत असतो. संशोधनाकरिता संकलित केलेल्या माहितीमधून संशोधनाच्या अनुषंगानी नवीन मुद्दा, विषय मिळत असतो, त्यासोबत विषयाच्या अनुषंगानी अज्ञात असलेली माहिती समोर येते, तर काही साधनांमधून संशोधकाच्या विचारांना पुष्टी देणारे संदर्भ सापडतात. संशोधनात्मक इतिहास लेखन करीत असतांना संशोधनाकरिता संकलित केलेल्या माहितीचा उपयोग संशोधक करीत असतो. इतिहास लेखन करीत असतांना संशोधकानी वापरत असलेली ऐतिहासिक माहिती कोठून प्राप्त केली याचा उल्लेख लेखनात करणे अत्यावश्यक असते. संशोधकांनी ऐतिहासिक पुराव्यांचे संदर्भ स्पष्टपणे नोंद केल्याशिवाय संशोधनात्मक लिखाणाला विश्वसनियता प्राप्त होत नाही. संशोधनाला विस्वस्नियता प्राप्त करून देण्याचे कार्य तळटीपा करीत असतात.

## ९.३ तळटीपांचे महत्व

संशोधकांनी तळटीप व ग्रंथसूची देण्यामागील संशोधकाचा उद्देश हा संशोधन कार्यात वापरलेल्या माहितीचा स्त्रोत सांगणे आहे. लेखकांनी संशोधनात्मक लिखाणामध्ये तळटीप दिल्यामुळे वाचकांना संशोधन विषयाची अधिक माहिती हवी असल्यास तळटीपानंमध्ये निर्दिष्ट केलेल्या पुस्तकांचा आधार घेऊ शकतो, त्याच प्रमाणे तळटीपांमुळे संशोधन विस्वस्नियात प्राप्त होऊन पुढील संशोधन कार्यासाठी प्रारंभिक बिंदू म्हणून काम करतात. तळटीपांना ज्ञानाच्या मंदिराच्या वाटेवर चढण्याच्या पायऱ्या मानल्या जाऊ शकतात.पाठ्यपुस्तकांमध्ये अशा तळटीपा क्वचितच आढळतात. पाठ्यपुस्तकांमध्ये लेखकांनी वापरलेल्या पुस्तकांची यादी शेवटी दिलेली असते, मात्र त्यामुळे वाचकाला संशोधनातील विधानाची पडताळणी करता येत नाही. तळटीपांमुळे वाचकांना संशोधनातील विधानांची, माहितीची पडताळणी करता येते. उदा. भारतातील जातिव्यवस्थेला वैदिक वाङ्मयात मान्यता दिली आहे, असा सरळ उल्लेख केला तर वाचकाला एक अस्पष्ट कल्पना येते. याच वाक्याला ऋग्वेदाच्या दहाव्या "मंडला" मधील पुरुषसूक्त जातींच्या निर्मितीचा संदर्भ देते अशी तळटीप दिली तर त्या विधानाला विस्वस्नियता प्राप्त होते, त्याचप्रमाणे संशोधकांना स्वतःहून अधिक संशोधन करण्यास प्रवृत्त केले जाऊ शकते, त्यामुळे संशोधनाला एक नवीन दिशा मिळू शकते.

तळटीप देत असतांना लेखक पूर्ण ज्ञानाचा दावा करित नाही तर लेखकाने केलेल्या विधानाची विश्वासार्हता सुनिश्चित करीत असतो व  संशोधकांनासंशोधन कार्य करण्यास प्रोत्साहित करीत असतो. संशोधनात काही तांत्रिक संज्ञा किंवा इतर भाषेतून भाषांतरित केलेले शब्द असू शकतात ज्यांचे स्पष्टीकरण आवश्यक असते. वाचकांच्या या अडचणींचा अंदाज घेऊन तळटीप दिली तर वाचकांना विषय समजण्यात मदत मिळत असते. तळटीपांमुळे वाचकाला विश्वास होतो कि, लेखकाला विषयाची चांगली माहिती आहे. जर वाचकाला या विषयाबद्दल अधिक जाणून घ्यायचे असेल किंवा विधानांच्या वैधतेबद्दल शंका असेल तर तो तळटीपांमुळे प्राथमिक स्त्रोताकडे जाऊ शकतो आणि विषयात स्वारस्य असलेल्या लोकांना प्रबोधन करू शकतो.

## ९.४ तळटीपा देण्याचे उद्देश

संशोधन कार्यात तळटीपा देण्याचे चार उद्देश असतात असे डॉ. शांता कोठेकर यांनी त्यांच्या इतिहास संशोधन: स्वरूप व तंत्र या ग्रंथात खालील प्रमाणे सांगितले आहे.

१) संशोधनाकरिता ज्या स्त्रोत साधनांमधून माहिती मिळाली असेल, त्यांचा ऋणनिर्देश करणे.

२) संशोधनात केलेल्या विधानांची पुष्टी करणे.

३) संशोधनात उपस्थित होणारे मुदे व त्यात उल्लेख केलेल्या व्यक्ती किवा प्रसंगाबाबत अधिक माहिती देणे.

४) संशोधनात पूर्वी येऊन गेलेल्या संदर्भाचा पुन्हा निर्देश करणे आवशक असल्यास पूर्वीच्या संदर्भाचा उल्लेख करणे.

संशोधकांनी संशोधनात नवीन माहिती दिली आहे व ती विश्वसनीय आहे हे पटवून देण्यासाठी ती माहिती कोणत्या साधनांमधून घेतली त्याचा उल्लेख करणे आवशक असते. तळटीपा दिल्यामुळे संशोधन कार्याला भक्कम आधार मिळत असतो, संशोधन कार्याची विश्वसनियता वाढत असते. तळटीपांमुळे संशोधकाला आपल्या मातांना पुष्टी देता येते. संशोधन करिता असतांना अनेक वेळा संशोधन विषयाच्या अनुषंगानी घटना किवा व्यक्तींची बरीच माहिती मिळत असते, ती सर्वच माहिती संशोधनाकरिता आवश्यक असते असे नाही, मात्र सदर माहिती दिल्यास त्या विषयावर नवीन प्रकाश पडत असतो. मात्र अशी माहिती अतिशय लांबलचक नसावी. माहिती प्राथमिक स्वरुपाची असल्यास ती परिशिष्ठाच्या स्वरुपात द्यावी.

संशोधकांनी तळटीपांच्या माध्यमातून संदर्भ साधनांचा पुरावा दिल्यामुळे तो पुरावा इतर संशोधकांना तपासून पाहता येतो. संशोधकांनी एखादा विचार जरी एखाद्या ग्रंथातून घेतला असेल तरीही त्याचा उल्लेख तळटीपांमध्ये करणे आवश्यक आहे. तळटीपा देण्यामागचा दुसरा उद्देश असा की, वाचकाला सबंधित विषयावर अनेक संदर्भ देऊन त्यांच्या ज्ञानात भर घालणे असतो. तळटीपा दिल्यामुळे अनेक विचार प्रवाह वाचकाला समजू शकतात. त्यामुळे त्याची विचारसरणी तयार होत असते. संशोधाकालाही तळटीपांमुळे एखाद्या विषयावर किती संशोधन झाले आहे याची जाणीव होते.

## ९.५ तळटीपांचा वापर

संशोधन कार्यात तळटीपा देणे अत्यंत आवशक आहे. संशोधन करिता असतांना तळटीपा केव्हा व कश्या प्रकारे द्यायचे याचेही एक विशिष्ट पद्धत आहे. संशोधनात नवीन माहिती देणाऱ्या विधानांना त्याचप्रमाणे महत्वाच्या विधानांना तळटीपा देणे आवश्यक असते. सर्वसाधारण व सर्वांना ज्ञात असलेल्या माहितीसाठी तळटीपा देणे आवश्यक नाही. संशोधनात काही वाद्ग्रस्थ मुद्या असेल तर त्यास तळटीप देणे आवश्यक आहे, एका वाक्यात किवा परिच्छेदात एकच मुद्या असेल तर त्याकरिता एकच तळटीप देणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे संशोधकाची स्वताची विचार, विधाने व इतरांची विधाने यातील भेद स्पष्ट करण्याकरिता तळटीप देणे आवश्यक असते. तळटीपा या स्पष्टीकरना करीता तयार केलेल्या नोट्सपेक्षा वेगळ्या असतात. तळटीपा संशोधकाला संशोधनाच्या संदर्भात नवीन माहिती मिळविण्याकरिता मार्गदर्शक म्हणून काम करतात. त्याचप्रमाणे संशोधक प्रतिकूल टीका टाळण्यासाठी तळटीपा देत असतो.

## ९.६ तळटीपांचे प्रकार

संशोधनात सामान्यता तळटीपा देण्याच्या दोन पद्धती आहेत.

१) संशोधकाला एखादा मुद्दा स्पष्ट करावयाचा असतो त्यावेळेस तो मध्येच तळटीप देऊन आपला मुद्दा स्पष्ट करीत असतो, यामागे संशोधकाचा उद्देश आपल्या विचाराची पुष्टी करणे हा असतो.

२) संशोधक तळटीपेचा दुसऱ्या प्रकारात आपल्या विचाराच्या समर्थनार्थ अस्सल पुरावा देत असतो. अश्या पुराव्यामुळे वाचकाच्या ज्ञानामध्ये भर पडत असते. संशोधकांनी दोन्ही प्रकारच्या तळटीपा अवधान राखून द्यायच्या असतात.

## ९.७ तळटीपा देण्याच्या पद्धती

तळटीपा देण्याच्या विविध पद्धती आहेत. काही विद्वानांना तळटीपा एकाच पानाच्या खालच्या भागात असाव्यात असे वाटते. म्हणजे पानाच्या खालच्या बाजूला तळटीपा द्याव्यात कारण वाचकांच्या दृष्टीने ही पद्धत सोयीचे असते. पृष्टाच्या खालच्या बाजूला आवश्यक त्या ठिकाणी क्रमश: १., २., ३., असे आकडे देऊन त्या आकड्यानुसार खालच्या बाजूला तळटीप देत असतात. या पद्धतीत कधी तळटीपांचे क्रमांक पृष्ठानुसार बदलत असतात. एका पृष्ठावर जेवढी आकडे आले असतील तेवढीच असतात. त्या समोरील आकडे नंतरच्या पृष्ठावर प्रकरणाच्या शेवटीपर्यंत दिले जातात. तळटीपा देण्याच्या दुसऱ्या पद्धतीत तळटीपा पृष्ठाच्या खाली न देता प्रकरणाच्या सेवटी सलगपणे दिल्या जातात. या पद्धतीमध्ये क्रमांक प्रकरणाप्रमाणे दिले जातात. मुद्रणाच्या दृष्टीने हि पद्धत सोयीची आहे. तळटीपा देण्याची ही पद्धत मोठ्या ग्रंथांमध्ये वापरली जाते. या पद्धतीमध्ये वाचकाला वाचत असतांना अडथळा येत नाही.

## ९.८ तळटीपा देण्याचे सामान्य तंत्र

तळटीपा देण्यासंदर्भात अमेरिकेतील मॉडर्न लँग्वेज असोसिएशन व शिकागो युनिव्हर्सिटी म्यॅन्यूअल यांनी तळटीपा देण्याची जी पद्धत स्वीकारली आहे, सामन्यत: तीच पद्धत तळटीपा देण्याकरिता वापरली जाते. तळटीपा देण्याचे एक सामान्य तंत्र आहे, तळटीपा देण्याचा क्रम ठरविलेला असतो. संदर्भ देतांना तळटीपानंमध्ये सुरवातीला लेखकाचे नाव, संपादकांचे नाव, आद्याक्षरासह आडनाव,त्यानंतर स्वल्पविराम देऊन ग्रंथाचे शीर्षक,खंड क्रमांक, प्रकाशक व प्रकाशन वर्ष आणि शेवटी पृष्ट क्रमांक असा तळटीपा देण्याचा क्रम असतो. एखाद्या ग्रंथ प्रथम वापरात असतांना ग्रंथाचे पूर्ण शीर्षक लिहावे, दुसऱ्यांदा त्याच ग्रंथाचा उल्लेख येत असेल तर ग्रंथाचे नाव संक्षेपामध्ये लिहावे. तळटीपा देण्यासाठी इंग्रजीमध्ये काही शब्द वापरले जातात. उदा. Ibid, Ocpit, Loc cit, P. एखाद्या ग्रंथाचा दिल्या नंतर लगेच त्याच ग्रंथाचा संदर्भ येत असेल तर Ibid या शब्दाचा उपयोग केला जातो. मराठीमध्ये त्यासाठी कित्ता हा शब्द लिहला जातो. पृष्ट क्रमांक वेगळा असल्यास पृष्ट क्रमांक लिहिला जातो.

Op Cit म्हणजे Opera Citato या लॅटिन शब्दाचा अर्थ In the work cited असा होतो. एखाद्या संदर्भ ग्रंथाचा उल्लेख पूर्वी येऊन गेला असेल व त्याचा पुन्हा उल्लेख करायचा

असेल व त्या दोहोंच्या मध्ये दोन तीन तळटीपा आल्या असतील तर Op Cit लिहितात. Op Cit चा वापर करतांना ग्रंथाचे नाव न लिहता फक्त लेखकाचे नाव व पृष्ट क्रमांक लिहित असतात. त्याच ग्रंथाचा उल्लेख एक दोन पृष्टापूर्वी आलेला असेल तेव्हा मात्र ग्रंथाचे नाव लिहल्या जाते. Loc Cit चा वापर करतांना केवळ ग्रंथाच्या लेखकाचे नाव लिहल्या जाते, Loc Cit चा वापर पूर्वी येऊन गेलेल्या संदर्भ ग्रंथ व पृष्ट क्रमांक लिहण्यासाठी केला जातो. या दोन्ही शब्दासाठी मराठी मध्ये उपरोक्त व तत्रैव या शब्दांचा वापर करतात. वरील तळटीपांचे तंत्र खालील उदाहरणावरून समजून येईल.

१) इ.एच.कार , व्हाट इज हिस्ट्री, १९८३, पृ. ११०.

२) कित्ता. पृ. ११५.

३) कित्ता. पृ. ११६.

४) बि.एस.अल्ली, हिस्ट्री: इट्स थेरी अँड मेथड, १९७९, पृ. १२०.

५) सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्वज्ञान, १९६७, पृ. ५०.

६) इ.एच.कार, तत्रैव

## ९.९ तळटीपा कुठे द्याव्यात

तळटीपा देण्याचे काही संकेत निर्माण झाले आहेत, त्यानुसार डॉ. बी. एस. सरदेसाई यांनी आपल्या इतिहास लेखन परिचय या ग्रंथात पुढील प्रमाणे तळटीपा दिल्या जातात असे सांगितले आहे.

१) छापील रेषेवरच तळटीप निदर्शनाचा आकडा लिहावा.

२) निदर्शनाचे आकडे उजव्या बाजूला लिहावे.

३) ज्या ठिकाणी निदर्शनाचा आकडा लिहावयाचा आहे, तेथील शब्द व आकडा यात अंतर नसावे.

४) तळटीपा प्रत्येक पानावर द्याव्यात जर तसे शक्य नसेल तर प्रकणाच्या शेवटी तळटीपा द्याव्यात हेही जर शक्य नसेल तर ग्रंथाच्या शेवटी प्रत्येक प्रकरणानुसार तळटीपा द्याव्यात.

५) तळटीपाना द्यावयाचे आकडे एका विशिष्ट पद्धतीनुसारच द्यावेत, हीच पद्धत संपूर्ण ग्रंथात वापरावी.

६) कोणत्याही शीर्षकाला तळटीप देऊ नये.

## ९.१० तळटीपांचा दुरुपयोग

संशोधनाच्या क्षेत्रात तळटीपांचे महत्व अनन्य साधारण आहे. मात्र तळटीपांच्या चुका व गैरवापर अनेक प्रकारच्या असतात, त्यामुळे वाचकांमध्ये गोंधळ निर्माण होत असतो. सामान्य

वाचकांना तळटीपांचा फायदा होत नसतो. काहीवेळा तळटीपा या नंतर दिल्या जातात, त्यामुळे संशोधकाची विधाने व तळटीप यात समन्वय राहत नाही. काही संशोधक आपले पांडित्य दाखविण्यासाठी एकाच पानावर अनेक तळटीपा देत असतात. संशोधक संशोधनात चर्चा केलेल्या मुद्याबाबत गोंधळ लपविण्याकरिता तळटीप देत असतात. संशोधक बऱ्याचदा एकाच विधानाकरिता अनेक तळटीपा देत असतात. संशोधक बऱ्याचदा एकाच वाक्याकरिता अनेक पुस्तकांचा संदर्भ देत असतात. बऱ्याचदा तळटीपामध्ये असबंधता असते, लेखकाचे नाव, पुस्तकाचे शीर्षक बरोबर दिलेले असते, मात्र पुस्तकात समाविष्ट असलेल्या गोष्टींचा संशोधन विषयाशी फारसा सबंध नसतो. अश्या वेळेस वाचकाची दिशाभूल होत असते. संशोधकांनी संशोधनामध्ये चुकीचा संदर्भ दिल्यास वाचकांची निराश्या होत असते.

## ९.११ तळटीपांचे फायदे

संशोधन करीत असतांना तळटीपा ग्रंथाच्या शेवटी न देता बऱ्याचदा तळटीपा प्रत्येक पानावर दिल्या जातात. त्यामुळे वाचकाला तळटीपांचा सहजासहजी अर्थ समजत असतो. ज्या वेळेस प्रकरणाच्या शेवटी तळटीपा दिल्या जातात, त्यावेळेस त्या संशोधकाच्या दृष्टीने फायद्याच्या नसतात. सामान्य वाचक मात्र त्याच्या वाचण्याच्या ओघात खंड पळत नसल्यामुळे आनंदात असतो.

**आपली प्रगती तपासा**

१. इतिहास संशोधनातील तळटीपेचे महत्त्व सांगा.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

२. तळटीप देण्याचे समान तंत्र म्हणजे काय?

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

## ९.१२ ग्रंथसूची

काही अभ्यासकांच्या मते एखाद्या संशोधन कार्याचे महत्व संशोधकांनी संशोधनाच्या शेवटी दिलेल्या संदर्भ ग्रंथावरून कळत असते. ग्रंथसूची ही संशोधकांनी संशोधन करीत असतांना वापरलेल्या पुस्तकांची यादी असते. संदर्भ ग्रंथांची यादी अतिशय काटेकोरपणे तयार करावी लागते. तळटीपांप्रमाणेच संदर्भ ग्रंथांची यादी देण्याची विशिष्ट पद्धत आहे. संदर्भ ग्रंथ सूची तयार करण्याचे विविध प्रकार आहेत. काही संशोधक संदर्भ सूचीमध्ये फक्त वाचलेल्या

ग्रंथांचाच संदर्भ सूचीमध्ये समावेश करिता असतात, तर काही संशोधक वाचलेल्या संदर्भ ग्रंथाबरोबरच न वाचलेल्या मात्र संशोधन विषयाशी सबंधित ग्रंथांचाही समावेश संदर्भ सूचीमध्ये करीत असतात. काही संशोधक संशोधन लेखन कार्यात वापरलेल्या ग्रंथांचाच संदर्भ सूचीमध्ये समावेश करिता असतात.

संदर्भ ग्रंथांची यादी तयार करीत असतांना मूळ साधने:- मूळ साधनांचे अ) प्रकाशित ब) अप्रकाशित या दोन भागात वर्गीकरण करावे. त्याच प्रमाणे भाषेप्रमाणेही साधनांचे वर्गीकरण करायचे असते. मुळ साधने - प्रकाशित – मराठी, हिंदी, इंग्रजी याप्रमाणे, अप्रकाशित साधनांचे भाषेनुसार – मराठी, हिंदी, इंग्रजी याप्रमाणे वर्गीकरण करावे. त्यानंतर दुय्यम साधनांचीही भाषेनुसार वर्गीकरण मराठी, हिंदी व इंग्रजी याप्रमाणे करावे.

संदर्भ ग्रंथ सूची तयार करीत असतांना लेखकाच्या आडनावाचा वर्णक्रम लक्ष्यात घेऊन संदर्भ ग्रंथसूची तयार करावी. यात लेखकाचे आडनाव प्रथम, त्यानंतर नावाची सुरवातीची अक्षरे, ग्रंथाचे शीर्षक, ग्रंथाचा खंड क्रमांक, आवृत्ती, प्रकाशक, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष या प्रमाणे संदर्भ ग्रंथ सूची तयार करावी, त्यानंतर संदर्भ ग्रंथ सूचीमध्ये वृत्तपत्र, नियतकालिके व मुलाखतींचा समावेश असतो.

१) कुलकर्णी अ.रा., मराठ्यांचे इतिहासकार (इतिहास लेखन पद्धती), डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७.

२) कोठेकर शांता., इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५.

३) सरदेसाई बी.एन., इतिहास लेखन पद्धती,फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2004.

**आपली प्रगती तपासा –**

१. इतिहास संशोधनातील संदर्भग्रंथ सूची देण्याची पद्धती सांगा.

## ९.१३ सारांश

ऐतिहासिक संशोधनामध्ये तळटीपा व संदर्भ ग्रंथसूची यांना विशेष महत्व आहे. तळटीपा या अतिशय महत्त्वाच्या आहेत कारण कोणतेही संशोधन तळटीपांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. संशोधक व वाचक या दोघानाही तळटीपांचा फायदा होत असतो.तळटीपा संशोधकाला संशोधनाच्या संदर्भात नवीन माहिती मिळविण्याकरिता मार्गदर्शक म्हणून काम करतात.संशोधकांनी तळटीपांच्या माध्यमातून संदर्भ साधनांचा पुरावा दिल्यामुळे तो पुरावा इतर संशोधकांना तपासून पाहता येतो.संशोधकांनी ऐतिहासिक पुराव्यांचे संदर्भ स्पष्टपणे नोंद केल्याशिवाय संशोधनात्मक लिखाणाला विश्वसनियता प्राप्त होत नाही. संशोधनाला

विश्वसनियता प्राप्त करून देण्याचे कार्य तळटीपा करीत असतात. ग्रंथसूची ही संशोधकांनी संशोधन करीत असतांना वापरलेल्या पुस्तकांची यादी असते. ग्रंथ सूचीमध्ये गुणवत्ता पूर्ण प्राथमिक व दुय्यम ग्रंथांचा समावेश केला पाहिजे. संदर्भ ग्रंथ आणि तळटीपांशिवाय संशोधन कार्याशी सबंधित इतर महत्वाची माहिती असते, त्यांचा समावेश परीशिष्टामध्ये केला पाहिजे. एकंदरीत तळटीपा व ग्रंथ सुचीवरून संशोधन कार्याची गुणवत्ता लक्ष्यात येते.

## ९.१४ प्रश्न

**अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) संशोधन कार्यात तळटीपांचे महत्व विषद करा.

२) तळटीपांचे फायदे व तोटे सांगा.

३) तळटीपा देण्याचे तंत्र समजावून सांगा.

**ब) टीप लिहा**

१) ग्रंथ सूची

२) तळटीपांचा उद्देश

३) तळटीपांचे प्रकार

## ९.१५ संदर्भ

१. कोठेकर शांता., इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

२. सरदेसाई बी.ए, इतिहास लेखन पद्धती,फडके प्रकाशन, २००४

३. प्रभाकर देव, इतिहास - एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००२.

४. इ.एच.कार, व्हाट इज हिस्ट्री, लंडन, एच १९७१.

❄❄❄❄❄❄❄

# १०

# प्राचीन भारतीय इतिहासाचे स्रोत / साधने

**घटक रचना**

१०.० उद्दिष्टे

१०.१ प्रस्तावना

१०.२ पुरातत्त्वीय स्रोत

१०.३ लिखित साधने

१०.४ इतर साधने

१०.५ परकीय प्रवाशांचे वृत्तान्त

१०.६ सारांश

१०.७ प्रश्न

१०.८ संदर्भ

## १०.० उद्दिष्टे

या युनिटचा अभ्यास केल्यावर विद्यार्थी पुढील बाबी समजण्यास सक्षम होऊ शकेल

१) प्राचीन इतिहासाच्या स्रोतांचे स्वरूप व प्रकार समजून घेणे

२) प्राचीन भारतीय इतिहासाचे पुरातत्त्वीय व वाङ्मयीन स्रोत स्पष्ट होणे

३) प्राचीन भारतीय इतिहासाच्या स्रोतांचे स्वरूप स्पष्ट उमगणे

## १०.१ प्रस्तावना

इतिहास लिहिण्यासाठी साधनांची नितांत आवश्यकता असते त्यालाच ऐतिहासिक पुरावा असेही म्हणतात. ऐतिहासिक पुराव्यामुळे साहित्यापेक्षा इतिहास वेगळा गणला जातो. उपलब्ध पुराव्याचे पुरातत्व साधने व लिखित साधने या प्रकारात वर्गीकरण होते. पुरातत्त्व साधनांचे शिलालेख, नाणी, स्मारके इत्यादी प्रकारात वर्गीकरण करता येते. या ऐतिहासिक स्त्रोतांमधून भूतकाळात काय घडले असावे याचा अंदाज घेता येतो. भारत देश हा प्राचीन असून त्याचा इतिहास जाणून घेण्यासाठी साधनस्त्रोतांचा अभ्यास आवश्यक ठरतो.

## १०.२ पुरातत्त्वीय स्रोत

**शिलालेख**

प्राचीन भारतीय इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून शिलालेखांचा विचार केला जातो. असे आलेख शिलाखंड, स्तंभ, गुहांच्या भिंती यावर कोरलेले दिसून येतात. हे

करण्यासाठी शिला, लोखंड, तांबे इत्यादींचा उपयोग होतो. शिलालेख संस्कृत, प्राकृत, पाली, तमिळ, कन्नड इत्यादी भाषांमध्ये आढळून येतात. शिला लेख लिहिण्यासाठी ब्राह्मी व खरोष्टी या लिपीचा उपयोग केला गेला आहे. शिलालेखांमध्ये फेरफार करणे शक्य नसल्यामुळे समकालीन ऐतिहासिक पुरावा म्हणून त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतीय शिलालेखांची सुरुवात अशोकापासून होते. जेम्स प्रिन्सेप याने ब्राह्मी लिपी चे वाचन केल्यापासून शिलालेखांवर लिहिलेल्या मजकुराचे वाचन शक्य झाले आहे. लेखामध्ये लिहिलेल्या मजकुरावरून त्याचे वर्गीकरण करता येते. राज घराण्याची माहिती देण्यासाठी, धार्मिक, प्रशासकीय, उद्देश, आत्म प्रशस्ती पर, दान विषयक, वांडम्मयीन मजकूर दिसून येतो. अशोकाच्या आलेखात त्याच्या धार्मिक व प्रशासकीय सूचना आढळतात. त्यातील मजकूर युक्त, रजू व प्रादेशिक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेला आहे. आत्मप्रशस्तीपर लेखांमध्ये राजाची स्तुती केलेली आढळून येते. त्याने केलेली कामगिरी शिलालेखावर कोरली जाते. कलिंग देशाचा राजा खारवेल याचा हाथीगुंफा येथील आलेख, समुद्रगुप्ताचा अलाहाबाद येथील आलेख, चंद्रगुप्ताचा जुनागढ येथील आलेख, पुलकेशी दुसरा याचा ऐहोळ येथील आलेख हे आत्मप्रशस्तीपर शिलालेखांची उदाहरणे आहेत. अनेक शिलालेखांमध्ये राजेरजवाड्यांनी हिंदू,बौद्ध व जैन यांना दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. आपण केलेल्या दानाचे स्मरण रहावे यासाठी हे आलेख ताम्रपटांवर करण्यात येत. अशा प्रकारच्या महत्त्वाच्या शीलालेखांमुळे इतिहासाचे आकलन होण्यास फार मदत होते. याशिवाय राज्याभिषेक, विवाह व अन्य महत्त्वाच्या घटना ह्या देखील शिलालेखांवर कोरल्या जात. शिलाहार, चालुक्य व राष्ट्रकूट या राज्यांनी असे आलेख करून ठेवलेले आहेत. फाहिआन या बौद्ध चिनी प्रवाशाला अशा प्रकारचे शिलालेख देशांमध्ये ठीक ठिकाणी आढळले आहेत. भारतात आढळणाऱ्या अनेक शिलालेखांतून काही महत्त्वाचे आलेख पुढीलप्रमाणे आहेत.

१) **अशोकाचे शिलालेख-** अशोकाने संपूर्ण देशामध्ये शिलालेख कोरलेले दिसून येतात. जेम्स प्रिन्सेप याने ब्राह्मी लिपीचा उलगडा केल्यानंतर आपल्याला त्याचे शिलालेख वाचणे शक्य झाले आहे. या लेखांमधून अशोकाच्या जीवनातील महत्त्वाच्या घडामोडींचा अभ्यास शक्य झाला आहे. अशोकाची कलिंग देशावरील स्वारी व नंतर त्याने स्वीकारलेल्या बौद्ध धर्म याबाबत माहिती यामधून मिळते. या शिलालेखांचा उपयोग आपल्या अधिकाऱ्यांना सूचना देण्यासाठी अशोकाने केलेला आहे. याशिवाय काही शिलालेखांमध्ये धर्मविषयक आज्ञा देखील दिसून येतात अशोक बौद्ध धर्माचा अनुयायी असला तरी सर्व धर्माप्रती त्याने समान भाव बाळगल्याचे शीला लेखांमधून दिसून येते. सर्व लोकांनी संयम बाळगण्याची आवश्यकता आहे, व्रत वैकल्यांचा फोलपणा, प्राणिहत्येवर घातलेली बंदी इत्यादींचा उल्लेख शिलालेखांवर आहे. अफगाणिस्तान ते बिहार, काश्मीर ते दक्षिण भारतापर्यंत हे शिलालेख आढळतात. यावरून त्याचा साम्राज्य विस्तारही लक्षात येतो.

२) **हाथी गुंफा आलेख-** कलिंगचा राजा खारवेल यांनीही आपल्या जीवनाच्या महत्त्वाच्या घडामोडी हाथी गुंफा येथील शिलालेखांवर कोरलेल्या आहेत. यामध्ये त्याने केलेल्या संभाजी विस्तार,सैनिकी मोहिमा,त्याचा पराक्रम, त्यांचे व्यक्तिगत जीवन व त्याने केलेले जनहिताचे कामे याचा उल्लेख आहे.

**३) गुप्तकालीन आलेख-** गुप्तकाळातील पुष्कळ आलेख उपलब्ध आहेत. त्यांचे राज्य विस्ताराचे धोरण, त्यांच्या सैनिकी मोहिमा, त्यांनी पराभूत केलेल्या राजांची नावे,त्यांच्या घराण्याचा तपशील या लेखांमध्ये आढळतो. अलाहाबाद येथील एका स्तंभलेखन समुद्रगुप्ताचे जीवन चरित्र कोरलेले दिसून येते. उदयगिरि येथील शिलालेखांवरून चंद्रगुप्ताच्या सहिष्णू धार्मिक धोरणाचा अंदाज येतो. जुनागढ येथील शिलालेखांवरून भारतावर गुणांनी केलेल्या आक्रमणाची कल्पना येते.

**४)** ऐहोळ येथे पुलकेशिन दुसरा या चालुक्य राजाचा शिलालेख आहे. पुलकेशीने सम्राट हर्षवर्धनाचा पराभव केल्याची माहिती या शिलालेखांवरून आत येते. यामध्ये पुलकेसिनचे वर्णन परमेश्वर असे करण्यात आले आहे.

**नाणी**

नाणेशास्त्र इतिहासलेखनात महत्त्वाची भूमिका बजावते. नाणीशास्त्राचा अभ्यास अनेक बाबींवर प्रकाश टाकतो. नाणी हा एक महत्त्वाचा प्राथमिक ऐतिहासिक स्त्रोत आहे. वस्तूंची अदलाबदल करण्याच्या पद्धती नंतर देवाणघेवाणी मध्ये यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. चांदी, सोने, तांबे त्यातून पासून नाणी बनवली जात असत. नाणी पद्धतीमुळे व व्यापारी वर्गाला व्यापार करण्यास सोपे गेले. त्यामधूनच अनेक नाणी पाडली गेली. यांच्या अभ्यासामधून राजकीय, भौगोलिक व धार्मिक परिस्थिती जाणून घेता येते. प्राचीन भारतीय राजे, इंडो ग्रीक, शक, कुशाण इत्यादी राजांनी अनेक नाणी पाडल्यामुळे आपल्याला त्यांच्याविषयी माहिती मिळाली. नाण्यांवर राजांची माहिती असल्यामुळे आपल्याला आतापर्यंत माहित नसलेल्या अनेक राजांची माहिती मिळाली. काही नाण्यांवर एका बाजूला राजाचे नाव तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या धर्मविषयक प्रतिका विषयी माहिती दिसते. यावरून तू कोणत्या धर्माचे पालन करत होता हे देखील दिसते. कुशाण राजांपैकी सुरुवातीचे शासक शिवपूजन असल्याचे त्याच्या नाण्यांवरून दिसते. नंतरच्या काळात सत्तेवर आलेला कनिष्क याने नाण्याच्या एका बाजूला बुद्धांची प्रतिमा कोरली. यावरून बौद्ध धर्माचा अनुयायी असल्याचे दिसून येते. सम्राट चंद्रगुप्त याच्या नाण्यावर एका बाजूला चंद्रगुप्त व कुमारी देवी यांचे चित्र आहे. तर दुसऱ्या बाजूला लिच्छवय अशी अक्षरे दिसून येतात. यावरून संशोधकांनी असा निष्कर्ष काढला की राज्य विस्तारामध्ये त्याला लिच्छवींचे मदत झाली असावी. नाण्यांचा अभ्यास केल्यानंतर राजकीय व आर्थिक प्रभावाचा आवाका लक्षात येतो. नाणी उपलब्ध झालेल्या प्रदेशावरून तत्कालीन राज्यव्यवस्था कितपत पसरली असावी याचा अंदाज येतो. काही नाण्यांवर एका बाजूला शासनाचे नाव तर दुसऱ्या बाजूला तो शासक ज्याचा मांडलिक आहे त्याचे नाव आढळून येते. नाण्यांच्या अभ्यासावरून तत्कालीन धातु शास्त्र कितपत प्रगत होते याची माहिती देखील मिळते.

**स्मारके**

या प्रकारच्या ऐतिहासिक साधनांमध्ये प्रार्थना स्थळे, स्तूप, विहार, राजवाडे, किल्ले इत्यादींचा समावेश होतो. या शिवाय उत्खननात सापडलेले पुरातत्त्वीय अवशेष यांचाही समावेश करता येतो. लिखित साधनांच्या अभावी इतिहासलेखन अशक्य बनल्यास पुरातत्वीय साधने महत्त्वाची भूमिका बजावतात. सिंधू संस्कृतीमध्ये लिखित साधने मिळाली असून देखील त्यावरील लिपीचा उलगडा न झाल्यामुळे त्या संस्कृती विषयीची माहिती

उपलब्ध शिल्पे, स्मारके, भांडी, खेळांची साधने, व इतर अवशेष यांच्या आधारे आपण घेत आलेलो आहोत. प्राचीन राजघराण्यांच्या अभ्यासातही पुरातत्वीय अवशेष महत्त्वाची भूमिका बजावतात. अनेक उत्खननामधून प्राचीन शहरांची माहिती मिळाली आहे. अजिंठा व वेरूळ येथील भित्तीचित्रे गौतम बुद्धांच्या जीवनावर आधारित आहेत. दक्षिण भारतातील विविध शिल्पे व मंदिरे यामधून पल्लव, चोळ, चालुक्य यांचे विषयी धागेदोरे हाती लागतात. प्रस्तुत स्थापत्यांवर तत्कालीन राजांची व देणगीदारांची नावे कोरलेली आहेत त्यावरून तत्कालीन राजघराण्यांची माहिती मिळते. उत्खननात सापडलेल्या भांड्यांवर तत्कालीन कलाकुसरीचा प्रभाव दिसून येतो. त्यावरून ती भांडी कोणत्या कालखंडात व कोणत्या राजवटीत तयार झाली असावीत याचा अंदाज बांधता येतो. प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन कालखंडात अनेक प्रकारच्या स्थापत्यकला मूर्तिकला यांचा विकास झाला. त्यांच्यावर कोणत्या संस्कृतीचा किती प्रभाव होता हेदेखील तुलनात्मक अभ्यास आणि दिसून येते.

**आपली प्रगती तपासा –**

१. पुरातत्त्वीय स्त्रोत म्हणजे काय? व त्याची माहिती द्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १०.३ लिखित साधने

प्राचीन काळामध्ये भारतीयांनी मौखिक परंपरेत द्वारे साहित्य निर्माण केले. पुढे लेखनकला अवगत झाल्यानंतर ते लिहिले गेले. या साधनांचे वर्गीकरण प्रामुख्याने धार्मिक व ऐहिक या दोन प्रकार करता येते.

**धार्मिक लिखित साधने**

धार्मिक लिखित साधनांचे हिंदू साहित्य, बौद्ध साहित्य वजन साहित्य इत्यादी प्रकारात विभागणी करता येते.

**हिंदू साधने**

**१)** **वेद-** वेदांमध्ये प्राचीन समाज व धर्म यांची विस्तृत माहिती दिली आहे. हिंदू धर्म व तत्त्वज्ञान यांचे उगमस्थान म्हणून वेदांकडे पाहिले जाते. ऋग्वेद हा सर्वात प्राचीन वेद मानला जातो. यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद इत्यादी वेदांमध्ये आर्यांच्या जीवनाविषयी माहिती मिळते. यजुर्वेदामध्ये अनेक प्रकारचे मंत्र संकलित केलेले आहेत. विविध प्रसंगी केल्या जाणाऱ्या यज्ञांचा उल्लेख यामध्ये आहे. प्रार्थना पद्धतीचा आरंभ, वाढ व विकास याबद्दल माहिती आहे. यज्ञामुळे दैवी शक्ती व मानव प्राणी यांच्यात सहकार्य निर्माण होऊन त्याच्या इच्छा पूर्ण होतात असा विचार मांडला आहे. साम वेदांमध्ये

यज्ञाच्या वेळेस म्हणावयाच्या ऋचांचा संग्रह आहे. यज्ञकर्म व भारतीय संगीत यांचा इतिहास समजण्यासाठी सामवेद उपयोगी आहे. अथर्ववेदामध्ये पुरोहित वर्गासाठी उपयोगी अशा संहिता दिलेल्या आहेत अनिष्ट शांती पूर्ती हे त्याचे मुख्य हेतू आहेत राज्याभिषेक व युद्धात जय मिळवण्याचे मंत्र अथर्ववेदामध्ये दिसतात.

२) **ब्राह्मणे-** वेदांमध्ये असलेले वैदिक मंत्राचा अर्थ कालांतराने अस्पष्ट वाटू लागला. त्यासाठी यज्ञविधीतील म्हणावयाच्या मंत्रांचा योग्य उपयोग होण्यासाठी ऋषींनी विवेचन संग्रह केला आहे. त्यालाच ब्राह्मण असे म्हटले आहे. प्रत्येक शाखेचे वेगळे ब्राह्मण ग्रंथ आहेत. ऋग्वेदाचे ऐतरेय, सामवेदाचे तांड्य , अथर्ववेदाचे गोमिळ हे ब्राह्मण ग्रंथ प्रसिद्ध आहे.

३) **उपनिषदे-** उपनिषदे अध्यात्मिक विचारांसोबत तात्विक विचार साठी प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये विश्व व जीव यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास केलेला आहे. १०८ उपनिषदांचा उल्लेख असून त्यापैकी केन, कठ, मुंडक, ऐतरेय, छांदोग्य इत्यादी उपनिषदे जुनी व महत्त्वाचे मानले जातात मोक्षप्राप्ती हे अंतिम ध्येय मानून त्यादृष्टीने योगसाधना करणे अशा प्रकारचे मार्ग यामध्ये सुचविले आहेत. उपनिषदांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा पाया घातला असून पुढील धार्मिक व आध्यात्मिक सुधारणांना त्यांना खाद्य पुरवले आहे.

४) **वेदांगे-** वेदांच्या अभ्यासासाठी काही नवीन परंपरा उदयाला आल्या. त्यालाच वेदांगे म्हटले आहे. शिक्षा, कल्प, व्याकरण, छंद, ज्योतिष्य अशी वेदांगे आहेत. वैयक्तिक व सामाजिक नीतिनियम यांचा संग्रह यामध्ये आहे.

५) **महाकाव्य-** रामायण व महाभारत ही महाकाव्ये पूर्णतः ऐतिहासिक नसली तरी या महाकाव्यांचा समाजव्यवस्था समजून घेण्यासाठी उपयोग होऊ शकतो. पुरोहित वर्गाचे वर्चस्व व कनिष्ठ जातीतील लोकांनां नाकारले जाणारे हक्क, याची जाणकारी या महाकाव्यातून घडते. या महाकाव्यात इतिहास, दंतकथा, मिथक कथा यांचे बेमालूम मिश्रण आढळते. याशिवाय भारतीय तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, अर्थशास्त्र व सामान्य लोकांचे जीवन यांची माहिती मिळते. परकीय आक्रमणे, अंतर्गत कलह, प्रादेशिक विभागणी इत्यादींचे दर्शन त्यातून घडते. या महाकाव्यातून उत्तरेकडे असलेले अनेक राज्य व त्यांचा राज्यकारभार यांची माहिती मिळते. चातुर्वर्ण्य संघटनेचे जातीव्यवस्थेत झालेले रूपांतर याची माहिती आपल्याला समजते. याव्यतिरिक्त पुराणे, स्मृतिग्रंथ व इतर वैदिक साहित्य यामधूनही तत्कालीन सामाजिक, आर्थिक, व राजकीय परिस्थितीचे आकलन होते.

६) **संगम साहित्य-** दक्षिण भारताच्या इतिहासाची माहिती संगम साहित्यातून होते. या साहित्यामध्ये तमिळ भाषेतील कवींची कवने, बोधकथा, इत्यादींचा समावेश आहे.

## बौद्ध साधने

बौद्ध साहित्यामधून इसवी सन सहाव्या शतकापूर्वीपासूनची राजकीय व धार्मिक माहिती मिळते. मगध राज्याच्या स्थापनेच्या आधीपासूनची माहिती बौद्ध साहित्यात संकलित आहे. बौद्ध साहित्याचे विनयपिटक, सुत्तपिटक, व अभिधम्मपिटक असे तीन भाग

पडतात. विनयपिटक मध्ये बौद्ध भिक्खूंच्या जीवन विषयक नियम सांगितले आहेत. सुत्तपिटक मध्ये बुद्धांची शिकवण सारांश रुपात सांगितले आहे. अभिधम्म पिटक मध्ये बुध्दांच्या शिकवणीचे तात्विक विवेचन आढळते. याशिवाय श्रीलंकेमध्ये दीपवंश व महावंश या ग्रंथांमध्ये श्रीलंकेतील बौद्ध धर्माविषयी तपशीलवार माहिती आहे. जातक कथांमधून तत्कालीन सामाजिक व आर्थिक बाबींवर प्रकाश पडतो. दिव्यवदन या नेपाळी बौद्ध ग्रंथांमधून मौर्य ते शुंग शासन कालापर्यंत माहिती मिळते. ‘मिलिंद पन्ह’ या ग्रंथामधून बौद्ध भिक्खू नागसेन व इंडो-ग्रीक राजा मिलिंद यांच्यातील प्रश्नोत्तराचे वर्णन आहे.

**जैन साधने**

जैन साहित्य विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. महावीर व त्यांचे पूर्वज यांच्याबद्दल आख्यायिका व दंतकथा समावेश त्यामध्ये आहे. भद्रबाहू चरित्र या ग्रंथात चंद्रगुप्त मौर्य यांच्या जीवना बद्दल लिहिले गेले आहे. मेरुतुंग याचे प्रबंध चिंतामणी व राजशेखर याचे प्रबंधकोश हे ग्रंथही महत्त्वाचे आहेत.

**निधर्मी लिखित साधने**

ऐहिक किंवा निधर्मी साहित्याचे चरित्र, नाटक, काव्य इत्यादी प्रकारात विभागणी करता येते.

१) **चरित्र-** प्राचीन भारतातील अनेक लेखकांनी आपल्या आश्रयदात्या राजांचे चरित्र लेखन केलेले आहे. याशिवाय काही प्रसिद्ध व्यक्तींचे जीवन चित्ररूपात मांडलेले आहेत. अश्वघोष याने लिहिलेले बुद्ध चरित्र प्रसिद्ध आहे. हर्षवर्धनच्या दरबारी असलेल्या बाणभट्ट याने हर्षच्या जीवनावर आधारित हर्षचरित हा ग्रंथ लिहिला आहे.

२) **नाट्य-** विशाखादत्त याचे मुद्राराक्षस हे नाटक चंद्रगुप्त व नंद राजे यांच्यातील संघर्ष दाखवते. याशिवाय कालिदासाची अभिजात शाकुंतलम सारखी नाट्यकृती तत्कालीन सामाजिक जीवनावर प्रकाश टाकते. भवभूति, भास व शूद्रक यांच्या नाटकांमधूनही तत्कालीन भाषा, चालीरीती, वेशभूषा इत्यादींबद्दल माहिती मिळते. मुद्रा-राक्षस हे विशाखादत्ताने लिहिले आहे. हे नाटक चाणक्य (चंद्रगुप्त मौर्याचा पंतप्रधान) आणि राक्षस (धनानंदाचा अमात्य) यांच्याशी संबंधित एका घटनेशी संबंधित आहे.मालविका-अग्निमित्र नाटक गुप्त काळात कालिदास या थोर कवी व नाटककाराने लिहिले होते. शुंग घराण्याचा शूर राजा एक मालविका आणि अग्निमित्र यांच्यातील प्रेम हा या नाटकाचा विषय आहे. नांगनादा, रत्नावली, प्रियदर्शिका ही नाटके राजा हर्षवर्धनाने लिहिली होती. हे त्याच्या राजवटीतील सामाजिक-आर्थिक स्थिती आणि धार्मिक दृष्टिकोनावर प्रतिबिंबित करतात.

३) **कल्हण याचे राजतरंगिणी-** कल्हण याने आपल्या लेखनातून काश्मीरमधील समाज जीवन व राजकीय जीवन रेखाटले आहे. काश्मीरचे चित्रण करताना तो सर्वदूर फिरून आला व त्याने प्रत्यक्ष माहिती गोळा केली. त्यामुळे त्यांच्या लिखाणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**आपली प्रगती तपासा-**

१. प्राचीन काळातील धार्मिक साहित्यावर चर्चा करा.

२. अधार्मिक साहित्य म्हणजे काय? ते सांगून त्याचे वर्णन करा.

## १०.४ इतर साधने

कौटिल्याचे अर्थशास्त्र हे एक महत्त्वाचे ऐतिहासिक साधन आहे. या पुस्तकांमधून तत्कालीन समाज जीवन, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या सर्वांची माहिती होते. चंद्रगुप्त मौर्य याच्या प्रशासनाविषयी हे पुस्तक महत्त्वाची माहिती देते. राजाने पार पाडावयाची कर्तव्य, लोकांनी करावयाची कामे या पुस्तकात नमूद केलेली आहेत. याशिवाय तत्कालीन राज्यव्यवस्थेतील कर प्रणाली, कायदे, शिक्षा, जुगार, व्यापार, इत्यादी विषयक माहिती यामध्ये आहे. पाणिणी याच्या अष्टाध्यायी या ग्रंथामधून चौथ्या शतकातील समाज जीवनाचे दर्शन घडते. त्याने लिहिलेल्या पुस्तकातून भाषेच्या व्याकरण विषयक अंगावर प्रकाश पडतो. चरक संहिता व सुश्रुत संहिता या ग्रंथांमध्ये प्राचीन भारतातील वैद्यकशास्त्र बद्दल माहिती मिळते.

## १०.५ परकीय प्रवाशांचे वृतांत

परकीय प्रवाशांनी केलेले वर्णन हे निरपेक्ष असण्याचा संभव असतो. कारण त्यांनी केलेले लेखन हे जिज्ञासेपोटी केलेले असते. त्यांना कोणालाही खुश करायचे होते.त्यामुळे त्यांच्या लेखनात वस्तुनिष्ठ दृष्टिकोन आढळतो. भारतीय इतिहासकार आपल्या देशाचे इतिहास लिहिताना अतिशयोक्त वर्णन करू शकतात मात्र परकीय प्रवासी असे करत नाहीत. भारतात येवून वृत्तांत लिहिणारे पहिले प्रवासी म्हणून ग्रीक लोकांचा उल्लेख होईल. हेरोडोटस या ग्रीक इतिहासकारांनी देखील भारताबद्दल उल्लेख केलेला आहे. अलेक्झांडर सोबत अनेक इतिहासकार भारतात आले व त्यांनी तपशीलवार इतिहास लिहिलेला आहे. अलेक्झांडर भारतातून गेल्यानंतर सेल्युकस निकेटर यांनी वायव्य सरहद्दीवर राज्य स्थापन केले. त्याने आपला प्रतिनिधी मेगॅस्थेनीस याला चंद्रगुप्ताच्या दरबारी नेमले. त्यांनी लिहिलेल्या इंडिका या ग्रंथातून अनेक महत्त्वाच्या बाबींचा उलगडा होतो. चंद्रगुप्त मौर्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल व त्याच्या प्रशासकीय बाबींबद्दल पुष्कळ महत्त्वाची माहिती या ग्रंथातून मिळते.

सम्राट अशोक व कनिष्क यांनी बौद्ध धर्माचा पूर्वेकडील देशात पसार केल्यामुळे तेथील लोकांना भारताबद्दल कुतूहल निर्माण झाले. त्या कुतूहलापोटी व बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी अनेक चिनी प्रवासी भारतामध्ये आले त्यापैकी हुएन् त्संग, फाहीयान, व इत्सिंग आहेत.

**फा-हिएन (इ.स. ३३७-४२२) :**

या चिनी प्रवाशाने गुप्त काळात भारताला भेट दिली. तो बौद्ध भिक्खू होता, देव-भूमी (म्हणजे भारत) यांच्याकडून ज्ञान मिळवण्यासाठी आणि बौद्ध तीर्थक्षेत्रांना भेट देण्यासाठी त्याने भारताला भेट दिली होती. आपल्या तीन वर्षांच्या प्रवासाच्या आधारे त्याने आपल्या 'रेकॉर्ड्स ऑफ बुद्धिस्टिक किंग्डम्स' या इतिवृत्तात उत्तर भारतातील समाज आणि संस्कृती, याशिवाय गुप्त प्रशासनातील विविध घटकांवरही लिहिले आहे. त्याने आपले अनुभव सविस्तरपणे मांडले आहेत. त्याच्या वृत्तांतामधील कालगणना अचूक असल्यामुळे इतिहासामध्ये त्याचा फार उपयोग होतो. चिनी प्रवासी हे मुख्यत्वे बौद्ध भिक्षु होते. बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी ते भारतामध्ये आले होते. त्यामुळे धार्मिक विषयांवर त्यांच्या लेखनाबद्दल मध्ये जास्त माहिती मिळते. असे असूनही ऐतिहासिक घडामोडी जाणून घेण्याच्या दृष्टीने त्यांचे लेखन अतिशय महत्त्वाचे आहे.

**हुएन् त्संग (युवान स्वांग) (इ.स. ६०२-६६४)**

हा चिनी बौद्ध भिक्षू, सर्व प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जावून हर्षवर्धनाच्या कारकिर्दीत भारताला भेट देऊन गेला. त्याने बौद्ध तीर्थक्षेत्रांना भेट दिली, नालंदा विद्यापीठात राहून बौद्ध धर्माचा अभ्यास केला, मूळ बौद्ध ग्रंथांचा अभ्यास केला, मौलिक हस्तलिखिते व स्मृतिचिन्हे गोळा केली, प्रती तयार केल्या, हर्षाच्या संमेलनाला हजेरी लावली आणि १५ वर्षांच्या भारतभर प्रवासानंतर इ.स. ६४५ मध्ये चीनमध्ये परतला.नालंदा विद्यापीठात भविष्य अभ्यास करीत होता. त्याला हर्षवर्धनचा आश्रय देखील मिळाला.चीनमध्ये त्याने आपला लेखा 'सी-यू-की' (ग्रेट टँग रेकॉर्ड्स ऑन द वेस्टर्न रिजन्स) या नावाने लिहिला. या इतिवृत्तात त्याने भारतात जे काही पाहिले होते त्याचे स्पष्ट वर्णन केले आहे. तो राजांची विशेषत: हर्षाची आणि त्याची उदारता, भारतातील विविध प्रदेशांतील लोक व चालीरीती, जीवन-मार्ग इत्यादींची माहिती देतो. महाराष्ट्रीय लोकांच्या सवयी आणि प्रकृतीवर त्यांनी आपल्या लेखनातून प्रकाश टाकला आहे.

**आपली प्रगती तपासा-**

१. परकीय प्रवाशांचे प्रवास वर्णनाची माहितीचे विश्लेषण करा.

## १०.६ सारांश

इतिहासलेखनात उपलब्ध साधने महत्वाची भूमिका बजावतात. साधनांमुळे इतिहास हा मिथके व कथा कादंबरी यापेक्षा वेगळा गणला जातो. लिखित साधनांच्या अभावी पुरातत्वीय साधने महत्वाची आहेत. शिलालेख, नाणी, स्मारके, चित्रे यांचा पुरातत्वीय साधनामध्ये समावेश होतो. प्राचीन भारतामध्ये मुबलक प्रमाणावर लिखित साहित्य उपलब्ध आहे. त्याचेही धार्मिक व ऐहिक या प्रकारात विभाजन करता येते. प्राचीन भारतीयांना इतिहास लेखन कला अवगत नसली तरी त्यांनी निर्माण केलेल्या लिखित साधनांमधून इतिहासाचे दर्शन घडते. परकीय प्रवाशांनी लिहिलेल्या इतिवृत्तामधुनही आपल्याला ऐतिहासिक घटना व प्रसंग ज्ञात होतात.

## १०.७ प्रश्न

१) प्राचीन भारतीय इतिहासाची पुरातत्वीय साधने कोणती?

२) शिलालेख व नाणी यांचे प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासात महत्व स्पष्ट करा.

३) इतिहासाच्या अभ्यासात साधनांचे परिक्षण करा.

४) प्राचीन भारताच्या इतिहासातील धार्मिक आणि ऐहिक साहित्याचे महत्त्व कोणते?

## १०.८ संदर्भ

१) सरदेसाई बी. एन., इतिहास लेखनशास्त्र, , फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.

२) ग्यारेगन जी. एस, अ गाईड टू हिस्टोरिकल मेथड,फोर्थम युनिवर्सिटी प्रेस, १९५१.

३) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक्स, औरंगाबाद.

४) ए. एल. बाशम, द वंडर दाट वाज इंडिया,

५) झा ,डी. एन, एनशियंट इंडिया, मनोहर पब्लिकेशन,दिल्ली, २००८.

❄❄❄❄❄❄❄

# ११

# मध्ययुगीन भारत आणि मराठ्यांच्या इतिहासाची साधने

**घटक रचना**

११.० उद्दिष्टे

११.१ प्रस्तावना

११.२ सुलतानशाही कालखंडातील लिखित साधने

११.३ मुघल कालखंडातील लिखित साधने

११.४ परकीय प्रवाशांचे वृत्तान्त

११.५ पुरातत्व साधने

११.६ लिखित साधने

११.७ शासकीय व खाजगी कागदपत्रे

११.८ पर्शियन साधने

११.९ युरोपियन साधने

११.१० सारांश

११.११ प्रश्न

११.१२ संदर्भ

## ११.० उद्दिष्टे

प्रस्तुत घटकाचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील बाबी अवगत होतील

१) मध्ययुगीन भारतीय इतिहासाची साधनांचे स्वरूप व प्रकार

२) मध्ययुगीन भारतीय इतिहासाची पुरातत्त्व व लिखित साधने यांचे आकलन

३) मराठा इतिहासाची साधनांचे स्वरूप व स्त्रोत

४) मध्ययुगीन भारतीय इतिहास लेखनाची साधने

## ११.१ प्रस्तावना

मध्ययुगीन कालखंडात भारतामध्ये मुस्लिमांचे साम्राज्य स्थापन झाले. तुर्की व अरब मुस्लिमांमध्ये इतिहास लेखन कला आधीपासून चालत आलेली होती. भारतामध्ये राज्य स्थापन केल्यानंतर इतिहासलेखनाला गती मिळाली. त्यांच्या दरबारात अनेक इतिहासकार

होते. काहीजणांनी राजाश्रयाने इतिहास लेखन केले तर काही जणांनी आपल्या अधिकारात वैयक्तिक रित्या इतिहास लिहिला. लिखित साहित्याशिवाय शिलालेख, नाणी, स्मारके व इमारती पुरातत्वीय साधना देखील उपयोग लेखनामध्ये होतो. मध्ययुगीन कालखंड याबाबत दोन्ही प्रकारची साधने उपलब्ध करून देतो.

## ११.२ सुलतानशाही कालखंडातील लिखित साधने

सिंध प्रांतावर अरबांनी स्वारी केल्यानंतर झालेल्या ऐतिहासिक घडामोडींचे वर्णन 'छचनामा' या ग्रंथात सापडते. हा ग्रंथ अरेबिक भाषेत असून त्याचे पर्शियन भाषांतर मोहम्मद अली बिन अबू बकर याने केले. या ग्रंथावर आधारित पुढे 'तारीख ए सिंध' हे पुस्तक लिहिण्यात आले. हसन निजामी यांनी लिहिलेल्या 'ताजुल मासीर' या ग्रंथात कुत्बुद्दीन-ऐबक आणि अल्तमश या गुलाम घराण्यातील सुलतान चा इतिहास लिहिलेला आहे. मोहम्मद घोरी सोबत भारतामध्ये आला व भारतामध्ये स्थायिक झाला. मिन्हाज-उस-सिराज यांने 'तबकात-इ-नासिरी' या ग्रंथात सुल्तान रजिया व सुलतान नसीरुद्दीन त्याबद्दल माहिती दिलेली आहे. इतर देशातील मुस्लिम देशांचा इतिहासही त्याने या पुस्तकात लिहिला आहे. अमिर खुसरो हा दिल्ली सुलतानशाही च्या काळातील प्रसिद्ध साहित्यिक होता. बल्बन ते गियासुद्दीन तुघलक अशा अनेक सुलतानांच्या दरबारात तो राजकवी होता. तो स्वतः इतिहासकार नव्हता पण त्याने इतिहासावर आधारित अनेक ग्रंथ लिहिले. खजाइन-उल फुतूर या ग्रंथात अल्लाउद्दीन खिलजीच्या पहिल्या सोळा वर्षाचे वर्णन आहे. याशिवाय त्याने तुगलक नामा या ग्रंथात गियासुद्दीन तुघलकने सत्ता कशी मिळवली याचे वर्णन केले आहे.

झियाउद्दीन बराणी याने 'तारीख- ए- फिरोजशाही' या ग्रंथात बल्बन पासून फिरोज तुगलक पर्यंतचा इतिहास लिहिलेला आहे. हा दरबारी इतिहासकार असल्याने अनेक घटना त्यांनी जवळून पाहिले आहेत. असे असूनही त्यांनी काही चुका केल्या आहेत. घटना व तारखा यामध्ये चुका आढळतात. शम्स-ए-सिराज अफीफ याने बरनिच्याच 'तारीख-ए- फिरोजशाही' या ग्रंथाचे नाव घेऊन इतिहासलेखन केले. फिरोज तुघलकाच्या राजवटीचे संपूर्ण वर्णन त्याने केले आहे. सुलतान फिरोजशाह तुघलक याने स्वतः 'फुतुहते फिरोजशाही' हा ग्रंथ रचला व त्यात स्वताच्या कारकिर्दीविषयी माहिती लिहिली. इसवी सन १३५० मध्ये इसामी यांनी 'फुतुह-उल-सलातीन' हा इतिहास ग्रंथ लिहिला. त्यामध्ये महंमद गझनीच्या आक्रमणापासून मोहम्मद बिन तुगलक पर्यंतचा इतिहास लिहिला आहे. मोहम्मद बिन तुगलक सोबत बिनसल्यामुळे तो पुढे दक्षिणेस जाऊन राहिला.

'तारीख ए मुबारकशाही' हा ग्रंथ याह्या बिन अहमद त्याने लिहिला. इ. स. १४०० ते १४३४ पर्यंत सय्यद घराण्यात घडलेल्या घडामोडी जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ म्हणजे एक विश्वसनीय साधन आहे. नंतरच्या काळातील निजामुद्दीन अहमद, बदायुनी या इतिहासकारांनी देखील या ग्रंथाचा उपयोग केला आहे. याशिवाय सुलतान कालखंडात इतर राजवटींची माहिती देणारे देखील ग्रंथ उपलब्ध आहेत. गुजरातची माहिती सिकंदर बिन मोहम्मद याच्या 'मीरत इ सिक्न्दारी' या ग्रंथात सापडते. बहामनी आणि अहमदनगरच्या निजामशाहीची माहिती देणारा सय्यद अली तबातबा याचा 'बुर्हाण इ मासीर' हा ग्रंथ उपलब्ध आहे. राफिउद्दिन सिराजी याने आपल्या 'ताजीकीरात उल मुल्क' या ग्रंथात विजापूरच्या आदिलशहाची माहिती दिलेली आहे.

## ११.३ मुघल कालखंडातील लिखित साधने

मुघल कालखंडात विपुल प्रमाणात लिखित साहित्य आढळून येते. आत्मचरित्र, चरित्र, प्रादेशिक इतिहास, दरबारातील नोंदी अशा विविध प्रकारे इतिहास लेखन केले गेले आहे. बाबर व जहांगीर यांचे आत्मचरित्र विशेषकरून प्रसिद्ध आहेत.

'तुझुक ए बाबरी' किंवा 'बाबरनामा' या नावाने बाबरचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. फारसी भाषा मध्ये त्याची चार भाषांतरे झाली. बाबरची लेखनशैली साधी व सरळ आहे. त्याने स्वतःच्या चुका व व्यसने याबद्दल मोकळेपणाने लिहिले आहे. त्याची बलस्थाने व लष्करी डावपेच याबद्दलही माहिती दिलेली आहे. भारतामधील भौगोलिक परिस्थिती, प्राणी, पक्षी, व भारतीय लोक याबद्दल पुस्तकात त्याने नमूद केलेले आहे. इथल्या लोकांविषयी काही पूर्वग्रह त्याच्या मनात दिसून येतात. त्याच्या मते, भारतातील लोक सुंदर नाहीत, त्यांना शिष्टाचार अवगत नाहीत, तेथे चांगले घोडे, चांगल्या प्रकारची फळे, थंड पाणी व चांगले अन्न उपलब्ध नाही, काबुल सारखे प्रशस्त बाजार, सार्वजनिक स्नानगृहे, मेणबत्ती वाचनालय भारतामध्ये नाहीत. हिंदुस्थानात पाण्याचा अभाव आहे. येथील घरे सुंदर नाहीत मात्र हिंदुस्थानात चांदी व सोने विपुल सापडते व तेथील हवा हे चांगली आहे. भारतामध्ये लोक जाती-जातीत विभागलेले आहेत हेदेखील तो आपल्या पुस्तकात लिहितो. बाबरच्या म्हणण्यात पूर्णपणे सत्यांश नाही कारण तो थोडेच दिवस भारतात राहिला व त्याच्या अनुभव उत्तर भारतात या विशिष्ट प्रदेशाशी संबंधित आहेत. असे असूनही तत्कालीन इतिहास समजण्यासाठी त्यांचे आत्मचरित्र एक मौलिक साधन आहे.

'तुझुक इ जहांगिरी' हे जहांगीर या मुघल सम्राटाचे आत्मचरित्र आहे. जहांगीरच्या आत्मचरित्र बऱ्याच अंशी विश्वसनीय आहे. त्याने स्वतःच्या कारकिर्दीच्या सतरा वर्षाची हकीकत स्वतः लिहिली आहे. जहांगीर व्यक्तिमत्त्व समजण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे. त्याच्या वडिलांबद्दल म्हणजे अकबराबद्दल माहिती लिहिली आहे. असे असूनही त्यांनी अकबराविरुद्ध केलेले बंड व नुरजाहासोबत त्याने केलेला विवाह याबद्दल तो फारसे लिहित नाही. या आत्मचरित्रांव्यतिरिक्त मुघल कालखंडात दरबारातील व्यक्तींनी मोगल बादशहाची चरित्र लिहिलेली आहेत. तर काहींनी मुगल कालखंडातील इतिहास शब्दबद्ध केलेला आहे.

बाबरची मुलगी व हुमायूनची बहीण, गुलबदन बेगम हिने हुमायूनच्या जीवनावर आधारित पुस्तक 'हुमायुननामा' लिहिले आहे. बाबर व हुमायून यांची वैयक्तिक माहिती जाणून घेण्यासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे. गुलबदन बेगमने कुटुंबातील इतर व्यक्तींची कसे संबंध आहेत याची विस्तृत विवेचन पुस्तकात केलेले आहे. बाबरचा मावसभाऊ महंमद हैदर याने 'तारीखे रशिदी' हा ग्रंथ लिहिला. त्याने बाबरच्या पराक्रमाची प्रसंग केली आहे. त्याच्या पुस्तकात बाबरच्या लढाया, हुमायुन शेरशाह संघर्ष, हुमायुनचे पलायन व काश्मीरमधील घडामोडी इत्यादींचे वर्णन आहे. यापैकी अनेक ठिकाणी तर स्वतः हजर असल्यामुळे त्यांच्या लिखाणाला महत्त्व आहे. हुमायुन विश्वासू नोकरी जोहर याने 'ताज्कीरात इ वाकाइत' हा ग्रंथ लिहिला असून त्यात हुमायुनने सहन केलेल्या हाल-अपेष्टांचे वर्णन आहे. मात्र वयाच्या ऐंशीव्या वर्षी केवळ स्मरण शक्तीवर अवलंबून राहून हा ग्रंथ लिहिल्याने तारखांमध्ये त्याने गडबड केली आहे.

अकबराच्या कारकिर्दीची माहिती देणारा ग्रंथ 'तारीखे अकबर शाही' हाजी मोहम्मद कंदारी त्याने १५७८ ते १५८० या काळात लिहिला. त्याने अकबराच्या धर्मिक मतांची फारशी दखल घेतली नाही. पण अकबराच्या व्यक्तिमत्त्वावर व शासन पद्धतीवर प्रकाश टाकला आहे. निजामुद्दीन अहमद त्याने 'तबाकत ई अकबरी' या ग्रंथात मुस्लिम सत्तेच्या सुरुवातीपासून अकबराच्या कारकिर्दीच्या ३९ व्या वर्षापर्यंत इतिहास दिला आहे.

मुगल कारकिर्दीबद्दल विशेष माहिती देणारा ग्रंथ म्हणजे 'अकबरनामा' होय. अबुल फजल हा अकबराचा केवळ दरबारी नसून मित्रही होता. त्याने तीन खंडांमध्ये हा ग्रंथ लिहिला आहे त्याने केवळ घटनाच नव्हे तर घटनांमागील उद्देश नमूद केला आहे. 'ऐन-ए--अकबरी' या ग्रंथांमध्ये अबुल फजलने निरनिराळ्या खात्यांसाठी केलेल्या नियमांचा तपशील दिला आहे. प्रत्येक खात्यांची आकडेवारी दिली आहे. लेखकाने स्वतःची वंशावळ देखील नमूद केली आहे. याशिवाय सरकारी कागदपत्रे व अकबराचा पत्रव्यवहार हा देखील अबुल फजल याने ग्रंथांमध्ये दिला आहे. प्रशासनाची खास करून अकबराच्या मनसबदारी पद्धतीची संपूर्ण माहिती अबुल फजलने दिलेली आहे. अकबराने आखून दिलेल्या नवीन जमीन महसूल पद्धतीचीही माहिती त्याच्या ग्रंथातून मिळते. अबुल फजल अकबराबद्दल प्रशंसोद्गार काढतो.

त्याचाच समकालीन इतिहासकार बदायुनी हा मात्र आपल्या ग्रंथात अकबरावर टीका करतो. अकबराचे सहिष्णू धोरण त्याला मान्य नाही. आपल्या 'मुन्तखाब उल तवारीख' या पुस्तकामध्ये बाबरपासून आगमनापर्यंत साहित्यात दिलेला आहे. मोहम्मद कासिम शाह याने लिहिलेल्या 'गुलशन इ इब्राहिमी' या ग्रंथामध्ये जहांगीर गादीवर बसे पर्यंतचा इतिहास नमूद केलेला आहे. अनेक राजकीय घटना घडत असताना तो स्वतः हजर असल्यामुळे त्याने केले इतिहासलेखन विश्वसनीय आहे. अकबराच्या आज्ञेने अब्बास खान शेरवानी याने 'तारीख इ शेरशाही' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात शेर शहाविषयी माहिती दिलेली आहे.

खाफीखान याने 'मुन्तखाब-उल-लुबाब' या ग्रंथात १५१९ पासून १७३४ पर्यंतचा इतिहास लिहिला आहे. खाफीखान हा औरंगजेबाच्या दरबारात होता. अनेक ऐतिहासिक घटनांचा खाफीखान हा साक्षीदार होता. औरंगजेबाने इतिहास लिहिण्यास बंदी घातल्यामुळे त्याने औरंगजेबाच्या नकळत इतिहास लेखन केले. त्यामुळे त्यांच्या इतिहास लेखनामध्ये पक्षपातीपणा असण्याचा संभव कमी आहे. मुघल मराठा संबंध समजून घेण्यासाठी हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आहे. या ग्रंथाचे इतर भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. औरंगजेबाच्या पदरी असलेला हिंदू अधिकारी भीमसेन सक्सेना यांने 'तारीख इ दिल्खुशा' हा ग्रंथ लिहिला. याशिवाय ईश्वरदास नगर याचा फुतुहात आलमगिरी हा ग्रंथ मुघलांच्या राजस्थानातील कारवाया समजून घेण्यासाठी उपयुक्त आहे.

## ११.४ परकीय प्रवाशांचे वृत्तान्त

भारतामध्ये मध्ययुगीन कालखंडामध्ये अनेक परकीय प्रवासी येत असत. त्यांनी देखील भारताबद्दल पुष्कळ माहिती आहे. मोहम्मद गजनी सोबत आलेला अल्बरूनी याने 'तारीख ए हिंद' या ग्रंथात भारताबद्दल विपुल माहिती लिहिली आहे. तो अरेबिक व पर्शियन भाषांचा विद्वान होता. भारतामध्ये येऊन त्यांनी संस्कृत भाषेचे अध्ययन केले. औषधशास्त्र,

तत्त्वज्ञान, गणित, धर्मशास्त्र, तर्कशास्त्र इत्यादींचा अभ्यास त्याने केला. भारतीय लोकांचे त्याने वर्णन आपल्या पुस्तकात केले आहे.

मोरोक्को देशाचा प्रवासी इब्न बतुता हा मोहम्मद तुघलकच्या कारकिर्दीत भारतात आला. १३३३ ते १३४७ या कालावधीत भारतामध्ये राहून त्याने मुख्य काजी म्हणूनही काम पाहिले. त्याने 'किताब उल रहेला' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकात भारतातील विविध घटनांची माहिती त्यांनी दिली. याशिवाय भारतामधील न्यायविषयक व राजकीय परिस्थिती नमूद केली आहे. त्या काळातील टपालव्यवस्था,रस्ते, हेरखाते,इत्यादी अनेक विषयांवर त्यांनी विस्तृत वर्णन केलेले आहे. तुघलक काळातील माहिती मिळवण्यासाठी हे पुस्तक अतिशय विश्वसनीय आहे. परकीय प्रवासी असल्यामुळे त्याच्यावर सुलतानाच्या बाजूने लिहिण्याचे दडपण नव्हते. विजयनगरचा साम्राज्यामध्ये देशोदेशीचे पर्यटक येत असत. त्यांनी विजयनगर बद्दल विपुल माहिती लिहून ठेवली आहे. अब्दुल रझाक या पर्शियन राजदूताने विजयनगरला १४४२ मध्ये भेट दिली होती. निकोलो कौंटी या इटालियन प्रवाशांने विजयनगर बद्दल आपल्या पुस्तकात माहिती दिली आहे. दोमिनगो पेस हा पोर्तुगीज प्रवासी विजयनगरला गेला होता. बहामनी राज्याबद्दल रशियन प्रवासी निकीतीन याने लिहिले आहे.

मुघल काळामध्ये अनेक परकीय प्रवासी भारतामध्ये आले. जहांगीरच्या काळात कॅप्टन हॉकिन्स भारतामध्ये आला. तो तीन वर्ष मुघल दरबारात राहिला. त्याने बरीच माहिती लिहून ठेवले आहे. मुलांच्या शासन व्यवस्थेविषयी त्यांनी थोडीफार माहिती दिली आहे. थोमास रो त्याला इंग्लंडचा राजा पहिला जेम्स यांने १६१५ मध्ये जहांगीरच्या दबावात पाठवले होते. त्याने जहांगीरच्या कारकिर्दीचा तपशील दिला आहे. भ्रष्टाचार, शेतकऱ्यांचे दारिद्र्य, वशिलेबाजी इत्यादींचे वर्णन केले आहे. फ्रान्सिस बर्निअर हा फ्रेंच डॉक्टर शहाजहानच्या काळात भारतात आला होता. त्याने भारत भ्रमण केले व त्याचा वृत्तांत लिहिला. भारताच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीवर त्याने प्रकाश टाकला. औरंगजेबाने दारा शिकोह् याला कसे मारले याचे वर्णनही त्यांनी केले.

निकोलाय मनुची हा इटालियन प्रवासी १६५६ मध्ये भारतात आला. त्याने भारतभर भ्रमण केले. काही काळ दाराजवळ व नंतर मिर्झाराजा जयसिंग कडे तो नोकरीस राहिला. घडलेल्या घटनांचा तो प्रत्यक्ष साक्षीदार होता. त्याने स्तोरीया डी मोगोर या ग्रंथात आपले अनुभव नमूद केले आहेत हा ग्रंथ पोर्तुगीज भाषेत आहे. त्याचे नंतर इंग्रजीमध्ये भाषांतर केले गेले.

**आपली प्रगती तपासा-**

१. मध्ययुगीन कालखंडातील परकीय प्रवाशांचे वृत्तान्त वर्णन करा.

## ११.५ पुरातत्वीय साधने

मुघल काळातील पुरातत्वीय साधनांमध्ये स्मारके, वास्तु, नाणी इत्यादींचा समावेश होतो. मुघल कालखंडात वास्तू बांधल्या गेल्या. त्या आजही चांगल्या अवस्थेत आहेत. दिल्ली व आग्रा येथील किल्ले, बादशहांच्या कबरी आजही शाबूत आहेत. याशिवाय वेगवेगळ्या ठिकाणी बांधलेले मशिदी व कलापूर्ण वास्तु काळातील इतिहासाची साक्ष देतात. दिल्ली व आग्रा, याव्यतिरिक्त बुऱ्हाणपूर, सुलतानपूर इत्यादी ठिकाणी त्यांनी बांधलेली स्मारके इतिहासाचा एक स्त्रोत म्हणून माहिती देतात. याशिवाय आदिलशहा, निजामशहा या दक्षिणेकडील राजांनी बांधलेल्या वास्तू देखील आहेत. महाराष्ट्रामध्ये याच कालखंडामध्ये शिवाजी महाराजांनी बांधलेले किल्ले मध्ययुगीन इतिहासाबद्दल आवश्यक ती माहिती पुरवतात. स्मारकामध्ये उपलब्ध असलेली चित्रे देखील इतिहासकालीन घटनांनवर प्रकाश टाकतात.

मध्ययुगीन कालखंडातील अनेक नाणी आजही उपलब्ध आहेत. मुंबई विद्यापीठ, कलिना व नाशिक येथील अंजनेरी येथील संग्रहालयात मध्ययुगातील नाणी पाहता येतात. शेरशहाच्या नाण्यांवरून त्या काळात व्यापार-उदीम भरभराटीस आला होता हे निदर्शनास येते. अकबराच्या नाण्यांवर राम सीतेचे चित्र दिसून येते. यावरून त्याचा धर्मविषयक उदार दृष्टीकोण दिसून येतो. दीन ए इलाही पंथ स्थापन केल्यानंतर अकबराने इलाही नाणी जारी केले होते. जहांगीरच्या नाण्यांवर नुरजाहाची प्रतिमा दिसते. यावरून जहांगीर वरील तिचा प्रभाव दिसून येतो. याव्यतिरिक्त मुगल कालीन व सुलतान कालीन भांडी,खेळाची साधने व वस्तुसंग्रहालयातील साधने यावरूनही इतिहासाच्या आकलनास मदत होते.

### अ) मराठ्यांच्या इतिहासाची साधने

इंग्रजांनी अठराव्या शतकात भारतीय उपखंडात राजकीय सत्ता प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. त्यापैकी सर्वात शेवटी मराठी सत्तेवर त्यांनी वर्चस्व मिळवले. मराठी सत्तेचा उदय आणि अस्त समजून घेण्यासाठी सतराव्या व अठराव्या शतकातील इतिहासाचा अभ्यास करावा लागतो. मराठी सत्तेचा काळ शिवकालीन कालखंड व पेशवेकालीन कालखंड यामध्ये विभागता येतो. मराठ्यांचा इतिहास अभ्यासण्यासाठी आत्मचरित्र, चरित्र,शासकीय कागदपत्रे, वेळोवेळी जाहीर केलेली फर्माने,इत्यादी अभ्यासावे लागतात.त्याशिवाय युरोपियन प्रवाशांनी व इतिहासकारांनी देखील मराठ्यांच्या इतिहासावर लिहिलेले आहे.

## ११.६ लिखित साधने

मध्ययुगीन कालखंडामध्ये इतिहासलेखनाकडे शास्त्रशुद्धपणे पाहिले जात नव्हते. मराठा शासक राज्यकारभाराकडे काटेकोरपणे लक्ष देत असले तरी इतिहास लेखनाकडे समाजात औदासिन्य व अनास्था होती. त्यामुळे मराठा कालखंडात इतिहास लेखन केले गेले नाही. तथापि ऐतिहासिक साधने मात्र तयार केली गेली आहेत. त्या काळातील लिखित पत्र, शासकीय कागदपत्रे व बखरी इत्यादींच्या साह्याने इतिहास लेखन करता येऊ शकते. त्यापैकी मराठीत मराठ्यांच्या ऐतिहासिक बखर हे एक साधन उपलब्ध आहे. राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या व्यक्तीचे चरित्र अथवा त्याच्या जीवनातील महत्त्वाच्या गोष्टी व्यावसायिक

लेखककाकडून लिहून घेण्यात येत. त्यालाच बखर असे म्हणत. माहिती देणे या शब्दावरून बखर हा शब्द तयार झाला होता.

### बखर

छ. शिवाजी महाराजांच्या कार्याविषयी व पेशवे कालखंडातील राजकीय इतिहासाविषयी माहिती देणाऱ्या पुष्कळ बखरी लिहिल्या गेल्या आहेत. त्यामध्ये शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक प्रसंगाचे चित्रण दिसून येते. यामध्ये इतिहासलेखनाचा आधुनिक दृष्टिकोन दिसून येत नाही. क्वचित प्रसंगी अतिशयोक्तीपूर्ण वर्णनही आढळते. प्रसिद्ध इतिहासकार वि. का. राजवाडे यांच्या मतानुसार बखरीमध्ये मध्ये पुढील दोष आढळतात. कालगणनेतील चूक, स्थळ विषयक चूक आणि व्यक्तिविषयक चूक. बखरींमध्ये आढळून येणाऱ्या चुकांची काही कारणे आहेत. बहुतेक वेळा लेखक स्वप्नरंजन करून लेखन करत तर काही वेळेस घटना घडून गेल्यानंतर पुष्कळ कालावधी लोटल्यास केवळ स्मरणाच्या साहाय्याने हे लिखाण केले जात असे. इतिहासकार जदुनाथ सरकार बखरीला इतिहासाचा विश्वासार्ह स्त्रोत मानत नाहीत कारण त्यांच्या मते हे लिखाण ऐतिहासिक दृष्टिकोन बाळगून झालेले नाही. बखरीमध्ये पुष्कळ चुका व परस्पर विरोधी रचना असल्या तरीही मराठ्यांचा इतिहास समजून घेण्याच्या दृष्टीने पुढील काही बखरी आवश्यक भूमिका बजावतात.

### सभासद बखर

कृष्णाजी अनंत सभासद याने १६९४ मध्ये ही बखर लिहिली. मालोजी भोसले यांच्या पासून ते शिवाजी महाराजांपर्यंत ऐतिहासिक वृत्तान्त यामध्ये आलेला आहे. १६३० ते १६४२ हा कालखंड वगळता, अफजलखानाचा वध व इतर महत्त्वाच्या घडामोडी यामध्ये नमूद केलेल्या आहेत. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर 14 वर्षांनी ही बातमी लिहिली गेली आहे. उपलब्ध बखरीपैकी सभासद बखर ही सर्वात विश्वसनीय उपयुक्त मानली जाते.

### चिटणीस बखर

१८११ मध्ये शाहू द्वितीय यांच्या आदेशावरून मल्हारराव चिटणीस यानेही बखर लिहिली. या बखरीचे सात भाग पडतात. पहिल्या भागात भोसले घराण्याची वंशावळ दिलेली आहे. पुढील भागांमध्ये शिवाजी महाराजांचे प्रशासन, सैन्य व लष्करी याची माहिती लिहिली आहे. सहाव्या भागामध्ये कर्नाटक मोहीम तर सातव्या भागात शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक सोहळा याबद्दल माहिती दिलेली आहे.

### चित्रगुप्त बखर

सभासद बखर मधून पुष्कळशी माहिती जशीच्या तशी घेऊन चित्रगुप्त बखर तयार करण्यात आली. बाळाजी आवजी चिटणीस याचा जवळचा नातेवाईक चित्रगुप्त यांने कोल्हापूरचे संभाजी महाराज यांच्या आदेशावरून १७६० ते १७७० या काळात ही बखर लिहिली. यामध्ये भाषेचे लालित्य आढळून येते पण ऐतिहासिक दृष्ट्या मजकूर फारसा उपयुक्त आढळत नाही.

**पेशवे कालखंडातील बखरी**

पेशवे कालखंडाविषयी माहिती देणाऱ्या बखरी पुष्कळ लिहिल्या आहेत. त्यापैकी साष्टीची बखर प्रसिद्ध आहे. पहिल्या बाजीराव पेशवे चा भाऊ चिमाजी आप्पा याने१७३७ मध्ये साष्टी बेटावर हल्ला केला होता व ते जिंकून घेतले होते. या विषयी संपूर्ण माहिती या बखरी मध्ये दिलेली आहे. शाहू बखरीमध्ये शाहू मोगलांच्या कैदेत असताना त्यात त्यांनी व्यतीत केलेल्या आयुष्य याबद्दल माहिती दिलेली आहे. पानिपत बखर पेशवा बाळाजी बाजीराव त्याची विधवा पत्नी गोपिकाबाई तिच्या आज्ञेवरून रघुनाथ यादव याने १७६३ मध्ये लिहिली. पानिपतचे तिसरे युद्ध झाल्यानंतर ही बखर लिहिले गेली. पानिपतच्या युद्धात धारातीर्थी पडलेल्या मराठा सरदारांविषयी यात माहिती आहे.

**आपली प्रगती तपासा-**

१. मराठा साम्राज्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक साधन म्हणून बखरीचे वर्णन करा.

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

## ११.७ शासकीय व खाजगी कागदपत्रे

मराठा कालखंडात अनेक सार्वजनिक, प्रशासकीय व खाजगी पत्रव्यवहार उपलब्ध आहे. प्रशासकीय पत्र व्यवहारांमधून वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या आज्ञा व आदेश निदर्शनास येतात तसेच शासकीय कागदपत्रातून जमाखर्च हिशोब व मराठा सैन्य व्यवस्था इत्यादींची माहिती उपलब्ध आहे. शिवाजी महाराजांच्या पत्रांचे संकलन अ. रा. कुलकर्णी यांनी केलेले आहे. या पत्रांमधून शिवाजी महाराजांचा माहिती विषयी दृष्टिकोन व त्यांची न्यायदान पद्धती याविषयी विपुल माहिती मिळते.

राजघराण्यातमधील व्यक्तींच्या वंशावळीची माहिती देखील उपलब्ध आहे. अशा वंशावळीमधून या राजघराण्यातील महत्त्वाचे व्यक्ती, संस्थापक इत्यादींची माहिती मिळते. शकावल्यामधून प्रसंगांचे देखील वर्णन असते. शकावल्यांचे मुख्य दोन भाग पडतात. एका भागावर पौराणिक परंपरेचा प्रभाव पडलेला असतो तर दुसऱ्या भागावर राजकीय घडामोडींचा उल्लेख असतो. शकावल्या मध्ये दररोजच्या खर्चापासून ते राज्यव्यवस्था पर्यंतच्या अनेक गोष्टींचा उल्लेख असतो. या माहितीचा पडताळा दुसऱ्या साधनां सोबत घेता येतो.

संत तुकाराम व संत रामदास हे शिवाजी महाराजांचे समकालीन होते. त्यांच्या अभंग व श्लोकांमधून नही तत्कालीन समाजजीवन निदर्शनास येते. त्यांच्या लेखनातून पुरेशी राजकीय परिस्थितीचे आकलन होत नसले तरी तत्कालीन सामाजिक व आर्थिक बाबींचे दर्शन घडते. इतिहासाचे साधन म्हणून हे देखील महत्त्वाचे साधन ठरू शकते. पोवाडे हे मूलतः काव्य रचनात्मक वाटत असले तरी त्यामधील वर्णन बरेचदा ऐतिहासिक सत्याला धरून असते. क्वचित प्रसंगी ते लिहून ठेवलेले असतात. पोवाडे गाणारे शाहीर हे बऱ्याच

वेळेस लिखित स्वरूपात नोंद करून ठेवण्याऐवजी मौखिक स्वरूपातच त्यांचा उपयोग करतात. बऱ्याच वेळेस यामुळे मूळ कवने बदलली जाऊन त्याजागी नवीन कवने येतात.

अधिकृत कागदपत्र म्हणून सनदांना फार मोठे महत्त्व आहे. यामधून राजकीय माहिती मिळू शकते. इ. स. १७१९ दिल्लीच्या बादशाहाने नानासाहेब पेशव्याना एक राजकीय सनद दिली. या सनदेत अब्दाली पासून दिल्लीच्या बादशहाच्या संरक्षण करावे असे एक कलम आहे. यावरून दिल्लीच्या बादशहाला अब्दालीच्या हल्ल्याची भीती आधीपासून होती हे दिसून येते. सध्या राजकीय कारणाप्रमाणे एखाद्या घराण्याला सुद्धा देत असत. प्राथमिक कागदपत्रांमधील जमाखर्च हेदेखील एक महत्त्वाचे साधन आहे. शिवकाळात व पेशवे कालखंडात असेच जमाखर्चाचे तपशील आढळून येतात. त्याचा इतिहास लेखनामध्ये उपयोग होऊ शकतो.

## ११.८ पर्शियन साधने

पर्शियन भाषा राज्यकारभारात मोठ्या प्रमाणात वापरली जात असे. मराठ्यांचा इतर राज्यकर्त्यांशी संबंध आला त्याचे उल्लेख पर्शियन भाषेत अनेक कागदपत्रांमध्ये व दस्तऐवजांमध्ये सापडतात. मराठ्यांचा इतिहास विषयी बरीचशी माहिती काही साधनांमध्ये आढळते.

१) साकी मुश्ताद्खान याच्या 'मासीर इ अलामगिरी' या ग्रंथामध्ये मोगल सैन्याच्या मोहिमांविषयी तपशीलवार माहिती आढळते. मुघल सैन्य दक्षिणेकडे चाल करून गेले असता त्यांच्यासोबत लेखक गेला होता. त्यामुळे त्याचे लेखन हे प्रत्यक्ष स्वरूपातील आहे. मात्र मुघल व मराठे यांची संघर्षाचे मूलभूत कारण दिले नाही व औरंगजेबाचा चाहता असल्याने त्याने एकतर्फी लिखाण केले आहे.

२) सरकारी अधिकारी भीमसेन बऱ्हाणपूरी याने 'नुक्शा इ दिलखषा' या नावाचे पुस्तक लिहिले. हे कुणाचे सांगण्यावरून आणि यामुळे त्याच्या पुस्तकात फारशी अतिशयोक्ती आढळत नाही. या ग्रंथात मुघल मराठी यांच्यातील संघर्ष व महाराणी ताराबाई यांचे नेतृत्व गुण याविषयी पुष्कळ माहिती मिळते.

३) लेखक ईश्वरदास नागर याने 'फतुहात इ अलमगिरी' हे पुस्तक लिहिले. त्याच्या पुस्तकात रजपूत सरदार यांच्या पराक्रमांच्या घटना येतात. त्या अनुषंगाने औरंगजेबाने संभाजी महाराजांची केलेली हत्या, राजाराम महाराजांच्या जिंजी येथे प्रयाण इत्यादी गोष्टींचा उल्लेख येतो.

४) खाफीखान या इतिहासकाराने 'मुन्तखाब इ लुबाब' हा ग्रंथ लिहिला असून त्यामध्ये मोगल मराठे यांच्यातील याचे तपशीलवार वर्णन आले आहे. औरंगजेबाने इतिहासलेखनाला बंदी घातली असल्यामुळे खाफीखान याने स्वतंत्रपणे इतिहास लेखन करत होता.

## ११.९ युरोपियन साधने

सतराव्या शतकामध्ये पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्रज इत्यादी युरोपियन लोकांनी भारतामध्ये व्यापारासाठी आगमन केले होते. काही ठिकाणी त्यांनी आपल्या वखारी देखील बांधल्या होत्या. तत्कालीन राजकीय परिस्थितीवर त्यांचे लक्ष होते. तसेच एकमेकांसोबत केलेला पत्रव्यवहारही उपलब्ध आहे. यावरून मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश पडतो.

### पोर्तुगीज साधने

पोर्तुगीज सर्वात प्रथम भारतामध्ये आले होते. गोवा दीव, दमण व साष्टी येथे त्यांनी राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले होते. भारतातील वसाहत करणाऱ्यांनी लिस्बन येथील पोर्तुगीज शासकांसोबत पत्रव्यवहार केला होता. त्याद्वारे ही इतिहास समजण्यास मदत होते. याशिवाय काही लेखकांनीही मराठा इतिहासाविषयी नोंदी करून ठेवले आहेत. कास्मो दी गार्डा या लेखकाने मराठ्यांच्या इतिहासविषयक ग्रंथ प्रसिद्ध केला होता. आताच्या ग्रंथांमध्ये शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील अनेक घटनांचा उल्लेख आहे. तो शिवाजी महाराजांचा चाहता असल्याचे दिसून येते. मात्र त्या त्याच्या ग्रंथातील माहिती अपुरी आहे.

### इटालियन साधने

इटालियन प्रवासी निकोलो मनूची याने 'स्टोरीयो दा मोगोर' या पुस्तकात मुघल प्रशासनाविषयी व मुघल दरबार विषयी माहिती दिलेली आहे. राजा जयसिंगच्या पदरीही त्यांनी काही काळ काम केले होते व त्यांच्यासोबत तो दक्षिणेकडे आला होता. दक्षिणेत त्याचा संबंध शिवाजी महाराजांची आला त्याबद्दल त्यांनी पुस्तकात लिहिले आहे.

### फ्रेंच साधने

फ्रेंच प्रवासी बर्निएर व थेवेनोट यांनी आपल्या प्रवास वर्णनात शिवाजी महाराजांच्या पराक्रमाविषयी लिहून ठेवले आहे. थेवेनोट याने सुरतेची लूट व शहाजी राजांचा मृत्यू या दोन घटनांमध्ये कालखंडाबाबत त्यांनी चूक केली आहे. शिवाजी महाराजांनी दिलेल्या आग्रहाचे भेटीचा तपशीलवार वृत्तांत त्यांनी दिलेला आहे. बर्थोमोलो कारे फ्रेंच १६६८ मध्ये भारतात आला. त्याच्या लिखाणात सुरतेवरील दोन्ही स्वाऱ्या व युरोपियन लोकांबद्दलचे व्यापारी धोरण याचा उल्लेख आहे. त्यांनी दिलेल्या घटनांचा क्रम अचूक आहे. त्याच्या लिखाणात शिवाजी महाराजांबद्दल आदर जातो. त्याचे वर्णन निष्पक्षपाती आहे. फ्रान्कोय मार्टिन हा फ्रेंच इंस्ट इंडिया या कंपनीचा लोकर होता. १६६५ मध्ये तो भारतात आला. पोंडीचेरी तेथेही त्यांनी काही काळ काम केले. येथे राजाराम यांच्याशी त्याचा संबंध आला. राजारामचे प्रशासन व दरबार याविषयीची माहिती त्याच्या लेखनात आढळते. झुल्फिकार खानच्या किल्ल्याबद्दल माहिती देतो. अबे कारे हा फ्रेंच कंपनीचा मुख्याधिकारी होता. त्यानेदेखील शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले असून मराठ्यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे.

**इंग्रजी साधने**

सतराव्या शतकामध्ये ईस्ट इंडिया कंपनीने भारतामध्ये ठीक ठिकाणी वखारी स्थापन केल्या होत्या. ईस्ट इंडिया कंपनी ही मुळात व्यापारी कंपनी असल्यामुळे प्रत्येक वखारी मध्ये त्यांनी कामकाजाची व सर्व व्यवहारांची तपशीलवार नोंद केली होती. इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्ड या तपशीलाखाली ती माहिती उपलब्ध आहे. भारतामध्ये असलेल्या अनेक वखारी मध्ये परस्परांशी पत्रव्यवहारही चालत असे. त्याच्या देखील नोंदी ठेवल्या गेले आहेत. यासाठी रेकॉर्ड्‌समध्ये शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील घटना बद्दल माहिती मिळते. सुरत लुटीच्या वेळेसचे तपशीलवार वर्णन या रेकॉर्ड्‌समध्ये दिसून येते. या सर्व कागदपत्रांचे संपादन करून 'इंग्लिश रेकॉर्ड ऑफ शिवाजी' या ग्रंथात नमूद केलेले आहेत. याशिवाय हेन्री ओक्सेंडेन त्याची रोजनिशी याची माहिती देतो. १६७४ मध्ये राज्याभिषेक सोहळा उपस्थित असल्याने त्याच्या नोंदी विशेष महत्त्व आहे. डॉ. जॉन फ्रेयर यांनी लिहिलेल्या 'ट्रवेल्स इन इंडिया इन सेवेनटिन सेंचुरी' या पुस्तकात शिवाजी महाराजांच्या कार्याची दखल घेतली आहे.

**पुरातत्वीय साधने**

लिखित साहित्य व्यतिरिक्त मराठा काळातील पुरातत्त्वीय साधने अद्यापही शाबूत आहेत. शिवाजी महाराजांनी बांधलेले वेगवेगळे किल्ले व त्यांनी पाडलेली नाणी त्यांच्या कार्याबद्दल विपुल माहिती देतात. मध्ययुगीन इतिहासात गड-किल्ल्यांना विशेष महत्व होते. त्यामुळे त्या काळचा इतिहास अभ्यासण्यासाठी आजही गडकिल्ल्यांच्या रचनेचा अभ्यास केला जातो. त्या काळातील भांडी, शस्त्र व अवजारे वस्तुसंग्रहालयामध्ये आढळतात. इतिहास लेखनामध्ये ते देखील महत्त्वाची भूमिका बजावतात.

**आपली प्रगती तपासा-**

१. पर्शियन साधनांवर टीप लिहा.

२. ब्रिटीश व फ्रेंच साधनांवर चर्चा करा.

## ११.१० सारांश

ऐतिहासिक पुराव्यामुळे साहित्यापेक्षा इतिहास वेगळा गणला जातो. इतिहास अवगत करून घेण्यासाठी पुरातत्त्व साधने भूमिका बजावतात. या साधनांमुळे आपले भूतकाळाविषयी चे ज्ञान वाढले आहे. पुरातत्त्व साधनांमध्ये शिलालेख, नाणी,भांडी,इत्यादींचा समावेश होतो. सुलतान व मुघल कालखंडात विपुल प्रमाणात लिखित साहित्य आढळून येते. आत्मचरित्र, चरित्र, प्रादेशिक इतिहास, दरबारातील नोंदी अशा विविध प्रकारे इतिहास लेखन केले गेले आहे. भारतामध्ये मध्ययुगीन कालखंडामध्ये अनेक परकीय प्रवासी येत असत. त्यांनी देखील भारताबद्दल पुष्कळ माहिती दिली आहे. सतराव्या शतकामध्ये पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्रज इत्यादी युरोपियन लोकांनी भारतामध्ये व्यापारासाठी आगमन केले होते. तत्कालीन राजकीय परिस्थितीवर त्यांचे लक्ष होते. तसेच त्यांनी एकमेकांसोबत केलेला पत्रव्यवहारही उपलब्ध आहे. यावरूनही मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश पडतो.

## ११.११ प्रश्न

१) मध्ययुगीन भारताच्या इतिहासाच्या साधनांचे स्वरूप स्पष्ट करा.

२) मध्ययुगीन भारतीय इतिहासाची लिखित व पुरातत्त्वीय साधने कोणती?

३) मराठ्यांच्या इतिहासाची कोणकोणती साधने उपलब्ध आहेत?

४) मराठा इतिहासाची लिखित साधने स्पष्ट करा.

## ११.१२ संदर्भ

१) सरदेसाई बी. एन., इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.

२) युजीन डिसोझा, मेडीवल इंडिया, मनन प्रकाशन, मुंबई

३) रायचौधरी, इरफान हबीब, दि केम्ब्रिज इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ ऑफ इंडिया, लंडन.

४) पेडणेकर आणि मुकादम ,हिस्ट्री ऑफ मराठा, ,मनन प्रकाशन, मुंबई १९९६.

५) स्तेवाट गार्डन, दी नीव केम्ब्रिज हिस्ट्री ऑफ : द मराठास १६००-१८१८, ऑक्सफर्ड युनि प्रेस.

❄❄❄❄❄❄❄

# १२

# आधुनिक व समकालीन इतिहासाची साधने

**घटक रचना**

१२.० उद्दिष्टे

१२.१ प्रस्तावना

१२.२ मुंबई येथील पुराभिलेखागार

१२.३ ईस्ट इंडिया कंपनीची कागदपत्रे

१२.४ पत्रव्यवहार

१२.५ वृत्तपत्र

१२.६ प्राथमिक स्त्रोत

१२.७ आधुनिक व समकालीन कालखंडातील इतिहास लेखन

१२.८ सारांश

१२.९ प्रश्न

१२.१० संदर्भ

## १२.० उद्दिष्टे

या युनिटचा अभ्यास केल्यावर विद्यार्थी पुढील बाबी समजण्यास सक्षम होऊ शकेल

१) आधुनिक व समकालीन इतिहासाच्या स्त्रोतांचे स्वरूप समजून घेणे

२) आधुनिक व समकालीन इतिहासाचे पुराभिलेखागारातीलस्त्रोत समजणे

३) आधुनिक व समकालीन इतिहासाच्या स्त्रोतांचे प्रकार स्पष्ट उमगणे

## १२.१ प्रस्तावना

आधुनिकभारतातीलराजकीय, सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक घडामोडींवर पुष्कळमाहिती उपलब्ध आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या नोंदी १८ व १९ व्या शतकातील राजकीय व व्यापारी परिस्थितीची तपशीलवार माहिती देतात. ब्रिटीशप्रशासनाने मोठ्या प्रमाणात विविधता आणि अधिकृत नोंदी ठेवल्या. सतराव्या आणि अठराव्या शतकातील इतिहास रचण्यासाठी पोर्तुगीज, डच आणि फ्रेंच कंपन्यांच्या नोंदी उपयुक्त आहेत. याशिवाय पाश्चात्य व भारतीय इतिहासकारांचे लेखन यांच्याद्वारे देखील महत्वाची माहिती मिळते.प्राथमिक स्त्रोतांचे खालील श्रेणींमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते: समकालीन रेकॉर्ड, गोपनीय अहवाल, सार्वजनिक अहवाल आणि सरकारी दस्तऐवज. अशा प्रकारच्या नोंदी संग्रहात आढळू शकतात तर इतिहासकारांनी प्राथमिक नोंदींच्या मदतीने लिहिलेले ग्रंथ हेदेखील उपयुक्त आहेत.

## १२.२ मुंबई येथील पुराभिलेखागार

मराठीत पुरा म्हणजे जुने व प्राचीन, अभिलेख म्हणजे कागदपत्र, तर आगार म्हणजे साठवणुकीची जागा होय. या शब्दांवरून "जुन्या कागदपत्रांच्या साठवणुकीचे आगार" अशा अर्थाचा पुराभिलेखागार हा शब्द तयार झाला आहे. इंग्रजीत याला अर्कायव्हज् असा शब्द असून महाराष्ट्रातील या विभागाची स्थापना १८२१ मध्ये इंग्रजांनीच केली आहे. महाराष्ट्र पुराभिलेखागार मुंबईच्या फोर्ट भागातील एलफिन्स्टन महाविद्यालयाच्या इमारतीत आहे. त्यात मराठा साम्राज्य, इ.स. १८५७ चा उठाव, भारतातील ब्रिटिश राजवट ते भारतीय स्वातंत्र्यचळवळीचा संपूर्ण इतिहास आहे. या पुराभिलेखागारातला पहिला कागद इ.स. १६३० सालचा आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेखागार विभागाने ठिकठिकाणची दप्तरे (विविध सरदार घराणी, महाराष्ट्रातील विविध संस्थानांकडे असलेले कागदपत्रांचे रुमाल) आपल्याकडे घेतली. त्यामुळेच आज केवळ ब्रिटिश आमदनीतलाच दस्तऐवज महाराष्ट्र पुराभिलेखागाराकडे आहेत. यात प्रामुख्याने मोडी लिपीतील दस्तऐवज आहेत. मुंबई अभिलेखागाराची खासीयत म्हणजे या अभिलेखागारात १८५७ च्या बंडासबंधीची पत्र, राणीच्या जाहिरनाम्याची प्रत, वासुदेव बळवंत फडके, शिवाय गांधीजींचा मीठाचा सत्याग्रह, १९४२ चलेजाव आंदोलन ते मुंबई सात बेटांची असल्यापासूनचे मुंबई आणि महाराष्ट्र-गुजरात-मध्यप्रदेश परिसरातील विविध शहर-गावांचे तब्बल पंधरा हजार नकाशे आहेत. यातील विभागांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**सार्वजनिक (सामान्य) विभाग**

**१) सार्वजनिक विभाग**

या विभागाने सार्वजनिक हिताचे विषय हाताळले - रस्त्यांचे बांधकाम, सार्वजनिक इमारती, औषधे, वजने आणि उपाययोजना इत्यादी. १८०५ मध्ये विभक्त होण्यापूर्वी लष्करी आणि व्यावसायिक विभागांनी या विभागाचा एक भाग तयार केला. तसेच सप्टेंबर १८६० मध्ये धर्मोपदेशक विभागाला लष्करी विभागाच्या सचिवाच्या अधिपत्याखाली नियुक्त करेपर्यंत धर्मोपदेशक प्रकरणांशीही ते व्यवहार करत असे.

**२) सामान्य विभाग**

१८२१ मध्ये सार्वजनिक विभागाला अनेक महत्त्वाची कार्ये दाखविल्यामुळे त्याचे नाव बदलून "सामान्य विभाग" असे करण्यात आले व स्थानिक स्वराज्य संस्था, वैज्ञानिक, वैद्यकीय व स्वच्छताविषयक बाबी, लोकसेवकांचे वर्तन इ. विषय विभाग हाताळत असे. "सार्वजनिक बांधकाम" हे १८६० साली विभक्त होईपर्यंत सामान्य विभागाचा भाग राहिले. १८४४ ते १८४८ दरम्यान या विभागात रेल्वे योजनेचा विचार केला गेला. या विभागाच्या सामान्य विभागाच्या नोंदींच्या कार्यवाहीत १९१० नंतरच्या प्लेगशी संबंधित कार्यवाही, भाग बनलेल्या प्रगती अहवाल आणि बुबोनिक प्लेगच्या मृत्यूचे रिटर्न, समुद्र, रेल्वे किंवा रस्त्याने मुंबईत येणाऱ्या व्यक्तींची वैद्यकीय तपासणी,रेल्वे स्थानकांवर वैद्यकीय तपासणी बुबोनिक प्लेगसाठी, सूचना, प्लेग आयुक्तांचे अहवाल, लसीकरणामुळे प्लेग आणि इतर जंतूजन्य रोगांविरुद्ध प्रतिकारशक्ती मिळते का, असे प्रश्न, मुंबई सोडून इतर बंदरांवर समुद्रमार्गे येणाऱ्या

व्यक्तींची तपासणी करण्याचे नियम, स्थानिक हस्तकांनी किनारपट्टीवरील बंदरांवर प्लेगचा प्रवेश रोखण्यासाठी उपाययोजना , जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी जारी केलेले आदेश यांचा समावेश आहे.

### ३) गुप्त आणि राजकीय विभाग गुप्त आणि राजकीय विभाग (आता सामान्य प्रशासन विभाग म्हणून ओळखला जातो)

५ एप्रिल १७५४मध्ये इस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळाच्या आदेशानुसार स्थापन करण्यात आला. या विभागाची कार्यवाही १० मार्च १७५५ पासून सुरू झाली. याद्वारे हाताळलेले विषय विभाग बहुतेक राजकीय स्वरूपाचे होते, उदा. परदेशी न्यायालयातील रहिवाशांसोबतचा पत्रव्यवहार, परदेशी राष्ट्रे आणि देशांच्या अधिकारांसोबतचे व्यवहार, लष्करी घडामोडी इ. गुप्त आणि राजकीय विभाग मालिकेचा (१७५५ ते १८२०) वर्णनात्मक कॅटलॉग १९५४ मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे आणि तोच संशोधन विद्वानांसाठी उपयुक्त आहे.

### ४) महसूल विभाग

महसूल विभाग हा विभाग मुख्यत्वे सर्वेक्षण सेटलमेंट्स, जमीन वेगळे करणे, खोती आणि खोती गावे, सीमा विवाद, जंगले इत्यादी बाबी हाताळतो. निरीक्षणांमध्ये महसूल प्रशासनाची संपूर्ण जमीन, देशातील विविध कार्यकाळ, सरकारचे अधिकार यांचा समावेश होतो. जमिनीचे उत्पादन, प्राचीन ग्राम अधिकारी आणि लोकांशी त्यांचे संबंध, सर्वेक्षण आणि मूल्यांकन आणि सामान्य ग्राम अर्थव्यवस्था. ते अध्यक्षपदाच्या महसूल प्रशासनावर मौल्यवान भाष्य करतात.

### ५) न्यायिक विभाग

कायदा आणि नियमांशी संबंधित बाबी या विभागामध्ये हाताळल्या जात होत्या. त्यातील काही विषय १९२० पर्यंत राजकीय आणि विधान विभागाचा भाग बनले होते, जरी १९०७ मध्ये विधान विभाग राजकीय विभागापासून वेगळे करण्यात आले. गृह विभाग आता पोलीस दिवाणी आणि फौजदारी न्याय, शांतता व सुव्यवस्था राखणे, तुरुंग इत्यादींबरोबरच राजकीय क्रियाकलाप, सार्वजनिक सुरक्षा, सांप्रदायिक संघटना, अश्लील साहित्य, लष्करी आणि राजकीय बाबी यांच्याशी संबंधित बाबी यामध्ये आढळून येतात.

### ६) आर्थिक विभाग हा विभाग (आता वित्त विभाग म्हणून ओळखला जातो)

व्यापार, वाणिज्य, बँकिंग, टांकसाळ, सार्वजनिक प्राप्ती आणि खर्च इत्यादीसारख्या आर्थिक हितसंबंधांच्या बाबी हाताळत असे. मुंबई टांकसाळशी संबंधित बाबी आर्थिक विभागाचा भाग बनल्या; १८३० पासून मिंटशी संबंधित कार्यवाही १८३७ मध्ये पुन्हा त्याच्या मूळ विभागात समाविष्ट होईपर्यंत स्वतंत्रपणे ठेवली गेली. १८४९ ते १८६० च्या दरम्यान “रेल्वे” हा विभागाचा भाग बनला.

### ७) सागरी व वन विभाग

सार्वजनिक विभागात विविध स्वरूपाच्या व्यवसायाची मोठी वाढ झाल्यामुळे मुंबई सरकारने सागरी आणि वनांचे नियंत्रण यांच्याशी संबंधित पत्रव्यवहाराला एका वेगळ्या विभागात विभागले. २ जानेवारी १८१८ पासून कार्यवाही सुरू झाली.

### ८) टांकसाळ विभाग

मुंबई टांकसाळशी संबंधित बाबी हा 'वित्तीय विभाग' या विषयांपैकी एक बनला. १८३० मध्ये, नवीन मुंबई टांकसाळीच्या प्रगतीचा अहवाल इस्ट इंडिया कंपनीच्यासंचालकांच्या देखरेखीखाली होता मात्र नंतर वित्त विभागाच्या सचिवांच्या सूचनेनुसार १ जानेवारी १८३७ पासून वित्त विभागाच्या कार्यवाहीमध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली. १८७६ मध्ये भारत सरकारने बॉम्बे मिंटचा कार्यभार स्वीकारला.

### ९) सार्वजनिक बांधकाम विभाग

१८५५ पर्यंत, सार्वजनिक बांधकामांशी संबंधित कार्यवाही सामान्य विभागाच्या कार्यवाहीचा भाग बनली. १८६० मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग एक वेगळा विभाग बनला आणि मुख्य अभियंता त्याचे सचिव होते. हा विभाग रस्ते व पूल बांधणे, सरकारी इमारतींची देखभाल, रुग्णालये शाळा, सिंचन इत्यादी बाबींचा निगडीत होता.

### १०) सचिवालय विभाग

हा विभाग पाटबंधारे आणि उर्जा विभाभगतील पुढील बाबींशी संबंधित आहे: (अ) सिंचन आणि कालवे निचरा आणि तटबंध, पाणी साठवण आणि पाणीसाठा आणि सिंचन हेतूंसाठी कूपनलिका, (ब) सिंचनाची तपासणी, तयारी आणि अंमलबजावणी , हायड्रो-इलेक्ट्रिक आणि बहुउद्देशीय प्रकल्प, (c) सरकारी एजन्सीद्वारे करणे आवश्यक असताना पाणीपुरवठा आणि ड्रेनेजसाठी प्रकल्पांची तयारी, अंमलबजावणी आणि ऑपरेशन, (d) पूर्ण झालेल्या सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन.

### ११) शैक्षणिक विभाग

शैक्षणिक विभाग १८६० मध्ये तयार करण्यात आला आणि जुन्या जनरलचा एक भाग बनला. शैक्षणिक आणि सागरी विभाग हे प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणाशी संबंधित होते. विभागाचे काम जसजसे वाढत गेले तसतसे 1947 मध्ये सामान्य आणि शैक्षणिक विभागाचे शिक्षण आणि उद्योग विभाग आणि आरोग्य आणि स्थानिक स्वराज्य विभाग असे विभाजन करण्यात आले.

### १२) संकीर्ण विभाग

फॅक्टरी अँड रेसिडेन्सी रेकॉर्ड्स आणि सचिवालय (विभागीय) नोंदी अंतर्गत समाविष्ट नसलेल्या नोंदी 'विविध नोंदी' म्हणून मानल्या जाऊ शकतात. या नोंदींमध्ये अनेक मनोरंजक जुन्या संस्था व संस्था, राजकीय मिशन, प्रशासकीय बाबींसाठी नेमलेल्या

समित्या, कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या नोंदी आणि काही किरकोळ नोंदी व विवरणपत्रे यांचा समावेश होतो.

**आपली प्रगती तपासा-**

१. आधुनिक भारताच्या इतिहासाच्या कागदपत्राच्या संदर्भात मुंबई येथील पुराभिलेखागाराचे महत्त्व विषद करा.

### कोल्हापूर अभिलेखागार

कोल्हापूर अभिलेखागारात कोल्हापूर संस्थान व राजर्षी शाहूंच्या कारकीर्दीसंबंधीची सर्व कागदपत्रं जतन करुन ठेवण्यात आली आहेत. मराठवाडा आणि विदर्भ, महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात आले. या दोन ठिकाणी शासनाची पुराभिलेखागारं नव्हती म्हणून शासनाने १९७१ ला मराठवाड्यासाठी औरंगाबाद येथे आणि विदर्भासाठी नागपूर या ठिकाणी पुरालेखागाराची स्थापना केली. या सर्व ठिकाणी अतिशय महत्त्वाची अशी कागदपत्रे ठेवण्यात आली आहेत.

### दिल्ली येथील राष्ट्रीय पुराभिलेखागार

दिल्ली येठील राष्ट्रीय पुराभिलेखागर म्हणजे राष्ट्रीय चळवळीचा चालताबोलता इतिहासच आहे. विविध व्यक्तींचा पत्रव्यवहार, शासकीय कागदपत्रे, चित्रे, फिल्म्स यांचा अमाप साठा यात आहे. आधुनिक व समकालीन इतिहास जाणून घेण्याच्या दृष्टीने तो फार उपयुक्त आहे. शासकीय कागदपत्रांशिवाय इतिहासावरील दुर्मिळ व महत्वाची पुस्तकेदेखील येथे उपलब्ध आहेत.

## १२.३ ईस्ट इंडिया कंपनीची कागदपत्रे

१६३० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने भारतातली आपली पहिली वखार पश्चिम किनाऱ्यावर सुरतला सुरू केली. या वखारीच्या माध्यमातूनच तेव्हा त्यांचा भारतातील व्यवसाय आणि इतर राजनैतिक हालचाली चालायच्या. मात्र १६६१मध्ये मुंबई बेटाचा ताबा त्यांच्याकडे गेला आणि १६८५ मध्ये कंपनीने आपलं मुख्यालय सुरतेहून मुंबईला हलवलं. त्यानंतरच्या काळात भारतात केलेल्या प्रत्येक हालचालींची-कारवायांची नोंद कंपनीने आपल्या डायरीत ठेवली. केवळ व्यापारी किंवा ऐतिहासिकच नाही, तर नंतर ब्रिटिश आमदनीत मुंबई-भारतात ज्या दळणवळणाच्या सोयी होत गेल्या किंवा पोस्ट, टेलिग्राफ सुरू झालं, रेल्वे आली, विद्यापीठे सुरु झाली अशा सर्व बदलांसंबंधीची, सुधारणेसंबंधीची कागदपत्रं, पत्रव्यवहार जपून ठेवला गेला आहे. ईस्ट इंडिया कंपनीने जेव्हा पूर्वेकडे आपला व्यवसाय सुरू केला, तेव्हा त्यांच्या व्यवसायाची ठिकाणे 'फॅक्टरीज' म्हणून ओळखली जात होती. सुरत हे त्यांचे पश्चिम

भारतातील मुख्यालय किंवा मुख्य कारखाना होते. फॅक्टरीमध्ये कमर्शिअल रेसिडेन्सीचाही समावेश होता. रेसिडेन्सी रेकॉर्डमध्ये प्रामुख्याने कंपनीच्या व्यावसायिक व्यवहारांची नोंद असते, परंतु योगायोगाने देशातील राजकीय घटनांचा संदर्भ दिला जातो.

## १२.४ पत्रव्यवहार

खाजगी आणि गुप्त पत्रव्यवहार यांना इतिहासाच्या साधनांमध्ये फार महत्त्व आहे. कोणत्याही दबावाशिवाय पत्र व्यवहार होत असल्याने त्यातील मजकुराच्या विश्वासनियते विषयी फारसी शंका नसते. तसेच पत्रव्यवहारामुळे तत्कालीन राज्यव्यवस्थेची व पत्र लिहिणारा याविषयी पुष्कळ माहिती मिळते. मध्ययुगीन कालखंडात अनेक राज्यकर्त्यांनी लिहिलेली पत्रे, ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केलेला पत्र व्यवहारांमधून अठराशे सत्तावनचे बंड व इतर तत्कालीन राजकीय घडामोडी यावर प्रकाश पडतो., काँग्रेसच्या स्थापनेस ब्रिटिश अधिकारी ऍलन ह्यूम यांनी पुढाकार घेतला असला तरी काँग्रेस बाबत ब्रिटिश शासन आधीपासूनच साशंक होते. भविष्यात काँग्रेसकडून राजसत्तेला धोका उत्पन्न होऊ शकतो हे जाणून तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड डफरीन यांनी व्यक्त केलेली मते त्यांच्या खाजगी पत्रात दिसून येतात. एल्फिन्स्टन यांचे भारतातील विशेष करून मुंबई प्रांतातील विषयीचे मत त्यांच्या राज्यकारभाराविषयीच्या भावना त्यांच्या लेखनात दिसून येतात. आधुनिक कालखंडात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व मामा परमानंद यांच्या पत्रव्यवहारातून सत्यशोधक चळवळीवर प्रकाश पडतो. स्वातंत्र्यकाळात महात्मा गांधी, पंडित नेहरू, अबुल कलाम आजाद, गोपाळकृष्ण गोखले इत्यादींच्या पत्रांचा इतिहास लेखनात उपयोग होतो. फाळणी सारख्या संवेदनशील विषयात समकालीन नेत्यांच्या पत्रव्यवहारावरूनही त्यावेळेसच्या राजकीय परिस्थितीचे दर्शन घडते.

सर्वात महत्त्वाच्या कागदपत्राचा उल्लेख करायचाच तर १८५८ ला राणीने जो जाहीरनामा केला तो आमच्या मुंबई पुरालेखा विभागामध्येच आहे. महात्मा गांधी यांच्या हस्ताक्षरांपासून पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी अहमदनगरच्या किल्ल्यातून इंदिरा गांधींना जी पत्रं लिहिली आणि ज्याचा उल्लेख 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'मध्ये केला. ती कागदपत्रं आपल्याकडे आहेत. सेनापती बापट, सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर इतकंच नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी भारतीय राज्यघटना लिहिली त्याचे सर्व मसुद्याची कागदपत्रं येथे आहेत. चवदार तळ्याचा त्यांनी जो दावा केला ज्याला आपण संगर म्हणतो त्याचा सुरुवातीचा दावा मोडीलिपीत आहे. हायकोर्टातून ते जिंकल्यानंतर म्हणजे सुरुवातीपासून शेवटपर्यंत चवदार तळ्याचा इतिहास सांगणारी कागदपत्रं काही मोडी लिपीतील, काही इंग्रजीमधील आपल्या मुंबई पुराभिलेखागारांमध्ये आहेत. राजश्री शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहारही आपल्या मुंबई पुरालेखागारामध्ये आहे. आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांचे सर्व पेपर्स येथे आहेत. अनेक क्रांतीकारकांचे, स्वातंत्र्य सैनिकांचे पेपर्स आहेत. काँग्रेसच्या स्थापनेची सुध्दा कागदपत्रे आहेत. त्याच्या अगोदर १८४४ ला मुंबई असोसिएशन म्हणून एक संस्था स्थापन झाली होती. ती काँग्रेसची पूर्वपिठीका होती. तिथपासून लोकमान्य टिळक, आगरकर महात्मा गांधी किंवा त्यांचे अनुयायी या सर्वांनी दिलेला लढा विशेषत: चले जाव चळवळीची सर्व महत्त्वाची कागदपत्रे उपलब्ध आहेत.

## १२.५ वृत्तपत्र

मुंबई पुरालेखागारात नुसती ऐतिहासिक कागदपत्रं नाहीत. तर त्या ठिकाणी वृत्तपत्रे सुध्दा आहेत. १८९७ ला बॉम्बे क्रॉनिकल नावाचं एक वृत्तपत्र सुरु झाले होते. त्याचा पहिला अंक उपलब्ध आहे. पहिलं वुत्तपत्र सुरु झालं ते बाळशास्त्री जांभेकर याचं दर्पण. त्याचीही पहिली प्रत येथे आहे. त्याचा अर्धा भाग मराठीत व अर्धा भाग इंग्रजीत आहे. त्यामध्ये जाहिरातीही आहेत. हा पहिला अंक सुध्दा पहाण्यासारखा आहे. नंतर लोकमान्यांचा केसरी, मराठा त्याठिकाणी आहे. महात्मा गांधी यांनी सुरु केलेला हरिजनचा अंक ठेवलेला आहे. भारतात आगमन झाल्यानंतर त्यांनी गोवा येथे मुद्रणालय सुरू केले. त्यांचाच कित्ता गिरवत ब्रिटिशांनी काही नियतकालिके वर्तमानपत्रे सुरू केली. त्यामधूनच तत्कालीन राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था याविषयी पुष्कळ माहिती मिळते. त्या काळातील बॉम्बे गॅझेट, मुंबई दर्पण, मुंबापुर समाचार, प्रभाकर इत्यादी नियतकालिकात वर्तमान ऐतिहासिक घडामोडींचे ज्ञान होते.

**इतर शासकीय कागदपत्रे**

जुनी राजपत्रे, केंद्र सरकारची आणि महाराष्ट्र शासनाची. त्यांनी सुरु केलेल्या जनगणनाचे सर्व रिपोर्ट येथे आहेत. इतकेच नव्हे तर भूगर्भ शास्त्राचा त्यांनी केलेला अभ्यास आहे, पाण्याचा स्त्रोत कसा आहे कुठून कुठली नदी वाहते, पाण्याचे झरे कुठून वाहतात त्याचा सर्व सायंटीफिक अभ्यास करुन ठेवला आहे. मुंबईतल्या ज्या प्रसिध्द ब्रिटीशकालीन इमारती आहेत, या सर्वांचे आराखडे, रेल्वेचे नकाशे हे आपल्याकडे जवळजवळ ४० हजार आहेत. सर्व प्रकारची अतिशय दुर्मिळ कागदपत्रे उपलब्ध आहेत.

**आपली प्रगती तपासा-**

१. आधुनिक भारताच्या इतिहासाच्या कागदपत्राच्या संदर्भात कोल्हापूर येथील पुराभिलेखागाराचे वर्णन करा.

## १२.६ प्राथमिक स्त्रोत

**दैनंदिनी**

ब्रिटिश कालीन अधिकारी दैनंदिनी मध्ये प्रत्येक दिवशी घडलेल्या महत्त्वाच्या घटनांची नोंद ठेवत असत. दैनंदिनी अथवा रोजनिशी हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक स्त्रोत आहे. अशा प्रकारच्या दैनंदिनी व्यक्तिगत रित्या अथवा वाचनालयात आढळून येतात. ब्रिटिश गव्हर्नर जनरल व अनेक अधिकारी लिहिलेल्या दैनंदिनीत तत्कालीन राजकीय परिस्थितीचे चित्रण

आढळते. अठराशे सत्तावनचा उठाव, कायदेभंग चळवळ, चलेजाव चळवळ इत्यादी घटनांचे समाजात पडलेले पडसाद व त्याबाबतचा ब्रिटिश दृष्टिकोन या रोजनिशीत दिसून येतो.

**मुलाखत**

आधुनिक अथवा समकालीन इतिहास लेखनामध्ये मुलाखतींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मुलाखतींद्वारे घडलेल्या घटनांचे प्रत्यक्ष ज्ञान होते. १९४२ ची चले जाव चळवळ, गोवा मुक्तिसंग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ इत्यादी ऐतिहासिक बाबींची माहिती त्यामध्ये भाग घेतलेल्या व्यक्तींची मुलाखत घेऊन मिळवली तर ते जास्त प्रत्ययकारी ठरते. म्हणूनच मुलाखत हा एक महत्त्वाचा प्राथमिक स्त्रोत आहे.

**प्रश्नावली**

समकालीन इतिहासाचे आकलन होण्यासाठी प्रश्नावली महत्वाचे साधन आहे. साधने गोळा करण्यासाठी प्रस्तावनेचा उपयोग होतो. यामध्ये काही प्रश्नांची मालिका दिलेली असते. संबंधित व्यक्तींकडून ती भरून घेणे अपेक्षित असते. प्रश्नावलीत व्यक्तींना निश्चित स्वरूपाचे प्रश्न विचारलेले असतात. अतिशय कमी वेळात अनेक व्यक्तींना प्रश्न विचारण्यात येतात. याचे स्वरूप मौखिक नसून लिखित असते. त्यामुळे एकाच वेळेस हजारो व्यक्तींकडून प्रश्नावली भरून घेता येते. प्रश्नावलीत निरीक्षकाचा कोणताही प्रभाव पडत नाही त्यामुळे हा एक वस्तुनिष्ठ पर्याय आहे. शासनाला आपले धोरण ठरवण्यासाठी लोकमत विचारात घेणे आवश्यक असते. लोकमत जाणून घेण्यासाठी प्रश्नावली हा एक महत्त्वाचा घटक असू शकतो. अठराशे अठरा मध्ये मराठी सत्तेचा पाडाव झाल्यानंतर नवीन प्रदेशात कशा प्रकारचे धोरण आखावे यासाठी एलफिस्टनने आपल्या अधिकाऱ्यांना प्रश्नावली पाठवली. व त्याच्याआधारेच राज्यकारभार सुरू केला.

**आपली प्रगती तपासा-**

१. प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत व प्रश्नावलीचे महत्त्व सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १२.७ आधुनिक व समकालीन कालखंडातील इतिहास लेखन

आधुनिक कालखंडात इतिहासलेखनाला शास्त्रशुद्ध आधार मिळाला असून पूर्ण अभ्यास करून, पुरावे गोळा करून इतिहास लिहिला जातो. अशा प्रकारच्या इतिहासलेखनाला संदर्भ ग्रंथाचे स्वरूप प्राप्त होते. अशा प्रकारचे लेखन केले. जेम्स मिल, एल्फिन्स्टन, आर. सी. दत्त, जदुनाथ सरकार, इरफान हबीब, आर. एस. शर्मा, रोमिला थापर इत्यादींनी विविध पुराव्यांचा अभ्यास करून आपापल्या विचारधारेनुसार इतिहास लेखन केले आहे.

ब्रिटीश कालखंडात अनेक ब्रिटीश इतिहासकारांनी इतिहास लेखनाचे कार्य हाती घेतले. अर्थात त्यांनी केलेल्या साम्राज्यविस्ताराचे समर्थन करण्याचा त्यांचा हेतू त्यांच्या लेखनातून उघड होतो. जेम्स मिल याने 'हिस्टरी ऑफ ब्रिटीश इंडिया' या पुस्तकात भारतीयांच्या मागासलेपणाचा उल्लेख करून ब्रिटीश राजवटीची भलामण केली. माउंट स्तुअर्त एल्फिन्स्टन याने १८८७ मध्ये'द राईज ऑफ ब्रिटीश पॉवर इन इंडिया' तर आधुनिक कालखंडात सुमित सरकार यांनी मार्क्सवादी दृष्टीकोनातून इतिहास लेखन केले आहे. आधुनिक भारताचा इतिहास हा त्यांच्या अभ्यासचा विषय राहिला आहे. 'स्वदेशी मुवमेंट इन बेंगाल व मोडर्न इंडिया' हे त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. भारतीय इतिहासाची हिंदू आणि मुस्लीम अशी विभागणी अमान्य करून त्यांनी शेतकरी, कामगार यांच्या चळवळीला विशेष महत्व दिले आहे. तळागाळातील शोषितांचा इतिहास मांडण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

## १२.८ सारांश

इतिहास लिहिण्यासाठी साधनांची नितांत आवश्यकता असते त्यालाच ऐतिहासिक पुरावा असेही म्हणतात. ऐतिहासिक पुराव्यामुळे साहित्यापेक्षा इतिहास वेगळा गणला जातो. मराठ्यांचा इतिहास अभ्यासण्यासाठी आत्मचरित्र, चरित्र, शासकीय कागदपत्रे, वेळोवेळी जाहीर केलेली फर्माने, इत्यादी उपलब्ध आहेत. त्याशिवाय युरोपियन प्रवाशांनी व इतिहासकारांनी देखील मराठ्यांच्या इतिहासावर लिहिलेले साहित्य आजमितीस अभ्यासकांसाठी खुले आहे. आधुनिक कालखंडात इतिहासलेखनाला शास्त्रशुद्ध आधार देऊन जेम्स मिल, एल्फिन्स्टन, आर. सी. दत्त, जदुनाथ सरकार, इरफान हबीब, आर. एस. शर्मा, रोमिला थापर इत्यादींनी विविध पुराव्यांचा अभ्यास करून आपापल्या विचारधारेनुसार इतिहास लेखन केले आहे.

## १२.९ प्रश्न

१) आधुनिक आणि समकालीन भारताच्या इतिहासाची पुराभिलेखागारामधील व लिखित साधने कोणती?

२) आधुनिक भारताचा इतिहास जाणून घेण्यासाठी शासकीय कागदपत्रे कशा प्रकारे महत्वाची भूमिका बजावतात?

## १२.१० संदर्भ

१) http://maharashtraarchives.org

२) hhtp//nationalarchives.nic.in

३) ग्रोवर अंड ग्रोवर ,अ न्यू लूक अट इंडिअन हिस्टरी, एस. चांद, २००१.

४) बिपीन चंद्र ,हिस्टरी ऑफ मॉडर्न इंडिया, , ओरीन्तल ब्लाक्स्वान, २००९.


❋❋❋❋❋❋❋

# Digital Receipt

This receipt acknowledges that Turnitin received your paper. Below you will find the receipt information regarding your submission.

The first page of your submissions is displayed below.

| | |
|---|---|
| Submission author: | Pandurang Choudhari |
| Assignment title: | plag_report |
| Submission title: | history_book |
| File name: | sanshodhan_padhati_ani_itihasachi_sadhane.pdf |
| File size: | 2.7M |
| Page count: | 165 |
| Word count: | 82,590 |
| Character count: | 202,380 |
| Submission date: | 07-Dec-2022 04:08PM (UTC+0530) |
| Submission ID: | 1974153235 |



१

## इतिहास– अर्थ, व्याप्ती व स्वरूप

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ इतिहासाचा अर्थ व व्याख्या

१.३ इतिहासाची व्याप्ती

१.४ इतिहासाचे स्वरूप

१.५ सारांश

१.६ प्रश्न

१.७ संदर्भ

### १.० उद्दिष्टे

- इतिहास म्हणजे काय ते सांगून त्याचा अर्थ व व्याख्या संदर्भात चर्चा करणे.
- इतिहासाची व्याप्ती समजून घेवून त्याच्या प्रासंगिकतेवर भाष्य करणे.
- इतिहास विषयाचे स्वरूप समजून घेणे.

### १. १ प्रस्तावना

“इतिहासातील संशोधन पद्धती आणि त्याची साधने”जाणून घेण्याआधी इतिहास म्हणजे काय? इतिहास शब्दाचा अर्थ काय,इतिहासाची व्याप्ती किती? इतिहासाचेस्वरूप कसे आहे? यांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. इतिहासकारांनी भिन्नभिन्न दृष्टिकोनातून ऐतिहासिक घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यातून इतिहाससंदर्भात अनेक सिद्धांत व व्याख्या प्रतिपादन केल्या. तसेच सुरुवातीला राजकीय व लष्करी घटनांपुरते मर्यादित असलेल्या इतिहास अध्ययनाच्या कक्षा वाढत गेल्या. राजकीय घटनांबरोबर इतिहासकारांना सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक घटकांचे ऐतिहासिक मूल्य कळाले. यामुळे त्या अनुषंगाने इतिहासातील संशोधन करण्याचे व अन्वयार्थ लावण्याचे प्रयत्न वाढू लागले. अशा प्रकारे टप्याटप्याने इतिहासाची व्याप्ती वाढत गेली. इतिहासाचा संबंध मानवी जीवनाच्या सर्व घटकांशी असतो. त्यावरून इतिहासाच्या व्यापक स्वरूपाची आपणास कल्पना येण्यास हरकत नाही.

**इतिहासाची संकल्पना प्रामुख्याने तीन गोष्टीवर साकारलेली आहे.**



Copyright 2022 Turnitin. All rights reserved.

# history_book

ORIGINALITY REPORT

| 0% | 0% | 0% | 0% |
|---|---|---|---|
| SIMILARITY INDEX | INTERNET SOURCES | PUBLICATIONS | STUDENT PAPERS |

MATCH ALL SOURCES (ONLY SELECTED SOURCE PRINTED)

< 1%

★ archive.org

Internet Source

| | | | |
|---|---|---|---|
| Exclude quotes | Off | Exclude matches | Off |
| Exclude bibliography | On | | |